
अमर विश्व साहित्य



५

भारतीय ग्रंथ भवन

अमर विश्व साहित्य

: ५ :

अमेरिकन, इंग्लिश, रशियन, फ्रेंच, जर्मन, नॉर्वेजियन अशा
चौदा कादंबऱ्या; ग्रीक, इंग्लिश, अमेरिकन अशीं सात नाटकें;
एक लॅटिन महाकाव्य आणि एक इंग्लिश परीकथा;
अशा एकंदर तेवीस जगप्रसिद्ध ग्रंथांचे सारांश

अनुवादक

स. ह. मोडक

भारतीय ग्रंथ भवन, मुंबई १४

मेसर्स हार्पर अँड ब्रदर्स, न्यू यॉर्क,
यांनीं प्रकाशित केलेल्या
मास्टरपीसेस ऑफ वर्ल्ड लिटरेचर इन् डायजेस्ट फॉर्म
या ग्रंथावरून अनुवादित

पहिली मूळ इंग्रजी आवृत्ति : १९४९
दुसरी मूळ इंग्रजी आवृत्ति : १९५२
पहिली मराठी आवृत्ति : सप्टेंबर, १९६२

मुद्रक-प्रकाशक :
क्र. रा. सामंत,
संचालक,
भारतीय ग्रंथ भवन, मुंबई १४

मुद्रण-स्थळ :
न्यू ईरा प्रिंटिंग प्रेस, वरळी, मुंबई १८

अनुक्रमणिका

ऋ ण नि र्दे श

पुढील कॉपीराइट ग्रंथांचा या भागांत उपयोग करण्यास परवानगी दिल्याबद्दल आम्ही त्या त्या ग्रंथांच्या लेखकांचे वा प्रकाशकांचे आभारी आहोंत:

ॲब्सालोम! ॲब्सालोम! लेखक विल्यम फॉकनेर; खुद्द लेखकाच्या आणि प्रकाशक रॅन्डम हाउस इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९३६, विल्यम फॉकनेर यांचा. **एब लिंकन इन् इलिनॉय,** लेखक रॉबर्ट ई. शेरवुड; खुद्द लेखकाच्या आणि प्रकाशक चार्ल्स स्क्रिब्नर्स सन्स यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९३७, १९३८, १९३९, रॉबर्ट एमेट शेरवुड यांचा. **द ॲडमिरेबल क्रिश्टन,** लेखक जेम्स एम्. बॅरी; प्रकाशक चार्ल्स स्क्रिब्नर्स सन्स यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९१४, चार्ल्स स्क्रिब्नर्स सन्स, १९१८, १९२८, जे. एम्. बॅरी यांचा. **द एज ऑफ इनोसन्स,** लेखक एडिथ व्हार्टन; प्रकाशक ॲपल्टन-सेंचरी-क्रॉफ्ट्स इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें: कॉपीराइट, १९२०, डी. ॲपल्टन ॲंड कंपनी यांचा; पुन्हां नव्यानें घेतलेला कॉपीराइट, १९४७, फ्रेडरिक किंग यांचा. **ॲलेक माओरी, स्पोर्ट्स्मन,** लेखक कॅरोलिन गॉर्डन; खुद्द लेखकाच्या आणि प्रकाशक चार्ल्स स्क्रिब्नर्स सन्स यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९३४, चार्ल्स स्क्रिब्नर्स सन्स यांचा. **ॲलिस ॲडाम्स,** लेखक बूथ टार्किंग्टन; ब्रॅन्ट ॲंड ब्रॅन्ट यांच्या व प्रकाशक डबलडे ॲंड कंपनी इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९२१, डबलडे ॲंड कंपनी इन्कॉर्पोरेटेड, यांचा; पुन्हां नव्यानें घेतलेला कॉपीराइट, १९४९, आर्. सुसान्ना टार्किंग्टन यांचा. **ॲन अमेरिकन ट्रॅजेडी,** लेखक थिओडोर ड्रायसर; मिसेस थिओडोर ड्रायसर यांच्या आणि प्रकाशक द वर्ल्ड पब्लिशिंग कंपनी, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९२५, बोनी ॲंड लाइव्हराइट इन्कॉर्पोरेटेड यांचा. **ॲन्थनी ॲड्व्हर्स,** लेखक हेर्वे ॲलन; खुद्द लेखकाच्या आणि प्रकाशक राइन्हार्ट ॲंड कंपनी इन्कॉर्पोरेटेड, यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९३३, हेर्वे ॲलन यांचा. द **ॲपॉसल,** लेखक शॉलेम आश्च; अनुवादक मॉरिस सॅम्युएल; खुद्द लेखकाच्या आणि प्रकाशक जी. पी. पुटनम ॲंड सन्स यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९४३, शॉलेम आश्च यांचा. द **ॲपल ऑफ द आय,** लेखक ग्लेन्वे वेस्कॉट; खुद्द लेखकाच्या आणि प्रकाशक हार्पर ॲंड ब्रदर्स यांच्या परवानगीनें; कॉपीराइट, १९२४, डायल प्रेस इन्कॉर्पोरेटेड यांचा.

द ॲबे कॉन्स्टन्टाइन

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* लुदोविक हालेवी (१८३४-१९०८). *कथानकाचा प्रकार :* भावनाप्रधान अद्भुतरम्य कथा. *काळ :* १८८१. *स्थळ :* फ्रान्स. *प्रथम प्रकाशन :* १८८२.

प्रमुख पात्रें : **ॲबे कॉन्स्टन्टाइन**, फ्रेंच धर्मोपदेशक. **जियां रेनो**, त्याचा मानलेला मुलगा. **मिसेस स्कॉट**, एक अमेरिकन बाई. **मिस पर्सीव्हल**, तिची बहीण.

समीक्षण : फ्रेंच भाषेच्या अभ्यासवर्गासाठीं उपयुक्त म्हणून ही कथा फार पूर्वीपासून वाचकांची आवडती ठरलेली आहे. रमणीय स्थळें व आनंदी माणसें यांची कथेंत अगदीं रेलचेल आहे. संघर्ष असा तींत जवळ जवळ नाहींच म्हटलें तरी चालेल. खलपुरुष असें नांव ज्या पात्राला कदाचित देतां येईल तो देखील इतका सभ्य दाखविलेला आहे कीं तो नायक-नायिका यांच्या बेतांना फारसा विरोध असा करीतच नाहीं. या कादंबरीचा फ्रेंच ॲकॅडेमीनें विशेष गौरव केला.

कथानक : प्रेमळ वृद्ध धर्मोपदेशक ॲबे कॉन्स्टन्टाइन हा लॉंगेव्हाल घराण्याच्या ग्रामीण वाड्यासमोर थबकला. वाड्यावर लावलेल्या जाहिरातींकडे त्याचें लक्ष गेलें. वाडा व त्याच्या भोंवतालची जागा चार गट करून अगर सगळी एकत्र लिलांवानें विक्रीस काढल्याचा तींत उल्लेख होता. येवढी सगळी इस्टेट विकत घ्यायला वीस लाख फ्रॅंकपेक्षां अधिक रक्कम देण्याची ऐपत पाहिजे. अशी ऐपत असणारा इथें कुणीच निघणार नाहीं. या विचारानें शेजाऱ्यांपाजाऱ्यांप्रमाणेंच ॲबे देखील गालांतल्या गालांत हंसला. त्या जुन्या इस्टेटीच्या जवळून जातांना त्याला तींतल्या वृद्ध सरदारीणबाईची व तिच्या सहवासांत आपला वेळ कसा आनंदांत जात असे याची आठवण झाली. आतां या इस्टेटीचा नवा मालक येणार या गोष्टीची त्याला धास्ती वाटूं लागली. तो कशाला आपल्याला आठवड्यांतून दोनदां पंक्तीला बोलावील? गरिबांना उदार हस्तें मदत करायची त्याला कसली जरूर? आपल्या लहानग्या चर्चमधील सगळ्या प्रार्थनांना तो कसचा हजर राहणार? ॲबेच्या उतारवयाला हा बदल मानवण्याजोगा नव्हता.

तो तसाच पुढें गेला. वाटेंत मादाम द लावार्देन्स या बाईचें लहानसें घर

लागलें. या घरांत ती व तिचा मुलगा पॉल अशीं दोनच माणसें. पॉल तितकासा चांगला निघाला नाहीं. आईनें त्याला दरसाल भरपूर पैसे खर्चायला द्यायचे. या राजेश्रींनीं पॅरिस शहरीं हे सारे पैसे तीन महिन्यांत खलास करायचे आणि बाकीचे नऊ महिने स्वारी पुन्हां या खेड्यांत आईकडे येऊन राहायची. या घरीं अॅबेला एक बातमी कळली. आपला दलाल या इस्टेटीचा निदान एक हिस्सा आपल्याला मिळवून देईल अशी बाईला आशा वाटत होती. लिलांवाच्या बातमीची ती वाटच बघत होती. काय निकाल लागतो तो ऐकायला अॅबेनें आपल्याकडे थांबावें म्हणून बाईनें त्याला आंत बोलावून घेतलें.

दलाल आला. त्यानें या मंडळींना बातमी दिली कीं मिसेस स्कॉट या श्रीमंत अमेरिकन बाईनें ती सगळीं इस्टेट खरेदी केली. अॅबेच्या तोंडचें पाणीच पळालें. अरे बापरे! अमेरिकन! म्हणजे ती प्रॉटेस्टंट पंथाची असणार— म्हणजे निःसंशय पाखंडीच. आपल्या लहानग्या चर्चविषयींच्या त्याच्या आकांक्षा खचायला लागल्या. इस्टेटींतल्या कृत्रिम उष्मागृहांतील (हॉट हाऊसमधील) बगीच्यांतून आलेल्या फुलांच्या गर्दीनें आपलें देवघर यापुढें सजणार नाहीं. वाड्यांतल्या लोकांच्या दातृत्वाचा दिलासा गांवांतल्या गरिबांना यापुढें मिळणार नाहीं. उद्विग्न मनानें तो आपल्या घरीं जेवायला गेला.

अॅबेचा मानलेला मुलगा जियां रेनो त्या रात्रीं त्याच्या पंक्तीला पाहुणा म्हणून जेवायला आलेला होता. जियांचे वडील ज्या रेजिमेंटमध्यें लष्करी अधिकारी होते त्याच रेजिमेंटच्या पुरोहिताचें काम अॅबेकडे होते. दोघांची उत्तमपैकीं दोस्ती होती. जियांचे वडील युद्धांत कामास आल्यावर त्यांच्या पश्चात स्वतःच्या पोटच्या पोराप्रमाणें अॅबेनें या मुलाचें पालनपोषण केलें. वडिलांच्या पावलावर पाऊल टाकून जियांनें लष्करी पेशा पतकरण्याचा हट्ट खरा केला. ज्या दिवशीं त्याचे वडील लढाईत ठार झाले त्याच दिवशीं ठार झालेल्या दोघां सैनिकांच्या अनाथ कुटुंबांना तो वार्षिक तनखा देत असे. अॅबेच्या गांवांतील गरीबगुरिबांना लागेल ती मदत करणें हा तर त्याचा नित्यक्रमच होऊन बसलेला होता.

घरीं आल्यावर जियां बागेंत जाऊन कोशिंबिरीसाठीं पालेभाजी तोडायला लागला. तेवढ्यांत कुणी तरी अॅबेची भेट मागितली. तो वर मान करून बघतांक्षणीं दचकलाच. सुंदर पण साध्या पोशाखांतल्या दोन तरुणी अॅबेची चौकशी करीत

होत्या. आपण मिसेस स्कॉट व तिची बहीण मिस पर्सीव्हल आहोंत अशी त्या दोघींनीं आपली ओळख करून दिली. या अनपेक्षित पाहुण्यांना भेटायला म्हातारा ॲबे बाहेर आला तेव्हां त्याची खूपच तारांबळ उडाली. आपण पूर्वीं फ्रान्सहून कॅनडांत राहायला गेलेल्या कुळांतल्या कॅथोलिकपंथीय आहोंत असें त्यांनीं सांगितल्यावर त्याला जो काय आनंद झाला तो विचारूंच नका. दोघी बायांनीं प्रत्येकीं हजार फ्रँक गरिबांना वांटून देण्यासाठीं ॲबेच्या स्वाधीन केले, तेव्हां तर म्हाताऱ्याला आनंदाश्रू आंवरण्याची मुश्कील झाली. वाड्यांतलीं माणसें हीं गांवाला अजूनहि वरदानच ठरलीं म्हणायचीं.

त्या दोघी स्त्रियांच्या सौंदर्यानें जियां खूपच प्रभावित झाला. दोघींतली जास्त सुंदर कोण हें त्याला कांहीं केल्या ठरवितां येईना. मिस पर्सीव्हल वयानें लहान आणि अधिक उल्हसित होती, तर मिसेस स्कॉटचा प्रसन्न मोहकपणा देखील तितकाच आकर्षक होता. दोघी बायांनीं आपल्या जीवनकथा ॲबेला सांगितल्या. आपण बालपणीं कसे गरिबींत दिवस काढत होतों, आपल्या वडिलांनीं मरतांना कोर्टातले कज्जे अजिबात काढून न घेण्याबाबत आपल्याकडून कसें वचन घेतलें, आणि शेवटीं हे कज्जे आपल्या बाजूनें निकालांत निघाल्यावर आपण कशा लक्षाधीश झालों हें सारें सारें त्यांनीं त्याला सांगितलें. मिसेस स्कॉट म्हणाली, "आतां मी नि माझे यजमान आमच्या नव्या घरीं फ्रान्स देशांतच पुष्कळसं राहायच्या विचारांत आहोंत." त्या बाया निघून गेल्यावर ॲबे व जियां या दोघांनींहि त्यांची मनमुराद स्तुति केली.

पुढच्या अनेक मुलाखतींपैकीं ही पहिली मुलाखत होती. पॅरिस शहरांतील मुक्कामांत तिथल्या ख्याली खुशालीच्या जीवनाचा दोघींना कंटाळा आलेला होता. मिस पर्सीव्हल हिला तर आपल्याला लग्नाची मागणी घालणाऱ्यांच्या भाऊगर्दीचा अगदीं वीट येऊन गेला. एकानें नव्हे, दोघांनीं नव्हे, एकंदर चौतीस पुरुषांनीं तिला लग्नाची मागणी घातली. आणि हे सगळे आपल्याला स्वतःला मागणी घालत नसून केवळ आपल्या संपत्तीलाच मागणी घालत होते ही गोष्ट ती पुरतेपणीं जाणून होती. कांहीं आठवडे निवांतपणीं वाड्यांतच घालवावेत आणि ॲबे व जियां यांच्याखेरीज कुणालाहि भेटायला येऊं देऊं नये असें दोघींनीं ठरविलें. या भेटींच्या मुदतींत जियांचें प्रेम मिस पर्सीव्हलवर जडलें. परंतु पॉल

लावार्दें यानें या दोघींचा परिचय करून घेण्याचा आग्रह धरला तेव्हां जियांला मनस्वी चीड आली.

मिस पर्सीव्हल हिनें चटकन हेरलें कीं पॉल हा पस्तीस नंबरचा मागणीवाला ठरणार. त्याची वागणूक सभ्य होती, तो संभाषण-चतुर होता, परंतु जियांच्या अंगीं असलेल्या ज्या गुणांचें तिला कौतुक वाटे, ते गुण त्याच्यांत नव्हते. जियांला जितकें अधिक वेळां भेटावें, तितका तो तिला अधिकाधिक आवडूं लागला. आणि लवकरच तिच्या ध्यानांत येऊन चुकलें कीं या तरुण लष्करी अधिकाऱ्यावर आपलें मन बसलें आहे.

वाड्यांत झालेल्या पहिल्या नृत्यसमारंभाच्या वेळीं मिस पर्सीव्हल हिला जियांच्या वागण्यावरूनच दिसून आलें कीं त्याचें आपल्यावर प्रेम आहे. पण तो याबाबत कांहींएक बोलला नाहीं. कारण लष्करांतील संसारी जीवन हें तिला सुखावह होणार नाहीं असें त्याचें ठाम मत होतें. त्याच्या वागण्यांत तेवढा सफाईदारपणा नव्हता किंवा ही उणीव भरून काढण्याइतकी श्रीमंतीहि त्याच्याजवळ नव्हती. म्हणून नृत्यसमारंभाचे वेळीं तिच्याबरोबर नाचायची त्याला हिंमतच झाली नाहीं. न जाणों, अशा प्रसंगीं तिच्याविषयींच्या आपल्या प्रेमाचा परिस्फोट झाला तर पंचाईत व्हायची, अशी त्यानें धास्ती घेतली. ती त्याला आपल्याबरोबर नृत्य करायला पाचारण करण्यासाठीं आलेली पाहून तो एकदम निघूनच गेला.

यानंतर वीस दिवस जियांच्या रेजिमेंटचा मुक्काम दूरच्या गांवीं होता. तो परत आल्यावर त्याच्या ध्यानांत आलें कीं आपलें मिस पर्सीव्हलवरील प्रेम भलतेंच वाढलें आहे. शेवटीं त्यानें असें ठरविलें कीं अन्य प्रदेशांतील एखाद्या रेजिमेंटमध्यें आपली बदली करून घेणें हा एकच मार्ग आपण पतकरला पाहिजे. प्रयाणाच्या रात्रीं त्यानें वाड्यांत आपल्याला भेटायला यायला फुरसत नसल्याबद्दल क्षमायाचनेचा निरोप धाडला, आणि ॲबेला त्यानें आपण काय काय केलें तें सारें खुलासेवार सांगितलें. ॲबेनें त्याचें बोलणें अत्यंत आस्थेनें ऐकून घेतलें. तेवढ्यांत अचानक दरवाज्यावर थाप ऐकूं आली आणि मिस पर्सीव्हल सरळ आंत आली. तिनें या अतिप्रसंगाबद्दल या मंडळींची माफी मागितली, पण त्याचबरोबर आपण ॲबेसमोर आपल्या पापाचा कबुलीजबाब देण्यासाठीं आलों

आहोंत असें सांगितलें. जियांनें बाहेर न जातां तिथेंच थांबावें व आपलें बोलणें ऐकावें असेंहि तिनें जियांला विनविलें.

आपलें जियांवर प्रेम असून जियांचेंहि आपल्यावर प्रेम असल्याबद्दल आपली खात्री आहे असें तिनें चक्क सांगून टाकलें. जियांलाहि ही गोष्ट खरी असल्याचें कबूल करणें भाग पडलें. आपल्या संपत्तीपायीं जियांला आपल्या-जवळ लग्नाची मागणी घालायची हिंमत झाली नाहीं हें ती जाणून होती. शेवटीं तिलाच त्याच्याजवळ लग्नाची मागणी घालणें भाग पडलें. अॅबेनें तिच्या या कृतीचें कौतुक केलें आणि दोघांचा वाङ्निश्चय झाला. या सुखी जोडप्याचा विवाहसमारंभ तिथल्या चिमुकल्या चर्चमध्यें चालू असतांना एक सुंदर नवें ऑर्गन प्रार्थनेच्या वेळीं संगीताची साथ करीत होतें. अॅबेला सुखसमाधान वाटलें. जुन्या वाड्याच्या विक्रीमुळें गांवाला न भूतो न भविष्यति असा लाभ झाला.

एब लिंकन इन् इलिनॉय

वाङ्मयप्रकार : नाटक. *लेखक :* रॉबर्ट ई. शेरवुड (१८९६-१९५५). *कथानकाचा प्रकार :* ऐतिहासिक बखर. *काळ :* १८३१-१८६१. *स्थळ :* न्यू सालेम आणि स्प्रिंगफील्ड, इलिनॉय राज्य. *पहिला प्रयोग :* १९३८.

प्रमुख पात्रें : **मेंटॉर ग्रॅहम**, एक शिक्षक. **एब लिंकन. अॅन रटलेज**, एब याची आरंभींची प्रेयसी. **जज्ज बोलिंग ग्रीन**, न्यायमूर्ति—'जस्टिस ऑफ द पीस'. **निनियन एड्वर्ड्स**, एक राजकारणी इसम. **जोशुआ स्पीड**, एक व्यापारी. **विल्यम हेंडरसन**, एब याचा वकिलीव्यवसायांतील कारकून. **मेरी टॉड**, एब याची पत्नी. **स्टीफन ए. डग्लस**, एब याचा राजकीय प्रतिस्पर्धी. **सेठ गेल**, एब याचा मित्र. **जिम्मी गेल**, सेठ याचा लहान मुलगा.

समीक्षण : एब लिंकन यानें केलेल्या धडपडींमध्यें रॉबर्ट शेरवुड या नाटककाराला क्रियाशील लोकशाहीचें प्रतीक दिसून आलें. लोकशाही बाण्याची वाढ दर्शविणाऱ्या या रूपकाची रचना करतांना नाटककाराला लिंकनच्या चरित्रांतील सत्य घटनांचा बऱ्याचशा प्रमाणांत उपयोग करून घेतां आला. परंतु आपला मुख्य मुद्दा प्रेक्षकांच्या मनावर ठसविण्यासाठीं त्याला कित्येक प्रवेशांमध्यें काल्पनिक पात्रें वा प्रसंग निर्माण करून घालावे लागले. या नाटकाला तुम्ही

लावार्दे यानें या दोघींचा परिचय करून घेण्याचा आग्रह धरला तेव्हां जियांला मनस्वी चीड आली.

मिस पर्सीव्हल हिनें चटकन हेरलें कीं पॉल हा पस्तीस नंबरचा मागणीवाला ठरणार. त्याची वागणूक सभ्य होती, तो संभाषण-चतुर होता, परंतु जियांच्या अंगीं असलेल्या ज्या गुणांचें तिला कौतुक वाटे, ते गुण त्याच्यांत नव्हते. जियांला जितकें अधिक वेळां भेटावें, तितका तो तिला अधिकाधिक आवडूं लागला. आणि लवकरच तिच्या ध्यानांत येऊन चुकलें कीं या तरुण लष्करी अधिकाऱ्यावर आपलें मन बसलें आहे.

वाड्यांत झालेल्या पहिल्या नृत्यसमारंभाच्या वेळीं मिस पर्सीव्हल हिला जियांच्या वागण्यावरूनच दिसून आलें कीं त्याचें आपल्यावर प्रेम आहे. पण तो याबाबत कांहींएक बोलला नाहीं. कारण लष्करांतील संसारी जीवन हें तिला सुखावह होणार नाहीं असें त्याचें ठाम मत होतें. त्याच्या वागण्यांत तेवढा सफाईदारपणा नव्हता किंवा ही उणीव भरून काढण्याइतकी श्रीमंतीहि त्याच्याजवळ नव्हती. म्हणून नृत्यसमारंभाचे वेळीं तिच्याबरोबर नाचायची त्याला हिंमतच झाली नाहीं. न जाणों, अशा प्रसंगीं तिच्याविषयींच्या आपल्या प्रेमाचा परिस्फोट झाला तर पंचाईत व्हायची, अशी त्यानें धास्ती घेतली. ती त्याला आपल्याबरोबर नृत्य करायला पाचारण करण्यासाठीं आलेली पाहून तो एकदम निघूनच गेला.

यानंतर वीस दिवस जियांच्या रेजिमेंटचा मुक्काम दूरच्या गांवीं होता. तो परत आल्यावर त्याच्या ध्यानांत आलें कीं आपलें मिस पर्सीव्हलवरील प्रेम भलतेंच वाढलें आहे. शेवटीं त्यानें असें ठरविलें कीं अन्य प्रदेशांतील एखाद्या रेजिमेंटमध्यें आपली बदली करून घेणें हा एकच मार्ग आपण पतकरला पाहिजे. प्रयाणाच्या रात्रीं त्यानें वाड्यांत आपल्याला भेटायला यायला फुरसत नसल्याबद्दल क्षमायाचनेचा निरोप धाडला, आणि ॲबेला त्यानें आपण काय काय केलें तें सारें खुलासेवार सांगितलें. ॲबेनें त्याचें बोलणें अत्यंत आस्थेनें ऐकून घेतलें. तेवढ्यांत अचानक दरवाज्यावर थाप ऐकूं आली आणि मिस पर्सीव्हल सरळ आंत आली. तिनें या अतिप्रसंगाबद्दल या मंडळींची माफी मागितली, पण त्याचबरोबर आपण ॲबेसमोर आपल्या पापाचा कबुलीजबाब देण्यासाठीं आलों

आहोंत असें सांगितलें. जियांनें बाहेर न जातां तिथेंच थांबावें व आपलें बोलणें ऐकावें असेंहि तिनें जियांला विनविलें.

आपलें जियांवर प्रेम असून जियांचेंहि आपल्यावर प्रेम असल्याबद्दल आपली खात्री आहे असें तिनें चक्क सांगून टाकलें. जियांलाहि ही गोष्ट खरी असल्याचें कबूल करणें भाग पडलें. आपल्या संपत्तीपायीं जियांला आपल्याजवळ लग्नाची मागणी घालायची हिंमत झाली नाहीं हें ती जाणून होती. शेवटीं तिलाच त्याच्याजवळ लग्नाची मागणी घालणें भाग पडलें. ॲबेनें तिच्या या कृतीचें कौतुक केलें आणि दोघांचा वाङ्निश्चय झाला. या सुखी जोडप्याचा विवाहसमारंभ तिथल्या चिमुकल्या चर्चमध्यें चालू असतांना एक सुंदर नवें ऑर्गन प्रार्थनेच्या वेळीं संगीताची साथ करीत होतें. ॲबेला सुखसमाधान वाटलें. जुन्या वाड्याच्या विक्रीमुळें गांवाला न भूतो न भविष्यति असा लाभ झाला.

एब लिंकन इन् इलिनॉय

वाङ्मयप्रकार : नाटक. *लेखक :* रॉबर्ट ई. शेरवुड (१८९६-१९५५). *कथानकाचा प्रकार :* ऐतिहासिक बखर. *काळ :* १८३१-१८६१. *स्थळ :* न्यू सालेम आणि स्प्रिंगफील्ड, इलिनॉय राज्य. *पहिला प्रयोग :* १९३८.

प्रमुख पात्रें : **मेंटॉर ग्रॅहम,** एक शिक्षक. **एब लिंकन. ॲन रटलेज,** एब याची आरंभींची प्रेयसी. **जज बोलिंग ग्रीन,** न्यायमूर्ति—'जस्टिस ऑफ द पीस'. **निनियन एड्वर्ड्स,** एक राजकारणी इसम. **जोशुआ स्पीड,** एक व्यापारी. **विल्यम हेंडरसन,** एब याचा वकिलीव्यवसायांतील कारकून. **मेरी टॉड,** एब याची पत्नी. **स्टीफन ए. डग्लस,** एब याचा राजकीय प्रतिस्पर्धी. **सेठ गेल,** एब याचा मित्र. **जिम्मी गेल,** सेठ याचा लहान मुलगा.

समीक्षण : एब लिंकन यानें केलेल्या धडपडींमध्यें रॉबर्ट शेरवुड या नाटककाराला क्रियाशील लोकशाहीचें प्रतीक दिसून आलें. लोकशाही बाण्याची वाढ दर्शविणाऱ्या या रूपकाची रचना करतांना नाटककाराला लिंकनच्या चरित्रांतील सत्य घटनांचा बऱ्याचशा प्रमाणांत उपयोग करून घेतां आला. परंतु आपला मुख्य मुद्दा प्रेक्षकांच्या मनावर ठसविण्यासाठीं त्याला कित्येक प्रवेशांमध्यें काल्पनिक पात्रें वा प्रसंग निर्माण करून घालावे लागले. या नाटकाला तुम्ही

इतिहास म्हणा वा रूपक म्हणा, त्याच्या प्रमुख पात्राच्या इतकेंच तें सत्यपूर्ण अमेरिकन नाटक ठरलें आहे.

कथानक : सन १८३१ चा उन्हाळा. एब लिंकन बावीस वर्षांचा होता. तो इलिनॉय राज्यांतील न्यू सालेम या गांवीं दाखल झाला. त्या वेळीं हें गांव म्हणजे पंधरा लांकडी झोंपड्या असलेलें पश्चिम अमेरिकेच्या सरहद्दीवरचें खेडें होतें. यानंतर लवकरच या हडकुळ्या तरुणानें बेरी नामक एका मित्राच्या भागीदारींत जनरल स्टोअर्सचें एक दुकान सुरू केलें. त्यांच्या दुकानीं व्हिस्कीचा सांठा विक्रीसाठीं ठेवलेला असे. बेरी या व्हिस्कीच्या पिंपाचा नळ खोलून इतकी दारू पिऊं लागला कीं अखेर या दुकानाचें सगळें खेळतें भांडवल त्यानें पिऊन फस्त केलें आणि दुकानाचें दिवाळें वाजलें. एब यानें भागीदारींतल्या देण्याची सगळी जबाबदारी स्वतःच्या एकट्याच्या शिरावर घेतली आणि तो पंधरा हजार डॉलर कर्ज करून बसला.

त्या वेळीं शेजारचा शाळामास्तर मेन्टॉर ग्रॅहॅम याजकडे एब जेवत असे. या मास्तरानें इथल्या आडरानांतल्या लोकांना व्याकरणाचीं मूलतत्वें शिकवायचें कार्य आरंभलें. त्यानें एब याच्या मनांत पहिल्या प्रतीच्या वक्तृत्वाविषयीं गोडी निर्माण केली आणि काव्यरसाचा आस्वाद कसा घ्यायचा हेंहि त्याला शिकविलें. आपला विद्यार्थी अत्यंत उद्विग्न मनःस्थितींत असतो, त्याला मरणाचा ध्यास लागलेला आहे, आणि विशेष मेहनत करावी लागेल असलें कोणतेंच काम करण्याला तो मुळींच उत्सुक नसतो हें ग्रॅहॅमच्या ध्यानांत आलें. त्यानें एब याला राजकारणांत शिरण्याचा सल्ला दिला. त्यानें रुक्षपणानें त्याला असें चक्क सांगूनच टाकलें कीं "बाबा रे, जो माणूस इतर एकूणएक बाबतींत अपेशी ठरलेला असेल त्याच्यासाठीं दोनच धंद्यांचीं दारें खुलीं असतात—एक शाळामास्तरकी आणि दुसरें राजकारण."

आणखी एक वर्षानें एब याला तशी संधि मिळाली. त्या वेळीं तो स्थानिक पोस्टमास्तराची नोकरी करीत होता. निनियन एडवर्ड्स हा तरुण राजकारणी इसम न्यू सालेम येथील रटलेज हॉटेलांत दाखल झाला. हा प्रेसिडेंट जॅकसनचा जोरदार विरोधक होता. राज्यविधानसभेची आमदारकी स्वीकारणारा कुणी उमेदवार मिळेल तर बघावा म्हणून तो शोध करीत होता. जॅकसनच्या कित्येक भांडकुदळ पाठिराख्यांना एब यानें कसें कौशल्यानें ठिकाणावर आणलें. याचें एडवर्ड्स खूप

कौतुक करूं लागला. इतकें कीं अखेरीस त्यानें एब यालाच आमदारकीची उमेदवारी देऊं केली.

त्याच्या या सूचनेला जोशुआ स्पीड हा व्यापारी व जज्ज बोलिंग ग्रीन हा जे. पी., या एब याच्या दोघां निष्ठावंत व वजनदार सालेम-निवासी मित्रांचा पाठिंबा होता. परंतु एब याचा विचार असा होता कीं आपण आणखी पुढें पश्चिमेकडच्या भागांत स्थलांतर करावें. म्हणून त्यानें नकार दिला. मग त्याचा हा विचार बदलण्याला कारणीभूत होणाऱ्या कित्येक घटना घडल्या. ज्याच्याबरोबर पश्चिमेकडे स्थलांतर करावयाचा बेत त्यानें आंखलेला होता तो त्याचा मित्र सेठ गेल याचे वडील आजारी असल्याची बातमी आली, आणि सेठ याला तावडतोब आपलें मूळ राज्य मेरीलँड इकडे परत जाणें भाग पडलें. आणि जिच्यावर एब चोरून प्रेम करीत होता ती स्थानिक हॉटेलवाल्याची कन्यका ॲन रटलेज हिला न्यूयॉर्क राज्यांतून असें पत्र आलें कीं ज्याच्यावर तिचें प्रेम होतें तो मॅकनील हा तरुण इसम न्यू सालेमला परत येऊं शकणार नाहीं. तेवढ्यांत एब यानें ॲन-जवळ आपल्या प्रेमाचा परिस्फोट केला. तिच्या पूर्वीच्या प्रियकरानें तिचा अगोदरच भ्रमनिरास केलेला होता. म्हणून ॲन हिनें एब याला या बाबतींत उत्तेजन दिलें. याचा परिणाम असा झाला कीं आपण राज्यविधानसभेच्या आमदारकीसाठीं उमेदवार म्हणून उभे राहायला तयार आहोंत असा निरोप एब यानें आपला मित्र जज्ज बोलिंग ग्रीन याच्या हातीं धाडून दिला.

दैवानें एब याच्या नशिबाला आणखी एक अधिकच प्रलयकारी कलाटणी दिली. ॲन रटलेज एकाएकीं तापानें आजारी झाली. डॉक्टरनें वा एब यानें तिला बरी करण्यासाठीं प्रयत्नांची शर्थ केली तरी तिचे प्राण वांचूं शकले नाहींत. ॲन हिच्या मृत्यूनंतर एब उद्वेगाच्या झटक्याच्या संपूर्णपणें आहारीं गेला. त्यांतून त्याचे कुणीहि मित्र त्याला बाहेर काढूं शकेनात. मग त्यानें स्प्रिंगफील्ड येथें आपला मित्र जज्ज स्टुअर्ट याच्या समवेत वकिली चालू केली, पण त्यानें राजकारणांत विशेष लक्ष घालण्यास अजिबात नकार दिला. त्याच्या वकिली व्यवसायांतला कारकून विल्यम हेर्नडन हा गुलामगिरी नष्ट करण्याचा कट्टर पुरस्कर्ता होता, आणि या कारकुनानें त्याला राजकारणांत लक्ष घालण्याचा सतत आग्रह चालविला. तरीहि त्यानें या बाबतींत अलिप्त राहण्याचा हट्ट तसाच चालूं ठेवला. एब याला गुलामगिरीची प्रथा बिलकुल नापसंत होती.

तरी पण गुलामगिरीच्या प्रथेचे विरोधक देशाची फाळणी करण्याची धमकी देऊन गुलामांच्या विमोचन कार्याला मदतच करीत आहेत या गोष्टीचें आकलन त्याला कांहीं केल्या होईना.

एब याला त्याच्या आळशीपणाच्या व्याधींतून बाहेर काढण्यासाठीं कांहीं तरी करणें भागच होतें. म्हणून त्याचा राजकीय गुरु निनियन एडवर्ड्स यानें आपली महत्वाकांक्षी मेव्हणी मेरी टॉड हिच्याशीं त्याची ओळख करून दिली. आपण ज्याला मोठमोठ्या गोष्टी करण्यासाठीं उत्स्फूर्त करूं शकूं असाच लिंकन हा माणूस आहे हें मेरीनें चटकन हेरून घेतलें. तिची राजविलासी बहीण एलिझाबेथ हिला मेरीच्या या वृत्तीचें आकलनच होईना. पश्चिम सरहद्दीवरच्या या हडकुळ्या माणसांत मेरीला काय येवढें गुणांचें भांडार सांपडलें हें एलिझाबेथला कांहीं केल्या कळेना. पण मेरीला मात्र आपल्या स्वतःच्या विफल आकांक्षांची परिपूर्ति याच्याकडून करून घेतां येईल असें दिसून आलें. दोघांचा साखरपुडा झाला.

पण एब याला ॲन रटलेज हिचा विसर नव्हता पडलेला. मेरीशीं लग्न व्हायच्या दिवशींच त्यानें आपला मित्र जोशुआ याला परोपरीनें विनवून सांगितलें कीं "माझं मेरीवर प्रेम नाहीं हें तिला समजावून सांगणारं पत्र मीं तुझ्याजवळ देतोंय. तें कसंहि करून तूं स्वतः तिला नेऊन दे." स्पीडनें आग्रह धरला कीं "तूं स्वतः मेरीला जाऊन भेट आणि तिला समजावून सांग कीं आपल्याल तुझं भय वाटतं, लग्नानंतर तूं आपल्याकडे ज्या एकेक मागण्या करशील त्यांची आपण धास्ती घेतलेली आहे." त्याप्रमाणें एब स्वतः जाऊन मेरी टॉड हिला भेटला, आपल्या वतीनें त्यानें तिच्याजवळ सगळे खुलासे करून तिची मानखंडना केली आणि मग स्वारी पुन्हां पश्चिमेकडील सरहद्दीवरच्या गवताळ प्रदेशांत परत येऊन राहिली.

एके दिवशीं त्याला आपला जुना मित्र सेठ गेल हा अचानक भेटला. या सेठसमवेत त्यानें एका काळीं पश्चिमेकडील प्रदेशांत नशीब काढण्यासाठीं जाण्याचे मनसुबे रचलेले होते. सेठ आपल्या पत्नीला व लहानग्या मुलाला बरोबर घेऊन मेरीलँड राज्यांतून निघाला होता. त्याला ऑरेगॉन राज्यांत जायचें होतें. परंतु त्याचा मुलगा जिम्मी आजारी पडला. सेठला वाटलें कीं जर का आपला मुलगा या आजारांत दगावला, तर पुढचा प्रवास चालू करण्याची

हिंमत आपल्यालाहि होणार नाहीं अगर आपल्या पत्नीलाहि होणार नाहीं. मित्रावर ओढवलेल्या या संकटामुळें एब याचा आंतला आवाज एकदम जागृत झाला. या आंतल्या आवाजानें एब याला असा कानमंत्र दिला कीं "तुझ्या मित्रावर ओढवलेलें संकट हें तुझ्या अवघ्या देशावर ओढवलेल्या संकटाचें प्रतीकच आहे." गुलामगिरीची प्रथा ड्रेड स्कॉटच्या निर्णयानुसार पश्चिमेकडील प्रदेशांतहि आपला व्याप पसरूं लागेल अशी शक्यता निर्माण झालेली होती. असें जर प्रत्यक्षांत घडलें तर सेठ गेल याजसारखे जे लोक पश्चिम भागांत नव्या जीवनाची उभारणी करण्याची खटपट करीत होते त्यांच्यावर हें प्राणसंकटच ओढवणार होतें. भवितव्याच्या या दर्शनामुळें एब याचा जीवनहेतु निश्चित झाला. आणि छोट्या जिम्मीचे प्राण वांचविण्यासाठीं जेव्हां तो परमेश्वराची आळवणी करूं लागला तेव्हां त्याच वेळीं त्याचें मन एकंदर देशाला वांचविण्याच्या विचारानेंच भारावून गेलें. या नव्या उद्दिष्टाची प्रेरणा घेऊन त्यानें स्वाभिमानाच्या कल्पनांना तिलांजलि दिली व तो मेरी टॉड हिला परत शरण गेला. त्याच्यावरील तिचा विश्वास अजूनहि कायम होता. म्हणून तिनें क्षणभरहि कांकूं न करतां त्याच्या प्रेमयाचनेचा स्वीकार केला.

त्या दिवसापासून त्याची कर्तबगारी एकाच सरळ रेषेनें चालूं लागली आणि तिचें पर्यवसान शेवटीं असें झालें कीं अमेरिकेच्या अध्यक्षपदासाठीं उमेदवार म्हणून त्याचें नांव पुढें आलें. आगामी निवडणुकींत त्याचा प्रतिस्पर्धी म्हणून उभा राहणारा उमेदवार स्टीफन ए. डग्लस याच्याशीं त्याचे जाहीर वादविवाद होऊं लागले. त्याच्या स्वतःच्या पक्षांतील अनेक अंतर्गत राजकीय प्रश्न त्यानें स्वतःचा आब कायम ठेवून मोठ्या हिकमतीनें हाताळले. पण मेरी टॉड हिच्यासमवेत त्याचें जें खासगी सांसारिक जीवन चाललेलें होतें तेंहि तसें म्हटलें तर सगळ्यांत जास्त महत्वाचें होतें. लग्नानंतरच्या या मुदतींत तिला त्याच्यापासून चार मुलगे झाले. त्यांपैकीं एक मुलगा निवर्तला. या काळांत तिचा स्वभाव भयंकर द्राष्टिक व चिडखोर झाला. शेवटीं गोष्टी इतक्या थराला गेल्या कीं या लिंकन पतिपत्नींचें सांसारिक जीवन त्यांना जवळ जवळ असह्य होऊन बसलें. बिचारा एब पत्नीचे टीकाप्रहार घरांतल्या घरांत शांतपणें सहन करीत होता, परंतु मेरी जेव्हां त्याच्यावर जाहीरपणें टीका करूं लागली तेव्हां मात्र त्यानें तिचा प्रतिकार केला. ऐन निवडणुकीच्या रात्रींच तिला असाच संतापवायूचा

एक भयंकर झटका आला आणि राष्ट्राध्यक्षाची पत्नी या नात्यानें तिला देशांतील सर्वोच्च मान प्राप्त करून देणाऱ्या विजय-दिनाच्या आदल्या रात्रीं तिची घरीं रवानगी करणें एब्र याला भाग पडलें.

देशांतील सर्वोच्च अशा राष्ट्राध्यक्षपदावर निवड झाल्यानंतर लिंकनच्या मागील कटकटी आणखीच वाढल्या. उद्विग्न मनःस्थिति व मरणाचा ध्यास या त्याच्या जुन्या दुखण्यांनीं आतां पुन्हां उचल खाल्ली. अखेरीस १८६१ सालांतील तो युगप्रवर्तक दिवस उजाडला. स्प्रिंगफील्डहून वॉशिंग्टनला त्याला घेऊन जाणाऱ्या आगगाडीच्या डब्यांतील मागच्या सज्जांत तो उभा राहिला. त्या वेळीं त्याला निरोप देण्यासाठीं तिथें जमलेल्या जुन्या शेजाऱ्यापाजाऱ्यांना व स्नेह्यांना उद्देशून त्यानें अमेरिकेच्या भवितव्याविषयींचीं आपलीं ध्येयें समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. अध्यक्षाची गाडी स्टेशनांतून मार्गस्थ होऊन जसजशी दूर जाऊं लागली तसतसे त्याच्या हितचिंतकांच्या तोंडून "जॉन ब्राउन्स बॉडी" या सांघिक गीताचे "हिज सोल गोज मार्चिंग ऑन" (त्याचा आत्मा आगेकूच करीत चालला आहे) हे शेवटच्या कडव्याचे सूर त्याला ऐकूं येत होते.

"ॲब्सालोम्, ॲब्सालोम् !"

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* विल्यम फॉकनेर (१८९७-१९६२). *कथानकाचा प्रकार :* मानसशास्त्रीय वास्तववाद. *काळ :* एकोणिसावें शतक. *स्थळ :* मिसिसिपी राज्य (उत्तर अमेरिकेच्या दक्षिण भागांतील एक घटक राज्य). *प्रथम प्रकाशन :* १९३६.

प्रमुख पात्रें : **थॉमस सुट्पेन**, 'सुट्पेन्स हंड्रेड' म्हणजे सुट्पेननें स्वतः खरेदी केलेल्या शंभर चौरस मैल क्षेत्रफळ असलेल्या मळे-जमिनीचा मालक. **एलन कोल्डफील्ड सुट्पेन**, त्याची पत्नी. **हेन्री** आणि **ज्युडिथ**, त्यांचीं मुलें. **रोझा कोल्डफील्ड**, एलनची धाकटी बहीण. **गुडह्यू कोल्डफील्ड**, एलन आणि रोझा यांचे वडील. **चार्ल्स बॉन**, थॉमस सुट्पेन याचा प्रथम पत्नीपासून झालेला मुलगा. **कैंटिन कॉम्पसन**, रोझा कोल्डफील्ड हिचा तरुण मित्र. **श्रेव्हे मॅककॅनन**, हार्वर्ड विद्यापीठांतील वसतिगृहांत कैंटिनच्या खोलींत राहणारा त्याचा सहाध्यायी.

समीक्षण : विल्यम फॉकनेर याच्या कादंबऱ्यांपैकीं सगळ्यांत जास्त गुंतागुंत असलेली अशी ही कादंबरी आहे. कारण तींत वर्णन केलेल्या घटना प्रत्यक्ष घडून गेल्यानंतर कित्येक वर्षांनीं आठवणींच्या रूपानें तिच्या कथानकाचा आविष्कार केलेला आहे. अनुभवाचें निवेदन तींत जास्तींत जास्त व्यक्त स्वरूप पावलेलें आहे. या अनुभवाचें महत्व मुद्दाम आठवण करून सांगितलेलें आहे आणि त्यानंतर कित्येक वर्षांनीं त्याचें अवशिष्ट राहिलेलें वैशिष्ट्य यथातथ्यपणें नमूद केलेलें आहे. कथाकथनाच्या रूढ पद्धतीचा अवलंब अजिबात केलेला नाहीं. आपल्या खास निवेदनपद्धतीनुसार मानवी कृतीची व मानवी भावनेची पुनर्निर्मिति तिच्या मूळ प्रकृतिधर्मानुसार करण्यांत फॉकनरेला या कादंबरींत यश लाभलेलें आहे. तत्क्षणीं उमटलेले संवेदनांचे संस्कार, प्रचंड प्रेरक शक्ती ठरणाऱ्या कौटुंबिक परंपरा, शोकपर्यवसायी आघात—या सगळ्या गोष्टी वाचकांच्या मनांत सत्यस्वरूपांत केंद्रित होतात आणि अशा प्रकारें अत्यंत बारीकसारीक तपशिलांनीं युक्त असें एकोणिसाव्या शतकांतील अमेरिकेच्या दक्षिण भागांतील जीवनाचें ठसठशीत चित्र वाचकाच्या कल्पनासृष्टीमध्यें संथपणें भव्य आकार धारण करतें. 'अॅब्सालोम्, अॅब्सालोम्!' ही महान सामर्थ्यशाली व शोक-पर्यवसायी प्रभाव पाडणारी कादंबरी आहे.

कथानक : सन १९१० चा उन्हाळा. क्वेंटिन कॉम्पसन याची हावर्ड विद्यापीठांत जाण्याची तयारी चाललेली होती. रोझा कोल्डफील्ड ही वृद्ध बाई त्याला म्हणाली, "हें बघ, थॉमस सुट्पेन यांची संपूर्ण अभद्र कहाणी मी तुला सांगत्यें. ती तूं ऐकून घेतलीच पाहिजेस." हा सुट्पेन तिच्या मतें राक्षसच होता. ज्यांनीं ज्यांनीं त्याच्याशीं कसला ना कसला व्यवहार केला, त्या त्या सगळ्यांनीं त्याची धास्ती घेतली व त्यांचें त्याच्यापायीं वाटोळें झालें असें मिस रोझा हिचें म्हणणें होतें.

१८८३ सालीं थॉमस सुटपेन हा एक उमदा घोडा व दोन पिस्तुलें घेऊन मिसिसिपी राज्यांतील जेफरसन या गांवीं आला. त्याचें पूर्वचरित्र कुणालाच ठाऊक नव्हतें. कांहीं काळ हॉटेलांतल्या लोकांसमवेत त्याचें त्या गांवीं रहस्यमय वास्तव्य घडलें आणि थोड्याच अवधीनंतर तो नाहींसा झाला. गांवगप्पा अशा सुरू झाल्या कीं त्यानें चिक्सॉ या रेड इंडियन जमातीकडून शंभर चौरस मैल

क्षेत्रफळाची जंगल-जमीन खरेदी केली असून या जमिनीला मोठ्या मळ्याचें रूप देण्याचा त्याचा बेत आहे.

तो जो परत आला तो पिसाट दिसणारे गाडीभर नीग्रो गुलाम घेऊन. आपल्याबरोबर त्यानें एक फ्रेंच वास्तुशिल्पज्ञ आणलेला होता. कांहीं हत्यारें व गाड्याहि त्यानें आणलेल्या होत्या. मात्र या वेळीं देखील स्वारी जी आली ती पहिल्याप्रमाणेंच कुणाशीं कांहीं एक न बोलतां आपलें काम करायला लागली. ताबडतोब त्यानें जंगलतोड चालू केली व एक हवेली बांधण्याचें काम आरंभलें. दोन वर्षें तो एकसारखा राबत होता आणि या साऱ्या मुदतींत त्यानें जेफरसन गांवांतील आपल्या ओळखीच्या लोकांची एकदां देखील गांठभेट घेतली असेल का नाहीं याची शंकाच होती. त्याला येवढा पैसा कुठून मिळाला याचें लोकांना राहून राहून कुतूहल वाटे. कुणी ठांसून सांगूं लागले कीं "याचें हें रहस्यमय जाणें येणें चालू असतें ना! असाच कुठें तरी डल्ला मारून यानें पैसा आणला असला पाहिजे!" मग पुढचीं तीन वर्षें त्याचें घर बांधायचें काम अपुरेंच राहिलें. खिडक्यांना तावदानें बसविलेलीं नव्हतीं. घरांत सजावट सामान कसलेंच आणलेलें नव्हतें. इकडे त्या मुदतींत थॉमस सुट्पेन आपल्या शेतीव्यवसायांत गढून गेला. अधूनमधून तो जेफरसन गांवच्या मंडळींना आपल्या मळ्यावर शिकारीसाठीं येण्याचें आमंत्रण देई. दारू, पत्ते व आपल्या प्रचंड शक्तिशाली गुलामांच्या राक्षसी साठमाऱ्यांचे कार्यक्रम या करमणुकीच्या प्रकारांनीं तो त्यांचें मनोरंजन करी. या साठमाऱ्यांमध्यें कधीं कधीं तो स्वतः देखील खेळ म्हणून भाग घेत असे.

शेवटीं तो पुन्हां एकदां नाहींसा झाला. आणि परत आल्यावर आपल्या घराची सजावट त्यानें इतक्या सुंदर प्रकारें व इतकी तपशीलवार केली कीं त्याची ऐसपैस हवेली ही एक उत्तमपैकीं प्रेक्षणीय स्थळ होऊन बसली. त्याच्या या रहस्यमय कृतींमुळें गांवांतील लोकभावना त्याच्याविरुद्ध उलटली. पण गांवांतील अत्यंत आदरणीय असे गुडह्यू कोल्डफील्ड यांची कन्या एलेन कोल्डफील्ड हिच्याशीं त्यानें लग्न केल्यावर लोकांच्या मनांतला हा वैरभाव कांहीं अंशीं ओसरला.

मिस रोझा व क्वेंटिनचे वडील यांना सुट्पेन याच्या भानगडींचा उलगडा कांहीं प्रमाणांत झालेला होता. क्वेंटिन हा दूरच्या ठिकाणीं कॉलेजांत शिकत

असल्यामुळें त्याला 'सुटपेन्स हंड्रेड' विषयीं ज्या अनेक गोष्टी कळल्या त्यांतल्या बऱ्याचशा गोष्टी घरून आलेल्या पत्रांतून त्याला माहीत झाल्या. इतर तपशील त्याला वडिलांशीं समक्ष बोलतांना ठाऊक झाले.

त्या आडरानांतील विलक्षण हवेलीची मालकीण या नात्यानें एलेन सुट्पेन कशा प्रकारें कालक्रमणा करीत होती हें त्याला कळून आलें. आपले यजमान आपल्याच एका गुलामाशीं निकरानें लढत आहेत याचा तिला पत्ता लागला. हा भयंकर प्रकार बघून लहानगा हेन्री सुट्पेन तर बेशुद्धच झाला. पण त्यांची कन्या ज्युडिथ ही हा सामना गवताच्या गंजीवर बसून मजेंत बघत राहिली व तिला त्यांत खूप गंमत वाटली. त्यानंतर एलेननें आपल्या खऱ्या भावना उघड करून दाखविण्यास साफ नकार दिला आणि आपल्या मळ्याविषयीं गांवचे लोक करीत असलेल्या कुटाळक्यांकडे तिनें अजिबात दुर्लक्षच केलें.

पुढें मुलें लहानाचीं मोठीं झालीं. तरुण हेन्रीनें वडिलांच्या एकदम उलट वळण घेतलें. तो मिसिसिपीच्या ऑक्सफर्ड विद्यापीठांत उच्च शिक्षणासाठीं दाखल झाला. तिथें एका श्रीमंत मळेवाल्याचा नातू चार्ल्स बॉन याच्याशीं त्याची ओळख झाली. हा चार्ल्स म्हणजे आपला सावत्रभाऊ आहे हें हेन्रीला ठाऊक नव्हतें. तो सुट्पेनच्या पहिल्या बायकोचा मुलगा होता. जेफरसन गांवांतील कुणालाहि नकळत सुट्पेन यानें चार्ल्स बॉन याच्या वेस्ट इंडियन आईशीं अगोदर लग्न केलें होतें व या लग्नांत हुंड्याच्या रूपानें त्याला खूप पैसा मिळालेला होता. पुढें ही पत्नी अंशतः नीग्रो वंशीय आहे असें त्याला कळलें तेव्हां त्यानें तिला टाकून दिलें होतें.

चार्ल्स बॉन याचा ज्युडिथ सुट्पेन हिच्याशीं वाङ्निश्चय झाला. पण हें लग्न अचानक चार वर्षें लांबणीवर पडलें. कारण त्या सुमारास अमेरिकेंतील नीग्रोंच्या गुलामगिरीचे पुरस्कर्ते व या गुलामगिरीचे विरोधक यांच्या दरम्यान यादवीयुद्ध सुरू झालें. चार्ल्स व हेन्री हे दोघे मिळून लढाईवर गेले. थॉमस सुट्पेन या युद्धांत कर्नल झाला.

गुडह्यू कोल्डफील्ड यानें या युद्धाच्या विरुद्ध भूमिका घेतली व तो त्याविषयीं अत्यंत तुच्छता दर्शवूं लागला. त्यानें आपल्या पोटमाळ्यावर स्वतःला कोंडून घेतलें. आणि तिथून एका लांब दोरीला लटकावलेल्या टोपलींतून त्याचें जेवण वर पाठवून देणें त्याची मुलगी रोझा हिला भाग पडलें. नीग्रोंच्या

गुलामगिरीची प्रथा चालू ठेवण्यासाठीं मध्यवर्ती सरकारच्या अखत्यारांतून फुटून निघूं इच्छिणाऱ्या 'कॉन्फेडरेट' बंडखोरांच्या सैनिकांनीं त्याची कोठीची खोली लुटून फस्त केली. एका रात्रीं आपल्या पोटमाळ्यावर एकाकी अवस्थेंत असतांनाच त्याला मृत्यु आला.

दरम्यान ज्युडिथ आपल्या प्रियकराशीं मीलन होण्यासाठीं धीर धरून वाट बघत राहिलेली होती. चार वर्षांची मुदत संपल्यावर, त्यानें तिला जें पत्र लिहिलेलें होतें तें घेऊन ती क्लेटिनच्या आजीकडे गेली. त्यानंतर सुमारें एक आठवड्यानें सुट्पेनच्या मळ्यावरील वॉश जोन्स हा हरकाम्या मिस रोझा हिच्या दाराशीं आला आणि चार्ल्स बॉन याचा खून झाल्याची बातमी मागचा पुढचा विचार न करतां सांगून मोकळा झाला. चार्ल्सचा सावत्र भाऊ व माजी मित्र हेन्री यानेंच हा खून मळ्याच्या कंपौंडाच्या फाटकाजवळ केलेला होता. मग हेन्री फरारी झाला. ज्युडिथनें आपल्या प्रियकराचें दफन सुट्पेन कुटुंबासाठीं मळयांत राखून ठेवलेल्या स्मशानभूमींत केलें. मिस रोझा हिची आई ती जन्माला आल्याबरोबरच मरण पावलेली होती. आतां मिस रोझा ही आपल्या भाचीच्या सोबतीला 'सुट्पेन्स हंड्रेड' या मळ्यावर राहायला गेली. एलेन तर अगोदरच मरून गेलेली होती. आपण आपली भाची ज्युडिथ हिला मदत करूं शकतों अशी मिस रोझाला खात्री वाटत होती.

कर्नल थॉमस सुट्पेन यादवी युद्धावरून परत आला. त्याचे गुलाम आतां त्याच्या ताब्यांतून सोडवून मुक्त करण्यांत आले होते. त्याच्या मळ्याची लूट झालेली होती. आतां त्याच्या बेकाम जमिनीवर व उध्वस्त इमारतीवर नव्या करांचा बोजा बसलेला होता. त्यानें मिस रोझा कोल्डफील्ड हिच्याशीं लग्न करायचा बेत योजिला. ज्युडिथनें आजन्म अविवाहित राहण्याची शपथ घेतलेली, आणि हेन्री तर परागंदा झालेला. अशा परिस्थितींत आपल्या इस्टेटीला कुणी तरी नवा वारस हवा. या तीव्र इच्छेपोटींच रोझाशीं लग्न करण्याचा त्याचा विचार बळावला. त्याचा मुलगा चार्ल्स बॉन हा जर जिवंत असता तर गोष्ट वेगळी होती. तशा स्थितींत अनिर्वाह पक्ष म्हणून, त्यानें त्याला आपली कन्या ज्युडिथ हिच्याशीं लग्न करायची परवानगी दिली असती. पण तोहि मरण पावला होता.

त्याच्या प्रेमयाचनेचें खरें स्वरूप ध्यानांत आल्याबरोबर रोझा अपमानानें

बेफाम झाली. ती सरळ तिथून निघाली, आणि खेड्यांत तिच्या वडिलांचें मोडकळीला आलेलें घर होतें, तिथें जाऊन राहिली. आपलें उरलेलें दुःखी आयुष्य ती तिथेंच घालविणार होती. थॉमस सुट्पेन हा खुद्द राक्षसाचाच अंशतः अवतार आहे असें तिच्या अपमानित मनानें घेतलेलें होतें. त्याच्या भयानक राक्षसी वृत्तीचें चिंतन करीतच तिनें आपलें उर्वरित आयुष्य तिथें काढलें.

आदल्या सुटींत क्वेंटिन घरीं आला. त्या वेळीं सुट्पेन कुटुंबाच्या शोककारी कहाणींतील आणखी हकीकती त्याला कळल्या होत्या. या कथेंतला बराचसा भाग त्यानें आपल्या वसतिगृहांतील खोलींतला जोडीदार श्रेव्हे मॅकॅनन याला उघड करून सांगितला. पण हा मॅकॅनन होता अमेरिकेच्या उत्तर भागांतला रहिवासी. त्यानें या हकीकतीकडे विशेष लक्षच दिलें नाहीं आणि जें कांहीं ऐकलें त्याबद्दलहि स्वतःचा विपरीत ग्रह करून घेतला.

क्वेंटिन व त्याचे वडील यांनीं सुट्पेन कुटुंबाच्या स्मशानभूमीला भेट दिली होती. तिथें त्यांना एक चिंचोळी पाऊलवाट व एक विवर दिसलें. तें थेट एलेन सुट्पेन हिच्या थडग्यापर्यंत पोंचलेलें होतें. ऑपोस्सम जातीच्या अमेरिकन कांगारूंनीं त्या विवरामध्यें अनेक पिढ्या वास्तव्य केलेलें होतें. एलेन व तिचे यजमान यांच्या थडग्यांवर इटलीहून आणलेलें संगमरवरी स्मारकचिन्ह बसविलेलें होतें. खुद्द सुट्पेन १८६९ सालीं मेला होता. १८६७ सालीं वॉश जोन्स याची तरुण नात मिली जोन्स हिला त्यानें रखेली म्हणून ठेवून घेतली होती. तिला त्याच्यापासून मुलगी झाली. हें कळतांक्षणीं वॉश जोन्स यानें थॉमस सुट्पेन याला ठार मारलें होतें.

च्यार्ल्स बॉन याचा संबंध अष्टमांश नीग्रोवंशीय रक्त असलेल्या एका बाईशीं आलेला होता. तिच्या पोटीं त्याला एक मुलगा झालेला होता. हा मुलगा अकरा वर्षांचा झाल्यावर त्याला घेऊन ही बाई सुट्पेन्स हंड्रेड येथें राहायला आली. ज्युडिथ व हा मुलगा अशीं दोघें १८८४ सालीं देवी येऊन मरण पावलीं. मरणापूर्वी या मुलानें एका नीग्रो स्त्रीशीं लग्न केलेलें होतें आणि तिच्या-पासून त्याला एक वेडपट मुलगा झालेला होता. या वेडपट मुलाचें नांव च्यार्ल्स बॉन हेंच ठेवलेलें होतें. या मृत लोकांच्या थडग्यांवर रोझा कोल्डफील्ड हिनें स्मारक शिला उभारविल्या. ज्युडिथच्या स्मारक शिलेवर तिनें एक भयानक संदेश कोरवून घेतला.

१९१० च्या त्या उन्हाळ्यांत रोझा कोल्डफील्ड हिनें क्केंटिनला विश्वासांत घेऊन एक रहस्य सांगितलें. ' सुट्पेन्स हंड्रेड ' या मळ्यावर अजूनहि कुणी तरी राहत असलें पाहिजे असें तिला वाटत होतें. म्हणून तीं दोघें रात्रीं तिथें तपास करायला गेलीं. तिथें त्यांना क्लायटी ही म्हातारी राहत असलेली आढळली. एका नीग्रो गुलाम स्त्रीच्या पोटीं थॉमस सुट्पेन याला झालेली ही मुलगी होती. आणखी विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे त्यांना तिथें खुद्द हेन्री सुट्पेन हाहि सांपडला. तो तिथल्या मोडकळीला आलेल्या जुन्या घरांत लपून राहिलेला होता. आपण परत आल्याला चार वर्षें झालीं आणि आतां आपण मरेपर्यंत इथेंच कसेंबसें राहणार असें त्यानें त्या दोघांना सांगितलें. रोझा व क्केंटिन तिथून परत चाललीं तेव्हां वेडपट चार्ल्स बॉन त्यांच्याकडे बघत उभा होता. रोझा आपल्या घरीं परत आली आणि क्केंटिन परत कॉलेजांत दाखल झाला.

सुट्पेन कुटुंबाच्या कहाणीचें शोककारी पर्यवसान क्केंटिनच्या वडिलांनीं त्याला पत्रांतून कळविलें. त्या माळ्यावरील मोडकळीला आलेल्या घराकडे रोझानें कांहीं महिन्यांनीं एक ॲम्ब्युलन्स गाडी धाडून दिली. कारण आपला भाचा हेन्री याला खेड्यांतल्या आपल्या घरीं राहायला आणावा म्हणजे आपल्याला त्याचा नीट संभाळ करतां येईल, असा तिनें शेवटीं निर्णय घेतलेला होता. पण ती ॲम्ब्युलन्स गाडी बघून क्लायटीला अशी धास्ती पडली कीं चार्ल्स बॉन याच्या कित्येक वर्षांपूर्वी केलेल्या खुनाबद्दल हेन्रीला पकडायला कुणी तरी गाडी घेऊन येत असावेत. अशा हवालदील मनःस्थितींत तिनें त्या मोडकळीला आलेल्या घराला आग लावून दिली. त्या आगींत ती व हेन्री सुट्पेन अशीं दोघें जळून खाक झालीं. तो वेडपट चार्ल्स बॉन हा एकटाच तेवढा त्या आगींतून वांचला. थॉमस सुट्पेन याच्या वंशांतला हाच काय तो शेवटचा माणूस आतां शिल्लक होता. हा वेडपट माणूस त्यानंतर कुठें गेला हें कुणालाच कळलें नाहीं. कारण त्यानंतर तो पुन्हां कधींच दिसला नाहीं. मिस रोझानें यानंतर कायमचें अंथरूण धरलें. १९१० च्या हिंवाळ्यांत तिनें अखेर या जगाचा निरोप घेतला.

ही सगळी कहाणी म्हणजे अमेरिकेच्या दक्षिण भागांत राहणाऱ्या एकंदर समाजाचीच कहाणी आहे असें क्केंटिनला, कां कुणास ठाऊक, पण वाटत होतें. भावनांचा आत्यंतिक आवेग, शोकपर्यवसायी प्रसंग, विध्वंस व अधोगति यांनीं भरलेली अशी ही कहाणी आहे असें त्याला वाटत होतें. म्हणूनच

त्यानें आपल्या वसतिगृहांतील खोलींतल्या सहाध्यायाला ही कहाणी निवेदन केली.

ॲडाम बीड

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखिका :* जॉर्ज ईलियट (मेरी ॲन इव्हान्स, १८१९-१८८०). *कथानकाचा प्रकार :* घरगुती अद्भुतरम्य कथा. *काळ :* १७९९. *स्थळ :* इंग्लंड. *प्रथम प्रकाशन :* १८५९.

प्रमुख पात्रें : **ॲडाम बीड**, एक सुतार. **सेथ बीड**, त्याचा भाऊ. **मार्टिन पॉयसर**, "हॉल फार्म"चा मालक. **मिसेस पॉयसर**, त्याची पत्नी. **डिना मॉरिस**, तिची भाची, एक मेथॉडिस्टपंथीय धर्मोपदेशिका. **हेट्टी सॉरेल**, तिची आणखी एक भाची. **कॅप्टन आर्थर डॉनिथॉर्न**, एक तरुण जमीनदार (सरदार).

समीक्षण : इंग्लंडच्या ग्रामीण जीवनावरील ही कादंबरी जॉर्ज ईलियट या लेखिकेचा कादंबरीलेखिका या नात्यानें कसदारपणा तिच्या इतर सगळ्या कलाकृतींपेक्षां अधिक प्रकर्षानें प्रकट करते असें म्हणायला हरकत नाहीं. या विधानाला अपवाद फक्त "मिडलमार्च" ही कादंबरी बहुधा मानावी हवी तर. वॉरविकशायरमधील शेतकरी, कारागीर, स्त्रिया, धर्मोपदेशक आणि जमीनदार-सरदार यांजविषयीं जॉर्ज ईलियट लिहीत होती त्या वेळीं ती स्वतःच्या बाळपणींच्या आठवणींतूनच हें सारें लिहून काढत होती. आणि तिनें रेखाटलेलीं स्वभावचित्रें हीं तिच्या परिचयांतलीं माणसें म्हणून सजीव रूप घेऊन वाचकांसमोर आलीं. याशिवाय ती या स्वभावचित्रांवर नियतीच्या जाणिवेचा एक हात फिरवून ठेवते. मात्र ही नियति थॉमस हार्डीनें वर्णन केल्याप्रमाणें भव्य दिव्य अशा परमेश्वरी सूत्रापैकीं नव्हे. अन्य निसर्गामध्यें जसा एक कार्यकारणभाव असतो, तसाच कार्यकारणभाव मानवी वागणुकींत देखील असतो, या तिच्या ठाम मतांतूनच ही तिची नियतीची कल्पना विकसित झालेली आहे.

कथानक : अठराव्या शतकाच्या अखेरीस हेस्लोप या खेड्यांत ॲडाम बीड नामक एक तरुण सुतार राहत असे. उंचापुरा व पिळदार स्नायु असलेला हा ॲडाम चांगला कारागीर व प्रामाणिक नि नेकीचा माणूस म्हणून सगळ्यांच्याच

आदराचा विषय झालेला होता. खेड्यांतला तरुण जमीनदार-सरदार कॅप्टन आर्थर डॉनिथॉर्न याची देखील अॅडामशीं ओळख होती आणि त्याला तो आवडत असे; आणि अॅडामहि त्याला आपला सर्वोत्तम स्नेही समजत होता.

खरें सांगायचें म्हणजे अॅडाम येवढा चांगला कसबी कामगार होता कीं त्याचा मालक मिस्टर जोनाथन बर्ज या बांधकाम-कारागिरानें त्याला मोठ्या आनंदानें आपला जांवई व भागीदार करून घेतला असता. परंतु अॅडामचें मन मेरी बर्जवर मुळींच नव्हतें. मिसेस पॉयसरची भाची स्वरूपसुंदरी हेट्टी सॉरेल हिनें त्याला बेचैन करून सोडलें होतें आणि तिच्याखेरीज त्याच्या मनांत अन्य कुणाहि तरुणीविषयींच्या विचाराला जागाच नव्हती. मिसेस पॉयसरचे यजमान मिस्टर मार्टिन सॉरेल हे "हॉल फार्म" चे मालक होते.

अॅडामचा जीव हेट्टीमध्यें येवढा अडकलेला असतांना देखील तिला मात्र त्याची काडीइतकीहि पर्वा नव्हती. तिचें सारें लक्ष कॅप्टन डॉनिथॉर्न याच्यांतच गुंतलेलें होतें. या कॅप्टनची व तिची भेट एके दिवशीं तिच्या मावशीच्या डेअरींत झाली होती.

हेट्टी ही अॅडामची सुयोग्य पत्नी ठरेल असा विचार हेस्लोप गांवांतील एकाहि माणसाच्या मनांत आला नाहीं. अॅडामची आई लिस्बेथ हिच्या मनांत तर असा विचार अजिबात येणें शक्य नव्हतें. आपल्या लाडक्या मुलाला आपल्यापासून दूर करणारी कोणतीहि तरुणी तिनें सून म्हणून नापसंतच केली असती. तिचे यजमान मॅथियास बीड हे त्या खेड्यांतल्या हॉटेलांतून घरीं परत येतां येतां वाटेंतल्या विलोब्रूक या ओढ्यांत बुडून मेले, आणि त्यानंतर अॅडाम हा तिच्या जीवनाचा एकमेव आधार होऊन बसला. त्याच्या बाबतींतल्या तिच्या आपुलकीच्या भावना पतिनिधनानंतर तीव्रतर झाल्या.

दरम्यान अॅडामचा भाऊ सेथ हा मेथॉडिस्ट पंथांतली तरुण धर्मोपदेशिका डिना मॉरिस हिच्या प्रेमांत सांपडला. डिना ही मिसेस पॉयसरची आणखी एक भाची. अॅडाम जसा सेथपेक्षां अगदीं वेगळा, तशीच डिना देखील आपली मावसबहीण हेट्टी हिच्यापेक्षां अगदीं वेगळी होती.

हेट्टीला अगदीं समर्पक उपमा द्यायची म्हटली तर ती एखाद्या मांजरीच्या पिल्लासारखी होती. तशीच नाजुक नि तशीच असहाय, दुबळी. याच्या उलट डिना सगळ्याच बाबतींत खंबीर नि गंभीर होती.

एके दिवशीं सायंकाळीं डिना नि सेथ अशीं दोघें खेड्यांतल्या गायरानाकडून घराकडे बरोबरच चालत निघालीं. त्यानें तिला लग्नाची मागणी घातली. डिनानें उद्विग्नपणें नकार दिला. ती म्हणाली: "माझं सारं आयुष्य मी धर्मोपदेशकार्याला अर्पण केलंय."

त्यानंतरच्या रविवारीं माथियास बीडच्या अंत्यसंस्कारांनिमित्त हेस्लोप चर्च-मध्यें प्रार्थनेचा कार्यक्रम झाला. त्या वेळीं तिथें जमलेल्या मंडळींच्या मनांत त्या गंभीर प्रसंगाशीं संबंध असलेले असेच विचार चाललेले होते. ॲडामच्या मनांत वडिलांच्या आठवणींच्या जोडीला हेट्टीविषयींचेहि विचार येत होते. हेट्टीच्या मनांत कॅप्टन डॉनिथॉर्नखेरीज दुसरा कसलाच विचार नव्हता. त्यानें या प्रार्थनेला हजर राहायचें वचन दिलेलें होतें. परंतु डॉनिथॉर्न अगोदरच आपल्या रेजिमेंटबरोबर तें गांव सोडून गेल्यामुळें तिची बिचारीची निराशा झाली.

तो रजा घेऊन परत आल्यावर त्यानें आपला एकविसावा वाढदिवस मोठ्या थाटांत साजरा केला. वाढदिवसाच्या मेजवानीला बहुतेक साऱ्या हेस्लोप गांवाला आमंत्रण मिळालें. ॲडामला खास पाहुणा म्हणून डॉनिथॉर्नच्या टेबलावर खाना मिळाला. ॲडामच्या आईला या गोष्टीचा अभिमानहि वाटला आणि त्याचबरोबर ती या प्रकारानें बेचैनहि झाली. कारण, न जाणों, आपला मुलगा आपल्या अधिकाधिक आटोक्याबाहेर तर जात नाहीं ना, अशी तिला यामुळें धास्ती वाटली.

डॉनिथॉर्नच्या या मेजवानीला बरोबर तीन आठवडे लोटल्यानंतर एक प्रसंग घडला. ऑगस्ट महिना. रात्रीची वेळ. डॉनिथॉर्न इस्टेटीवरील आपल्या कामावरून ॲडाम घरीं परत येत होता. वाटेंत त्याला एक जोडपें एकमेकांना गाढ आलिंगन देऊन उभें असलेलें दिसलें. हें जोडपें म्हणजे डॉनिथॉर्न आणि हेट्टी सॉरेल हींच दोघें होतीं. ॲडामचा कुत्रा भुंकल्याबरोबर हेट्टी घाईघाईनें दूर होऊन निघून गेली.

डॉनिथॉर्नला चोरट्यासारखें झालें. त्यानें कांहीं तरी खुलासा करायला हवा म्हणून सांगितलें : "मला ती चुकून वाटेंत भेटली आणि मी सहज तिचं चोरून चुंबन घेतलं." ॲडामनें आपल्या मित्राला तिथल्या तिथें सटकावलें. "तूं बदमाष नि भेकड आहेस" असें त्यानें त्याच्या तोंडावर सांगितलें. मुद्यावरून दोघे गुद्यांवर आले. ॲडामनें डॉनिथॉर्नला जो फटका लगावला, त्यासरशीं तो बेशुद्ध होऊन जमिनीवर कोसळला. आपल्या हातून संतापाच्या

भरांत या जमीनदार-सरदाराचा खून तर झाला नसेल ना, अशी धास्ती ॲडामला वाटली. म्हणून त्यानें त्याला शुद्धीवर आणलें आणि जवळच्याच एका झोपडींत नेऊन बसविलें. तिथें त्यानें डॉनिथॉर्नकडे अशी मागणी केली कीं त्यानें हेट्टीला उद्देशून एक पत्र लिहावें आणि "मी तुला यापुढं पुन्हां कधीं भेटणार नाहीं" असें तिला कळवून टाकावें.

दुसऱ्या दिवशीं डॉनिथॉर्ननें असें पत्र हेट्टीला उद्देशून लिहिलें आणि तें ॲडामच्याच पत्त्यावर धाडलें. अशा प्रकारें त्या पत्राचा जो काय संभाव्य परिणाम होईल त्याची जबाबदारी त्यानें खुद्द ॲडामवरच लादली. पुढच्या रविवारीं ॲडाम व हेट्टी फिरायला गेलीं असतांना ॲडामनें हें पत्र तिच्या हवालीं केलें. हेट्टीनें तें पत्र तसेंच ठेवलें आणि आपल्या झोंपायच्या खोलींत एकटी असतांना तिनें तें उघडून वाचलें. तिची घोर निराशा झाली. तिच्या सुखस्वप्नांच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. आपल्या या दुःखांतून कांहीं तरी मार्ग काढायला पाहिजे येवढाच विचार तिच्या मनांत शिल्लक राहिला.

नंतरच्या नोव्हेंबर महिन्यांत ॲडामला मिस्टर बर्जनें आपल्या धंद्यांत भागीदारी देऊं केली. मग ॲडामनें हेट्टीला लग्नाची मागणी घातली. आपण ज्याचें येवढें कौतुक करतों त्याच्याशींच आपल्या भाचीचें लग्न होणार म्हणून मिस्टर आणि मिसेस पॉयसर यांना आनंद झाला.

परंतु बीड मंडळींच्या घराला आणखी दोन खोल्यांची जोड मिळेपर्यंत लग्न लांबणीवर टाकणें भाग पडलें.

फेब्रुवारी महिन्यांत हेट्टीनें आपल्या मावशीला सांगितलें कीं "मी स्नोफील्ड गांवीं डिना मॉरिसला भेटायला जाऊन येत्यें." तथापि खरें म्हटलें म्हणजे ती डॉनिथॉर्नचा पत्ता लावायच्या निर्धारानें घराबाहेर पडली होती. ती विंडसरला येऊन पोंचली. वास्तविक त्याचा कँप तिथेंच असायचा. परंतु तिला तिथें असा पत्ता लागला कीं त्याच्या रेजिमेंटची बदली आयर्लंडला झाली.

आतां मात्र हेट्टीची संपूर्ण निराशा झाली. ती सैरावैरा भटकत सुटली. शेवटीं एका अनोळखी खेड्यांत सारा स्टोन नामक एका विधवेच्या घरीं तिनें डॉनिथॉर्नच्या मुलाला जन्म दिला. आतां आपलें काळें तोंड कुठें लपवावें असें हेट्टीला झालें. तिनें आपलें बाळ तसेंच जंगलांत सोडून दिलें आणि ती वाट फुटेल तिकडे चालूं लागली. मागाहून सदसद्विवेकबुद्धीची टोंचणी तिला असह्य झाली.

ती आल्या पावलीं परत निघाली. परंतु पूर्वी तिनें जिथें आपलें बाळ ठेवलें होतें तिथें तें आतां नव्हतें.

आपल्या आजोबांच्या मृत्यूनंतर डॉनिथॉर्न आपल्या गांवीं हेस्लोपला परत आला. त्या वेळीं त्याला पत्ता लागला कीं स्वतःच्या बालकाचा खून केल्याच्या आरोपावरून हेट्टी तुरुंगांत अडकून पडली आहे. त्यानें तिची सुटका करून घेण्यासाठीं आपल्या शक्त्यनुसार सर्व कांहीं केलें. डिना मॉरिस तुरुंगांत तिला भेटायला गेली. तिनें आपलें अंतःकरण उघडें करून दाखवावें नि सत्य सांगावें म्हणून डिनानें तिच्या समवेत परमेश्वराची प्रार्थना केली. शेवटीं गरीब बिचारी हेट्टी एकदांची विरघळली आणि हेस्लोप गांव सोडल्यापासून जें जें कांहीं घडलें तें तें सगळें तिनें मोकळ्या मनानें सांगून टाकलें. ती म्हणालीः "माझ्या बाळाला मारून टाकायचा माझा मुळींच विचार नव्हता. खरं सांगायचं म्हणजे मी माझं बाळ मारलंच नाहीं. मी तें नुसतं जंगलांत ठेवून दिलं. माझा विचार वेगळाच होता. मी जीव द्यायचा विचार केलेला होता."

आणखी दोन दिवसांनीं डॉनिथॉर्न शरमिंदा होऊन पश्चात्तप्त मनःस्थितींत आला. त्यानें बातमी आणली कीं तिची फांशी रद्द झालेली असून तिला काळ्या पाण्याची शिक्षा मिळालेली आहे. आणखी कांहीं वर्षांनीं शिक्षा भोगून झाल्यावर परत येतां येतां वाटेंतच तिला मृत्यु आला. डॉनिथॉर्न स्पेनला निघून गेला.

आतां डिना मॉरिस अनेकदां पॉयसर मंडळींच्या घरीं राहूं लागली. आणि हळू हळू ती व अॅडाम हीं दोघें एकमेकांकडे आकर्षित होऊं लागलीं. परंतु डिनाचें अंतःकरण अजून धर्मोपदेशांतच गुंतलेलें होतें. ती "हॉल फार्म" सोडून परत स्नोफील्ड्स येथें राहायला गेली. अॅडाम बीडला आतां एकच समाधान होतें. तें म्हणजे आपल्या सुतारकामांत गर्क होऊन राहणें. मग एके दिवशीं त्याच्या आईनें त्याच्याजवळ डिनाविषयीं बोलणें काढलें. तिच्या शालीनतेची आईनें प्रशंसा केली. मग मात्र अॅडामला अधिक काळ धीर धरवेना. तो तिला गांठायला निघालाच.

द अॅडमिरेबल क्रिक्टन

वाङ्मयप्रकार : नाटक. *लेखक :* जेम्स एम्. बॅरी (१८६०-१९३७). *कथानकाचा प्रकार :* विनोदी उपहासिका. *काळ :* विसाव्या शतकाचा आरंभ.

स्थळ : लोम हाउस, मेफेअर (*लंडन शहराचा फॅशनेबल विभाग; पार्क लेन, ऑक्सफर्ड स्ट्रीट, रीजंट स्ट्रीट आणि पिकॅडिली या चार रस्त्यांनीं वेढलेला मधला भाग*); एक ओसाड बेट.

प्रमुख पात्रें : **द अर्ल ऑफ लोम. लेडी मेरी, लेडी कॅथरिन** आणि **लेडी आगाथा**, त्याच्या तीन कन्या. **द ऑनरेबल अर्नेस्ट वूली**, त्याचा पुतण्या. **विल्यम क्रिच्टन**, त्याचा बटलर.

स मी क्ष ण : 'द ॲडमिरेबल क्रिच्टन' या नाटकाची गणना बॅरीच्या सर्वोत्तम सुखान्तिकांमध्यें करतात. बॅरी सर्वसाधारपणें जे विषय आपल्या नाटकांतून सादर करतो त्यांच्यापेक्षां अधिक सुनिश्चित असा विषय या नाटकाला लाभलेला आहे. उदारमतवादी विचारांच्या एका इंग्रज सरदाराचें जें उपहासपूर्ण चित्र या नाटकांत आपल्यासमोर उभें केलेलें आहे तें आतांपर्यंत रंगभूमीवर आलेल्या अशा चित्रांमध्यें सगळ्यांत जास्त कौशल्यपूर्ण आहे. लॉर्ड लोम हा अनेक उदारमतवाद्यांप्रमाणेंच एका प्रकारचा दुहेरी सामाजिक भूमिका करणारा डॉक्टर जेकिल आणि मिस्टर हाइडच आहे असें म्हणतां येईल. तत्वतः तो मानवी हक्क मान्य करतो, परंतु व्यवहारांत मात्र तो आपल्या प्रस्थापित हितसंबंधांना घट्ट चिकटून राहतो.

क था न क : मेफेअर विभागांतील लोम हाऊसमधील मोठ्या दिवाणखान्यांत दर महिन्यांतून एकदां दानशूर अर्ल ऑफ लोम हा मानवी समतेविषयींच्या आपल्या विचारांची अंमलबजावणी करीत असे. आपल्यासमवेत व आपल्या कुटुंबियांसमवेत आपल्या नोकरांना चहा घ्यायला भाग पाडणें ही त्याची या अंमलबजावणीची ठरलेली रीत असे. या कार्यक्रमांत भाग घेणाऱ्या सगळ्याच मंडळींना हा एकंदर प्रकार अजिबात पसंत नसे. त्यांतल्या त्यांत अर्लसाहेबाचा बटलर क्रिच्टन याला तर हा प्रकार अगदीं आवडत नव्हता. आपल्या धन्याचे उदारमतवादी विचार त्याला मुळींच पटत नसत.

एकट्या लॉर्ड लोम साहेबालाच तेवढा हा प्रसंग मोठा आनंददायक वाटायचा. कारण त्या चहापानसमारंभामध्यें स्वतःच्या स्वत्वाची संपूर्ण जाणीव ठेवणारी अशी व्यक्ति ती एकटीच असे. तो त्या दिवशीं आपल्या मुलींना व आपल्या पुतण्याला हवे तसे हुकूम सोडत असे. महिन्यांतल्या बाकीच्या सगळ्या

दिवशीं तो आपल्या नोकरांना ज्या प्रकारें वागवी, नेमक्या त्याच प्रकारें या एका दिवशीं तो आपल्या कुटुंबियांना वागवी.

त्याची ज्येष्ठ कन्या लेडी मेरी म्हणजे एक तडफदार तरुणी. आपल्या कुटुंबियांशीं वागतांना आपले वडील भलताच चढेलपणा करतात याचा तिला भारी राग येई. एके दिवशीं तर तिचा हा संताप अगदीं शिगेला पोंचला. त्याचें असें झालें. कुटुंबांतल्या सगळ्या मंडळींनीं यॉटमधून जलविहार करायचा एक कार्यक्रम आंखला. या कार्यक्रमांत आपल्या तिघी मुलींना मिळून फक्त एकच मोलकरीण मिळेल असें फर्मान लॉर्ड लोम यांनीं काढलें. हें फर्मान ऐकून लेडी मेरीचा जो काय जळफळाट झाला म्हणतां! परंतु ती असें गृहीत धरून चालली कीं आपली मोलकरीण फिशर ही या कार्यक्रमांत आपल्याबरोबर येणारच. मग फिशरला कळलें कीं आपली मालकीण लेडी मेरी हिच्या जोडीला तिच्या दोघी धाकट्या बहिणींची सेवाहि या कार्यक्रमांत आपल्याला करावी लागणार. त्याबरोबर तिनें तत्काळ राजिनामाच दिला. आणि तिनें राजिनामा दिला म्हणून लेडी कॅथरिन व लेडी आगाथा या दोघींची सेवा करणाऱ्या दुसऱ्या दोन मोलकरणींनींहि पाठोपाठ धडाधड राजिनामे देऊन टाकले.

शेवटीं या संकल्पित जलविहारासाठीं लॉर्ड लोम यांच्याकडे एकहि नोकर म्हणून शिल्लक नाहीं राहिला. कारण त्यांच्या स्वतःच्या हुजऱ्यानेंहि राजिनामा सादर केला. शेवटीं बटलर क्रिख्टन हाच धन्याविषयींच्या इमानाला जागला. त्याचा स्वाभिमान भयंकर दुखावलेला होता तरी देखील तो या जलविहाराच्या कार्यक्रमांत लॉर्डसाहेबांचा हुजऱ्या म्हणून काम करायला तयार झाला. याशिवाय त्यानें आणखीहि एक मोठी कामगिरी बजाविली. घरकाम करणारी मोलकरीण ट्वीनी ही त्याच्या मर्जीतली होती. तिचें त्यानें मन वळविलें आणि लॉर्ड लोमच्या तिघी कन्यकांची मोलकरीण म्हणून या कार्यक्रमांत सामील व्हायला तिलाहि त्यानें तयार केली.

अखेर त्या जलविहाराचा शेवट चांगला झाला नाहीं तो नाहींच. पॅसिफिक महासागरांतील एका भयंकर वादळांत या मंडळींची यॉट सांपडली आणि तिच्या ठिकऱ्या ठिकऱ्या उडाल्या. उष्णकटिबंधांतल्या एका ओसाड बेटावर ही सगळी मंडळी फेंकली गेली. लॉर्ड लोमखेरीज बाकीचीं सगळीं माणसें किनाऱ्याला लागलीं. लॉर्ड लोम सगळ्यांच्या अगोदर लाइफ बोटींत शिरायचा

जीव तोडून प्रयत्न करतां करतां अपेशी झालेला इतर सगळ्यांना दिसला. नंतर तो बुडाला असावा अशी सगळ्यांची समजूत झाली.

बेटावरच्या मुक्कामांत इंग्लंडमधील रूढ वर्गभेद शक्य तों जसेच्या तसे कायम ठेवायची खटपट सगळ्यांनीं चालू ठेवली. परंतु त्यांचा हा खटाटोप अपेशी ठरला. क्रिख्टनला एकट्यालाच तेवढी स्वत्वाची पक्की जाणीव होती. आणि इतरांना तर त्याच्यावरच अवलंबून राहावें लागे. म्हणून मुळांत नोकर असलेला क्रिख्टन त्या बेटावर सगळ्यांचा स्वाभाविक पुढारी झाला आणि आपल्या माजी वरिष्ठांवर त्यानें सौजन्यानें पण खंबीरपणानें अंमल चालविला. उदाहरणार्थं द ऑनरेबल अर्नेस्ट याचे झणझणीत चुटके इंग्लंडमध्यें फारच चटकदार वाटत असत. पण तेच या ठिकाणीं त्याला जरा त्रासदायक वाटूं लागले. याचा परिणाम असा झाला कीं अर्नेस्टनें एखादा झणझणीत चुटका सांगतांक्षणीं त्याच्यावर कडाडून टीकेचा हल्ला चढवायचा असें धोरण क्रिख्टननें अंमलांत आणलें.

आपल्या माजी बटलरच्या या वाढत्या वर्चस्वाबद्दल व स्वतःच्या इभ्रतीच्या घसरगुंडीबद्दल या सरदार घराण्यांतल्या मंडळींना फार चिंता वाटूं लागली. शेवटीं लॉर्ड लोम जेव्हां जहाजाच्या फुटक्या अवशेषांसमवेत त्याच किनाऱ्याला जिवंतपणीं लागला, तेव्हां त्यांनीं त्यालाच आपलें पूर्वीचें अधिकारपद हातीं घेण्याचा आग्रह केला.

लॉर्ड लोमला यांतून एकच मार्ग सुचला. तो म्हणजे क्रिख्टनपासून अलग होऊन त्याच बेटावरील दुसऱ्या एका भागांत आपला लहानसा कबिला घेऊन जाणें आणि तिथें आपला वेगळा कारभार थाटणें. पण हीं पडलीं सरदार घराण्यांतलीं माणसें. यांना स्वतःच्या प्रयत्नानें स्वतःची भूक भागविणें अशक्यच होतें. सगळीं बिचारीं भुकेपायीं खालीं माना घालून परत पहिल्या ठिकाणीं मुठींत नाक धरून आलीं. क्रिख्टन आतां या सगळ्या मंडळींचा सर्वमान्य पुढारी झाला.

नवीन मिळालेल्या या अधिकाराचा क्रिख्टननें पुरेपूर फायदा घेतला. अर्लच्या डोक्यांत समतेविषयींच्या कल्पनांचें भरताड भरलेलें होतें त्यांतलें क्रिख्टनच्या डोक्यांत कांहीं एक नव्हतें. अशा परिस्थितींत पूर्वी आपल्यापेक्षां वरचढ असलेले हे लोक कोणत्याहि अर्थानें आपल्या बरोबरीचे आहेत असें

ढोंग करण्याची आवश्यकता या बेटावर त्याला मुळींच वाटली नाहीं. प्रत्येकाला त्यानें ज्याची त्याची जागा नेमून दिली. कॅंपच्या जरूरीनुसार प्रत्येकाला आपापलें नेमून दिलेलें काम करणें भाग पडे.

या सरदार घराण्यांतल्या माणसांना आयुष्यांत बहुधा पहिल्यांदांच सुख अनुभवायला मिळालें. आणि तेंहि क्रिख्टनच्या राजवटींत. खूप शारीरिक कष्ट करावे लागल्यामुळें अर्नेस्टला जवळ जवळ माणूसपण प्राप्त झालें असें म्हणायला हरकत नव्हती. त्याचप्रमाणें क्रिख्टनचें जेवण तयार करायला मदत करण्याची कामगिरी, तसेंच तो जेवायला बसला म्हणजे त्याच्या टेबलाशीं उभें राहून हवें नको करणें, या सगळ्या गोष्टींमुळें लॉर्ड लोमच्या स्वतःला शिष्ट समजणाऱ्या मुलींचें परिवर्तन होऊन त्या आकर्षक आणि कामसू स्त्रिया दिसूं लागल्या. लॉर्ड लोम जनावरांच्या चामड्यांचा पोषाख करून एक अगदींच निरुपद्रवी व विशेष अक्कल नसलेला म्हातारा ठरला. तसा तो वागणुकींत जरासा रंगेलहि वाटे. सगळी मंडळी त्याला 'डॅडी' म्हणत.

परंतु सगळ्यांत मोठा फरक झाला तो लेडी मेरी हिच्यामध्यें. कोणत्याहि वातावरणांत क्रिख्टन हाच या सगळ्या लोकांपेक्षां वस्ताद असून तथाकथित शिष्ट समाजांतील प्रघातांपायींच हें सत्य सगळ्यांच्या नजरेआड झालें आहे ही गोष्ट केवळ तिच्याच तेवढी ध्यानांत आली. याचा परिणाम असा झाला कीं ती या बटलरच्या प्रेमांत सांपडली आणि त्याची आवडती होण्यासाठीं तिला आपल्या शक्तीनुसार जें जें कांहीं करतां येणें शक्य होतें तें तें सगळें तिनें केलें. क्रिख्टनलाहि या स्वरूपसुंदर लेडी मेरीविषयीं चांगलेंच आकर्षण वाटलें. त्यानें असा विचार केला कीं आपण जसे या बेटाचे राजे आहोंत, तशी हिला या बेटाची म्हणजे आपलीच राणी करावी. त्यानें स्वतःचें कौतुक करून घेण्यासाठीं अशी कल्पना लढविली कीं आपल्या कोणत्या तरी पूर्वजन्मामध्यें आपण एक राजा होतों आणि ही आपली खिस्ती गुलाम होती.

परंतु क्षितिजावर एक आगबोट दिसूं लागली. त्याबरोबर क्रिख्टनच्या ध्यानांत येऊन चुकलें कीं आपण जीं स्वप्नें रंगवीत आहोंत तो केवळ शंभरनंबरी अद्भुतरम्य मूर्खपणा आहे. ही सगळीं माणसें परत इंग्लंडला गेलीं कीं आपण पुन्हां बटलर होणार आणि ती पूर्ववत लेडी मेरी होणार ही गोष्ट अगदीं उघड दिसत होती.

आणि क्रिख्टननें जी अपेक्षा केली तसेंच खरोखरी घडलें. बेटावरून सगळ्यांची सुटका झाल्यावर लॉर्ड लोम आणि त्याच्या कुटुंबांतलीं माणसें पूर्ववत जुन्या सरावांतल्या चाकोरींतून विचार करूं लागलीं, जुन्या वळणानुसार वागूं लागलीं. क्रिख्टन पुन्हां पूर्वीं होता तसा बटलर झाला. द ऑनरेबल अर्नेस्ट यानें बेटावर या मंडळींना आलेल्या अनुभवांचें वर्णन करणारा एक ग्रंथ लिहिला आणि त्या ग्रंथामध्यें सगळे पराक्रम करणाऱ्या नायकाची भूमिका त्यानें स्वतःकडे घेतली. क्रिख्टनचा त्यानें त्यांत जेमतेम उल्लेख केला असेल तेवढाच काय तो.

लेडी मेरीनें लॉर्ड ब्रॉकलहर्स्ट याच्याशीं पूर्वीं केलेल्या वाङ्निश्चयाचें मोठ्या नाखुषीनें पुनरुज्जीवन केलें. हा लॉर्ड म्हणजे जवळ जवळ गाढवांतच जमा होता. मात्र त्याच्या आईला तिकुडच्या त्या बेटावर काय झालें असेल नि काय नाहीं याची फारच काळजी वाटत होती; आणि लॉर्ड लोमची कन्या ही आपल्या मुलाला योग्य पत्नी आहे का नाहीं याबद्दल तिची तिलाच खात्री नव्हती.

परंतु लेडी मेरीला अजूनहि क्रिख्टनचा वरचढपणा सर्वस्वीं मान्य होता आणि तसें तिनें त्याला मनमोकळेपणानें सांगूनहि टाकलें. हें ऐकून क्रिख्टनला धक्काच बसला. तो म्हणालाः "बाई ग, तुझीं मतं त्या बेटावर मान्य होण्याजोगीं असतील कदाचित. परंतु हें आहे इंग्लंड. इथं तुझीं मतं मान्य करून कसं चालेल?" यावर तिनें असें जहाल मत प्रदर्शित केलें कीं "इंग्लंडमध्येंच कांहीं बिघाड झाला असला पाहिजे. माझ्या मतांत मला कांहींच गैर दिसत नाहीं." तेव्हां क्रिख्टननें तिला बजावलें: "बाई ग, इंग्लंडविरुद्ध किंवा इंग्लंडच्या चालीरीतींविरुद्ध प्रतिकूल टीकेचा एक शब्द देखील मी तुझ्याकडूनसुद्धां ऐकून घेणार नाहीं."

द एनीड

वाङ्मयप्रकार : काव्य. *लेखक :* पुब्लियुस व्हर्जिलियुस मारो (इ. स. पूर्वीं ७०-१९).

कथानकाचा प्रकार : वीररसप्रधान महाकाव्य. *काळ :* ट्रॉयच्या युद्धानंतर लगेच सुरू झालेला कालखंड. *स्थळ :* भूमध्य समुद्राच्या आसमंतांतील प्रदेश. *पहिली नक्कल :* ऑगस्टसच्या काळांतील हस्तलिखितावरून.

प्रमुख पात्रें : **आयेनियास,** ट्रॉयचा वीर; रोमन वंशाची स्थापना करण्याचें कार्य नियतीनुसार याच्याकडे आलें. **डिडो,** कार्थेजची राणी; हिचें आयेनियासवर प्रेम असतें. **आना,** तिची बहीण. **आस्कानियुस,** आयेनियासचा पुत्र. **आन्चिसेस,** आयेनियासचे वडील. **व्हीनस,** प्रीतीची आणि सौंदर्याची देवता; आयेनियासची आई. **जूनो,** देवांची राणी आणि ट्रोजन लोकांची वैरीण. **कुमाइयन सिबिल,** प्रेषिता; ही आयेनियासला हेडीजमध्यें (पाताळामध्यें) घेऊन जाते. **लॅटिनुस,** लॅटिन लोकांचा राजा; याचाच पराभव लढाईत आयेनियासकडून होतो. **लॅव्हिनिया,** त्याची कन्या. **टुर्नुस,** लॅटिन वीर पुरुष; लॅटिन राज्याची गादी मिळविण्याची आणि लॅव्हिनियाशीं विवाह करण्याची महत्वाकांक्षा याला असते. **एव्हान्डर,** आर्कॅडियन राजा; आयेनियासचा दोस्त. **पाल्लास,** त्याचा पुत्र.

समीक्षण : हें काव्य म्हणजे रोमच्या वैभवाचें महान् काव्यरूपानें यशोगान करणारें विख्यात लॅटिन महाकाव्य. रोमन वंशाच्या संस्थापनेची परंपरागत कथा या कवितेंत ग्रथित झालेली आहे. आणि अशा रीतीनें रोमन लोकांची पूर्वपीठिका आयेनियास आणि ट्रॉय यांच्यापर्यंत या काव्यांत भिडविलेली आहे. काळाच्या कसोटीला हें काव्य अगोदरच उतरलेलें असून इतिहासांत याची गणना जगांतील महान् महाकाव्यांमध्यें होते.

कथानक : आयेनियास वादळांत सांपडून लिबियाच्या किनाऱ्यावर फेंकला गेला. कार्थेजच्या जनतेनें त्याचें आनंदानें स्वागत केलें. कार्थेज हें आयेनियासशीं वैर असलेल्या जूनो देवतेचें आवडतें शहर. म्हणून आयेनियासची आई जी व्हीनस देवता, तिनें क्युपिडला (मदनाला) आयेनियासचा पुत्र आस्कानियुस याचें रूप घ्यायला लावलें. हेतु हा कीं प्रेमाच्या या तरुण देवानें अभिमानी डिडोच्या हृदयांत प्रेमभावना जागृत करावी आणि तिच्या हातून आयेनियासला कसलीहि इजा पोंचूं नये. आयेनियासच्या स्वागतासाठीं मोठी मेजवानी झडली. मेजवानीच्या अखेरीस दरबारी मंडळींनीं त्याला आपल्या साहसांची कथा सांगण्याचा आग्रह केला.

दहा वर्षें सतत वेढा देऊन ग्रीकांनीं त्याची मातृभूमि जें ट्रॉय शहर त्याचा पाडाव कसा केला याचें वर्णन त्यानें केलें. तो म्हणालाः "ग्रीकांनीं एक मोठा लांकडी घोडा तयार केला. त्या घोड्याच्या पोटांत सशस्त्र ग्रीक सैनिक छपून

बसले. या लांकडी घोड्याला ट्रॉय शहरांत प्रवेश मिळाला. अशी क्लृप्ति करून एकदां शहरांत शिरकाव मिळाल्यावर या सैनिकांनीं बाहेरच्या वेढा देणाऱ्या ग्रीक फौजेला आंत घेतलें आणि साऱ्या शहराला आग लावून दिली. आपल्या जळत्या नगरींतून ट्रोजन लोक (ट्रॉयचे नागरिक) सैरावैरा पळत सुटले. या पळापळींतच मी, माझे वडील आन्चिसेस आणि माझा तरुण पुत्र आस्कानियुस असे तिघे सामील झालों.

"यानंतर लवकरच माझे वडील आन्चिसेस यांनीं सल्ला दिला कीं आम्ही सगळ्यांनीं जहाजांत बसून दूर देशीं निघून जावं. आमचं जहाज वारा वाहील तसं एकदां या दिशेला तर एकदां त्या दिशेला असं भरकटत चाललं. शेवटीं आम्ही ट्रोजन लोक एकदांचे बुथ्रोटुम या ठिकाणीं येऊन पोंचलों.

"इथून आम्हीं लांबचा प्रवास करीत, वाटेंत खूप हालअपेष्टा सोसत, शेवटीं इटलीला पोंचूं असं भविष्य अगोदरच कुणी तरी वर्तवून ठेवलं होतं. त्या प्रमाणें आम्ही पुन्हां जहाजांतून प्रवास सुरू केला आणि सिसिली बेटावर जाऊन पोंचलों. या ठिकाणीं माझे वडील आन्चिसेस यांनीं देह ठेवला. आतांपर्यंत मला पोक्त सल्ला द्यायचं काम ज्यांनीं केलं ते माझे वडील मला सोडून गेले. त्यांचं दफन आम्ही सिसिली बेटावर केलं.

"यानंतर मला सिसिली बेट सोडावं लागलं. मी जहाजांतून पुढच्या प्रवासाला निघालों. माझं जहाज वादळांत सांपडून फुटलं आणि मी कसाबसा जीव वांचवून लिबियाच्या किनाऱ्याला लागलों."

येवढें सांगून आयेनियासनें आपली कहाणी संपविली. आस्कानियुसचें रूप धारण केलेल्या क्युपिडनें (मदनानें) राणी डिडो हिच्यावर चांगला प्रभाव पाडून ठेवलेला होता. तिला या ट्रोजन वीराची दया आली आणि त्याच्या एकंदर पराक्रमाचें कौतुकहि वाटलें.

दुसऱ्या दिवशींहि डिडोनें आपला पाहुणा आयेनियास याच्या सन्मानार्थ मेजवान्यांचा व इतर करमणुकींचा थाटमाट तसाच चालू ठेवला. राणीनें एक शिकारीचा कार्यक्रम ठेवला. ही शिकार करतां करतां एक प्रचंड वादळ झालें आणि त्यांतून बचाव करून घेण्यासाठीं डिडो आणि आयेनियास यांनीं एकाच गुहेंत आश्रय घेतला. तिथें तीं दोघें प्रेमाच्या आहारीं गेलीं. नंतरचा सगळा हिंवाळा आयेनियासनें कार्थेजमध्येंच घालविला आणि या मुदतींत

राणीच्या प्रणयभक्तीचें सुख त्यानें मनमुराद उपभोगलें. परंतु पुढें वसंत ऋतु आल्यावर, आपल्याला नियतीनें ठरवून दिलेल्या मार्गानें पुढें गेलें पाहिजे अशी त्याला गरज वाटूं लागली. म्हणून तो जहाजांतून पुढील प्रवासाला निघाला. त्याबरोबर राणी डिडोनें वियोगदुखाःच्या भरांत जीव दिला. तिच्या पार्थिव देहाला अग्नि देण्यांत आल्यावर तिच्या चितेच्या ज्वाळा समुद्रांतून किती तरी दूर अंतरावरून त्याला दिसत होत्या.

आयेनियास आपल्या परिवारासह पुन्हां सिसिलीच्या किनाऱ्यावर येऊन उतरला. तिथें आल्यावर त्यानें आपल्या लोकांना असा आदेश दिला कीं "आतां इथं खा, प्या, खेळा आणि भरपूर आराम करून पुन्हां ताजेतवाने व्हा." पहिल्या प्रथम या ठिकाणीं होड्यांची शर्यत झाली. तींत क्लोआन्थुस विजयी झाला. नंतर दुसरी शर्यत झाली धांवण्याची. ती एयुरियाल्टुस यानें जिंकली. मग मुष्टियुद्धाचा एक सामना घडविण्यांत आला. त्यांत एन्टेल्लुस आणि डारेस हे योद्धे एकमेकांशीं लढले. यांच्यापैकीं एन्टेल्लुस वरचढ आहे हें उघड दिसत होतें. हाच डारेसला चीत करणार होता. परंतु आयेनियासनें मध्यें पडून हा सामना पुरता होऊंच दिला नाहीं.

शेवटचा सामना होता धनुर्विद्येचा. या विद्येंत एयुरिटियॉन व आसेस्टेस या दोघांनीं असामान्य कौशल्याचें प्रदर्शन केलें. त्यांच्यापैकीं प्रत्येकाला घसघशीत इनाम मिळालें. हे सामने संपल्यानंतर तरुण मुलगे युद्धाचे खेळ खेळण्यासाठीं घोड्यावर स्वार होऊन दौडत निघाले. त्या दरम्यान या कबिल्यांतील स्त्रिया वयोवृद्ध आन्चिसेसचें मार्गदर्शन त्याच्या मृत्यूमुळें बंद झाल्याबद्दल दुःख करीत बसल्या. आणि जूनो देवतेच्या चिथावणीला बळी पडून त्यांनीं जहाजांना आगी लावून दिल्या. पण आयेनियासला इतर देवदेवतांनीं धीर दिला. त्यानें ही सगळी नासधूस दुरुस्त करण्याचा आपल्या लोकांना आदेश दिला. आणि ही सगळी ट्रोजन मंडळीं पुन्हां जहाजें हांकारून पुढच्या प्रवासाला लागलीं.

शेवटीं हे लोक इटलीच्या किनाऱ्यावरील कुमाये या बंदरांत पोंचले. हें गांव तिथल्या भविष्यवेत्तीमुळें प्रसिद्धीला आलेलें होतें. या भविष्यवेत्तीनें आयेनियासला पाताळांत जाऊन त्याच्या वडिलांची भेट घेण्याची खास संधि दिली. योग्य तो बळी दिल्यानंतर दोघांनीं हेडीजमध्यें (पाताळांत) उतरायला

सुरवात केली. शेवटीं तीं दोघें स्टिक्स नदीच्या कांठावर जाऊन पोंचलीं. त्यांनीं होडीवाला चारोन याचें मन वळवून आपल्याला होडींतून पैलतीरावर पोंचवायला त्याला प्रवृत्त केलें. आयेनियासला त्यांच्या हयातपणीं त्याच्या ओळखीचे असलेले अनेक मृतात्मे तिथें दिसले. या गर्दींत त्याला दुर्दैवी डिडो हिचाहि मृतात्मा भेटला. मग तीं दोघें चालत चालत एका तिवाठ्यावर येऊन पोंचलीं. तिथून दोन रस्ते फुटत होते. एक रस्ता अधःपतितांच्या प्रदेशाकडे जात होता; आणि दुसरा रस्ता सुखासीनांच्या प्रदेशाकडे जात होता.

त्या दोघांनीं सुखासीनांच्या प्रदेशाकडे जाणारा रस्ता पतकरला. जातां जातां शेवटीं आन्चिसेसपर्यंत तीं दोघें पोंचलीं. आन्चिसेसनें अत्यंत सुंदर रीतीनें रोमचा सगळा भावी इतिहास आयेनियाससमोर उभा केला. त्यानें त्याला असा आदेश दिला कीं "तूं ज्या ठिकाणीं आपलीं टेबलं खाशील तिथं आपलं राज्य स्थापन कर." पाताळांतून परत वरच्या भूलोकावर आल्यानंतर आयेनियासनें पुन्हां आपल्या लोकांच्या गांठीभेटी घेतल्या आणि मग तो आपल्या मुक्कामाच्या ठिकाणाकडे गेला.

मग हे ट्रोजन लोक पुन्हां आपल्या जहाजांत बसून इटालीच्या किनाऱ्या-किनाऱ्यानें वर सरकत सरकत लॅटियुम या प्राचीन राज्यांत जाऊन पोंचले. या राज्यावर लॅटिनुस राजा राज्य करीत होता. या राज्याच्या समुद्र-किनाऱ्यावरच या मंडळींनीं आपलें भोजन तयार केलें आणि मांसाखालीं रोट्या ठेवल्या. सगळीं मंडळी जेवत असतांना आस्कानियुस विनोदानें म्हणाला: "आपण या रोट्या खातों आहोंत म्हणजे आपण आपलीं टेबलंच खातों आहोंत." हे उद्गार ऐकतांक्षणीं आयेनियासला जाणीव आली कीं आन्चिसेसनें अगोदर ज्या जागेविषयीं भविष्य वर्तविलें होतें तीच ही जागा असली पाहिजे.

दुसऱ्या दिवशीं ट्रोजन लोक टायबर नदीकांठावरील राजा लॅटिनुसच्या राजधानींत आले. लॅटिनुसला देववाणीकडून अगोदरच असा इशारा मिळालेला होता कीं "तूं तुझ्या कन्येचं लग्न कुणाहि स्थानिक माणसाशीं करून देऊं नकोस. एक परका माणूस तुझ्या राज्यांत येईपर्यंत तुझी कन्या लॅव्हिनिया हिचं लग्न तूं तहकूब ठेव. हा परका माणूस इथं येऊन एका महान जनतेचा वंश स्थापन करील." राजा लॅटिनुसनें या भविष्यवाणीनुसार आयेनियास हाच तो परका माणूस असला पाहिजे असें जाणून त्याचें स्वागत केलें.

राजा लॅटिनुस यानें आयेनियासवर अशी मेहेरनजर केली, याबद्दल लॅटिन वीर पुरुष टुर्नुस याला त्याचा हेवा वाटूं लागला. म्हणून टुर्नुसनें आपल्या लोकांना चिथावून बंडाची उभारणी केली. जूनो देवता ही आयेनियासचा द्वेष करीतच होती; तिनें टुर्नुसला मदत केली. एके दिवशीं आयेनियासनें एक काळवीट मारला. हा काळवीट एका स्थानिक कुटुंबानें प्रेमानें पाळलेला होता हें त्याला ठाऊक नव्हतें. या साध्यासुध्या घटनेवरून तंटा तेवढ्या थराला जाऊन पोंचला कीं राजा लॅटिनुस आपल्या राजवाड्याचीं दारें बंद करून आंत बसून राहिला. त्याचा आपल्या प्रजेवर अंमल अजिबात चालेना. दरम्यान आयेनियासनें लढाईची तयारी केली आणि. टुर्नुसच्या नेतृत्वाखालील लॅटिन लोकांचा मुकाबला करण्याचें ठरविलें.

लढाई सुरू होण्यापूर्वी आयेनियासला एक स्वप्न पडलें. त्या स्वप्नांत त्याला असा सल्ला मिळाला कीं त्यानें एव्हान्डरची मदत मागावी. या एव्हान्डरचें सात टेकड्यांचें राज्य होतें. या सात टेकड्याच पुढें सामर्थ्यशाली रोमनगरीची वास्तु होणार होत्या. एव्हान्डरनें आपली फौज टुर्नुसच्या फौजांविरूद्ध लढण्यासाठीं आयेनियासच्या मदतीला देण्याचें कबूल केलें. याशिवाय त्यानें जवळपासच्या प्रदेशांतील आणखी फौजाहि जमविण्याची जबाबदारी पतकरली. आतां व्हीनस देवतेनें आपला पुत्र आयेनियास याला व्हल्कननें बनविलेली एक खास ढाल दिली. कारण या लढाईत आपल्या पुत्राच्या सुरक्षिततेविषयीं तिला विशेष काळजी वाटूं लागली.

आयेनियास आणि एव्हान्डर यांची गट्टी जमली आहे असें कळतांक्षणीं टुर्नुसनें आपल्या फौजेनिशीं ट्रोजन लोकांच्या कँपला वेढा दिला. असा वेढा पडलेला असतांनाच एका रात्रीं नायसुस आणि एयुरियालुस हे दोघे ट्रोजन तरुण वीर झोंपलेल्या लॅटिन लोकांच्या कँपांत हळूच शिरले आणि त्यांनीं किती तरी लोकांना तिथल्या तिथें कापून काढलें. मग त्यांचा पत्ता लागला आणि त्यांना लॅटिन लोकांनीं पकडून ठार केलें.

ट्रोजन तरुणांचें हें विलक्षण साहस बघून लॅटिन लोक चिडले आणि त्यांनीं ट्रोजन लोकांवर एकदम हल्ला चढविला व त्यांना उघड लढाई द्यायला भाग पाडलें. ट्रोजन लोक आपल्यावरील हा हल्ला परतविण्यांत जवळ जवळ यशस्वी झाले होते, येवढ्यांत स्वतः टुर्नुस रणांत उतरला व त्यानें ट्रोजन लोकांना पळवून

लावलें. परंतु आयेनियासच्या विचारानें ट्रोजन लोकांना शौर्याची येवढी स्फूर्ति मिळाली कीं त्यांनीं जोरदार प्रतिहल्ला करून टुर्नुसला नदीच्या पात्रांत पळवून लावलें.

या लढाईचाहि आगाऊ इशारा आयेनियासला स्वप्नांत मिळालेला होता. तो आपल्या दोस्त फौजांना बरोबर घेऊन रणांगणाजवळच्या किनाऱ्यावर उतरला. तिथें त्याचा टुर्नुसशीं व त्याच्या फौजेशीं सामना झाला. एव्हान्डरच्या फौजेची दाणादाण होणार असा रंग दिसत होता, परंतु तेवढ्यांत एव्हान्डरचा लाडका पुत्र पाल्लास त्या फौजेला पुढें सरसावायला उत्तेजन देऊं लागला आणि तोच रणांत उतरला आणि त्यानें अतुल पराक्रम करून शत्रूच्या अनेक सैनिकांना ठार केलें. परंतु टुर्नुसबरोबरच्या द्वंद्वयुद्धांत पाल्लास मारला गेला. आयेनियासनें याचा सूड म्हणून टुर्नुसला ठार करण्याचें ठरविलें, परंतु तेवढ्यांत जूनो देवतेनें मध्यस्थी केल्यामुळें टुर्नुसला जीव घेऊन पळून जातां आलें.

मध्यंतरीं उभयपक्षीं बारा दिवसांची युद्धतहकुबी जाहीर झाली. या मुदतींत पाल्लासचा पार्थिव देह योग्य लष्करी इतमामानिशीं त्याच्या वडिलांकडे धाडून देण्याचा हुकुम आयेनियासनें फर्मावला. ही लढाई देवदेवता दुरून बघत होत्या. आतां ज्युपिटर देवाच्या आदेशानुसार जूनो देवतेला अनुताप झाला. परंतु तिनें असा आग्रह धरला कीं ट्रोजन लोकांनीं आपलें शहर जगावर अधिराज्य गाजविण्याइतकें सामर्थ्यशाली करण्यापूर्वीं लॅटिन भाषा व लॅटिन वेशभूषा यांचा स्वीकार केला पाहिजे.

आयेनियासबरोबर लॅटिनुसनें तहनामा केला असतांनासुद्धां टुर्नुस हा तहनामा मोडून आपल्या अनुयायांनिशीं आयेनियासवर चालून गेला. कुठल्या तरी अज्ञात दिशेकडून एक बाण आला आणि तो लागून आयेनियास जखमी झाला. परंतु त्याची जखम मोठ्या चमत्कारिक रीतीनें चटकन बरी झाली. हा ट्रोजन वीर पुन्हां रणांत उतरला आणि पुन्हां जखमी झाला. परंतु तशा जखमी स्थितींतच त्यानें टुर्नुसशीं द्वंद्वयुद्ध केलें आणि त्याला जमीनदोस्त केलें.

आयेनियासनें आपल्या शत्रूचा निःपात पाल्लासच्या मृत्यूचा सूड घेण्यासाठीं म्हणून केला आणि आपल्या या दोस्ताच्या मृतात्म्याला शत्रूचा देह बळी म्हणून अर्पण केला. टुर्नुसचा विरोध अशा रीतीनें अतःपर

कायमचा नष्ट झाल्यामुळें आयेनियासला आतां निर्वेधपणें लॅव्हिनियाशीं लग्न करायला मोकळीक मिळाली आणि फार पूर्वीपासून भाकित केलेल्या त्याच्या नव्या राष्ट्राची स्थापना करायला त्याला मुभा लाभली. हें नवें राष्ट्र म्हणजेच रोम. मागाहून प्राचीन जगावर ज्यानें अधिराज्य गाजविलें तेंच हें रोम.

द एज ऑफ इनोसन्स : भोळेपणाचें युग

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखिका :* एडिथ व्हार्टन (१८६२-१९३७). *कथानकाचा प्रकार :* सामाजिक टीका. *काळ :* एकोणिसाव्या शतकाचा उत्तरार्ध. *स्थळ :* न्यू यॉर्क शहर. *प्रथम प्रकाशन :* १९२०.

प्रमुख पात्रें : **न्यूलँड आर्चर,** एक तरुण सॉलिसिटर. **मे वेलँड,** त्याची वाग्दत्त वधू. **कौंटेस एलेन ओलेन्स्का,** तिची मावसबहीण.

समीक्षण : न्यू यॉर्क शहरांतील शिष्ट समाजामध्यें अतिशय कसोशीनें वेगवेगळ्या कक्षा प्रस्थापित झालेल्या आहेत. या समाजांतील गुंतागुंतीच्या जुलुमी जमातनिष्ठ चालीरीतींशीं खुद्द प्रस्तुत लेखिकेचा चांगलाच परिचय होता. या चालीरीतींवरील मर्मभेदक परंतु तिरकस हल्ला म्हणजेच ही कादंबरी. आपल्या पात्रांच्या सामाजिक वर्तनाच्या बाह्य दर्शनी आवरणामागील गर्भित अर्थ व प्रेरणा यांचा मानसशास्त्रीय ठाव घेण्यांत लेखिकेनें जें कौशल्य प्रगट केलें आहे, त्यावरून ती हेन्री जेम्स या कादंबरीकाराची खरी शिष्या असल्याचें दिसून येतें. एडिथ व्हार्टन हिनें अंगिकारिलेली मनोविश्लेषणपद्धति जरी खरोखरी जेम्सचीच असली तरी लेखनशैली मात्र जास्त सुबोध आणि कमी गुंतागुंतीची आहे. आहे. म्हणूनच ही एक सुडौल कादंबरी वाटते. ही एका कसबी कारागिराची कृति असल्याचें पटतें. हिचें बाह्यांग व निवेदनपद्धति यांचा या कारागिरानें एकजीव साधला आहे. हिच्यांतील सगळ्या घटना पात्रांच्या स्वतःच्या स्वभावांतूनच अपरिहार्यपणें परिणत झालेल्या आढळतात.

कथानक : न्यूलँड आर्चर हा एक देखणा व कार्यक्षम असा तरुण सॉलिसिटर. मे वेलँड ह्या सुंदरीशीं त्याचा वाङ्‌निश्चय झाला. त्याच्या वाग्दत्त वधूची मावसबहीण कौंटेस एलेन ओलेन्स्का हिच्या स्वागताप्रीत्यर्थ होणाऱ्या खास पार्टीच्या वेळीं हा वाङ्‌निश्चय जाहीर होणार आहे असें त्याला कळलें.

एलेनप्रीत्यर्थ ठरलेला हा स्वागतसमारंभ म्हणजे वेलँड कुळाशीं संबंध असलेल्या अनेक मंडळींनीं दर्शविलेल्या शौर्यशाली त्यागवृत्तीचेंच प्रतीक होतें. त्याला तसेंच कारण होतें.

हें कारण म्हणजे तिचें एका नालायक पोलिश कौंटशीं (सरदाराशीं) झालेलें लग्न. न्यूयॉर्क शहरांतील कडक इस्त्रीवाल्या कठोर शिष्टाचारवादी उच्चभ्रू समाजाच्या दृष्टीनें या लग्नामुळें तिच्या सामाजिक दर्जामध्यें मुळींच सुधारणा झाली नाहीं. तिनें आपल्या पतीपासून घटस्फोट घेण्याचा जो विचार चालविलेला होता त्यामुळेंहि या शिष्ट समाजांत तिच्याविषयीं संशयाचें वातावरण पसरलें. आणि या सगळ्या गोष्टींवर कळस म्हणजे तिची जराशी वाह्यात राहणी. वैवाहिक जीवनांत अयशस्वी झालेल्या स्त्रीनें कसें वागावें या बाबतींत तिच्या कुळांतल्या लोकांच्या कांहीं विशिष्ट अपेक्षा होत्या. या अपेक्षांशीं तिच्या वाह्यात राहणीचा मुळींच मेळ बसत नव्हता.

शेवटीं तो स्वागत समारंभ एकदांचा झाला. त्या वेळीं न्यूलँड आर्चर व मे यांचा वाङ्निश्चय ठरल्याप्रमाणें जाहीर झाला. त्याच स्वागतप्रसंगीं एलेनविषयीं आर्चरला खूपच आकर्षण वाटूं लागलें. पुढें हें आकर्षणाचें प्रकरण वाढत गेलें. आपल्या वाग्दत्त वधूच्या मावसबहिणीला जरा माणसांत आणावें या सबबीखालीं तो तिच्याकडे फुलांच्या भेटी पाठवूं लागला आणि तिच्या भेटीलाहि जाऊं लागला. त्याला असें वाटूं लागलें कीं लग्नानंतर मे हिच्याकडून ज्या प्रकारच्या जीवनाची अपेक्षा आपण करूं शकतों त्यापेक्षां अगदींच वेगळ्या प्रकारचें जीवन एलेनच्या सहवासांत आपल्याला अनुभवायला मिळेल. एलेन ही स्त्री सहसंवेदना देईल, सौंदर्याचा लाभ देईल आणि अगदीं स्वतंत्र रीतीनें आपल्याला सुखी करील असें त्याला वाटूं लागलें.

शिष्ट समाजांतले बाकीचे लोक एलेनच्या घटस्फोटाच्या संकल्पावर हल्ला चढवीत होते आणि आर्चर एकटाच तिचें समर्थन करीत होता. परंतु त्याचबरोबर तो आपला मे हिच्याशीं ठरलेला वाङ्निश्चय मोडायला मात्र तयार होईना. त्याच्या वर्तुळांतल्या इतर सगळ्या लोकांच्या मतें ही सोयरीक उत्तम प्रकारची ठरली. म्हणून या सोयरिकीचें समर्थन करण्यासाठीं तो स्वतःचीं स्वतंत्र कारणेंहि शोधूं लागला. एलेनविषयींचे विचार त्याच्या मनांत अनेकदां येत होते. तिच्या मानानें मे वेलँड हिच्या सौंदर्यात एक प्रकारचा थंडेपणा होता, तिच्या

व्यक्तित्वांत रेखीवपणा असला तरी तें मनाची खळबळ उडविण्याइतकें सामर्थ्य-शाली नव्हतें; यामुळें आर्चरच्या लेखीं मे वेलँडचें पारडें हलकें होऊं लागलें आणि एलेनचें पारडें जड होऊं लागलें.

एलेनची अवस्था मोठी चमत्कारिक झाली. तिच्या समकक्ष टोळींतले लोक आपल्या कक्षेबाहेरील लोकांच्या टीकेच्या हल्ल्यांपासून तिचें संरक्षण करीत असले तरी ते स्वतः तिला अनेकदां वाळींत टाकल्यासारखें वागवीत असत. तिच्या कुटुंबांतल्या लोकांनीं तिच्यावर करडी नजर ठेवली. तिचा वाह्यातपणा मर्यादेबाहेर चालला कीं त्याला ते आंवर घालूं लागले. शिष्टसमाजाच्या दृष्टीनें त्या गांवांतील ज्या वस्तींत राहणें योग्य नव्हतें अशा वस्तींत एक घर भाड्यानें घ्यायची एक विलक्षण लहर तिच्या मनांत आली. तिच्या घरच्या लोकांनीं तिला तें करूं दिलें नाहीं. तिच्या टोळींतल्या स्त्रिया देखील ही आपली एक धोकेबाज प्रतिस्पर्धी आहे याच दृष्टीनें तिची दखल घेत होत्या. आणि ज्युलियस बोफोर्ट हा निर्घृण इसम तिच्याकडे विशेष लक्ष देत होता. त्याचे गुप्तपणें चाललेले बदफैलीपणाचे प्रकार त्याच्या पत्नीसकट सगळ्यांना ठाऊक होते. आणि असा इसम एलेनकडे विशेष लक्ष देऊं लागलेला होता या गोष्टीला तिच्या टोळींतल्या लोकांच्या दृष्टीनें एक खास अर्थ होता. यामुळें आर्चरला तर ज्युलियस बोफोर्टचा भयंकर द्वेष वाटूं लागला.

आपण एलेनला फार वेळां भेटायला जातों हें बरें नव्हे अशी आर्चरनें स्वतःच्या मनाची खात्री पटवून दिली, आणि तो मुद्दाम मे वेलँडला भेटायला सेंट ऑगस्टिन या गांवीं गेला. आपल्या रोगभ्रम झालेल्या वडिलांना हवा पालटायला म्हणून बरोबर घेऊन ती व तिची आई तिथें मुक्काम करून राहिल्या होत्या. तिनें त्याचें थंडें व प्रघाताला धरून असें स्वागत केलें. तिनें त्याचा अनुनय सौम्य रीतीनें धुडकावला. तरी देखील तिच्या सौंदर्यामुळें त्याच्या मनांत एका प्रकारची जवळीक पुन्हां जागृत झाली आणि त्यानें तिला आपल्या लग्नाची तारीख अलीकडे ओढायची गळ घातली. मे आणि तिचे आईवडील या तिघांनीं त्याच्या या सूचनेला नकार दिला. कारण लग्नाची साग्रसंगीत तयारी करायला मधला थोडा वेळ पुरण्याजोगा नव्हता.

आर्चर न्यू यॉर्क शहरीं परत गेला. तिथें त्यानें कुटुंबांतील प्रमुख

महिला मिसेस मॅन्सन मिन्गॉट हिची मदत घेऊन आपला उद्देश सिद्धीला नेला आणि त्याच्या लग्नाची तारीख अलीकडे आली.

ही बातमी त्याला मे हिजकडून एलेनला आलेल्या तारेंतून कळली. तो आपली एलेनबरोबरची सलगी वाढवायचा प्रयत्न करीत होता आणि नेमक्या त्याच वेळीं एलेननें ही तार त्याला वाचून दाखविली. एलेनच्या घरून आर्चर स्वतःच्या घरीं परत गेला. तिथें त्याला स्वतःला त्याच आशयाची वेगळी तार मे हिजकडून आलेली आढळली. आपलें लग्न आतां एक महिन्याच्या आंत होणार ही बातमी त्यानें आपली बहीण जेनी हिला सांगितली. आतां एलेनशीं अतिप्रसंग करण्याच्या मोहापासून आपला बचाव होणार ही गोष्ट अचानक त्याच्या ध्यानांत आली.

नंतर झालेलें थाटदार लग्न, रूढ प्रघातानुसार त्यानंतर मधुचंद्रासाठीं उभयतांनीं केलेला युरोपचा प्रवास, यथायोग्य पत्नीच्या भूमिकेची मे हिजकडून होत असलेली अंमलबजावणी—या सगळ्या गोष्टींमुळें लवकरच आर्चरचा भ्रमनिरास झाला. आपण सांपळ्यांत पकडले गेलों हें त्याच्या ध्यानांत आलें. आपल्या स्वतःच्याच अंगीं धैर्याचा अभाव असल्यामुळें आपल्या शिष्ट समाजांतल्या वडिलधाऱ्यांनीं या गोष्टीचा फायदा घेतला आणि एखाद्या ठराविक धर्तीनें होणाऱ्या विधीनुसार आपल्याला इकडे तिकडे हलतां येणार नाहीं अशा नियमबद्ध जीवनाच्या चाकोरींतून जाण्याची आपली तयारी करून दिली हें त्याच्या ध्यानांत येऊन चुकलें. परंतु या सांपळ्याची चीड येण्याइतकी बुद्धि व निरीक्षण-शक्ति आर्चरच्या अंगीं होती येवढेंच काय तें.

न्यूयॉर्कला परत आल्यानंतर त्यानें एलेनची भेट घेण्याचा क्रम चालू ठेवला. एका पुरातन सॉलिसिटर कंपनींतील दुय्यम सॉलिसिटर या नात्यानें त्याला कराव्या लागणाऱ्या कामाचा निरुपयोगीपणा, त्याच्या सामाजिक जीवनांतला शिळापाका ठराविक ठशाचा नित्यक्रम, आणि त्याची पत्नी मे हिचा निष्क्रिय गोडपणा—या गोष्टींमुळें आर्चरचें मुळींच समाधान होईना. त्याच्या जमातींतील इतर सगळ्या लोकांहून त्याच्या अंगीं जो वेगळेपणा होता त्या वेगळेपणामुळेंच त्याला हें असमाधान वाटत होतें.

त्यानें एलेनला सुचविलें कीं "आपण दोघं मिळून कुठं तरी दूर निघून जाऊं या." परंतु एलेन शाहणी होती, प्रेमळ होती. तिनें त्याला हें दाखवून

दिलें कीं अशा प्रकारचा पळपुटेपणा विशेष आनंददायक ठरणार नाहीं. आणि बोलतां बोलतां तिनें त्याला हळूच सांगून टाकलें कीं " तूं जोंपर्यंत तुझ्या माझ्या प्रेमाच्या परिपूर्तीचा हट्ट धरणार नाहींस तोंपर्यंतच तुला माझ्यावर प्रेम करतां येईल." आणि हें त्यानें मान्य केलें.

आर्चरच्या शरणागतीनें याच्याहि पुढची मजल गांठली. एलेनच्या कुटुंबांतील लोकांच्या आग्रहाखातर आणि तिचा एक वकील व नातेवाईक म्हणून त्यानें तिला असा सल्ला दिला कीं तिनें कौंट ओलेन्स्कीपासून घटस्फोट घेऊं नये. आणि ती या गोष्टीला कबूल झाली. आपल्या या कृतीबद्दल स्वतःच्या भेकडपणाला दोष देण्याची पाळी पुन्हां आर्चरवर आली.

या कुटुंबाला आणखी एका अरिष्टाला तोंड द्यावें लागलें. त्याचें असें झालें. ज्युलियस बोफोर्टच्या कंपनीचा कारभार संशयास्पद आर्थिक व्यवहारांवर उभारलेला होता. हा धंदा बुडाला. त्याबरोबर त्याची तर हानि झालीच. आणि त्याच्या जोडीला त्यानें थापाथापी करून जमा केलेल्या गिऱ्हाइकांचीहि भयंकर हानि झाली. या धक्क्यानें वडिलधारी मिसेस मिन्गॉट हिला तर झटकाच आला. तिचें सारें कुटुंब तिला मदत करायला तिच्या भोंवतीं जमा झालें. तिनें आपली लाडकी एलेन हिला बोलावणें धाडलें. त्या वेळीं एलेन वॉशिंग्टन शहरीं राहत होती. ती परत मिन्गॉट मंडळींच्या घरीं राहायला आली.

एलेनला घटस्फोट घेऊं नकोस असा सल्ला दिल्यानंतर पुन्हां आर्चरची व तिची भेटच झालेली नव्हती. आतां ती परत आल्यावर तो तिला पुन्हां भेटूं लागला. आर्चरच्या परिचयांतल्या पुरुष मंडळींचे कांहीं उद्गार आणि त्यांच्या जोडीला मे हिनें त्याच्या बाबतींत धारण केलेली तुटकपणाची व हुतात्म्यासारखी वृत्ति, यांवरून त्याला जो काय बोध व्हायचा तो झाला. त्याचा व एलेनचा गुप्त संबंध त्याच्या कुटुंबांतल्या मंडळींना व मित्रांना ठाऊक झालेला होता हें यावरून सूचित होत होतें. परंतु मे हिला दिवस गेलेले आहेत असें कळल्यावर एलेन स्वदेश सोडून पॅरिसला निघून गेली आणि मग हें त्याचें गुप्त प्रेमप्रकरण समाप्त झालें.

या प्रकरणांत मे हिचा विजय झाला हें सगळ्यांना उघड दिसून आलें. आणि एखादा उधळ्या मुलगा नीट वागायच्या शर्तीवर घरीं परत यावा अशा

प्रकारें आर्चरला त्याच्या कुटुंबांतले लोक वागवूं लागले. बंडखोरावर त्यांनीं विजय प्रस्थापित केला. आर्चरनें शिष्ट समाजाशीं शांततेचा तहनामा करून टाकला.

यानंतर अनेक वर्षें लोटलीं. आर्चरनें उदारमतवादी राजकारणांत लुडबुड केली. नागरी जीवनांत सुधारणा करण्याच्या कामीं त्यानें लक्ष पुरविलें. त्याचीं मुलें मेरी आणि डल्लास यांचें योग्य रीतीनें लालनपालन झालें. आर्चरची पन्नाशी उलटल्यावर व साठी व्हायच्या अगोदर मे हिनें देह ठेवला. तिच्या निधनाबद्दल खऱ्याखुऱ्या दुःखानें तो शोकाकुल झाला.

शिष्ट समाजांत बदल होत असलेले तो बघत होता. जुनी पुराणमतवादी समाजव्यवस्था कोसळत असलेली त्याला दिसली. अधिक तरुण व अधिक उदारमतवादी पिढीनें रूढ केलेल्या नव्या प्रथा मान्य करून त्या प्रथा ही समाजव्यवस्था पचवून घेत आहे हें त्यानें पाहून घेतलें.

एके दिवशीं त्याचा पुत्र डल्लास यानें त्याला फोन केला. डल्लासचें लग्न ठरलें होतें व तें लवकरच होणार होतें. पुत्रानें वडिलांसमोर युरोपच्या दौऱ्याचा मनसुबा सादर केला. पितापुत्रांचा हा शेवटचा दौरा असें त्यानें या मनसुब्याचें वर्णन केलें. पॅरिसच्या मुक्कामांत डल्लासनें आपल्या वडिलांना उघड करून सांगितलें कीं "बाबा, एलेन ओलेन्स्का या माझ्या मावशीचं सगळं प्रकरण मला ठाऊक आहे. इथल्या मुक्कामांत तिच्या बिऱ्हाडीं जाऊन तिची भेट घ्यायची व्यवस्था मी करून ठेवलेली आहे."

परंतु पितापुत्रांची जोडी जेव्हां तिच्या बिऱ्हाडाजवळ आली तेव्हां आर्चरनें आपल्या पुत्राला अगोदर तिला अभिवादन करण्यासाठीं पुढें धाडून दिलें आणि तो स्वतः बाहेरच्या बागेंत एका बांकावर बसून राहिला. आर्चर म्हणजे अथपासून इतिपर्यंत रोमँटिक (अद्भुतरम्यतावादी) माणूस. ज्या ज्या वेळीं परिस्थितीनें त्याला आपल्या भावनाशील साधनसामुग्रीचा वापर करण्याचें आवाहन केलें त्या त्या प्रत्येक वेळीं त्याची क्रियेवीण वाचाळता सिद्ध झाली. तो बागेंत बसल्या बसल्या एलेनच्या बिऱ्हाडांतील उजेडाकडे पाहत राहिला. शेवटीं एक नोकर सज्जांत आला आणि त्यानें खिडक्यांचीं दारें लावून घेतलीं. मग आर्चर मंद गतीनें चालत चालत आपल्या हॉटेलकडे परत गेला. झालें गेलें गतकाळांत जमा झालें. वर्तमानकाळ सुनिश्चित होता.

आ ल्से स्टि स

वाङ्मयप्रकार : नाटक. *लेखक :* युरिपिडीज (इ. स. पूर्वी ४८०-४०६). *कथानकाचा प्रकार :* अभिजात शोकान्तिका. *काळ :* अतिप्राचीन काळ. *स्थळ :* फेरायें हें प्राचीन ग्रीसमधील नगर. *पहिला प्रयोग :* इ. स. पूर्वी ४३८.

प्रमुख पात्रें : **ॲपोल्लो**, सूर्यदेव. **ॲडमेटुस**, फेरायेचा राजा. **आल्सेस्टिस**, त्याची पत्नी. **थानाटोस**, मृत्युदेव. **हर्क्युलीस**, झ्यूस देवाचा पुत्र आणि ॲडमेटुसचा मित्र.

समीक्षण : इ. स. पूर्वी ४३८ या वर्षी डायोनिसियुसच्या उत्सव प्रसंगीं एका शोकान्त नाट्यचतुष्टयाचा प्रयोग झाला. या चतुष्टयांतील चवथें नाटक म्हणून 'आल्सेस्टिस' या नाटकाची रचना युरिपिडीजनें केली. शोकान्तिका आणि उपहासिका अशा दोन्ही प्रकारच्या नाटकांचे गुणधर्म या नाटकामध्यें आहेत. अथेन्सवासी नाटककारांनीं हाताळलेल्या नाट्यप्रकारांमध्यें हा प्रकार अपूर्व नसला तरी दुर्मिळ होता. आणि 'आल्सेस्टिस' हा त्याचा एकच अवशिष्ट नमुना उपलब्ध आहे. युरिपिडीजच्या तंत्राशीं सुसंगत असाच या नाटकाचा शेवट साधलेला आहे. म्हणजे, एखाद्या स्वर्गीय शक्तीच्या मध्यस्थीनें नाटकांतील संघर्षाची समाप्ति होते. या नाटकांत हें मध्यस्थाचें काम हर्क्युलीस या पात्रानें केलें.

कथानक : फोएबुस ॲपोल्लो या सूर्यदेवाला एक मुलगा झाला. त्याचें नांव आस्क्लेपियुस. हा कालांतरानें औषधांचा व रोग बरे करण्याच्या विद्येचा देव झाला. एकदां आस्क्लेपियुसनें देवांचा कायदा मोडून हिप्पॉलिटुस या मर्त्य माणसाला तो मेलेला असतांना जिवंत केलें. तेव्हां झ्यूस देव रागावला. या रागाच्या भरांत त्यानें ॲपोल्लोच्या पुत्रावर वज्र फेंकलें. हें वज्र सायक्लॉप्स या एकाक्ष राक्षसांनीं मुशींत घालून खूप आंच देऊन तयार केलेलें होतें. या वज्रप्रहारासरशीं ॲपोल्लोचा पुत्र ठार झाला. मग ॲपोल्लोनें या सायक्लॉप्स राक्षसांना ठार केलें. या त्याच्या कृतीबद्दल शिक्षा म्हणून झ्यूस देवानें त्याला ऑलिम्पुस (देव लोक) सोडायला लावलें आणि थेस्साल्लीमधील फेरायें नगरीचा राजा ॲडमेटुस याचा गुराखी म्हणून एक वर्षभर काम करायला लावलें.

ॲपोलोची नोकरीची मुदत संपल्यावर कांहीं वेळानें ॲडमेटुसनें लग्न केलें. आयोल्कुसचा राजा पेलियास याची कन्या आल्सेस्टिस हिच्याशीं हें लग्न झालें. परंतु लग्नाच्याच दिवशीं त्यानें आर्टेमिस देवीची आगळीक केली. आणि देवीच्या कोपामुळें त्याचें मरण अटळ झालें. ॲडमेटुसनें पूर्वी आपल्याशीं जें दयाळूपणाचें वर्तन केलें त्या उपकाराचा उतराई होण्यासाठीं ॲपोलोनें दैव-देवतांना गळ घातली आणि त्यांच्याकडून त्यानें ॲडमेटुसला सशर्त जीवदान देवविलें. ही शर्त अशी होती: ॲडमेटुसच्या मरणाची वेळ जेव्हां येईल तेव्हां जो कोणी त्याच्या बदल्यांत मरायला तयार होईल त्याचा जीव या देवतांनीं मोबदला म्हणून स्वीकारावा आणि ॲडमेटुसला जगूं द्यावें.

परंतु ॲडमेटुसच्या सग्यांसोयऱ्यांपैकीं कुणीहि महाभाग त्याची जागा घेऊन मरण पतकरण्यास आपण तयार आहोंत असें सांगायला पुढें येईना. सगळ्यांनीं त्याच्या जिवाविषयीं बेफिकिरीच दर्शविली. मग पतिव्रता आल्सेस्टिस आपल्या पतीच्या जागीं स्वतः मरण्याची प्रतिज्ञा करून पुढें सरसावली. शेवटीं तिनें आपले प्राण अर्पण करण्याचा दिवस येऊन ठेपला.

आपल्या मर्त्य मित्राच्या पतिव्रता पत्नीचे प्राण कसे वांचवायचे याची काळजी ॲपोलो देवाला वाटूं लागली. आल्सेस्टिसला पाताळ लोकामध्यें घेऊन जाण्यासाठीं थानाटोस (यम) तिथें आलेलाच होता. थानाटोसला त्यानें हात जोडून विनंति केली कीं "कांहींहि करा, पण या पतिव्रतेचे प्राण घेऊन जाऊं नका." तथापि थानाटोसनें त्याच्या या सगळ्या अर्जविनंत्या धुडकावून लावल्या आणि उलट ॲपोलो देवालाच असें बजावलें कीं "हे देवा, अक्षय निवाड्याची अशी पायमल्ली करूं नकोस. दैव-देवतांच्या इच्छेच्या आड असा येऊं नकोस."

यावर ॲपोलोनें जाहीर केलें कीं "दैव-देवतांना धुडकावून लावणारा असा एक सामर्थ्यशाली वीर आहे. आणि तो याच वेळीं ॲडमेटुसच्या वाड्याच्या दिशेनें वाटचाल करीत आहे. तुम्ही खुशाल जा या पतिव्रतेला घेऊन. तो तिला तुमच्या तावडींतून सोडवून नक्की जिवंत परत आणील अशी मला खात्री आहे."

दरम्यान आल्सेस्टिसनें आपल्या येऊं घातलेल्या मरणाचें स्वागत करण्याची तयारी चालविली. मरायच्या दिवशीं तिनें आपला मरणकाळचा उंची पोशाख परिधान केला. घरच्या अग्नीसमोर अग्निदेवता व्हेस्टा हिची तिनें प्रार्थना केली. ती म्हणाली: "हे अग्निदेवते, मी तर आतां चालल्यें. माझ्या दोन्ही

मुलांना मला सोडून जावं लागत आहे. म्हणून माझी तुला अशी प्रार्थना आहे कीं तूंच त्यांची आई हो. माझ्या पुत्रासाठीं त्याला मदत करणारी एक गृहिणी शोधून दे. माझ्या कन्येसाठीं एक प्रेमळ पति शोधून दे. आणि त्यांना आपल्या आईच्या पावलावर पाऊल टाकून अकालीं मृत्यूला कवटाळूं देऊं नकोस. त्यांना उदंड आयुष्य उपभोगायला मिळेल अशी तरतूद कर."

प्रार्थना आटोपल्यावर तिनें मटलीच्या पानांचे हार वाड्यांतील प्रत्येक पूजास्थानावर ठेवले. मृत्यु येत आहे हें जाणून तिनें डोळ्यांत अश्रू येऊं न देतां प्रत्येक देवमंदिरासमोर प्रार्थना केली. मग ती स्वतःच्या महालांत गेली. आपण व ॲडमेटुस या उभयतांनीं जीं इतकीं वर्षें सुखांत आयुष्य घालविलें त्यांची आठवण होऊन ती रडूं लागली. तिथें तिचीं मुलें येऊन तिला भेटलीं. त्यांचा निरोप तिनें घेतला. आपल्या प्रिय मालकिणीच्या वियोगदुःखानें सगळे नोकर-चाकर धाय मोकलून रडूं लागले. या आक्रंदनाच्या आवाजानें सारा वाडा दुमदुमला. ॲडमेटुस देखील ओक्साबोक्शीं रडूं लागला. "तूं मला सोडून जाऊं नकोस," असें तो आल्सेस्टिसला विनवूं लागला.

परंतु दैव-देवतांनीं लादलेल्या अटींनुसार सगळ्या गोष्टी घडायलाच पाहिजे होत्या. तो बघत असतांनाच तिचा श्वास हळू हळू मंद मंद होऊं लागला. तिचा गार पडलेला हात निस्त्राणपणें बाजूला पडला. मरणापूर्वी तिनें ॲडमेटुस-कडून एक वचन घेतलें. ती म्हणाली: "आपल्या मुलांचा सतत प्रेमानं संभाळ करूं असं वचन तुम्ही मला द्या. त्याचप्रमाणं आपण पुन्हां कधींहि लग्न करणार नाहीं असं वचन तुम्ही मला द्या. म्हणजे मी सुखानं प्राण सोडीन."

त्याच क्षणीं हर्क्युलीस वाड्यांत येऊन दाखल झाला. तो ॲडमेटुसचा जिवलग मित्र होता. त्यानें एकंदर बारा उद्योग करण्याचा संकल्प सोडलेला होता. त्यांतले सात पूर्ण झाले होते. आठवा उद्योग म्हणजे थ्रेसमध्यें जाऊन डायोमिडीजचे रानटी घोडे ठार मारून टाकणें हा होता. हा उद्योग उरकायलाच तो चालला होता. आणि वाटेंत तो ॲडमेटुसला भेटायला म्हणून आला. आल्सेस्टिसच्या मृत्यूची बातमी ॲडमेटुसनें आपला पाहुणा हर्क्युलीस याच्या-पासून मुद्दाम छपवून ठेवली. त्याला असें वाटलें कीं झ्यूस देवाचा हा पुत्र आपल्या घरीं पाहुणा म्हणून आलेला आहे; याचा पाहुणचार योग्य विधिपूर्वक

आपण केला पाहिजे; आपल्या पत्नीच्या मृत्यूची बातमी जर याला कळली तर याच्या पाहुणचारांत व्यत्यय येईल.

आपण फेराये नगरींत येण्यापूर्वी इथें काय घडलें याची हर्क्युलीसला गंधवार्ताहि नव्हती. त्यानें ती सारी रात्र ख्यालीखुशालींत, मद्यपानांत आणि गाण्याबजावण्यांत घालविली. आणि सकाळीं जागा झाल्यावर त्याला कळलें कीं आपण येण्याच्या कांहीं तास अगोदर आल्सेस्टिस मृत्यु पावलेली असून आपल्या यजमानानें आपला फेराये नगरींतला मुक्काम जास्तींत जास्त सुखावह व्हावा म्हणून ही बातमी मुद्दाम आपली दिशाभूल करून आपल्यापासून लपवून ठेवलेली आहे. ॲडमेटुसच्या मनाचा हा मोठेपणा बघून हर्क्युलीस थक्क झाला. आपल्या मित्राचें उतराई व्हायचें त्यानें ठरविलें. त्याचप्रमाणें आपल्या मित्राच्या घरांतलीं सगळीं माणसें अतिशय शोकमग्न असतांना आपण मात्र मौजमजा करीत बसलों याचा हर्क्युलीसला फार मोठा अनुताप झाला. म्हणून त्यानें असा निर्धार केला कीं थानाटोसला वाटेंत गांठायचें आणि आल्सेस्टिसला पाताळ-लोकांतून परत आणून जिवंत करायचें.

कोणताहि उद्योग म्हटला कीं तो हर्क्युलीसला कधीं जड जायचाच नाहीं. म्हणून तो थानाटोस आणि आल्सेस्टिस यांच्या मागावर निघाला. त्यानें झराझर चाल करून त्यांना वाटेंत गांठलें. तिथल्या तिथें त्यानें थानाटोसबरोबर कुस्ती केली आणि आल्सेस्टिसचा देह आपल्या स्वाधीन करायला त्याला भाग पाडलें. मग त्यानें आल्सेस्टिसला खूप जाडजूड बुरखा घ्यायला लावलें आणि तिला घेऊन तो शोकाकुल ॲडमेटुसच्या समोर हजर झाला.

हर्क्युलीस राजाला म्हणाला: " मित्रा, ही माझी वहिनी व तुझी पत्नी आल्सेस्टिस. ही मी तुझ्या स्वाधीन करतों. मी थ्रेसला जाऊन माझा आठवा उद्योग उरकून परत येईपर्यंत तूं हिचा नीट सांभाळ कर. "

ॲडमेटुसला ती जिवंत परत आली असेल हें खरेंच वाटेना. त्यानें आपल्या पत्नीच्या प्रेताचा संभाळ करण्यास साफ नकार दिला. तेव्हां हर्क्युलीस त्याला आग्रहपूर्वक म्हणाला: "अरे बाबा, जरा बुरखा बाजूला करून माझ्या वहिनीकडे निदान पाहा तर खरा. "

बुरख्यांतली स्त्री ही दुसरी तिसरी कोणी नसून खुद्द राणी आल्सेस्टिस हीच आहे आणि ती मोठ्या चमत्कारिक रीतीनें जिवंत होऊन परत आलेली

आहे हें कळल्याबरोबर ॲडमेटुस आणि त्याचा परिवार यांच्या आनंदाला सीमाच राहिली नाहीं.

आपण केलेल्या प्रयत्नांना यश आलेलें बघून बलशाली हर्क्युलीसची स्वारी बेहद्द खूष झाली. त्याला आपला मित्र ॲडमेटुस आणि आपली प्रेमळ वहिनी आल्सेस्टिस या उभयतांच्या कृतज्ञ भावाचें अमर बळ लाभलें. या बळाच्या जाणिवेनें त्याचें सामर्थ्य आणखी अधिक खंबीर झालें. आणि या सामर्थ्यानिशीं तो थ्रेसमध्यें त्याच्यासाठीं वाढून ठेवलेला अत्यंत कष्टदायक व प्राणांवर बेतणारा असा आठवा उद्योग पार पाडण्यासाठीं पुन्हां पुढें चाल करीत निघाला.

ॲलेक माओरी, स्पोर्ट्‌समन : शिकाऱ्याचें जीवन

वाङ्‌मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* कॅरोलिन गॉर्डन (१८९५-). *कथानकाचा प्रकार :* कादंबरीच्या रूपांत सादर केलेलें चरित्र. *काळ :* एकोणिसाव्या शतकाची अखेर व विसाव्या शतकाचा आरंभ. *स्थळ :* व्हर्जिनिया, टेनेसी, मिसिसिपी आणि मिसूरी हीं अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतील घटक राज्यें. *प्रथम प्रकाशन :* १९३४

प्रमुख पात्रें : **ॲलेक माओरी**, उत्तर अमेरिकेच्या दक्षिणी राज्यांतला एक शिकारी. **जेम्स मॉरिस**, त्याचा मामा. **व्हिक्टोरिया**, त्याची मामी. **ज्युलियन**, त्याचा मामेभाऊ. **मिस्टर फायेरली**, 'मेरी पॉइंट'चा मालक. **मिसेस फायेरली**, त्याची पत्नी. **मॉली फायेरली**, त्यांची कन्या आणि ॲलेकची पत्नी. **रिचर्ड** आणि **सारा [सॅली]**, ॲलेक आणि मॉली यांचीं मुलें. **स्टीव्ह**, ॲलेकचा जांवई.

समीक्षण : शिकारीची बंदूक आणि मासे पकडायचा गळ या दोन छंदांना आपलें सगळें आयुष्य समर्पण करणाऱ्या ॲलेक माओरीची कहाणी ही कादंबरी निवेदन करते. शिकार आणि मासे पकडणे या दोन गोष्टींना त्याच्या लेखीं श्वासोछ्वासाइतकें महत्व. बाकीच्या एकूण एक गोष्टी दुय्यम. लॅटिन व ग्रीक भाषांचा शिक्षक या नात्यानें त्यानें केलेलें कर्तृत्व देखील या दोहोंच्या मानानें बिनमहत्वाचें. हें पुस्तक म्हणजे अनेक घटनांची मालिका आहे. त्यांची संगति लावली म्हणजे ॲलेक माओरी याच्या वर्णनाला आकार येतो आणि त्याचें व्यक्तिचित्र वास्तव दिसूं लागतें.

कथानक : शिकार आणि मासे पकडणें या छंदांविषयींचें ॲलेक माओरीचें प्रेम लहानपणींच सुरू झालें. तो आठ वर्षांचा होता त्या वेळची गोष्ट. माओरी कुटुंबाच्या घरचा नीग्रो हरकाम्या राफे यानें कून (खोकडाच्या जातीचा हिंस्त्र अमेरिकन प्राणी) या प्राण्याची शिकार करण्यासाठीं ॲलेकला आपल्याबरोबर नेलें. त्यानंतर लवकरच जोन्स नामक एका गिरणीमालकानें या मुलाला आपल्याबरोबर मासे पकडायला नेलें आणि या छंदाविषयीं आजीव आस्था बाळगायला त्याला तेव्हांपासून उत्तेजन दिलें. खुल्या मैदानांत वावरायला मिळालें म्हणजे ॲलेकला नेहमींच सगळ्यांत जास्त सुख वाटे.

त्याला चार भावंडें होतीं. आईच्या निधनानंतर सर्वांत वडील बहिणीनें त्याचें लालन पालन केलें. तो दहा वर्षांचा होईपर्यंत त्याच्या वडिलांनीं त्याला घरींच शिकविलें. प्राचीन अभिजात साहित्यावर त्याच्या वडिलांचा फार जोर. या खेरीज अन्य कांहीं एक त्यांनीं आपल्या मुलांना शिकविलेंच नाहीं.

दहा वर्षांच्या वयाला ॲलेक आपला मामा जेम्स मॉरिस, मामी व्हिक्टोरिया, आणि मामेभाऊ ज्युलियन यांजकडे ग्रासडेल येथें राहायला गेला. तिथें त्याची मामी व्हिक्टोरिया हिच्या देखरेखीखालीं त्याच्या शिक्षणाला व्यापक स्वरूप मिळायचें होतें. ही मामी मोठी विदुषी होती. ग्रासडेल येथें ॲलेकचें आयुष्य चांगलेंच मजेंत गेलें. इथें मुख्यत्वेंकरून आपल्या छंदांना त्यानें भरपूर वाव दिला.

व्हर्जिनिया विद्यापीठांतून ॲलेक पदवीधर होऊन बाहेर पडला. त्याला प्राचीन अभिजात भाषांचें शिक्षण मिळालेलें होतें. पण चरितार्थ कसा चालवायचा याविषयीं त्याच्याजवळ निश्चित अशा कसल्याच योजना तयार नव्हत्या. त्यानें कित्येक कामें प्रयोग म्हणून करून पाहिलीं. ठराविक रकमेचें कंत्राट घेऊन त्यानें जंगलाचा भाग साफ करून दिला. मिसूरी नदीवरील बांधकामावर मजूरदार म्हणून काम केलें. सिएटल येथील नगर इंजिनियरच्या कचेरींत कामगिरी बजाविली. कॅलिफोर्निया राज्यांत जनावरांच्या कळपाची देखभाल करायचें काम रोजंदार म्हणून केलें. या कामावर असतांनाच तो विषमज्वरानें आजारी झाला. आणि त्याची रवानगी पूर्वेला कान्सास सिटी या शहरीं करण्यांत आली. तिथें कांहीं नातेवाइकांकडे त्यानें मुक्काम ठेवला. अखेरीस कुटुंबांतील मंडळींच्या प्रयत्नांमुळेंच 'मेरी पॉइंट' या शेतीचे मालक मिस्टर फायेरली यांच्या घरीं ॲलेक शिक्षक

म्हणून नोकरीला राहिला. ही शेती टेनेसी राज्यांतील ग्लॉव्हर्सव्हिल या गांवानजीक होती.

फायेरली मंडळींच्या घरीं राहिल्या राहिल्या ॲलेक या प्रदेशांतील बहुतेक सगळ्या जमीनमालकांच्या मुलांचा स्थानिक शिक्षक झाला. परंतु ॲलेकनें प्रथम लक्ष दिलें तें शाळेकडे वा तो शिकवीत होता त्या मुलांकडे नव्हे. त्या भागांत शिकार कुठें कुठें मिळते, मासे पकडायला कुठें कुठें वाव आहे, इकडेच त्यानें प्रथम लक्ष दिलें.

फायेरली मंडळींच्या घरीं मुक्काम असतांनाच मॉली फायेरलीच्या प्रेमांत ॲलेक सांपडला आणि १८९० सालीं त्याचें लग्न झालें. हें जोडपें लग्नानंतरहि फायेरली मंडळींच्या घरींच वास्तव्य करून राहिलें आणि ॲलेकनें शाळेंतलें मास्तरकीचें काम चालू ठेवलें. लग्नानंतरच्या पहिल्या वर्षांत ॲलेकनें एक कुत्र्याचें पिलूं हस्तगत केलें. त्याचें नांव गायगीज. हा चणीनें लहान पण अस्सल अवलादीचा पक्ष्यांची शिकार करणारा कुत्रा होता. त्यानें या कुत्र्याला बाळपणापासूनच शिकारीचें शिक्षण दिलें. या कुत्र्याविषयीं त्याला फार मोठा जिव्हाळा वाटूं लागला. पुढच्या पावसाळ्यांत ॲलेकचा पुत्र रिचर्ड याचा जन्म झाला. त्यानंतर दोन वर्षांनीं त्याची कन्या सारा ही जन्माला आली. तिचें 'सॅली' असें टोपणनांव ठेवलें. या सगळ्या मंडळींचें वास्तव्य अजून 'मेरी पॉइंट' या शेतीवरच चालू राहिलें.

रिचर्ड सात वर्षांचा झाल्यावर ॲलेकला एका लहानशा शाळेच्या हेड-मास्तर होण्याचें आमंत्रण आलें. ही शाळा मिसिसिपी राज्यांत होती. फायेरली मंडळींना या लोकांनीं हा भाग सोडून जाणें आवडलें नाहीं. परंतु त्यांच्या निषेधांना न जुमानतां माओरी कुटुंब 'मेरी पॉइंट' सोडून तिकडे जायला निघालें. वाटेंत या लोकांनीं रात्रीं कायरो येथें मुक्काम केला. या मुक्कामांत ॲलेकचा कुत्रा गायगीज हरवला. या कुत्र्याचा यानंतर पुन्हां कधींच पत्ता लागला नाहीं. ही मंडळी तशींच पुढें प्रवास करीत करीत ओकलॅंड येथें गेली आणि तिथून शाळेच्या मुक्कामावर जाऊन पोंचलीं.

ॲलेक येऊन पाहतो तों त्याला असें आढळून आलें कीं त्याच्या हाताखालचा तरुण दुय्यम शिक्षक हॅरी मॉरो याच्या कार्यक्षम मार्गदर्शनाखालीं शाळेचें काम व्यवस्थित चाललेलें आहे. या दुय्यम शिक्षकाला मुलांना

शिकविण्यापेक्षां शाळेचा कारभार चालविण्यांतच अधिक गोडी वाटत होती. ओकलँड येथें आल्यानंतर कांहीं महिन्यांनीं ॲलेकनें दोन वर्षें वयाचा एक बिनशिकलेला 'पॉइन्टर' जातीचा कुत्रा आपला मित्र विल्यम मेसन याजकडून मिळविला. या कुत्र्याचें नांव ट्रेचो. 'पॉइन्टर' जातीच्या कुत्र्याची खुबी अशी असते की शिकारीचा वास लागतांक्षणीं तो जागच्या जागीं नाकाड पुढें करून व एक पाय वर करून ताठ उभा राहतो. त्याला चांगला शिकारी कुत्रा बनविण्यासाठीं ॲलेकनें त्याला शिकवून तयार करण्याची दीर्घसूत्री व कष्टप्रद कामगिरी पुन्हां एकदां सुरू केली.

रिचर्ड पंधरा वर्षांचा झाल्यावर ॲलेकनें त्याला शिकार व मासे पकडणें हे स्वतःच्या जीवनांतील आनंददायक छंद गोड वाटावेत म्हणून प्रयत्न करून बघितला. परंतु हा मुलगा उत्तम पोहणारा व कुस्तीगीर असला तरी त्याच्या वडिलांना शिकारीच्या रानाविषयीं व मासे असलेल्या वाहत्या पाण्याविषयीं जी आपुलकी वाटत होती, ती त्याला मुळींच वाटेना. त्या उन्हाळ्यांत रिचर्ड आपल्या संवगड्यांच्या टोळीसमवेत नदींत पोहायला म्हणून गेला आणि पोहतां पोहतां बुडून मरण पावला. हा मुलगा मॉलीचा विशेष लाडका होता. त्याचा वियोग तिला सहन करणें जवळ जवळ अशक्य झालें. म्हणून इथलें वातावरण सोडून देऊन वेगळ्या वातावरणांत जाणें सगळ्यांच्या दृष्टीनेंच उत्तम होईल असा ॲलकेनें विचार चालविला.

मित्रांशीं थोडासा पत्रव्यवहार केल्यानंतर त्यानें असा निर्णय घेतला कीं आपण ग्लॉव्हर्सव्हिल येथेंच एक शाळा सुरू करावी. म्हणून हें सगळें कुटुंब परत तिकडे गेलें. टेनेसी राज्यांतील या लहानशा गांवांत स्थिरस्थावर झाल्यानंतर ॲलेकला मासे पकडणें व शिकार करणें या छंदांसाठीं भरपूर वेळ मिळूं लागला. इथल्या वास्तव्यांत त्याची कर्नल विंडहॅम याच्याशीं भेट झाली. त्याच्याकडून त्याला जाळीं टाकणें, गळाला अडकविण्याचीं निरनिराळी आमिषें, वेगवेगळ्या प्रकारचे मासे पकडण्यासाठीं उपयोगांत आणायचीं विविध तंत्रें, इत्यादि बऱ्याच गोष्टी शिकायला मिळाल्या. शेवटीं त्याला तेंच ते तलाव नि तीच ती नदी, पुन्हां पुन्हां तिथें जाऊन मासे पकडण्याच्या दृष्टीनें कंटाळवाणी वाटूं लागली. म्हणून पूर्वी त्याच्या हाताखालीं काम केलेला हॅरी मॉरो यानें देऊं केलेली प्राध्यापकाची नोकरी त्यानें पतकरली. मिसूरी राज्यांतील पोप्लरब्लफ येथील रॉडमन कॉलेजचें

अध्यक्षपद नुकतेंच मॉरोला मिळालेलें होतें. याच कॉलेजांत ॲलेक प्राध्यापक झाला.

ही नवी नोकरी पतकरण्यांत ॲलेकचा मुख्य उद्देश जर कोणता असेल तर तो म्हणजे काळी नदीवर मासे पकडायची संधि साधणें हा होता. अशा प्रकारें ग्लॉव्हर्सव्हिल येथें दहा वर्षें वास्तव्य केल्यानंतर माओरी कुटुंब मासे पकडायच्या आणखी नव्या क्षेत्राकडे पुन्हां एकदां स्थलांतर करून रवाना झालें.

सॅली मात्र या वेळीं त्यांच्याबरोबर गेली नाहीं. ती नॅशव्हिल येथील मुलींच्या शाळेंत दाखल झाली. इमानी कुत्रा ट्रेंचो हाहि मागें राहिला. कारण त्याच्या वयाला बारा वर्षें झाल्यानंतर त्याला संधिवात जडल्यामुळें शिकारीच्या कामाला तो निरुपयोगी ठरला होता.

रॉडमन येथें ॲलेकला फक्त सकाळचे वर्ग घ्यायचे असत. या वेळापत्रका-मुळें त्याला दररोज तिसरे प्रहरीं मासे पकडायचा छंद करायला मोकळीक मिळाली. हें आनंदकर जीवन—म्हणजे सकाळीं कॉलेजांत शिकवायचें आणि तिसरे प्रहरीं मासे पकडायचे—सतत सात वर्षें चालू राहिलें. मग मॉलीचें एकाएकीं ऑपरेशन करावें लागून त्यांतच तिचें देहावसान झालें. मिसेस फायेरली व सॅली या दोघी तिचें ऑपरेशन व्हायचें म्हणून तिला भेटण्यासाठीं आल्या, पण त्या येऊन पोंचण्यापूर्वींच सारा ग्रंथ आटोपलेला होता. मग तिघांनीं तिचा पार्थिव देह परत 'मेरी पॉइंट' ला नेला आणि तिथें तिच्या कुटुंबाच्या दफनभूमींत तिचा अंत्यसंस्कार करण्यांत आला.

ॲलेक एकटाच पोप्लरब्लफ येथें परत आला आणि तिथें त्यानें आणखी कांहीं वर्षें प्राध्यापकाचें काम चालू ठेवलें. परंतु शेवटीं त्यानें आपल्या जागेचा राजिनामा दिला आणि मग तो ग्लॉव्हर्सव्हिलनजीक जिम बुफोर्ड याजकडे राहायला गेला. पुढचीं दोन वर्षें त्यानें ब्रीम व बॅस जातीचे मासे जिमच्या सरोवरांतून पुन्हां सांठविण्यांत खर्च केलीं. मागाहून फ्लॉरिडामध्यें लेक हॅरिस या सरोवराकडे जाण्याचें त्यानें ठरविलें. तिथें मासे पकडण्याचा उद्योग जमतो का पाहावा म्हणून खटपट करण्याचा त्याचा उद्देश होता. परंतु त्या भागांत त्याची निराशाच झाली. कारण 'ईल' जातीच्या गवतामुळें मासे तिथें येईचनात.

त्याच सुमारास त्याला सॅलीचें एक पत्र आलें. तिचें लग्न झालें होतें आणि ती आपल्या पतीसमवेत परदेशच्या दौऱ्यावर गेलेली होती. तिनें लिहिलें होतें:

" मी आणि आपले जामात अशीं दोघें लवकरच स्वदेशीं परत येऊं. मग आमचा विचार असा आहे कीं मासे पकडायची भरपूर सोय असलेलं एखादं पाण्याचं ठिकाण शोधायचं. ती जागा निवांत असली पाहिजे. तिथं आम्ही बिऱ्हाड करूं. मग आपण तिथं आमच्याकडे येऊन राहायचं." ॲलेकनें तिला धाडलेल्या उत्तरांत लिहिलें: " तुझी कल्पना फार छान आहे. मी तुमच्याकडे जरूर राहायला येईन. एल्क नदीच्या जवळपास कुठं तरी घर मिळतं का याचा शोध करा."

आणखी चार आठवड्यांनीं त्याला सॅली व स्टीव्ह हें जोडपें टुल्लाहोमा येथें भेटलें. तीं दोघें आदल्याच दिवशीं तिथें येऊन दाखल झालीं होतीं. त्यांनीं त्याला सांगितलें: " आम्हांला हवी होती तशी जागा मिळाली एकदांची." ही जागा म्हणजे नदीच्या अगदीं जवळ असलेलें जुनें पॉटर मंडळींचें घर.

परंतु तें ऐसपैस घर बघितल्याबरोबर पांढऱ्या शुभ्र बंगलीचीं ॲलेकचीं सगळीं स्वप्नें विलयाला गेलीं. मग त्यानें नदीचें निरीक्षण केलें. ही नदी बहुधा वर्षातून सहा महिने पुराचें गढूळ पाणी वाहून नेत असणार असा त्यानें पक्का कयास बांधला.

त्याच्या चर्येवरील निराशा बघून स्टीव्ह आणि सॅली यांनीं त्याला असें आश्वासन दिलें कीं " कांहीं काळजी करूं नका. आम्ही याहून चांगलं आदर्श घर शोधून काढायचा प्रयत्न चालूच ठेवूं." परंतु दिवसभर शोधाशोध केल्यानंतर शेवटीं त्यांनीं तें जुनें पॉटर मंडळींचें घरच आपल्याला सगळ्यांत जास्त आवडतें असें ठरवून टाकलें.

त्या रात्रीं ॲलेक बसमधून कॅनी फोर्क येथें गेला. त्याला खरोखरी याच ठिकाणीं राहायला हवें होतें. तिथें एका लहानशा खानावळींत त्यानें आपलें बिऱ्हाड थाटलें. कॅनी फोर्क येथें मासे पकडायचा मोसम बारमहाच चांगला असे.

ॲलिस ॲडाम्स

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* बूथ टार्किंग्टन (१८६९-१९४६). *कथानकाचा प्रकार :* सामाजिक टीका. *काळ :* विसाव्या शतकाचा आरंभ. *स्थळ :* उत्तर अमेरिकेंतील अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांतील पश्चिम भागाच्या मधोमध असलेलें लहानसें गांव. *प्रथम प्रकाशन :* १९२१.

प्रमुख पात्रें : **ॲलिस ॲडाम्स,** एका लहानशा गांवांतील **तरुणी. व्हर्जिल ॲडाम्स,** तिचे वडील. **मिसेस ॲडाम्स,** तिची आई. **वॉल्टर ॲडाम्स,** ॲलिसचा भाऊ. **मिल्ड्रेड पामर,** ॲलिसची मैत्रीण. **आर्थर रसेल,** पामर कुटुंबाचा एक नातेवाईक. **मिस्टर लँब,** लँब आणि कंपनीचा चालक.

समीक्षण : ' ॲलिस ॲडाम्स ' ही जराशी साध्यासुध्या रीतीनें सांगितलेली कथा आहे. तिच्यांत कथानकाचा एकच धागा आहे. आणि एकाच मध्यवर्ती पात्राशीं ती निगडित झालेली आहे. टार्किंग्टननें आपल्या जीवनविषयक तत्वज्ञानाचें विवरण करण्याचें एक साधन म्हणून ही कादंबरी लिहिली असावी. लहानशा गांवांतील शिष्टाचाराच्या व नीतिअनीतीच्या कल्पना यांचा सौम्य उपहास करणें हाहि त्याचा ही कादंबरी लिहिण्यामागचा आणखी एक हेतु असावा.

कथानक : ॲलिस ॲडाम्स ही अशा गांवांत लहानाची मोठी झाली कीं तिथल्या प्रत्येक व्यक्तीच्या कामांत केव्हां ना केव्हां तरी गावांतल्या बाकीच्या सगळ्या व्यक्ति लक्ष घातल्याखेरीज राहत नसत. तिचे वडील व्हर्जिल ॲडाम्स हे लँब आणि कंपनींत कामावर होते. हा त्या गांवांतला मोठ्या प्रमाणावर औषधें तयार करण्याचा एक कारखाना होता. त्यांनीं आपला मुलगा वॉल्टर यालाहि त्याच कारखान्यांत नोकरीवर चिकटवून दिला.

ॲलिस हायस्कूलमध्यें होती तोंपर्यंत गांवांतल्या सगळ्यांत वरिष्ठ दर्जाच्या तरुणींमध्यें तिची गणना होत असे. परंतु पुढें तिच्या टोळींतल्या इतर मुली कॉलेजांत दाखल झाल्या. आर्थिक कारणांपायीं बिचारी ॲलिस तशीच मागें राहिली. जसजसा काळ पुढें चालला तसतशा आपण वाढत्या प्रमाणांत दुर्लक्षिल्या जात आहोंत असें तिला वाटूं लागलें. लोक आपल्याकडे लक्ष देत नाहींत याचा वचपा काढण्यासाठीं ॲलिस अनेकदां उसनें अवसान आणून मुद्दाम आपल्याकडे लोकांचें लक्ष वेधून घेई.

मिल्ड्रेड पामर ही ॲलिसच्या मतें तिची अगदीं जिवाभावाची मैत्रीण. या मिल्ड्रेडनें एक नृत्यसमारंभ ठरविला आणि त्याला हजर राहण्यासाठीं तिनें ॲलिसला निमंत्रण दिलें. वॉल्टरलाहि या नृत्यसमारंभाचें निमंत्रण होतें. कारण ॲलिसच्या बरोबर सोबत म्हणून कुणी तरी तरुण पुरुष माणूस जायला हवेंच होतें.

परंतु वॉल्टरला बाहेर कुठें तरी ॲलिसबरोबर जायला लावायचें म्हणजे तें एक मोठेंच दिव्य होतें. मिसेस ॲडाम्सनें त्याला परोपरीनें समजावावें, विनवावें, बाबापुता करावें, तेव्हां कुठें स्वारी तिच्याबरोबर जायला तयार व्हायची. नृत्य-समारंभाच्या रात्रीं ॲलिसनें उसनी ऐट दर्शविणारा पोशाख केला, व्हायोलेट जातीच्या रानफुलांचा घरीं तयार केलेला गुच्छ बरोबर घेतला आणि ती उसन्या आणलेल्या छोट्या मोटारींत बसून निघाली. गाडी चालवायला तिच्याबरोबर नाखुषीनें जायला तयार झालेला वॉल्टर होता.

नृत्यसमारंभाचा सुरवातीपासून बेरंग होऊं लागला. त्यांत कांहीं केल्या आकर्षकपणा येईना. ॲलिस जी भिंतीच्या कडेला जोडीदाराची वाट बघत बसली, ती तशीच बसून राहिली. तिच्याकडे कुणी तरुण लक्षच देईना. नाहीं म्हणायला सगळ्यांचा नावडता लठ्ठंभारती फ्रॅंक डाउलिंग यानें तेवढी तिच्याबरोबर नृत्य करायची इच्छा दर्शविली. कार्यक्रम जवळ जवळ संपत यायच्या सुमारास मिल्ड्रेड पामरनें तिची एका नवीन तरुणाशीं ओळख करून दिली. या तरुणाचें नांव आर्थर रसेल. हा पामर कुटुंबाचा दूरचा नातेवाईक. मिल्ड्रेड व आर्थर यांचा वाङ्‌निश्चय नजीकच्या भविष्यकाळांत होणार अशी एक भुमका गांवांत पसरलेली होती.

ॲलिसनें आर्थरला विनंति केली: "माझा भाऊ वॉल्टर नृत्याची दुसरी फेरी झाल्यानंतर मला इथं कुठं दिसलाच नाहीं. त्याला जरा शोधून आणलंत तर बरं होईल." आणि आर्थरला तो कुठें सांपडावा? क्लोकरूममध्यें नीग्रो वाढप्यांच्याबरोबर फाशांचा खेळ खेळत असलेला! हें कळल्यावर ॲलिसला मेल्यापेक्षांहि मेल्यासारखें झालें.

आणखी एक आठवड्यानंतर ॲलिसला अचानक वाटेंत आर्थर भेटला. तो तिच्याबरोबर घरापर्यंत चालत आला. चालतां चालतां दोघांचें जें बोलणें झालें त्यावरून नृत्यसमारंभाच्या वेळीं आर्थरनेंच आपली ओळख करून मागितली असें ॲलिसला कळलें. हें ऐकून ॲलिसला स्वर्ग दोन बोटें उरला. तिनें स्वतःविषयीं भलतीच कल्पना करून घेतली. वस्तुतः अशी कल्पना करून घ्यायला तिला व्यावहारिक आधार कसलाच अस्तित्वांत नव्हता. मग आर्थरनें तिची पुन्हां भेट घेण्यासाठीं परवानगी विचारली. आणि आर्थरनें तिचा निरोप घेतला.

परंतु कबूल केल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं आर्थर तिला भेटायला मुळीं आलाच नाहीं. ॲलिस उगीचच वाट बघत बसली.

अशा कित्येक रात्री गेल्या. मग एका रात्रीं खरकटीं भांडीं धुवून टाकायला आईला मदत केल्यावर ॲलिस उगीचच पुढच्या पोर्चमध्यें बसलेली होती. त्या वेळीं एकदांचा आर्थर तिला भेटायला आला. त्याचें आपल्यामध्यें लक्ष गुंतून राहावें म्हणून तिनें त्याच्याकडे एक अजब मागणी केली. ती म्हणाली: "माझ्याविषयीं कुणी तरी कांहीं तरी वेडंवांकडं बोलेल. तें बिलकुल ऐकून घ्यायचं नाहीं असं तूं मला वचन दे." असेच दिवसामागून दिवस चालले. कुणी तरी आपल्याविषयीं कांहीं तरी वेडेंवांकडें बोलेल अशी आपल्याला भीति वाटते, हें तिचें पालुपद आपलें चालूच राहिलें. आर्थरला तिच्या या पुन्हां पुन्हां बजावण्याचा कांहीं अर्थच कळेना.

आपल्या यजमानांनीं लॅब आणि कंपनींतली नोकरी सोडून द्यावी आणि स्वतःचा स्वतंत्र धंदा काढावा असें मिसेस ॲडाम्सचें एकसारखें टुमणें मिस्टर ॲडाम्सच्या मागें कित्येक वर्षें लागलेलें होतें. या बाबतींत त्याची खात्री पटवून देण्यासाठीं तिनें खूप शर्थीचे प्रयत्न चालविलेले होते.

तिची या बाबतींतली कल्पना अशी होती: लॅब आणि कंपनींत नोकरीला असलेला एक तरुण इसम आणि स्वतः मिस्टर ॲडाम्स या दोघांनीं मिळून सरस तयार करण्याची एक रीत कित्येक वर्षांपूर्वी शोधून काढलेली होती. पुढें हा तरुण वारला. मग ही रीत ठाऊक असलेले दोनच इसम शिल्लक राहिले. त्यांतला एक मिस्टर लॅब आणि दुसरा मिस्टर ॲडाम्स. या फॉर्म्युल्याचा उपयोग करण्याची उत्सुकता मिस्टर लॅबला आतां राहिलेली नव्हती. म्हणून मिसेस ॲडाम्सचा आग्रह असा होता कीं या फॉर्म्युल्याचा उपयोग करून मोठ्या प्रमाणावर सरस तयार करण्याचा कारखाना आपल्या पतिराजांनीं काढावा.

आपल्या पत्नीची ही योजना अप्रामाणिकपणाची आहे असें मिस्टर ॲडाम्सला वाटलें. तिनें या बाबतींत कितीहि रेटा लावला तरी त्यानें तिच्या इच्छेनुसार ही गोष्ट करायला साफ नकार दिला.

परंतु पुढें एक वेगळेंच प्रकरण घडलें. मिस्टर लॅबच्या नातीनें एक मेजवानी दिली. या मेजवानीचें निमंत्रण तिनें ॲलिसला धाडलें नाहीं. आपल्या मुलीला हें आमंत्रण आलें नाहीं याचें खरें कारण दुसरें तिसरें कांहीं नसून

आपली गरीब आर्थिक स्थिति हेंच आहे अशी मिसेस अ‍ॅडाम्सनें आपल्या यजमानांची खात्री पटवून दिली.

झालें. मग ही आर्थिक स्थिति सुधारण्यासाठीं कांहीं तरी करायला हें हवेंच. त्यासाठीं तो सरसाचा कारखाना काढण्याची योजना उपयोगी नाहीं का पडणार ? या मार्गानें मिसेस अ‍ॅडाम्सनें आपली योजना आपल्या यजमानांच्या गळीं उतरविली. आणि बिचारा मिस्टर अ‍ॅडाम्स, नाखुषीनें का होईना, एकदांचा हा कारखाना काढायला तयार झाला.

मग मिस्टर अ‍ॅडाम्स उगीच विलंब लावीत बसला नाहीं. त्यानें ताबडतोब आपल्या नव्या धंद्याची उभारणी सुरू केली. वॉल्टर आपली नोकरी सोडून आपल्या धंद्यांत सामील व्हावा अशी त्यानें इच्छा दर्शविली. परंतु वॉल्टरनें या गोष्टीला चक्क नकार दिला. कारण ? कारण त्याला वडिलांकडून ताबडतोब तीनशें डॉलर हवे होते आणि ही रक्कम द्यायला वडील तयार होईनात. आणि हें साहजिकच नव्हतें का ? मिस्टर अ‍ॅडाम्सला आपल्या नव्या धंद्याच्या उभारणीसाठीं आपल्या जवळचे सगळे पैसे घालणें जरूरीचें होतें. पण त्याच्या दिवट्या पुत्राच्या ध्यानांत ही गोष्ट येईल तरची गोष्ट ना !

मिस्टर लँबला उद्देशून मिस्टर अ‍ॅडाम्सनें राजीनामा देणारें एक पत्र लिहिलें. त्यांत आपण सरसाचा कारखाना काढायच्या विचारांत आहोंत हें त्यानें सांगून टाकलें. त्याला असें वाटलें कीं आपल्यावर कांहीं तरी इलाज योजिला जाईल. निदान हें पत्र वाचल्यावर मिस्टर लँब आपल्यावर खूप जळफळेल तरी. परंतु तसला कांहीं एक प्रकार घडला नाहीं. तेव्हां मिस्टर अ‍ॅडाम्स आपली योजना जारीनें अंमलांत आणायच्या उद्योगाला लागला. आणि सरस तयार करण्याचें काम त्यानें सुरू केलें.

आतां आर्थरला घरीं मेजवानीला बोलवायची योग्य वेळ आली आहे, असा निर्णय अ‍ॅलिसच्या आईनें घेतला. या निर्णयाशीं अ‍ॅलिस मोठ्या नाखुषीनें सहमत झाली. भोजनाचा साग्रसंगीत बेत ठरला. वाढण्यासाठीं एक मोलकरीण बोलावली. मिस्टर अ‍ॅडाम्सला सक्तीनें भोजनसमारंभाचा खास सूट परिधान करायला लावला.

परंतु या मेजवानीचा उद्वेगजनक फजितवाडा उडाला. आर्थरसकट सगळ्यांची मनःस्थिति अत्यंत बेचैन झाली. इतरांपेक्षां आर्थरला बेचैनी

बाटायला तसेंच विशेष कारण होतें. कारण मिस्टर ॲडाम्सच्या या नव्या उद्योगावर अत्यंत प्रतिकूल चर्चा चाललेली त्याला ऐकायला मिळालेली होती. ॲलिसविषयींहि कांहीं अनुदार उद्गार त्यानें ऐकले होते.

भोजनाचा कार्यक्रम समाप्त व्हायच्या अगोदरच चार्ली लॉहर नामक एक मित्र मिस्टर ॲडाम्सबरोबर कांहीं तरी जरूरीचें बोलणें करायला आला. ॲलिसचे आईवडील दोघेंहि जेवण तसेंच ठेवून त्याच्याशीं बोलणें करायला म्हणून जीं पोर्चमध्यें गेलीं तीं बराच वेळ परत येईनात. तेव्हां काय प्रकार आहे तो बघायला ॲलिस व आर्थर हीं दोघें पोर्चमध्यें आलीं. तिथें गेल्यावर आपल्या उभयतांच्या मैत्रीमध्यें कांहीं विघ्न आलें आहे हें ॲलिसला कळलें. म्हणून तिनें लवकरच आर्थरला निरोप दिला.

ती घरांत परत आली तेव्हां चार्ली लॉहरकडून तिला कळलें कीं तिच्या भावानें हिशेबांत कांहीं तरी गफलत केली असून त्याच्याजवळची शिल्लक कमी असलेली आढळली; आणि त्याची ही गफलत पकडली जातांक्षणीं त्यानें गांवांतून पोबारा केला.

वॉल्टरनें जी कांहीं उचल केली असेल ती ताबडतोब चुकती करून टाकण्यासाठीं दुसऱ्या दिवशीं सकाळीं पहिल्या प्रथम बँकेकडून पैसे कर्जाऊ काढायचे असें मिस्टर ॲडाम्सनें ठरवून टाकलें. परंतु तो दुसऱ्या दिवशीं सकाळीं आपल्या कारखान्यांत गेला तेव्हां त्याला पत्ता लागला कीं आपल्या कारखान्यासमोर रस्त्याच्या पलीकडे जी नवी इमारत बांधून तयार झालेली आहे ती वस्तुतः सरस तयार करायच्या दुसऱ्या एका कारखान्याचीच आहे. आणि हा दुसरा कारखाना मिस्टर लँबनें सुरू केलेला होता.

आपल्या कारखान्याच्या तारणावर बँकेकडून पैसे कर्जाऊ मिळण्याची मिस्टर ॲडाम्सची आशा यामुळें साफ धुळीला मिळाली.

मिस्टर ॲडाम्सचा आपण कसा बिनतोड सूड घेतला याचा आनंद दर्शविण्यासाठीं मिस्टर लँब त्याच वेळीं घोड्यावरून तिथें येऊन पोंचला. त्याला बघून मिस्टर ॲडाम्स भलताच चिडला. तो मिस्टर लँबला उद्देशून तावातावानें म्हणालाः " तुमचा नवा कारखाना निघणार आहे ही बातमी तुम्ही माझा वॉल्टर संकटांत सांपडेपर्यंत मुद्दाम छपवून ठेवलीत. अशा रीतीनं तुम्ही माझा

कारखाना कवडीमोलाचा करून टाकलांत. " ॲडाम्सच्या संतापाचा पारा चढतां चढतां इतका वर चढला कीं त्याला तिथल्या तिथें झटका येऊन तो बेशुद्धच पडला.

मिस्टर ॲडाम्सच्या या एकंदर दुरवस्थेबद्दल मिस्टर लँबला फार वाईट वाटलें. तो मिस्टर ॲडाम्सला म्हणाला: "आतां असं करा. तुमचा हा कारखाना तुम्ही मलाच विकून टाका. मी तो विकत घेतों. म्हणजे तुमचं अधिक नुकसान व्हायला नको." मिस्टर ॲडाम्सला ही सूचना मान्य करणें भाग पडलें.

आतां ॲडाम्स कुटुंबाला उत्पन्नाचें कांहीं साधनच शिल्लक उरलें नाहीं. मिसेस ॲडाम्सनें घरांत खानावळये घेण्याचें ठरविलें.

ॲलिसनेंहि अखेरीस फ्रिन्केच्या व्यापारी कॉलेजांत नांव घालायचा निश्चय केला. आर्थर रसेल तिच्या हातचा जाणें येवढेंच तिचें नुकसान झालेलें होतें अशांतला प्रकार नव्हता. त्याच्याबरोबर तिच्या दिवास्वप्नांचाहि चक्काचूर झालेला होता.

ॲलिस इन् वंडरलँड

वाङ्मयप्रकार : कल्पित कथा. *लेखक :* ल्यूइस कॅरोल (चार्ल्स लुटविज डॉजसन, १८३२-१८९८). *कथानकाचा प्रकार :* कल्पनेची भरारी. *काळ :* व्हिक्टोरिया राणीच्या कारकीर्दीतील इंग्लंड. *स्थळ :* कल्पना लढविणाऱ्या बालकाचें स्वप्नमय जग. *प्रथम प्रकाशन :* १८६५.

प्रमुख पात्रें : **ॲलिस. पांढरा ससा. द डचेस. बदाम-राणी.**

समीक्षण : ॲलिस ही बालिका मनाचा गोंधळ करून सोडणाऱ्या वातावरणांत जन्माला आली. तिच्या बालनजरेला शिक्षण, राजकारण, साहित्य आणि सर्वसाधारणपणें व्हिक्टोरिया राणीच्या राजवटींतील जीवन कसें दिसलें, यावर आधारलेली एक नाजुकशी उपहासिका या दृष्टीनें प्रौढ माणसें या पुस्तकाकडे पाहतील. या पुस्तकाचें लेखन आकर्षक पण साध्यासुध्या शैलीनें नटलेलें आहे. त्यांत वर्ड्सवर्थ व सदी या कवींच्या कवितांचीं काव्यमय विडंबनें आहेत. तीं वाचून इतकी करमणूक होते कीं हंसतां हंसतां मुरकुंड्या वळतात. त्याचबरोबर सामर्थ्यशाली स्त्री राज्यकर्त्यांच्या दर्जाला अनुलक्षून मनमोकळी टीकाहि या पुस्तकांत आढळते. स्वप्नमय जगामध्यें मति गुंग करून

सोडणारीं जीं सगळीं साहसें ॲलिस करते, त्यांमध्यें तिच्या अंगीं असलेला चिमुकल्या बालिकेच्या स्वभावाचा अस्सल अर्क प्रत्ययाला येतो. मुलें हें पुस्तक मोठ्या आनंदानें वाचतात. मोठें होण्याच्या बाबतींत त्यांच्या स्वतःच्या मनांतले जे विचार व ज्या भावना असतात त्यांचें यथायोग्य प्रतिनिधित्व करणारी नायिका त्यांना ॲलिसच्या स्वरूपांत आढळते.

कथानक : ॲलिसची बहीण कसलें तरी पुस्तक वाचीत होती. तिच्या खांद्यावरून डोकावून बघत ॲलिस मुकाट्यानें तेंच पुस्तक वाचीत होती. तेवढ्यांत तिला एक पांढरा शुभ्र ससा हिरवळीवरून भरधांव पळत पळत गेलेला दिसला. बघतां बघतां तो आपल्या बिळांत शिरून दिसेनासा झाला. तिनें ताडकन उडी मारली आणि त्याचा पाठलाग करीत ती धांवत सुटली. आणि ती सशाच्या बिळांत जाऊन पडली. बिळाच्या तळाशीं जाऊन ती बघते तों तो पांढरा ससा लगबगीनें तिच्या समोरच्या बोळांतून घाईघाईनें चाललेला तिला दिसला. "मला उशीर होणार, मला उशीर होणार," असें तो पुटपुटत असल्याचेंहि तिला ऐकूं आलें. तो एका कोपऱ्यावर वळण घेऊन पुढें गेला नि दिसेनासा झाला. पुढच्या अंगाला कुलुपें लावलेले कित्येक दरवाजे होते, त्यांच्यासमोर ॲलिस उभी राहिली.

एका कांचेच्या टेबलावर तिला एक चिमुकली सोन्याची किल्ली सांपडली. ती घेऊन पडद्याआड दडवून ठेवलेला एक दरवाजा तिनें उघडला. दरवाजा उघडा होतांक्षणीं तिला पलीकडे एक सुंदर छोटीशी बाग दिसली. परंतु त्या दरवाज्यांतून तिला पलीकडे जातां येईना. कारण तो दरवाजा फारच छोटा होता.

तिला वाईट वाटलें. तिनें ती किल्ली परत टेबलावर ठेवून दिली. तेवढ्यांत तिथें एक चिमुकली बाटली चमत्कारिक रीतीनें तिच्या हातीं आली. ॲलिसनें त्या बाटलींतलें पेय पिऊन टाकलें. त्याबरोबर ती इतकी लहान लहान होऊं लागली कीं तिचा चिमुकला हात त्या टेबलावरच्या किल्लीपर्यंत पोंचूं शकेना. मग तिथें जवळच तिला एक केक सांपडली. त्या केकचा एक तुकडा तिनें खाल्ला. त्याबरोबर ती भराभर मोठी मोठी होऊं लागली. ती इतकी मोठी झाली कीं तिला त्या दरवाज्यांतून फक्त तिरपा डोळा करून आंत डोकावून बघतां येऊं लागलें.

या प्रकारामुळें तिची बिचारीची फार निराशा झाली. तिला रडायला येऊं लागलें. तिच्या डोळ्यांतून पावसाच्या पाण्याच्या थेंबांसारखे मोठमोठे अश्रू

झरत होते. ती तशीच तिथें रडत बसली. तेव्हां तो पांढरा ससा पुन्हां तिथें आला. तो हिरमुसलें तोंड करून सांगूं लागला: "काय करावं! डचेसला (सरदारीण बाईला) जर मी माझी वाट बघत राहूं दिलं तर ती माझ्यावर रागावेल!"

पांढऱ्या सशानें आपला पंखा नि हातमोजे तिथें टाकून दिले. ॲलिसनें ते उचलले. त्याबरोबर ती पुन्हां लहान लहान होऊं लागली. ती पुन्हां धांवत धांवत बागेच्या दरवाज्यापाशीं गेली. पण तो दरवाजा बंद आहे असें तिला दिसून आलें. तेवढ्यांत तिला टेबलावरची ती सोन्याची किल्ली दिसली. परंतु तिचा हात त्या किल्लीपर्यंत पोंचेना.

दरम्यान तिनें रडून रडून जे अश्रू ढाळलेले होते, त्यांचें तिथें एक मोठें डबकें झालेलें होतें! मग त्या डबक्यांत ती पाय घसरून पडली! ती पुन्हां उठून उभी राहिली आणि त्या पाण्यांतून थबकत थबकत चालूं लागली. तेवढ्यांत एक उंदीर तिला दिसला. हा उंदीर असाच अडखळून त्या डबक्यांत पडलेला होता.

ॲलिसला एकंदरीनें हिकमत कमीच. तो उंदीर भेटला तर भेटला, पण त्याच्याशीं तिनें बोलतांना मांजराची गोष्ट कां काढावी? पण ती आपल्या घरची मांजरी दिना हिच्याबद्दल त्या उंदराला सांगूं लागली. उंदीर बिचारा हें ऐकून घाबरला. त्याच्या तोंडून एक शब्द निघेना.

लवकरच त्या अश्रूंच्या डबक्यांत जिवंत प्राण्यांची खूप गर्दी झाली. त्यांत पक्षी आले. सर्व प्रकारचे प्राणी आले. त्यांत मॉरिशस बेटावरचा डोडो जातीचा एक म्हातारा पक्षी होता. या म्हाताऱ्या डोडोनें सुचविलें: "चला रे. आपण सगळे भिजून चिंब झालेले आहोंत. आपण टोळीची शर्यत खेळूं या. म्हणजे आपण कोरडे ठणठणीत होऊं."

ॲलिसनें विचारलें: "टोळीची शर्यत म्हणजे रे काय?" तेव्हां तिला उत्तर मिळालें: "ही शर्यत म्हणजे काय हें तुला सांगत बसायच्या ऐवजीं आपण ती शर्यत आतांच्या आतां खेळूं या. म्हणजे ती काय असते हें तुला आपोआप कळेल." त्याबरोबर ते सगळे प्राणी सुसाट धांवत सुटले. धांवतां धांवतां त्यांची दमछाट झाली. आणि शेवटीं ते अगदीं कोरडे ठणठणीत झाले.

त्यानंतर उंदरानें आपल्या शेपटीला शोभेल अशी एक लांबलचक गोष्ट

सांगितली. ॲलिसला सगळे प्राणी म्हणाले: "तूं पण एखादी गोष्ट सांग ना." परंतु तिच्या डोक्यांत तिची मांजरी दिना हिच्याशिवाय दुसरा कसलाच विचार येत नव्हता. आणि ती आपल्या मांजरीची गोष्ट सांगूं लागली. त्याबरोबर बाकीचे सगळे प्राणी घाबरले आणि तिथून पळून गेले. आणि एकटी ॲलिस तेवढी तिथें मागें राहिली.

तो पांढरा ससा पुन्हां तिथें आला. आपले हातमोजे नि आपला पंखा यांचा तो शोध करीत होता. पण ते त्याला कुठेंच सांपडेनात. येवढ्यांत ॲलिस त्याला तिथें दिसली. तेव्हां तो तिला म्हणाला: "जा ग. माझ्या घरीं जा आणि माझ्यासाठीं हातमोज्यांचा नवा जोड नि दुसरा एक पंखा घेऊन ये."

सशाच्या घरीं ॲलिसला तो हातमोज्यांचा जोड नि पंखा सांपडला. तिथें एक बाटली होती. तिच्यांतलें पेयहि तिनें पिऊन टाकलें. ताबडतोब ती खूप खूप मोठी होऊं लागली. इतकी मोठी झाली कीं तिला आपला एक पाय धुराड्यांतून बाहेर काढावा लागला आणि तिनें आपलें एक कोंपर खिडकीच्या बाहेर काढलें. तसें तिनें केलें नसतें तर त्या घरांत ती न मावल्यामुळें चेंगरून मेली असती.

मग तिनें कशीबशी एक लहानशी केक खाल्ली. त्याबरोबर ती पुन्हां लहान लहान व्हायला लागली. दरवाज्यांतून बाहेर पडण्याइतकी लहान झाल्याबरोबर लगेच ती जवळच्या जंगलांत पळाली.

जंगलांत तिला एक सुरवंट दिसला. तो एका अळंबीवर बसलेला होता. हा सुरवंट तिच्याशीं फार उर्मटपणें वागला. तो तिरस्कारपूर्ण स्वरांत तिला म्हणाला: "काय ग मुली! तुझी काय योग्यता आहे ती दाखव बघूं! 'यू आर ओल्ड, फादर विल्यम!' हें गाणं म्हणून दाखवलंस तर तुझ्या अंगांत कांहीं तरी योग्यता आहे हें मी कबूल करीन." ॲलिसनें तें गाणें त्याला म्हणून दाखविलें. परंतु तिच्या तोंडचे शब्द कानाला फारच विचित्र वाटले.

तिचें गाणें ऐकून त्याला तिचा वीटच आला. मग तिला आपला आकार लहान कसा करायचा नि मोठा कसा करायचा याविषयीं त्यानें कांहीं मौल्यवान माहिती दिली आणि तो तिला तिथें सोडून निघूनच गेला.

तिनें अळंब्यांचे कांहीं तुकडे काढले. आणि मग तिनें जो प्रयोग केला त्यामुळें तिला जो काय आनंद झाला म्हणतां! तिनें डाव्या हातांतला अळंबीचा

तुकडा खाल्ला कीं ती भराभर उंच व्हायला लागायची, आणि तिनें उजव्या हातांतला अळंबीचा तुकडा खाल्ला कीं ती भराभर ठेंगू व्हायला लागायची.

ती तशीच जंगलांतून फिरतां फिरतां झाडींतल्या एका लहानशा घरापाशीं आली. तिथें एक हुजऱ्या आलेला होता. तो दिसायला माशासारखा दिसत होता. त्या हुजऱ्यानें दुसऱ्या एका हुजऱ्याच्या हातांत एक आमंत्रण दिलें. हा दुसरा हुजऱ्या अगदीं हुबेहुब बेडकासारखा दिसत होता. तें आमंत्रण डचेसला आलेलें होतें. राणीनें डचेसला आपल्याकडे खेळायला बोलावलें होतें.

या दोघां जलचर हुजऱ्यांनीं एकमेकांना मोठ्या औपचारिक रीतीनें लवून सलाम केले. आपल्या डोईवर घातलेल्या टोपांना दोघांनीं एकाच वेळीं हेलकावे दिले.

ॲलिसनें दरवाजा उघडला आणि बघते तों ती डचेसच्या घरांत आलेली होती. डचेसच्या घरांत सगळा सांवळा गोंधळ - चाललेला होता. ती स्वयंपाकघरांत गेली. तिथें एक स्वयंपाकी एका मोठ्या पातेल्यांत सूप ढवळत बसलेला होता आणि त्यांत खूपशी मिरपूड ओतत होता. त्या मिरपुडीच्या वासानें त्या स्वयंपाक्याखेरीज सगळे लोक सटासट शिंकत होते. तिथें शेकोटी-शेजारीं एक चेशायर जातीचें मांजर हंसत बसलेलें होतें. तें मात्र शिंकत नव्हतें. खुद्द डचेसच्या कडेवर एक रडकें लहान मूल होतें, तेंहि शिंकत होतें. आणि या मुलाला उद्देशून डचेस भसाड्या आवाजांत अंगाई गीत गात होती.

ॲलिसला त्या गरीब बिचाऱ्या बालकाविषयीं फार सहानुभूति वाटली. म्हणून ती त्या मुलाला कडेवर घेऊन बाहेर खुल्या हवेंत गेली. त्याबरोबर त्या मुलाचें रूप हळू हळू बदलत बदलत त्याचें झालें डुक्कर आणि हें डुक्कर तिच्या हातून आपली सुटका करून घेऊन डुलत डुलत जंगलांत गेलें.

हा चमत्कार बघून ॲलिस गोंधळून उभी राहिली. तिला तें हंसरें चेशायर जातीचें मांजर एका झाडावर बसलेलें दिसलें. तें मांजर त्याला हवें तेव्हां दिसे अगर दिसेनासें होई. हा आपला गुण तिला दाखविल्यानंतर तें ॲलिसला म्हणालें: " ए मुली ! त्या वेड्या टोपीवाल्यानं एक चहापार्टी ठरविलेली आहे. तिला तूं हजर राहा. जा बघूं ! " आणि तें मांजर दिसेनासें झालें. शेवटीं त्याचें हंसणें तेवढें तिथें शिल्लक राहिलें. मागाहून अखेरीस तें हंसणेंहि दिसेनासें झालें. आणि मग ॲलिस तिथून चहापार्टीला हजर राहायला निघून गेली.

तिथें गेल्यावर ॲलिसला वेगळाच प्रकार आढळून आला. आयुष्यांत आतांपर्यंत कधींच पाहिलीं नव्हतीं अशीं एकापेक्षां एकेक विलक्षण ध्यानें तिला तिथें भेटलीं. या सगळ्यांना संभाळून घेऊन हा चहापान समारंभ कसा उरकायचा असा मोठा विचित्र प्रसंग तिच्यावर ओढवला.

या मंडळींमध्यें एक होता मार्च महिन्यांतला ससा; दुसरा होता तो वेडा टोपीवाला; तिसरा होता एक झोंपाळू रानउंदीर. हे तिघेहि अतिशय आळशी होते. चहाच्या टेबलावर कपबशा व किटली हें साहित्य मांडून ठेवायला त्यांच्यांतला कुणीच तयार होईना. जिकडे तिकडे कळकट बशा विखरून पडलेल्या होत्या.

रानउंदरापुढें तिनें चहाचा कप ठेवला. तर तो बेटा चहाच्या कपांतच झोंपी गेला. वेडा टोपीवाला तिला म्हणाला: " ए मुली ! तुझे केंस फार वाढले आहेत. ते कापायला हवेत." मार्च महिन्यांतला ससा तिला म्हणाला : " ए मुली ! ही येवढी दारू पिऊन टाक." आणि मग त्यानें तिला सांगितलें: " अग मुली ! मी तुला दारू पी असं म्हणालों खरा. पण इथं दारूच नाहीं, तर तुला देऊं कुठली ! "

त्या तिघांनीं तिला मूर्खासारखे असे कांहीं तरी उखाणे घातले कीं त्या उखाण्यांना उत्तरेंच नव्हतीं. आणि मग, सगळ्यांत वर ताण म्हणजे, ते तिघे तिच्याकडे अगदीं संपूर्णपणें दुर्लक्ष करून आपसांतच कांहीं तरी हास्यास्पद गप्पा मारीत बसले. तेवढ्यांत तो रानउंदीर कसली तरी गोष्ट सांगतां सांगतां मध्येंच झोंपीं गेला. ती संधि साधून ॲलिस तिथून धूम ठोकून पळाली.

त्यानंतर ती एका बागेंत गेली. या बागेंतली फुलें बोलकीं होतीं. फुलांशीं तिचें संभाषण सुरू होणार, येवढ्यांत कांहीं माळी तिथें आले. या माळ्यांनीं आपल्याबरोबर रंगाचे ब्रश आणलेले होते. या ब्रशांनीं ते एका गुलाबाच्या झाडावर लाल रंग फांसू लागले.

ॲलिसनें त्या माळ्यांना विचारलें : " हें तुम्ही काय चालवलं आहे ? " तेव्हां त्यांनीं तिला सांगितलें : " अग मुली ! राणीनं आम्हांला या ठिकाणीं लाल गुलबाचं झाड लावायचा हुकुम दिलेला होता. आणि आम्ही इथं चुकून पांढऱ्या गुलाबाचं झाड लावलं. आतां इतक्यांत राणी इथं येईल. मग ती यायच्या अगोदर आमची चूक दुरुस्त नको का करायला ? " म्हणून आतां ते घाबरत

घाबरत आणि भराभरा तें पांढऱ्या गुलाबाचें झाड लाल रंगानें रंगवून काढायच्या उद्योगांत गढून गेलेले होते.

परंतु त्या गरीब बिचाऱ्या माळ्यांच्या हातून हें काम लवकर उरकेना. त्यांचें काम संपायच्या अगोदरच राणी तिथें येऊन हजर झाली. तिनें त्या माळ्यांना या लबाडीबद्दल मुद्देमालासकट पकडलें. अणि गरीब बिचाऱ्या माळ्यांना पकडून फांशी द्यायला शिपाई घेऊन गेले. मात्र ॲलिसनें त्या माळ्यांचे प्राण वांचविले. तिनें त्या सगळ्या माळ्यांना एका मोठ्या फुलदाणीच्या तळाशीं कोंबून ठेवलें. अशा रीतीनें ते त्या भयंकर राणीच्या दृष्टीआड झाले.

मग त्या बागेंत राणी व डचेस यांचा खेळ सुरू झाला. चेंडू मारायचें काम करायला त्यांनीं बॅटींऐवजीं जिवंत हंसक पक्षी घेतलेले होते. आणि चेंडू म्हणून जिवंत सायाळी त्यांनीं घेतलेल्या होत्या. हंसकांकरवीं त्यांनीं सायाळींना फटके मारले कीं त्या सायाळी मागचा पुढचा विचार न करतां आपल्या अंगाचीं वेटोळीं उलगडून खुशाल खेळाच्या मैदानभर भरधांव पळत होत्या.

खेळ चालू असतांनाच डचेसनें ॲलिसला एका कोपऱ्यांत गांठलें आणि ती तिथून तिला थेट आपल्याबरोबर दूर दूर समुद्रकिनाऱ्यावर घेऊन गेली. तिथें डचेसनें बनावट कासव व ग्रायफॉन या प्राण्यांशी ॲलिसची ओळख करून दिली.

त्या ठिकाणीं झिंगे मासे चार जोडप्यांचा नाच करण्यांत दंग झालेले होते. ॲलिसनें या नाचांत भाग घेतला. हा नाच चालू असतांना एका खटल्याची बातमी त्यांच्या कानीं आली. एका चोरानें कांहीं खायचे पदार्थ चोरलेले होते. त्याच्यावर कोर्टांत खटला चाललेला होता. खटल्याचें काम ज्यूरीसमोर चालू होतें. तेव्हां ॲलिस धांवतच कोर्टांत गेली.

बदाम राजा आणि बदाम राणी यांच्यासमोर साक्षीदार म्हणून ॲलिसला बोलावणें आलें. पण तिथला तो सगळा देखावा बघून ॲलिसला कांहीं सुचेनासें झालें. तिनें ज्यूरी ज्या बांकड्यांवर बसलेली होती तीं बांकडींच उलटीं पालटीं करून टाकलीं. बांकड्यांवर बसलेले सगळे ज्यूरर इतस्ततः फेंकले गेले. मग

सगळ्या प्राण्यांना परत त्या बांकड्यांवर आपापल्या जागीं बसविल्यानंतर ॲलिसनें साक्ष दिली.

साक्ष देतांना ती म्हणाली: "मला यांतलं कांहीं एक ठाऊक नाहीं."

तिचें हें भाषण ऐकून राणीला तिचा भयंकर राग आला. राणीनें हुकुम सोडला : "ॲलिसचं शिर धडापासून वेगळं करा."

सगळें कोर्ट ॲलिसच्या अंगावर धांवलें. ॲलिस त्या सगळ्यांना उद्देशून आव्हानपूर्वक म्हणाली: "तुम्ही सगळे अगदीं खेळायचे पत्ते आहांत नुसते. तुम्ही म्हणजे पत्त्यांचा जोड आहांत."

ॲलिसच्या तोंडावर कांहीं सुकलेलीं पानें पडलेलीं होतीं. तिच्या बहिणीनें तिच्या चेहऱ्यावर हळूच फुंकर मारली. त्याबरोबर तीं पानें उडालीं आणि ॲलिस आपल्या स्वप्नांतून जागी झाली.

ॲ मे लि या

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* हेन्री फील्डिंग (१७०७-१७५४). *कथानकाचा प्रकार :* घरगुती वास्तववाद. *काळ :* १७४० ते १७४९. *स्थळ :* इंग्लंड. *प्रथम प्रकाशन :* १७५१.

प्रमुख पात्रें : **कॅप्टन बूथ**, एक सैनिक. **ॲमेलिया**, त्याची पत्नी. **एलिझाबेथ हॅरिस**, तिची बहीण. **सार्जंट ॲट्‌किन्सन**, तिचा दूध-भाऊ. **डॉ. हॅरिसन**, बूथ याचा उपकारकर्ता. **मिस मॅथ्यूज**, एक शहरी स्त्री. **कर्नल जेम्स**, बूथ याचा एक माजी अधिकारी.

स मी क्ष ण : फील्डिंगनें 'द हिस्टरी ऑफ ॲमेलिया' च्या प्रस्तावनेंत म्हटलेंच आहे कीं या कादंबरींत आपण कुणाचाहि उपहास केलेला नाहीं. ॲमेलिया ही हर पिढींतली दीर्घकाळ हाल सोसणारी गृहिणी मनोरम आणि आकर्षक आहे. तिच्या पतीचे किरकोळ दोष अजूनहि खरे वाटतात. डॉ. हॅरिसन हा माणूस प्रत्येक वाचकाला ओळख करून घ्यावासा वाटतो. कादंबरीचा कांहीं चटकदार भाग, फील्डिंगनें तुरुंगांतील जीवन व कोर्टें यांचें जें बिनचूक वर्णन सादर केलेलें आहे, त्यांत सांपडतो. कादंबरीकार हा स्वतः कांहीं वर्षें मॅजिस्ट्रेट असल्यामुळें त्याला हे प्रसंग अत्यंत आधुनिक व वास्तववादी स्वरूपांत सादर

करतां आले. कारण ॲमेलिया हें पतिव्रता स्त्रीचें स्वभावचित्र वाचकांसमोर उभें करण्याच्या जोडीलाच आपल्या कादंबरीमुळें लोकांचें लक्ष तुरुंगाची व कायद्यांची सुधारणा करण्याच्या प्रश्नाकडे लागावें हाहि फील्डिंगचा उद्देश होता. त्याच्या अगोदरच्या कादंबऱ्यांमध्यें जशी विनोदाची उधळ माधळ आहे तशी या कादंबरींत नसली तरी हिच्या कथानकामध्यें अनेक मनोरंजक स्वभावचित्रें व गुंतागुंतीच्या प्रसंगांची गुंफण आपल्याला आढळते.

कथानक : एका रात्रीं वेस्टमिन्स्टरच्या पहारेवाल्यांनीं कॅप्टन विल्यम बूथ याला अटक केली. दोन मवाल्यांनीं एका अनोळखी माणसावर हल्ला केला; तेव्हां त्याला सोडवायला म्हणून बूथ गेला आणि सोडवायचा प्रयत्न चालू असतांना खुद्द बूथलाच अटक झाली. मवाल्यांनीं पोलिसांना लांच देऊन आपली सुटका करून घेतली. आणि बूथ मात्र आपल्यावर अन्याय झाल्याची तक्रार करीत असतांना त्याला पोलिसांनीं सोडून न देतां एका अन्यायी मॅजिस्ट्रेटसमोर उभा केला.

बूथनें मॅजिस्ट्रेटसमोर सांगितलेली हकीकत अगदीं साधी आणि सरळ होती. परंतु तो निर्धन असल्यामुळें आणि त्याच्या अंगावर स्वच्छ व नीटनीटके कपडे नसल्यामुळें जजानें त्याची जबानी धुडकावून लावली आणि त्याला तुरुंगवासाची शिक्षा ठोठावली.

बूथ अगदीं हैराण झाला. कारण लंडन शहरीं कुणाची मदत मागावी म्हटलें तर त्याच्या ओळखीचें कुणीच नव्हतें. तो तुरुंगांत दाखल झाल्यावर त्याचें जें स्वागत झालें त्यामुळें त्याची आणखीच दुर्दशा झाली. तुरुंगांतील त्याच्या संवगड्यांनीं त्याचा कोट काढून घेतला. एका खिसेकापूनें त्याची तपकिरीची डबीच लांबविली.

असल्या विटंबनांमुळें तो चरफडत बसलेला असतांनाच फॅशनेबल पोशाख केलेल्या एका तरुणीला वॉर्डरांनीं तुरुंगाच्या फाटकांतून आंत आणलें. पहारेकऱ्यांसमोर सोन्याच्या नाण्यांनीं भरलेली थैली नाचवीत तिनें अशी मागणी केली कीं "मला या तुरुंगांत वेगळीं खासगी खोली पाहिजे."

तिचा चेहरामोहरा नि एकंदर चालचलणूक यांवरून बूथला आपल्या एका जुन्या मैत्रिणीची आठवण झाली. तिचा लौकिक फारसा चांगला नव्हता. तिचें नांव मिस मॅथ्यूज हें होतें. कित्येक वर्षांत तिची व त्याची भेट

झालेली नव्हती. परंतु ही बाई त्याला कसलीहि ओळख न देतां त्याला डावलून तशीच पुढें निघून गेली. त्यामुळें तिच्या बाबतींत आपलीच चूक झाली असावी, आपण जी समजत होतों ती ही नसावी, असें त्याला वाटलें.

त्यानंतर थोड्याच वेळानें एका वॉर्डरनें त्याला एका लहानशा पाकिटांतून एक सोन्याचें गिनीचें नाणें आणून दिलें. या पैशांतून त्याला आपला कोट व तपकिरीची डबी हा चोरीला गेलेला माल सोडवून घेतां आला. या अचानक झालेल्या धनलाभांतील उरलेली रक्कम त्यानें पत्त्याच्या जुगारांत घालवून टाकली.

पुन्हां बूथ पहिल्यासारखा निर्धन झाला. मग एक वॉर्डर त्याच्याकडे आला आणि त्याला बरोबर घेऊन तो मिस मॅथ्यूजकडे गेला. म्हणजे ती स्त्री दुसरी तिसरी कुणी नसून त्यानें पूर्वी अंदाज केल्याप्रमाणें त्याच्या जुन्या ओळखीची मिस मॅथ्यूज हीच खरोखरी होती. तो तुरुंगाच्या फाटकापाशीं उभा असतांना त्याची दुर्दशा तिला दिसली आणि तिनेंच तें रहस्यमय गिनीचें सोन्याचें नाणें त्याच्याकडे पाठवून दिलें होतें.

अशा दुःखकारक परिस्थितींत तीं दोघें पुन्हां एकत्र आलीं. मग त्यांनीं एकमेकांना आपापले अनुभव निवेदन केले. मिस मॅथ्यूजनें सांगितलें: " एका सैनिकानं मला लग्नाचं खोटं वचन देऊन फशीं पाडलं. म्हणून मी त्याच्यावर चाकूचा हल्ला चढविला. या अपराधाबद्दल माझ्यावर खटला होऊन माझी इथं रवानगी झाली. मला आतां काय शिक्षा होणार आहे तिची वाट पाहत मी इथं दिवस काढत्यें आहें."

बूथनें यावर आपली हकीगत तिला सांगितली. तो म्हणाला: " माझी व मिस ॲमेलिया हॅरिस या सुंदर तरुणीची ओळख झाली. मी निर्धन शिपाई गडी म्हणून तिच्या आईनं तिला प्रथम माझ्याशीं लग्न करायला विरोध केला. मग आम्ही दोघं पळून गेलों. पण मागाहून डॉ. हॅरिसन हा शहाणा नि प्रेमळ धर्मोपदेशक आम्हांला भेटला. त्यानं आमच्यासाठीं रदबदली केली आणि ॲमेलियाच्या आईची समजूत घातली. मग आमची नि माझ्या सासूची पुन्हां दिलजमाई झाली.

" पुढं आम्ही सुखानं संसार चालू केला. ॲमेलियाला दिवस गेले. तिची बाळंतपणाची वेळ यायच्या अगोदरच माझ्या रेजिमेंटला इंग्लंड सोडून जिब्राल्टरला जायचा हुकुम मिळाला. मी मोठ्या नाखुषीनं ॲमेलियाला तिची आई व तिची

वडील बहीण एलिझाबेथ या दोघींच्या स्वाधीन करून व तिचा नीट संभाळ करायला त्यांना बजावून जिब्राल्टरला निघून गेलों.

" जिब्राल्टरच्या मुक्कामांत मी शौर्य गाजवून माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रशंसा मिळविली. तिथल्या मोहिमेंतील एका लढाईत मीं जखमी झालों. त्या वेळीं मी भलताच आजारी पडलों. मी आजारी आहे हें कळतांक्षणी ॲमेलिया आमचं तान्हं बाळ आपल्या आईच्या व बहिणीच्या स्वाधीन करून स्वतः माझी शुश्रूषा करण्यासाठीं जिब्राल्टरला निघून आली.

" पण माझं दुर्दैव असं कीं माझी शुश्रूषा करायला आलेली ॲमेलिया स्वतःच आजारी पडली. तिला तिथली कडक हवा मानवेना. म्हणून तिला हवा पालटायसाठीं सौम्य हवेच्या ठिकाणीं न्यायचा मी बेत केला. त्यासाठीं मला पैसे हवे होते. मी माझ्या सासूला पैसे पाठविण्याबद्दल पत्र लिहिलं. पण माझी सासू मिसेस हॅरिस हिच्याकडून मला पैसे मिळायचे दूरच राहिले; उलट माझी मेव्हणी एलिझाबेथ हिनं मला उर्मट उत्तर धाडून नकार दिला.

" माझ्या फौजेंतला एक अधिकारी मित्र मेजर जेम्स याच्याकडून पैसे घेईन अशी मी आशा धरून होतों. पण तो नेमका त्याच वेळीं कुठें तरी कामगिरीवर दूर गेलेला होता. शेवटीं मीं माझा मित्र आणि ॲमेलियाचा दूधभाऊ सार्जंट ॲटकिन्सन याच्याकडून पैसे उसने घेतले आणि मी ॲमेलियाला घेऊन मॉंत-पेलियेर या गांवीं हवा पालटण्यासाठीं राहायला गेलों. तिथें आम्हां दोघांची एक मजेशीर इंग्रज अधिकारी कर्नल बाथ आणि त्याची बहीण यांच्याशीं चांगलीच दोस्ती जमली.

" ॲमेलिया या सुमारास दुसरेपणीं बाळंतीण झाली. तिला मुलगी झाली. या आनंदांत आम्ही होतों, पण तेवढ्यांत डॉ. हॅरिसनचें एक पत्र आलें आणि आमच्या या आनंदावर विरजण पडलें. त्या पत्रांत माझी सासू मिसेस हॅरिस ही वारली अशी बातमी होती. त्याचबरोबर तिनं आपली मालमत्ता ॲमेलियाच्या बहिणीला देऊन टाकली असाहि मजकूर त्यांत होता.

" मी आणि ॲमेलिया मग इंग्लंडला परत आलों. माझी मेव्हणी एलिझाबेथ हिनं आम्हां दोघांना इतकं उर्मटपणानं वागवलं कीं आम्ही लगच्या लगेच तिचं घर सोडून दिलं. त्या वेळीं आम्हांला डॉ. हॅरिसननं मदत केली म्हणून ठीक झालं. नाहीं तर आमच्यावर भीक मागायचीच पाळी आली असती.

हॅरिसननं मला शेती मिळवून दिली. लष्करांतून मला अर्धा पगार मिळत होता, त्याच्या भरतीला मला चांगलं उत्पन्न मिळेल अशी त्यानं तरतूद करून दिली.

"परंतु माझ्या हातून कित्येक बारीकसारीक चुका झाल्या. त्यांमुळं आजूबाजूच्या शेतकऱ्यांना माझ्याविषयीं वैरभाव वाटूं लागला. त्या वेळीं डॉ. हॅरिसन युरोपच्या दौऱ्यावर होता. त्याच्या गैरहजेरींत माझं जवळ जवळ दिवाळं निघायची वेळ आली.

"शेवटीं मी नव्यानं नशीब काढायला लंडनला आलों. अगोदर मी पुढं निघून आलों, लहानशी जागा भाड्यानं घेतली आणि त्या पत्त्यावर यायला मी तिला पत्र लिहिलं. तेवढ्यांत ही नवीन आपत्ति माझ्यावर कोसळली नि मी या तुरुंगांत येऊन पडलों."

बूथनें सांगितलेली ही सगळी हकीगत मिस मॅथ्यूजनें ऐकून घेतली. तिला त्याच्या दुर्दशेबद्दल फार सहानुभूति वाटली. त्याची पत्नी व मुलेंबाळें यांच्याबद्दल तिनें त्याचें अभिनंदन केलें. मग तिनें जेलरला लांच दिली आणि बूथला आपल्याच खोलींत पुढच्या कांहीं रात्री राहायला मिळावें म्हणून तिनें त्याची परवानगी मिळवून घेतली.

लवकरच बूथ आणि मिस मॅथ्यूज या दोघांची तुरुंगांतून सुटका झाली. ज्या सैनिकाला मिस मॅथ्यूजकडून इजा झाली होती, त्याची जखम पूर्ण बरी झाली. म्हणून तिच्यावरचे आरोप काढून घेण्यांत आले. ती सुटल्यावर तिनें बूथची देखील सुटका करविली. हीं दोघें तुरुंगांतून बाहेर पडायची तयारी करीत होतीं, येवढ्यांत खुद्द ॲमेलियाच तेथें येऊन पोंचली. त्याला वांचवायसाठीं ती गांवावरून मुद्दाम येथवर धांव घेऊन आली होती. त्याच्याविषयींच्या काळजीनें त्या बिचाऱ्या पतिव्रतेचा जीव कासावीस झालेला होता. तो तुरुंगांतून सुटलेला पाहून तिला साश्चर्य आनंदाचा गोड धक्का बसला.

मग हें बूथ जोडपें लंडन शहरीं वास्तव्य करून राहिलें. त्यानंतर लवकरच बूथला त्याचा माजी अधिकारी म्हणजे आतांचा कर्नल जेम्स हा भेटला. मधल्या काळांत कर्नल जेम्स यानें मिस बाथ हिच्याशीं लग्न केलें होतें, परंतु लवकरच या पत्नीचा त्याला कंटाळा येऊं लागला. मिसेस जेम्स आणि ॲमेलिया यांच्या जुन्या मैत्रीला लंडनच्या नव्या वातावरणांत उजाळा मिळाला.

तुरुंगांत आपली मिस मॅथ्यूजबरोबर जी सलगी झाली तिची माहिती

मिस मॅथ्यूज कदाचित ॲमेलियाला सांगेल आणि यामुळें आपल्याला फारच चोरट्यासारखें होईल अशी बूथला धास्ती वाटत होती. या सगळ्या घोटाळ्यांचा व अडचणींचा पाढा बूथनें सविस्तर कर्नल जेम्सला सांगितला. कर्नलनें त्याला पैसे कर्जाऊ दिले आणि कशाबद्दलहि कसलीहि काळजी न करण्याचा सल्ला दिला.

मिस मॅथ्यूजची हकीकत ऐकायला मिळाल्यावर कर्नल जेम्सला स्वतःलाच तिच्याविषयीं आकर्षण वाटूं लागलें. परंतु बूथला हवी होती तशा प्रकारची रदबदली करून बूथची सोय पाहणें त्याला जमलें नाहीं. मिस मॅथ्यूजनें मुद्दाम बूथला उद्देशून टोमणे घालणारीं व उभयतांच्या गुप्त संबंधाचा स्फोट करण्याची धमकी देणारीं पत्रें लिहिण्याचा सपाटा चालविला. हीं पत्रें ॲमेलियाच्या हातीं केव्हांहि पडलीं असतीं आणि त्यांचा जो काय परिणाम व्हायचा तो होणें सहज शक्य होतें.

एके दिवशीं बूथ कुटुंब बागेंत फिरायला गेलें होतें. तिथें या मंडळींना सार्जेट ॲटकिन्सन अचानक भेटला. तेव्हांपासून तो त्यांच्या घरींच राहायला आला आणि त्यांच्या मुलांचा सांभाळ करूं लागला. लवकरच त्यानें बूथची घरमालकीण मिसेस एलिसन हिच्याशीं अर्धवट प्रेमचाळेहि चालू केले.

मिसेस एलिसन हिचा बूथ कुटुंबालाहि चांगलाच उपयोग झाला. तिला भेटायला एक लॉर्डहि येत असे. तिच्या ओळखीमुळें या लॉर्डनें थोडेसे पैसे कर्जाऊ दिले आणि या पैशांतून बूथनें आपलीं कांहीं देणीं चुकतीं केलीं. दरम्यान मिस मॅथ्यूजचीं खुनशी कारस्थानें चालूच होतीं. तिनें कर्नल जेम्सला फितवून त्याचें मन बूथविषयीं कलुषित करून ठेवलें.

आपल्या मेव्हण्याचें बूथविषयींचें कलुषित मत कळल्यावर कर्नल बाथनें देखील ठरवून टाकलें कीं बूथ हा लष्करीहि नाहीं आणि सभ्य गृहस्थ तर नाहींच नाहीं. या मुद्यावर चिडीला पेटून कर्नल बाथनें तर बूथला द्वंद्व युद्धाचें आव्हानच दिलें. जगामध्यें आचारसंहितेपेक्षां अधिक मोठी अशी कोणतीच गोष्ट नाहीं अशी कर्नल बाथची दृढ श्रद्धा होती. पुढें बूथ आणि बाथ यांचें द्वंद्व युद्ध होऊन त्यांत बाथला फारसें जखमी न करतांच बूथनें हार खायला लावली, तेव्हां बूथच्या या दिलदारपणाचा बाथवर भलताच प्रभाव पडला

आणि त्यानें त्याला क्षमा केली. त्यानंतर त्यानें जेम्स आणि बूथ या उभयतांची दिलजमाई घडवून आणली.

या मुदतींत मिसेस एलिसननें एक निराळीच खटपट चालविली. बूथचीं जुगारांतलीं देणीं चुकतीं करण्यासाठीं ज्या लॉर्डनें त्याला पैसे दिले होते, त्याच्याशीं ॲमेलियाचें मेतकूट जमवून देण्याचा या बाईनें घाट घातला. भोळी बिचारी ॲमेलिया. तिच्या मैत्रिणी म्हणविणाऱ्या या बायांनीं तिची दिशाभूल केली. परंतु बनावट पोशाख करून एका नृत्यसमारंभांत ॲमेलियाला गुप्तपणें भेटायचा या लॉर्डसाहेबाचा सगळा व्यूह मिसेस बेनेट या दुसऱ्या एका शेजारणीनें सपशेल हाणून पाडला. ही बाई मिसेस एलिसनकडे खानावळी म्हणून जेवायला येत असे. तिचीहि त्या लॉर्डशीं अशीच ओळख झालेली होती. त्यानंतर तिलाहि त्या लॉर्डनें अशाच प्रकारें बनावट पोशाख करून नृत्यसमारंभांत भाग घेण्याच्या निमित्तानें गुप्तपणें गांठून मद्यामधून गुंगी येणारें औषध पाजलें होतें. त्याच रीतीनें ॲमेलियाचीहि इज्जत बरबाद होऊं नये म्हणून मिसेस बेनेट आपल्या मैत्रिणीला सावध करायला वेळेवर हजर झाली. मग तिनें ॲमेलियाला आपल्याविषयींची नवी हकीगत सांगितली. तोंपर्यंत ॲमेलियाची अशी समजूत होती कीं आपल्याकडे राहणारा सार्जंट ॲटकिन्सन हा मिसेस एलिसनच्या प्रेमांत सांपडलेला आहे. पण ती गोष्ट खरी नव्हती. मिसेस बेनेटनें नुकतेंच सार्जंट ॲटकिन्सनशीं लग्नहि केलें होतें. या लग्नाची बातमी ऐकून ॲमेलियाला खूप आनंद झाला. आपण ज्या कारस्थानांत अडकविल्या जाणार होतों त्यांतूनहि आपली सुटका करून घेण्याचा बेत आपल्याला करतां आला याहि आनंदांत ती होती.

परंतु तिला कळलेल्या एका नव्या बातमीनें तिच्या या दुहेरी आनंदाचा विरस करून टाकला. कर्जापायीं बूथला त्याच्या सावकारांनीं पुन्हां तुरुंगांत डांबलें, हीच ती बातमी. या वेळीं त्यांचा जुना मित्र डॉ. हॅरिसन याच्या वारंटावरून बूथवर हा तुरुंगांत जाण्याचा प्रसंग ओढवला. बूथनें भलतीच उधळपट्टी चालविलेली आहे अशा खोट्या अफवा डॉ. हॅरिसनच्या कानांवर गेल्या. या अफवांमुळें डॉ. हॅरिसनचा गैरसमज झाला आणि बूथची ही बेफाट उधळमाधळ बंद पाडण्यासाठीं त्यानें त्याला मुद्दामच तुरुंगांत डांबून ठेवविण्याची व्यवस्था

केली. या गोष्टीचा ॲमेलियाला लवकरच पत्ता लागला. खरा प्रकार समजल्यानंतर डॉ. हॅरिसननें लगोलग बूथची तुरुंगांतून सुटका करविली.

बनावट पोशाख करून नृत्यसमारंभाला हजर राहण्याची ती रात्र येऊन ठेपली. त्या वेळीं ॲमेलियानें आपला अगोदर ठरवून ठेवलेला बनावट पोषाख मिसेस ॲटकिन्सनला घालायला दिला आणि ती स्वतः घरीं राहून तिनें आपल्या जागीं मिसेस ॲटकिन्सनलाच नृत्यसमारंभाला धाडून दिलें. त्या रात्रीं मिसेस ॲटकिन्सननें त्या लॉर्डची फटफजिती करण्यांत यश मिळविलें इतकेंच नव्हे तर कर्नल जेम्स याचीहि चांगलीच रेवडी उडवायचें काम तिनें साधून घेतलें. या प्रकरणांतून इतक्या गुंतागुंती निर्माण झाल्या कीं त्यांना कांहीं सुमारच राहिला नाहीं. जवळ जवळ प्रत्येकाचा दुसऱ्याशीं असलेल्या नात्याबाबत गैरसमज झाला.

या ठिकाणीं बूथची एका जुन्या दोस्ताशीं गांठ पडली आणि दोघे जुगार खेळले. त्यांत बूथ फार मोठी रक्कम हरला. या कर्जापायीं आपल्याला पुन्हां तुरुंगांत घालतात कीं काय याची बूथला काळजी पडली. त्यानंतर मिस मॅथ्यूजच्या प्रकरणावरून कर्नल जेम्सबरोबर द्वंद्व युद्ध करण्याची पाळी बूथवर आली. खरें म्हटलें म्हणजे मिस मॅथ्यूजनें आग्रह केला म्हणूनच बूथ तिला भेटायला गेला होता. परंतु कर्नल जेम्सनें वेगळाच समज करून घेतला आणि बूथला द्वंद्व युद्धाचें आव्हान दिलें.

परंतु हें द्वंद्व युद्ध प्रत्यक्ष व्हायच्या अगोदरच बूथला कर्जापायीं पुन्हां तुरुंगांत जावें लागलें. शेवटीं डॉ. हॅरिसनला मध्यस्थी करणें भाग पडलें. त्यानें बूथच्या वतीनें कर्नल जेम्सजवळ सगळी सफाई करून टाकली. मग जेम्सनें तो खुलासा मान्य केला आणि बूथला माफी दिली. मिस मॅथ्यूजनेंहि आपण यापुढें बूथला कधींहि त्रास देणार नाहीं असें वचन दिलें.

पुढें एक विलक्षण योगायोग घडून आला. एका अनोळखी घरीं रॉबिन्सन नामक इसमानें मरणापूर्वी आपल्या पापांचा झाडा घेण्यासाठीं डॉ. हॅरिसनला बोलावणें धाडलें. तिथें हॅरिसनला कळलें कीं हा रॉबिन्सन एका काळीं मर्फी नामक वकिलाचा कारकून होता. याच वकिलानें मिसेस हॅरिसचें म्हणजे ॲमेलियाच्या आईचें मृत्युपत्र केलें होतें. ज्या मृत्युपत्राअन्वयें ॲमेलियाला तिच्या आईनें एक कवडीहि ठेवलेली नव्हती तें मृत्युपत्र खोटें असून तें एलिझाबेथ व मर्फी या दोघांनीं संगनमतानें बनावट तयार केलेलें होतें हेंहि या वेळीं हॅरिसनला कळलें.

त्याबरोबर डॉ. हॅरिसननें लगेच रॉबिन्सनकडून एक कबुलीजबाब लिहून घेतला. तदनुसार ॲमेलियाला तिच्याकडे वारसा हक्कानें असलेले पैसे मिळायचा मार्ग मोकळा झाला. मर्फी वकिलाला तडकाफडकीं अटक होऊन खोटीं कागदपत्रें तयार केल्याबद्दल त्याला शिक्षा झाली.

आतां बूथवरील बहुतेक सगळीं संकटें संपलीं. डॉ. हॅरिसनला बरोबर घेऊन तो आणि ॲमेलिया अशीं आपल्या घरीं परतलीं. एलिझाबेथला तिचीं सगळीं कारस्थानें आपल्याला कळलीं असल्याचें सांगावें हा त्यांचा हेतु. परंतु एलिझाबेथ तिथून तोंड काळें करून अगोदरच फ्रान्सला पळून गेली. ॲमेलियाला तिची दया आली. तिनें सालिना ठराविक रक्कम एलिझाबेथकडे परस्पर फ्रान्स-मध्येंच धाडून देण्याची व्यवस्था केली. बूथनें इतक्या उचापती केल्यानंतर शेवटीं त्याला एकदांचा धडा मिळाला कीं जुगार खेळणें ही कांहीं चांगली गोष्ट नव्हे. त्यानें जुगार न खेळण्याची प्रतिज्ञा केली व तो आपली पतिव्रता पत्नी ॲमेलिया हिच्यासमवेत निर्वेधपणें समृद्ध जीवन जगूं लागला. या जोडप्याला अनेक अपत्यांचा लाभ झाला. डॉ. हॅरिसन व ॲटकिन्सन मंडळी यांच्यासारख्या अमोल मित्रमंडळींच्या सहवासांत आणि आपल्या मुलांबाळांचें कौतुक करीत त्यांनीं सुखानें कालक्रमणा चालविली.

द अमेरिकन

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* हेन्री जेम्स (१८४३-१९१६). *कथानकाचा प्रकार :* मानसशास्त्रीय वास्तववाद. *काळ :* एकोणिसाव्या शतकाचा मध्य विभाग. *स्थळ :* पॅरिस, फ्रान्स. *प्रथम प्रकाशन :* १८७७.

प्रमुख पात्रें : **ख्रिस्टॉफर न्यूमन**, एक अमेरिकन. **मिस्टर ट्रिस्ट्रॅम**, त्याचा मित्र. **मिसेस ट्रिस्ट्रॅम**, त्याची पत्नी. **मॉंसिये नायोच**, एक दुकानदार. **मादेमोसील नायोच**, दुकानदाराची कन्या. **मादाम द बेल्लेगार्द**, एक फ्रेंच सरदारीण. **क्लेअर द सीन्त्र**, मादाम द बेल्लेगार्द हिची कन्या. **मार्की द बेल्लेगार्द**, मादाम द बेल्लेगार्द हिचा वडील पुत्र. **वालेन्तीन द बेल्लेगार्द**, मादाम द बेल्लेगार्द हिचा धाकटा पुत्र. **मिसेस ब्रेड**, मादाम द बेल्लेगार्द हिची मोलकरीण.

समीक्षण : अमेरिकन आणि फ्रेंच या दोन संस्कृतींचा परस्परांवरील

प्रभाव प्रस्तुत कादंबरीच्या द्वारां हेन्री जेम्स दाखवून देतो. कथानकांतील घटनांचें वर्णन हा ही कथा लिहिण्यांतला त्याचा मुख्य उद्देश नव्हे. कथानकांतील घडा-मोडींतून निर्माण झालेल्या विविध मानसशास्त्रीय समस्यांचें विश्लेषण करण्यावर त्याचा विशेष भर आढळतो. आपल्या पात्रांच्या आंतरिक जीवनाची पारख करून या जीवनाचें चित्रण आपल्या सुश्लिष्ट व घोंटीव शैलीमध्यें लेखक सादर करतो. त्याच्या शैलीची अपूर्वाई अजोडच म्हणावी लागते.

कथानक : १८६८ सालीं ख्रिस्टॉफर न्यूमन हा तरुण अमेरिकन कोट्याधीश आपल्या धंद्यांतून अंग काढून घेऊन बोटींतून पॅरिसला चालता झाला. त्याला नुसतीच भटकंती करायला हवी होती. आपल्या कलारसिकतेचा विकास करून घ्यायचा होता. आपल्यासाठीं एखादी जन्माची जोडीदारीण शोधायची होती. एके दिवशीं तो असाच लोव्र म्युझियमध्यें भटकत होता. तिथें त्याचा मादेमोसील नायोच या तरुणीशीं परिचय झाला. सुंदर सुंदर चित्रांच्या प्रतिकृती तयार करणें हा तिचा व्यवसाय होता. तिनें त्याची आपल्या वडिलांशीं ओळख करून दिली. हे गृहस्थ एक अपेशी दुकानदार होते. न्यूमननें एक चित्र मादेमोसील नायोच हिजकडून खरेदी केलें आणि तिच्या वडिलांकडून फ्रेंच भाषा शिकून घेण्यासाठीं त्यांची शिकवणी ठरवून टाकली.

मागाहून ट्रिस्ट्रॅम नामक आपल्या एका अमेरिकन मित्राच्या फ्रेंच पत्नीमार्फत त्यानें क्लेअर द सीन्त्र या तरुण विधवेशीं ओळख करून घेतली. या क्लेअरची आई इंग्लिश होती व तिचे वडील फ्रेंच होते. क्लेअर लग्नाला योग्य झाल्यानंतर तिचा विवाह मॉसिये द सीन्त्र या दुष्ट म्हाताऱ्या गृहस्थाशीं झाला. नंतर लवकरच हा म्हातारा मरण पावला. आणि वैवाहिक जीवनाच्या या अशा अनुभवामुळें क्लेअरच्या मनांत लग्नाविषयीं चांगलीच अढी बसून राहिली.

तिची अशी वृत्ति असून देखील न्यूमनला मात्र तिच्या अंगीं आपली पत्नी व्हायला योग्य असे अनेक गुण असलेले दिसून आले. परंतु अमेरिकन व्यापारी हा फ्रेंच सरदार घराण्याशीं सोयरीक करायला योग्य माणूस नव्हे असा फ्रेंचांचा पहिल्यापासून दृढ ग्रह होता. यामुळें न्यूमन जों पहिल्या प्रथम क्लेअरला भेटायला जातो तों तिचा वडील भाऊ मार्कि द बेल्लेगार्द यानें त्याला क्लेअरच्या घरांत प्रवेश करायलाच मज्जाव केला.

मॉसिये नायोच यानें न्यूमनच्या घरीं येऊन त्याला फ्रेंच शिकवायचें

कबूल केलें होतें. त्या वचनाप्रमाणें तो एके दिवशीं सकाळीं फ्रेंच भाषेचा पहिला धडा देण्यासाठीं न्यूमनच्या घरीं हजर झाला. या म्हाताऱ्याशीं गप्पा मारतांना न्यूमनला मोठी मौज वाटली. आपली कन्या मादेमोसील नायोच हिचें आपल्यावर जबरदस्त वर्चस्व असून ती एखादे वेळेस आपल्याला सोडून देईल आणि कुणा तरी श्रीमंत माणसाची रखेली होऊन राहील अशी आपल्याला सतत धास्ती वाटत असते, हें म्हाताऱ्यानें न्यूमनला सांगून टाकलें. "माझ्या मुलीनं जर असला कांहीं प्रकार केला तर मी तिला गोळी घालून ठार मारीन" असे निकराचे उद्गार म्हाताऱ्यानें न्यूमनजवळ काढले. न्यूमनला त्याची दया आली. तो म्हणालाः "तुमची मुलगी जर चांगल्या चांगल्या चित्रांच्या आणखी प्रतिकृती रंगवून देईल तर मी तिला भरपूर पैसे देईन आणि हे पैसे तिच्या हुंड्यासाठीं तुम्हांला पुरेसे होतील. मग ती तुम्ही म्हणतां तसलं भलतं सलतं कांहीं एक करणार नाहीं. तुम्ही कांहीं एक काळजी करूं नका."

उन्हाळ्याचे दिवस आले. न्यूमननें साऱ्या युरोपचा दौरा काढला. दौरा उरकून तो पावसाळ्यांत पॅरिसला परत आला. तेव्हां त्याला कळलें कीं ट्रिस्ट्रॅम पतिपत्नींनीं आपल्याला बरीच मदत करून ठेवलेली आहे.' आतां बेल्लेगार्द मंडळी त्याला निदान आपल्या घरांत येऊं द्यायला तरी कबूल झाली होती.

एके दिवशीं संध्याकाळीं क्लेअरचा धाकटा भाऊ व्हॅलेन्टाइन सरळ न्यूमनला भेटायला आला. दोघांच्या खूप गप्पा झाल्या. परस्परांचे विरोधी दृष्टिकोन हाच त्यांना आपल्या मैत्रीसाठीं चांगला आधार सांपडला. न्यूमनला आपल्या मनासारखें करायला संपूर्ण मुभा आहे या गोष्टीचा व्हॅलेन्टाइनला हेवा वाटला. याच्या उलट बेल्लेगार्द कुटुंबांतील लोक ज्या शिष्ट फ्रेंच समाजांत वावरत होते त्यामध्यें आपल्याला वावरायला मिळालें तर किती छान होईल असें न्यूमनला वाटत होतें. दोघांची चांगली दोस्ती जमल्यावर व्हॅलेन्टाइनला उद्देशून न्यूमन म्हणाला: "तुझ्या बहिणीशीं मी लग्न करूं इच्छितों. या कामीं तूं मला मदत केली पाहिजेस." यावर व्हॅलेन्टाइन म्हणाला: "माझ्याकडून होईल तितकी मदत मी तुला करीनच. परंतु तुझा सामाजिक दर्जा तुझ्या या विचाराला अनुकूल असा नाहीं. तोच कदाचित तुझ्या आड येईल हा इशारा मीं तुला अगोदरच देऊन ठेवतों."

न्यूमननें योग्य संधि पाहून आपली इच्छा क्लेअरला उघड बोलून दाखविली.

तिचा अनुनय करण्याची आपल्याला परवानगी असावी अशी त्यानें तिची आई मादाम द बेल्लेगार्द व तिचा वडील भाऊ मार्कि या दोघांकडे अनुज्ञा मागितली. या दोघांनीं मोठ्या नाखुषीनें का होईना, पण त्याला ही परवानगी एकदांची दिली. कारण बेल्लेगार्द मंडळींना घरखर्चासाठीं पैशाची फार जरूरी होती.

मादेमोसील नायोच हिनें चित्रांच्या प्रतिकृति करायच्या कामांत किती प्रगति केलेली आहे हें पाहण्यासाठीं लोव्र म्युझियमकडे न्यूमननें एक चक्कर टाकली. तिथें त्याला व्हॅलेन्टाइन भेटला. त्यानें त्याची या तरुणीशीं ओळख करून दिली.

बेल्लेगार्द मंडळींच्या घरीं मिसेस ब्रेड नामक एक इंग्लिश मोलकरीण कामाला होती. न्यूमनचा अनुनय चांगलाच यशस्वी होत चालला आहे असें तिनें त्याला आश्वासन दिलें. त्या भरंवशावर त्यानें क्लेअरला लग्नाची मागणी घातली. तिनें चटकन होकार दिला.

दरम्यान व्हॅलेन्टाइन एका नव्याच घोंटाळ्यांत सांपडला. मादेमोसील नायोच हिजवरून त्याचें दुसऱ्या एका माणसाशीं भांडण झालें. त्या माणसाला त्यानें द्वंद्व युद्धाचें आव्हान दिलें. हें द्वंद्व युद्ध खेळण्यासाठीं तो आपल्या पुरस्कर्त्यांना बरोबर घेऊन स्वित्झर्लंडला चालता झाला. त्याच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं क्लेअरला भेटायला न्यूमन तिच्या घरीं गेला. मिसेस ब्रेड त्याला दरवाजांतच भेटली. तिनें न्यूमनला सांगितलें: "क्लेअर बाईसाहेब शहर सोडून दुसरीकडे चालल्या आहेत." न्यूमननें यावर खुलाशाची मागणी केली. तेव्हां मिसेस ब्रेड म्हणाली: "व्यापारी पेशांतला माणूस आपल्या कुळांत सोयरा म्हणून येऊं द्यायला बेल्लेगार्द लोक तयार नाहींत." न्यूमन घरीं परत आला. पाहतो तों आपल्या नांवची एक तार येऊन पडलेली आहे. ही व्हॅलेन्टाइनची तार होती. आपल्याला जबरदस्त दुखापत झाली असल्याचें त्यानें या तारेंतून कळविलें होतें. आणि न्यूमनला ताबडतोब स्वित्झर्लंडला बोलावून घेतलें होतें.

क्लेअरचा नकार आणि व्हॅलेन्टाइनची काळजी अशा दुहेरी दुःखांचें ओझें बरोबर घेऊन न्यूमन स्वित्झर्लंडला गेला. तिथें गेल्यावर पाहतो तों व्हॅलेन्टाइन अगदीं मरणाच्या दारीं पडलेला आहे. आपल्या कुळांतल्या लोकांनीं न्यूमनची काय संभावना केली असेल याचा बरोबर अंदाज व्हॅलेन्टाइननें केला. मग तो

न्यूमनला म्हणाला: "मिसेस ब्रेड हिला आमच्या कुटुंबांतलं एक महत्वाचं रहस्य ठाऊक आहे. तिच्याकडून जर हें रहस्य तूं माहीत करून घेतलंस तर तुझ्याशीं लग्न करायला क्लेअरला परवानगी देणं आमच्या लोकांना भाग पडेल. तिला तुझ्याकडे परत येण्यावांचून गत्यंतर राहणार नाहीं."

दुसऱ्या दिवशीं सकाळीं व्हॅलेन्टाइनचें देहावसान झालें. न्यूमन त्याच्या स्मशानयात्रेला हजर राहिला. त्यानंतर तीन दिवसांनीं तो क्लेअरला भेटायला गेला. ती त्याला म्हणाली: "मी मठांत जाऊन जोगीण व्हायचा विचार केलेला आहे. मला आतां कुणाशीं लग्नच करायचं नाहीं." तिनें हा मार्ग पतकरूं नये म्हणून न्यूमननें तिला परोपरीनें विनवून पाहिलें. शेवटीं तो अगदीं निकरावर आला. बेल्लेगार्द मंडळींना तो पुन्हां भेटायला गेला. "तुमचं रहस्य मी उघडकीला आणल्याखेरीज राहणार नाहीं. तुम्ही बऱ्या बोलानं मला क्लेअरशीं लग्न करायला मोकळीक द्या, नाहीं तर तुमचा सगळा गौप्यस्फोट मी करून टाकीन," अशी त्यानें चक्क धमकीच दिली.

त्याच रात्रीं न्यूमननें झटपट करून मिसेस ब्रेडची मुलाखत घेण्याची व्यवस्था केली. ती त्याला म्हणाली: "मादाम द बेल्लेगार्द हिनं आपल्या पंगू पतीचा खून केला. कारण क्लेअरचं लग्न मॉसिये द सीन्त्र याच्याशीं होऊं द्यायला त्याचा विरोध होता. मुलीला चांगलं स्थळ मिळावं अशी त्याची इच्छा होती. परंतु मादाम द बेल्लेगार्द हिनं आपल्या पतीचा खून करून आपल्या मार्गांतला कांटा दूर केला नि मग आपल्या मुलीचं म्हाताऱ्या नवऱ्याशीं लग्न लावून दिलं. हा खून पचवायसाठीं क्लेअरच्या वडिलांना नैसर्गिक कारणांनीं मृत्यु आला असं या लोकांनीं खोटंच उठवलं. परंतु मादाम द बेल्लेगार्द हिनं आपल्या पतीचा खूनच केला असं सिद्ध करणारा कागदोपत्री पुरावा माझ्याजवळ आहे." आणि मिसेस ब्रेडनें हा कागदोपत्री पुरावा न्यूमनच्या स्वाधीन करून टाकला.

मिसेस ब्रेडनें यानंतर बेल्लेगार्द मंडळींची नोकरी सोडली आणि ती न्यूमनकडे येऊन त्याचें घरकाम करणारी मोलकरीण म्हणून त्याच्या घरीं कामाला राहिली. क्लेअरनें मठांत मुक्काम ठोकला असून तिनें सगळ्यांना भेटायला नकार दिला आहे, खुद्द तिच्या घरांतलीं माणसें तिला भेटायला गेलीं तरी ती त्यांना भेटत नाहीं असें कळवितें, अशी माहिती मिसेस ब्रेड हिनें न्यूमनला सांगितली. त्यानंतरच्या रविवारीं न्यूमन मठामध्यें "मास" च्या

प्रार्थनेला गेला. प्रार्थना आटोपल्यावर बेल्लेगार्द मंडळी बागेंत फिरत असलेली त्याला दिसली. त्यानें त्यांना गांठलें आणि मिसेस ब्रेडकडून मिळालेल्या कागदोपत्री पुराव्याची एक नक्कल त्यानें या लोकांना दाखविली.

याचा योग्य तो परिणाम नेमका झाला. दुसऱ्या दिवशीं मार्कि अगतिक होऊन न्यूमनला भेटायला आला नि म्हणाला: "तो कागदोपत्री पुरावा आम्हांला विकत द्या. आम्ही त्याचे पैसे देऊं." न्यूमननें पैशाच्या मोबदल्यांत तो पुरावा विकायचें नाकारलें. परंतु क्लेअरचा पत्नी म्हणून स्वीकार करण्याच्या बदल्यांत आपण हा पुरावा परत द्यायला तयार आहोंत असें त्यानें मार्कि याला चक्क सांगून टाकलें. ही गोष्ट मार्कि यानें साफ अमान्य केली.

न्यूमन परत घरीं आला. त्यानें खूप विचार केला. परंतु बेल्लेगार्द मंडळींचें रहस्य जाहीर करायला त्याचें मन कांहीं केल्या तयार होईना. काय करावें हेंच त्याला सुचेनासें झालें.

ट्रिस्ट्रॅम पतिपत्नींचा त्यानें सल्ला घेतला. त्यांच्या सांगण्यावरून त्यानें इंग्लंडच्या खेडोंपाडीं खूप प्रवास केला. विवाह झाल्यानंतर मधुचंद्रासाठीं आपल्या पत्नीबरोबर ज्या ज्या ठिकाणीं जायचें त्यानें ठरवून ठेवलें होतें त्यांतलीं कांहीं ठिकाणें त्यानें या प्रवासांत अत्यंत उद्विग्न मनःस्थितींत एकट्यानेंच पाहून घेतलीं. मग तो अमेरिकेला परत गेला. तिथेंहि त्याला अजिबात चैन पडेना. तो पुन्हां पॅरिसला परत आला. तेव्हां त्याला क्लेअर जोगीण झाली असल्याची बातमी ट्रिस्ट्रॅम कुटुंबाकडून कळली.

त्यानंतर कांहीं दिवसांनीं तो मिसेस ट्रिस्ट्रॅम हिला भेटायला गेला. तिच्या घरीं तो शेकोटीजवळ शेकत बसला. शेकोटींतल्या लांकडांचा खूप मोठा जाळ झालेला होता. त्यानें अगोदरच मनाशीं ठरवून ठेवलेला एक विचार या वेळीं अंमलांत आणला. बेल्लेगार्द मंडळींच्या बाबतींतले पुराव्याचे कागद त्यानें सरळ त्या शेकोटींत टाकून दिले. क्षणार्धात त्या कागदांची जळून राख झाली. या संदर्भात तो मिसेस ट्रिस्ट्रॅमला उद्देशून म्हणाला: "आतां या बेल्लेगार्द लोकांचें गुन्हेगारीचें रहस्य उघडकीला आणण्यांत कांहीं एक अर्थ राहिलेला नाहीं. आतां ही नुसती पोकळ धमकी ठरणार आहे. त्यापेक्षां मी हा पुरावाच नष्ट करून टाकतों आहे तेंच ठीक आहे. उगाच डोक्याला त्रास नको. आणि मी आतां पॅरिस शहराला कायमचा राम राम ठोकणार आहें."

मिसेस ग्रिस्ट्रॅम म्हणाली: "माझा अंदाज असा आहे. बेल्लेगार्द मंडळींनीं तुमचं पाणी जोखलं असलं पाहिजे. तुम्ही दिलेल्या धमकीचा त्यांच्यावर कांहींच परिणाम झालेला दिसत नाहीं. ते लोक मुळींच घाबरले नाहींत. कारण तुम्ही इतके सुस्वभावी आहांत कीं तुमच्या हातून त्यांचं रहस्य कधींच उघडकीस आणलं जाणार नाहीं याबद्दल त्यांना पहिल्यापासून खात्री होती."

हें ऐकल्यावर न्यूमनची नजर आपसूकच शेकोटीकडे वळली. त्या कागदांची केव्हांच राखरांगोळी होऊन चुकलेली होती.

ॲन अमेरिकन ट्रॅजेडी : अमेरिकन शोकान्तिका

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* थिओडोर ड्रायसर (१८७१-१९४५). *कथानकाचा प्रकार :* सामाजिक टीका. *काळ :* विसाव्या शतकाचा आरंभ. *स्थळ :* कान्सास सिटी, चिकागो आणि लायकर्गस, न्यूयॉर्क. *प्रथम प्रकाशन :* १९२५.

प्रमुख पात्रें : **क्लाइड ग्रिफिथ्स. रॉबर्टा आल्डेन**, त्याची प्रेयसी. **सॅम्युएल ग्रिफिथ्स**, क्लाइडचे धनाढ्य काका. **सोन्द्रा फिन्चले**, शिष्ट समाजांतील तरुणी; हिच्यावरहि क्लाइडचें प्रेम असतें.

समीक्षण : 'ॲन अमेरिकन ट्रॅजेडी' (अमेरिकन शोकान्तिका) ही बहुधा ड्रायसरची सर्वोत्कृष्ट कादंबरी म्हणायला हरकत नाहीं. खुद्द तिचा मथळा देखील अर्थातच अर्थपूर्ण आहे. ड्रायसरच्या मतें क्लाइडचा अधःपात अमेरिकन अर्थव्यवस्थेपायीं झाला. आणि या अर्थव्यवस्थेचा कठोर शब्दांत धिक्कार करण्यासाठींच त्यानें ही कादंबरी सादर केली. क्लाइडला जर श्रीमंती नि उच्च सामाजिक दर्जा यांमुळें मिळणारे खास हक्क उपलब्ध असते, तर त्याला नैतिक निर्णय घेण्याचा कधीं मोहच झाला नसता आणि त्यापायीं त्याच्यावर ओढवलेला सर्वनाशहि टळला असता. ही कादंबरी म्हणजे सामाजिक विषमता व खास हक्काचा अभाव या विषयावर लेखकानें सादर केलेला जबरदस्त पुरावाच ठरतो.

कथानक : क्लाइड ग्रिफिथ्स याचे आई-वडील मोठे भाविक व धार्मिक मनोवृत्तीचे होते. तो अगदीं लहान असतांनाच ते त्याला व त्याच्या

बहीण-भावंडांना आपल्याबरोबर घेऊन निरनिराळ्या शहरीं हिंडत असत व रस्तोरस्तीं जाहीर कीर्तनें करून जनतेच्या भाविकपणाला साद घालीत असत. या कुटुंबाला सतत दारिद्र्यांत दिवस काढावे लागत होते. परंतु जीवनांतील सगळ्या वादळांना व अपत्तींना तोंड देतांना प्रॉटेस्टंट पंथाच्या धर्मग्रंथावरील अढळ विश्वास हाच या कुटुंबाचा एकमेव आधार होता, हेंच त्याचें एकमेव आशास्थान होतें.

तथापि तरुण क्लाइडला धर्मभावनेविषयीं कधींच आस्था वाटली नाहीं. आपल्या आईवडिलांच्या जीवनक्रमाची त्याला अतिशय शरम वाटे. सर्वसामान्य माणसें जसें जगतात तसें यांना कां जगतां येऊं नये, धार्मिकतेचें यांनीं येवढें अवास्तव स्तोम कां माजवावें असा प्रश्न त्याला सतत भेडसावी. समजूं लागण्या-इतकें वय होईपर्यंत आणि स्वतःविषयींचे निर्णय स्वतः घेण्याइतकी हिंमत अंगीं येईपर्यंत तो जेमतेम या वातावरणाशीं मिळतें घेऊन राहिला आणि नंतर त्यानें आपला स्वतंत्र मार्ग पतकरायचें ठरविलें.

सोळा वर्षांच्या वयाला त्याला कान्सास सिटी हॉटेलांत वेटरची नोकरी मिळाली. तिथले पगार आणि बक्षिशी ही मिळकत बघून तो चकितच झाला. आयुष्यांत पहिल्या प्रथमच त्याच्या खिशांत पैसा नांवाची वस्तु आली आणि त्याला नीटनेटके कपडे करून स्वतःची हौस पुरवितां येऊं लागली.

मग या कुटुंबावर एक शोककारक प्रसंग ओढवला. क्लाइडची बहीण घरांतून पळून गेली. लग्नाच्या उद्देशानें ती पळाली असें समजायचें. तिच्या या अचानक नाहींसें होण्यामुळें तिच्या आईवडिलांना जबरदस्त हादरा बसला. खुद्द क्लाइड मात्र ही गोष्ट मनाला लावून घेऊन विचार करीत राहिला नाहीं. त्याच्या समोर सुखी जीवन वाढूनच ठेवलेलें होतें. नोकरी करतां करतां त्याला अनेक प्रकारच्या चैनी व ऐषआराम करायची अनुकूलता मिळाली. हॉटेलांतील इतर वेटर लोकांशीं त्याची दोस्ती जमली. त्यांच्या समवेत तो निरनिराळ्या प्रकारच्या पार्ट्यांमध्यें भाग घेऊं लागला. या पार्ट्यांतून मद्यपान व स्त्रीसौख्य यांना प्राधान्य असे. क्लाइडला लवकरच दारू पिण्याचा व कुंटणखान्यांतून रात्री घालविण्याचा चांगला सराव झाला.

एके दिवशीं आपली बहीण गांवांत परत आली असल्याचा त्याला पत्ता लागला. ज्याच्या बरोबर ती पळून गेली, त्या इसमानें तिला टाकून दिलें. तिच्या

ावळ खर्चायला दिडकीहि राहिली नाहीं. आणि तिला दिवस गेलेले होते. ाहिणीला पैशाची गरज आहे हें लक्षांत घेऊन क्लाइडनें तिच्यासाठीं थोडेसे डॉलर मापल्या आईजवळ दिले. तिला आणखी पैसे लागले तर द्यायचें त्यानें कबूल केलें, पण तें त्याला जमलें नाहीं.

कारण एका मुलीला वश करून घ्यायच्या तो नादांत होता. बहिणीला ैसे देण्याऐवजीं त्यानें या मुलीसाठीं एक उंची कोट विकत घेतला. हेतु हा कीं या कोटाच्या आमिषामुळें तरी ती आपल्याला वश व्हावी. एका रात्रीं तो आणि त्याचे दोस्त कुणाची तरी मोटार उसनी घेऊन एका पार्टीला गेले. या नभोजनाहून परत येतांना एक लहान मुलगी त्यांच्या मोटारीखालीं सांपडली. आपण पकडले जाऊं, या भयानें त्यांनीं मोटार भलतीकडेच दामटली. या गोंधळांत अपघात होऊन मोटारीचा चक्काचूर झाला. क्लाइडनें गांवांतून पळ काढला आणि थेट चिकागो शहर गांठलें.

चिकागो येथें त्याला युनियन लीग क्लब या संस्थेमध्यें वेटरचें काम मिळालें. तिथें योगायोगानें त्याचा धनाढ्य काका सॅम्युएल ग्रिफिथ्स याच्याशीं त्याचा परिचय झाला. काकाला हा चलाख पुतण्या आवडला. लायकर्गस, न्यूयॉर्क, येथें काकाच्या मालकीचा एक कारखाना होता. काकानें पुतण्याला या कारखान्यांत काम देऊं केलें. क्लाइडला हा विचार पसंत पडला. तो लायकर्गसला गेला.

तिथें त्याचा चुलतभाऊ गिल्बर्ट होता. गिल्बर्टला या मध्य-पश्चिमेकडून आलेल्या आपल्या दरिद्री भाऊबंदाची चीडच आली. एक काका सोडला, तर कुटुंबांतील बाकीच्या सगळ्या लोकांच्या मतें हा क्लाइड सामाजिक दृष्ट्या त्यांच्या बरोबरीचा नव्हता. ते त्याला खालच्या दर्जाचा समजत होते. आपल्या टोळींत त्याला सामील करून घ्यायला ते मुळीं कबूलच होईनात. क्लाइडला प्रथम कारखान्यांत अगदीं हलक्यांतली हलकी नोकरी मिळाली. ती तो मुकाट्यानें करूं लागला. परंतु त्याच्या काकानें त्याला लवकरच बढती दिली आणि तो एका खात्याचा सुपरवायझर (मुकादम) झाला.

दरम्यान गिल्बर्टच्या तथाकथित उच्च सामाजिक वर्तुळामध्यें क्लाइडच्या आगमनानें चांगलेंच वादळ निर्माण झालें. या वर्तुळांतील सोन्ड्रा फिन्चले या तरुणीच्या मनांतून गिल्बर्ट साफ उतरलेला होता. ती आणि तिचा

मित्रपरिवार अनेक नृत्यसमारंभ, भोजनसमारंभ, असले कार्यक्रम करीत असत. या कार्यक्रमांचें निमंत्रण ती मुद्दाम क्लाइडला देऊं लागली. गिल्बर्टला सतावणें हाच यांत तिचा मुख्य हेतु होता. क्लाइडचें कौतुक करणें किंवा त्याला बरोबरीचा मान देणें या गोष्टीला तिच्या लेखीं दुय्यम महत्व होतें, किंबहुना मुळींच महत्व नव्हतें म्हटलें तरी चालेल. क्लाइडची लोकप्रियता जसजशी वाढूं लागली तसतसें ग्रिफिथ्स कुटुंबांतील मंडळींना त्याला आपल्या सामाजिक वर्तुळांत सामील करून घेणें भाग पडलें. गिल्बर्टला मात्र या प्रकाराची अगदीं शिसारी आली.

कारखान्यांत काम करतां करतां रॉबर्टा आल्डेन या तरुणीशीं क्लाइडचा परिचय झाला. लवकरच तो तिच्या प्रेमांत सांपडला. सुपरवायझरचा सामाजिक दर्जा मोठा. त्यानें खालच्या श्रेणींतल्या नोकरांशीं मिळून मिसळून वागणें वर्ज्य होतें. यामुळें रॉबर्टाशीं त्याच्या गांठीभेटी चोरूनच होत असत. रॉबर्टानें सर्वस्व समर्पण करावें म्हणून क्लाइडनें तिला खूप आग्रह करून पाहिला. परंतु लग्नाअगोदर बधायला ती तयार होईना. शेवटीं तो हातचा जातो कीं काय अशी धास्ती वाटून ती त्याला सर्वस्वीं वश झाली.

इकडे त्याच वेळीं सोन्द्राविषयींचें आकर्षण क्लाइडच्या मनांत वाढत चाललें. तिच्यावर त्याचें प्रेम बसलें. तिच्याशीं लग्न करावें असा विचार त्याच्या मनांत डोकावूं लागला. तिच्याशीं लग्न केल्यानें आपल्याला पैसाहि मिळेल, आपला सामाजिक दर्जाहि उंचावेल, आपण ज्या गोष्टींसाठीं इतके हपापलों होतों तें सगळेंच आपल्याला मिळेल, अशा आकांक्षांचे मनोरे तो रचूं लागला.

हळू हळू रॉबर्टाला भेटायच्या तारखा तो चुकवूं लागला. सोन्द्राला भेटायचे जेवढे मोके मिळतील तेवढे साधायचे, तिला भेटायसाठीं जास्तींत जास्त वेळ मोकळा ठेवायचा, असा कार्यक्रम त्यानें ठरविला. साहाजिकच रॉबर्टाला त्याच्या वागण्याचा संशय आला. शेवटीं खरा प्रकार रॉबर्टाला कळल्याशिवाय राहिला नाहीं.

त्याच सुमारास रॉबर्टाला दिवस गेले. कसलें तरी औषध देऊन गर्भपात करवितां आला तर बघावें म्हणून क्लाइडनें औषधांचीं अनेक दुकानें पालथीं घातलीं. कांहीं उपयोग झाला नाहीं. गर्भपात करायला तयार होणारा डॉक्टर मिळतो का, याचीहि त्यानें चौकशी केली. रॉबर्टा एका डॉक्टराकडे गर्भपात करून

घेण्यासाठीं म्हणून गेली देखील. परंतु त्या डॉक्टरनें असलें ऑपरेशन करायला नकार दिला. क्लाइड आणि रॉबर्टा या दोघांनाहि यांतून कसा मार्ग काढावा तें सुचेना. रॉबर्टाशीं लग्न करून मोकळें व्हावें तर आपल्या उज्वल भवितव्यावर पाणी पडणार, आपलीं सगळीं सुखस्वप्नें विलयाला जाणार, असें क्लाइडला वाटूं लागलें. बरें, तिला नकार द्यावा तरी तिकडूनहि मोठी पंचाईत झाली.

तो आपल्या मनाची अशी समजूत घालूं लागला कीं आपलें खरें प्रेम रॉबर्टावर नाहीं; आपलें खरें प्रेम सोन्द्रावरच आहे; सोन्द्राशींच आपण लग्न केलें पाहिजे. रॉबर्टा निकरावर येऊन त्याला म्हणाली: " निदान माझ्या होऊं घातलेल्या बाळासाठीं तरी माझ्याशीं लग्न कर. लग्न झालं कीं तुझी तशी इच्छा असल्यास मी इथून कायमचं तोंड काळं करीन. तुझ्या प्रगतीच्या आड मी मुळींच येणार नाहीं. म्हणजे तुझ्या मागचं माझं शुक्लकाष्ठ सुटेल. " पण क्लाइड तिचें हें म्हणणें मान्य करायला तयार होईना. तो जास्त जास्तच चिडूं लागला, अधिकाअधिक चिंताक्रांत दिसूं लागला.

एके दिवशीं त्यानें वर्तमानपत्रांत एक बातमी वाचली. एक जोडपें नौका-विहाराला म्हणून एका तलावांत गेलें आणि तिथें तीं दोघेंहि अपघात होऊन बुडून मेलीं. ही बातमी वाचल्यापासून हळू हळू त्याच्या डोक्यांत एक योजना साकार होऊं लागली. मग तो रॉबर्टाला म्हणाला: " चल. आपण लग्न उरकून घेऊं या. त्याच्या अगोदर आपण एका तलावांत नौकाविहार करायला जाऊं या. तो आड बाजूचा तलाव आहे. आपलं तिकडे जाणं कुणाच्याच लक्षांत येणार नाहीं. " तलावांत नौकाविहार करतां करतां तो जणूं काय चुकूनच तिच्याकडे झुकला. त्याच्या हातांतल्या कॅमेऱ्याचा मार तिच्या डोक्यावर बसला. होडी कलंडली. रॉबर्टा व क्लाइड दोघेंहि पाण्यांत पडलीं. रॉबर्टा बुडून मेली. क्लाइड पोहत पोहत कांठाला लागला आणि सटकला. आपण जरी हें सगळें अगोदर योजून केलेलें असलें तरी रॉबर्टा अपघातानें बुडून मेली असेंच सगळ्यांना वाटेल अशी क्लाइडला मनोमन खात्री होती.

परंतु क्लाइड हा माणूस एकंदरींत बावळटच. त्यानें व रॉबर्टानें एकमेकांना लिहिलेलीं प्रेमपत्रें पोलिसतपासांत सांपडलीं. त्यांवरून रॉबर्टाला दिवस गेल्याचें उघडकीस आलें. साहजिकच क्लाइडला खुनाच्या आरोपावरून अटक झाली. त्याच्या काकानें त्याच्यासाठीं एक वकील बघून दिला. खटला उभा राहिला.

त्याच्या बचावासाठीं त्याच्या वकिलानें त्याची बाजू खूप विस्तारानें मांडली. परंतु त्याच्या वकिलाची सगळी मेहनत व्यर्थ ठरली. कोर्टानें त्याच्यावर खुनाचा आरोप शाबीत धरला. त्याला देहान्ताची शिक्षा झाली. अमेरिकेंतील पद्धतीनुसार त्याला एका खुर्चीत बसवून त्या खुर्चीतून विजेचा प्रवाह सोडून त्याला "एलेक्ट्रॉक्यूट" करायचें ठरलें.

त्याची आई तुरुंगांत त्याची अखेरची भेट घेण्यासाठीं आली. तिनें त्याला स्वतःच्या आत्म्याला वांचविण्याचा आग्रह केला. एका उपाध्यायाला बोलावणें गेलें. त्याच्या समोर अखेरीस क्लाइडनें आपल्या पापांबद्दल आपल्याला पश्चात्ताप होत असल्याचें एक निवेदन लिहून दिलें. त्याला खरोखरी पश्चात्ताप झाला होता किंवा नाहीं याची मात्र शंकाच आहे. त्याला शेवटीं विजेच्या खुर्चीत मरण पतकरावें लागलें. ऐषआराम आणि श्रीमंतीच्या लोभानें मोहाला बळी पडलेल्या एका तरुणाचा, अशा रीतीनें शोकजनक अन्त झाला.

आ ना का रे नि ना

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* कौंट लिओ टॉल्स्टॉय (१८२८-१९१०). *कथानकाचा प्रकार :* सामाजिक टीका. *काळ :* एकोणिसावें शतक. *स्थळ :* रशिया. *प्रथम प्रकाशन :* १८७५-१८७७.

प्रमुख पात्रें : **आना कारेनिना. आलेक्सेई कारेनिन**, तिचे यजमान. **कौंट व्रोन्स्की**, तिचा प्रियकर. **स्तेपान ओब्लोन्स्की**, तिचा भाऊ. **कित्ती श्चेर्बात्स्की**, स्तेपानची मेव्हणी. **कोन्स्तन्तीन ल्येविन**, याचें कित्तीवर प्रेम असतें.

समीक्षण : 'आना कारेनिना' या कादंबरीची गणना टॉल्स्टॉयच्या हातखंडा कलाकृतींमध्यें केली पाहिजे. वास्तववाद हें तिचें ठळक वैशिष्ट्य. या कादंबरींत दोन कथानकें आहेत. एक कथानक म्हणजे मादाम कारेनिना हिची शोकान्तिका. जो पुरुष तिचा पति नव्हे त्या पुरुषाच्या प्रेमांत सांपडून तिचा शोकजनक अन्त होतो. दुसरें कथानक म्हणजे कोन्स्तान्तीन ल्येविन याची कहाणी. हा एक हळव्या मनाचा माणूस. त्याचें व्यक्तिगत तत्वज्ञान हेंच त्याचें चित्रण करायला टॉल्स्टॉयला कारण मिळालें. आनाची कहाणी वास्तव असून मति गुंग करून सोडते. ल्येविनच्या रूपानें टॉल्स्टॉयचे त्याच्या समकालीन

समाजाविषयींचे स्वतःचे विचारच प्रतिबिंबित झालेले आढळतात. अशा प्रकारें रशियन समाजव्यवस्थेच्या शृंखलांमध्यें जखडलेली एक स्त्री, आणि या समाजामध्यें अस्तित्वांत असलेल्या विसंगतींचा उलगडा करण्यासाठीं प्रयत्नशील असलेलें जीवनविषयक तत्वज्ञान, या दोहोंची एकजीव गुंफण केलेलें कथानक म्हणजेच ही कादंबरी.

कथानक : स्तेपान ओब्लोन्स्की व त्याची पत्नी दोली या मॉस्कोनिवासी जोडप्याचें कडाक्याचें भांडण झालें. हें भांडण मिटवितां आलें तर बघावें म्हणून त्याची बहीण आना कारेनिना मुद्दाम मॉस्कोला आली. या मुक्कामांत कौंट व्रोन्स्की या देखण्या तरुणाशीं तिचा परिचय झाला. दोलीची धाकटी बहीण कित्ती हिच्यावर त्याचें प्रेम असावें अशा अफवा पसरलेल्या होत्या.

तथापि कित्तीवर आणखीहि एकाचें प्रेम होतें. त्याचें नांव कोन्स्तान्तीन ल्येविन. हा मॉस्को शहरांतील एका जुन्या घराण्यांतला माणूस. आना ज्या वेळीं मॉस्कोला आली, त्याच वेळीं ल्येविन देखील मॉस्कोला आला. कित्तीनें ल्येविनला नकार दिला. व्रोन्स्कीकडून मागणी येईल म्हणून ती वाट बघत राहिली. ती मागणी येईना, तेव्हां बिचारीचा अगदींच हिरमोड झाला. खरें सांगायचें म्हणजे कित्तीला मागणी घालायचा विचार व्रोन्स्कीच्या मनांत देखील आलेला नव्हता. त्याची आणि आनाची दृष्टादृष्ट होण्याचीच खोटी. त्याचें तिच्यावर प्रथम दर्शनींच प्रेम जडलें. आना मागाहून सेंट पीटर्सबर्गला आपल्या घरीं परत गेली. तिच्या पाठोपाठ व्रोन्स्की देखील तिकडे चालता झाला.

लवकरच तीं दोघें एकमेकांच्या सहवासांत असलेलीं दिसूं लागलीं. कधीं संगीताच्या बैठकींमध्यें, तर कधीं नाटकगृहांमध्यें. त्यांच्याविषयीं बऱ्याच गटारगप्पा पसरूं लागल्या. त्यांना तेवढी या गोष्टीची दादहि नसावी असें दिसत होतें. आनाचा पति कारेनिन याला मात्र या प्रकरणामुळें बरीच काळजी लागली. हा थंड डोक्याचा, महत्वाकांक्षी व निर्विकार वृत्तीचा माणूस होता. त्याला या प्रकरणापायीं आपल्या सामाजिक दर्जाला धोका पोंचेल असें वाटलें.

विचार करतां करतां त्याला बोलल्यावांचून राहवेना. त्यानें एका रात्रीं या अफवांविषयीं आनाबरोबर चर्चा केली. व्रोन्स्कीशीं तिची ही जी सलगी झालेली होती तिला तो प्रेमाचें नुसतें वरवरचें सोंग समजत होता. असले प्रेमाचे चाळे उघडपणें चालू ठेवण्यांत कोणता धोका आहे, तो त्यानें तिला दाखवून दिला.

व्रोन्स्कीला आपल्या घरीं बोलावून त्याची सरबराई करायची नाहीं अशी त्यानें तिला ताकीद देऊन ठेवली. तो म्हणाला: "यापुढं तूं अधिक संभाळून वागलं पाहिजेस. तुझ्या या प्रेमप्रकरणाची मला चीड आली आहे, किंवा व्रोन्स्कीचा मला हेवा वाटतो, असं नको समजूंस. मला जी काळजी वाटते ती तुझ्या वागण्याचे सामाजिक परिणाम काय होतील याचीच. आपला मुलगा सेर्योझा अजून लहान आहे. आई म्हणून त्याच्याविषयींचं तुझं जें कर्तव्य आहे तेंहि तूं विसरतां कामा नये." यावर आना म्हणाली: "तुमचं म्हणणं मला पटलं. यापुढं तुम्ही सांगाल तसंच मी वागेन." आणि हें प्रकरण येवढ्यावरच स्थगित झालें.

परंतु यानंतर लवकरच घोड्यांच्या शर्यतीच्या मार्गावरील अपघातांत सांपडून व्रोन्स्की जखमी झाला. या वेळीं त्याच्याविषयींच्या खऱ्या भावना लपवून ठेवणें आनाला अशक्य झालें. जाहीर रीत्या असलें अविचारी वर्तन केल्याबद्दल कारेनिननें तिची खूप निर्भर्त्सना केली. द्वंद्व युद्ध, विभक्त राहणें, घटस्फोट, या सगळ्या पर्यायांचा त्यानें तुलनात्मक विचार केला. परंतु यांतला एकहि पर्याय त्याच्या पसंतीस उतरला नाहीं. त्यानें ते सगळे पर्याय बाजूला सारून टाकले. शेवटीं त्यानें आनाला आपल्याच घरीं राहू द्यायचें असा निर्णय घेतला. आपलें हें वर्तन धर्माज्ञेनुसार यथायोग्यच आहे असा त्यानें आपल्या मनाशीं विचार केला. इकडे आनानें कुणाला न कळेल अशा प्रकारें व्रोन्स्कीला गुप्तपणें भेटायचा क्रम चालूच ठेवला.

कित्तीकडून नकार मिळाल्यावर ल्येविन आपल्या खेड्यांतील जमीनदारी इस्टेटीवर परत आला. तिथें त्यानें शेती व शेतमजूर यांच्या प्रश्नांमध्यें बरेंच लक्ष घातलें. एके दिवशीं तो शेतावर गेला आणि भूदासांच्या बरोबरीनें त्यानें हातांत कोयती घेऊन प्रत्यक्ष काम केलें. त्यांच्या जीवनाची पुरातन आदिम तत्वप्रणाली आपल्याला समजूं लागलेली आहे असें त्याला या अनुभवानंतर वाटलें. त्यानें नवीन विकासयोजनांचा आराखडा तयार केला. त्यांत त्यानें सहकारी पद्धतीनें शेती करण्याच्या प्रयोगालाहि स्थान दिलें.

पुढें त्याच्या कानांवर अशी बातमी आली कीं कित्तीचें लग्न शेवटीं झालें नाहीं तें नाहींच. ती मध्यंतरी आजारी झाली, परंतु आतां ती बरी असून लवकरच मॉस्कोला परत येणार आहे असेंहि त्याला कळलें. त्यानें तिला मागणी

घालण्याच्या बाबतींत फिरून एकदां यत्न करून पाहायचें ठरविलें. तिचें आपल्यावर प्रेम आहे, पण हें प्रेम तिनें सगळ्यांपासून छपवून ठेवलें आहे, याची त्याला मनोमन जाणीव होती. तसा तोहि स्वाभिमानी होता, नि तीहि स्वाभिमानी होती. या स्वाभिमानापायींच हीं दोघें आतांपर्यंत एकमेकांपासून दूर राहिलीं.

आतां ल्येविनच्या हृदयांत नवी आशा अंकुरली. लवकरच किती आपली पत्नी होणार असें सुखद चित्र त्याच्या मनश्चक्षूंपुढें उभें राहिलें. या विचारानिशींच तो मॉस्कोकडे रवाना झाला.

आना कारेनिनाला दिवस राहिले. ही बातमी व्रोन्स्कीला सांगणें जरूरीचें होतें. पतीचे सगळे आदेश धाब्यावर बसवून तिनें व्रोन्स्कीला आपल्या घरीं बोलावून घेतलें. व्रोन्स्कीला हें कळल्यावर आनाविषयीं आपल्या काय काय जबाबदाऱ्या आहेत त्यांची जाणीव त्याला आली. त्यानें तिला विनवून सांगितलें: "कसंहि कर. कारेनिनच्या हातांपायां पड. आणि त्याच्याकडून काडीमोड मिळवून घे. म्हणजे आपल्याला लग्न करायला मोकळीक मिळेल." तिनें त्याप्रमाणें कारेनिनची करुणा भाकली. पण कारेनिन आपला थंडच. त्यानें तिला सांगून टाकलें कीं "काडीमोड वगैरे तुला कांहीं एक मिळणार नाहीं. व्रोन्स्कीपासून तुला होणारं हें मूल माझंच आहे असं मी समजेन. म्हणजे तूं माझ्या तोंडाला ही जी काळोखी फांसली आहेस ती जगाला अजिबात कळणार नाहीं. परंतु कांहींहि झालं तरी घटस्फोटाचा लाजिरवाणा दावा करायचा विचार सुद्धां माझ्या मनाला असह्य होतो. तूं माझं ऐकलंस तर ठीकच आहे. नाहींपेक्षां तूं आपला मूर्ख हट्ट असाच चालू ठेवलास तर मला सेर्योझाला तुझ्यापासून दूर करावं लागेल. हा इशारा मीं तुला मुद्दाम देतोंय. तो लक्षांत घे नि स्वस्थ राहा."

हें अगदीं ताणलेलें कौटुंबिक नातें अशा अवस्थेंत न तुटतां तसेंच चालू राहिलें. एका रात्रीं कारेनिननें बाहेर कुठें तरी जायचा आगाऊ बेत करून ठेवला. तो आनाला कळला. तिनें ती संधि साधून नेमक्या त्याच्या गैरहजेरीच्या वेळांत व्रोन्स्कीला आपल्या घरीं यायला कबूल व्हायला लावलें. योगायोग असा कीं कारेनिन बाहेर पडायला नि त्याच वेळीं पुढच्या पायऱ्यांवर व्रोन्स्कीची व त्याची भेट व्हायला एकच गांठ पडली. याचा कारेनिनला भयंकर संताप आला. त्या संतापाच्या भरांत तो आनाला म्हणाला: "मी तुझ्याशीं घटस्फोट घ्यायचं

ठरवलंय. सेर्योझाला मात्र मी माझ्याजवळ ठेवून घेईन. त्याला तुझ्या ताब्यांत देणार नाहीं." परंतु घटस्फोटाचा दावा करणें ही गोष्ट इतकी गुंतागुंतीची होती, त्यांतून निर्माण होणारी बदनामी येवढी भयंकर होती, या सगळ्या प्रकारांचें एकंदर दृश्यच त्याला इतकें किळसवाणें वाटत होतें, कीं हें सगळें सव्यापसव्य करायला कारेनिनचें मन कांहीं केल्या तयारच होईना.

आनाचे दिवस भरत आले, तिची बाळंतीण व्हायची वेळ अगदीं जवळ आली, तरी कारेनिनचा या बाबतींत कांहीं निर्णयच होईना. तेवढ्यांत त्याला एक महत्वाची राजकीय जागा हस्तगत करण्यांत यश मिळालें. मग तर आपल्या सार्वजनिक चारित्र्याला धोका पोंचेल असें कांहींहि करायला तो बिलकुलच तयार होईना.

आना बाळंतीण झाली. बाळंतपणाचा तिला फार त्रास झाला. ती मरणार कीं काय असा रंग दिसूं लागण्याइतकी ती आजारी झाली. तिच्या या आजारीपणाला आपणच कारण झालों या गुन्हेगारीच्या भावनेनें भारावून व्रोन्स्कीनें आत्महत्या करायचा प्रयत्न केला. पण तें त्याला जमलें नाहीं. कारेनिनच्या मनाचा तर जो काय गोंधळ उडाला, त्याला मुळीं सीमाच राहिली नाहीं. आपली पत्नी आतां लवकरच हें जग सोडून जाणार असें त्याला वाटलें, आणि ती जी काय विनंति करील ती मुकाट्यानें मान्य करायची असें त्यानें ठरवूनच टाकलें. व्रोन्स्की समोर असणें हा तिची प्रकृति सुधारण्याचा एकमेव उपाय असल्याचें दिसून आलें.

असे अनेक महिने ती आजारीच होती. शेवटीं आपली तान्ही कन्या व आपला प्रियकर यांना बरोबर घेऊन ती हवा पालटायला इटलीला निघून गेली. तिथें त्यांनीं ओढाताणींतच वास्तव्य केलें.

दरम्यान ल्येविननें पुन्हां कित्तीला लग्नाची मागणी घातली. तिनें होकार दिला. लग्नाच्या तयारीची खूप धामधूम उडाली. मग त्या दोघांचें लग्न एकदांचें झालें.

आना कारेनिना व व्रोन्स्की हीं दोघें इटलीहून रशियाला परत आलीं. तीं व्रोन्स्कीच्या इस्टेटीवर राहायला गेलीं. आतां तिला पतीच्या घरीं परत जाणें अशक्यच होतें. कारेनिननें घटस्फोटाचा दावा वगैरे करण्याची कसलीच तसदी घेतली नाहीं. तरी परंतु आनापासून आपली फारकत झाली आहे असेंच तो समजत

होता. हा माणूस म्हणजे एक अत्यंत निष्ठावंत संसारी गृहस्थ; यानें आपली इज्जत अविचल राखली; याच्या बेइमान पत्नीनें मात्र याच्यावर अन्यायाचा मोठाच गहजब केला—असें सगळ्याच लोकांचें कारेनिनविषयीं मत झालें.

अधूनमधून सेर्योझाला भेटायला म्हणून आना चोरून शहरांत येत असे. परंतु आपण आलों याचा पत्ता आपल्या पतीला लागेल या धास्तीनें ती मुद्दामच फार थोड्या वेळांत अशा भेटी आटोपून घेई. अशी मुलाची भेट झाल्यानंतर दर वेळीं परत येतांना तिच्या मनाला फारच यातना होत असत. या कार्यक्रमांत तिला गोडी मुळींच वाटत नसे. व्रोन्स्कीच्या बाबतींतहि ती अधिकाधिक चिडचिडेपणा करूं लागली. त्यानें जरा कांहीं तिच्या मर्जीविरुद्ध केलें कीं ती संतापानें फणफणूं लागे. याचा परिणाम असा झाला कीं व्रोन्स्की तिच्या सहवासांत कमी कमी वेळ राहूं लागला. आपल्या लहान बालिकेकडे तर ती जवळ जवळ मुळींच लक्ष देत नसे.

लवकरच तिनें आपल्या मनाची अशी एकतर्फी खात्री करून घेतली कीं व्रोन्स्की कुणा तरी दुसऱ्या बाईच्या प्रेमांत सांपडलेला असणार. एके दिवशीं तर तिला घरांत एकटी राहणें अशक्य झालें. ती थेट रेल्वे स्टेशनकडे चालती झाली. स्टेशनवर जाऊन तिनें तिकीट काढलें. प्लॅटफॉर्मवर उभी राहून ती खालच्या रुळांकडे टक लावून बघत होती. स्टेशनावर येऊं घातलेल्या गाडीचा खडखडाट तिच्या कानांत दुमदुमला. अचानक तिला मॉस्को रेल्वे स्टेशनावर एक माणूस चालत्या गाडीखालीं सांपडल्याचा प्रसंग आठवला. हा प्रसंग तिची आणि व्रोन्स्कीची भेट झाली त्याच दिवशीं घडलेला होता. येणारी गाडी किती अंतरावर असेल याचा तिनें काळजीपूर्वक हिशेब केला. आणि गाडी स्टेशनांत यायच्या ऐन मोक्याला तिनें रुळांवर अंग टाकलें.

तिच्या मृत्यूनंतर व्रोन्स्की लष्करांत कामगिरीवर गेला. एका काळचा तो देखणा व आनंदी तरुण. त्याच्यांत आतां इतका बदल झाला कीं तो मृत्यूचें स्वागत करायला निघाला. जगायला त्याला एकच निमित्त होतें. तें म्हणजे आना.

ल्येविन आणि कित्ती यांचें सांसारिक जीवन म्हणजे दैनंदिन कामाचा व नित्यक्रमाचा वाढता रामरगाडा होऊन राहिलें. त्यांत दोघें हौसेनें भाग घेऊन एकमेकांचे श्रम हलके करूं लागलीं. आपण शेतकऱ्यांशीं जे व्यवहार करतों त्यांच्या बाबतींत श्रीमंतीमुळें आपल्यावर कोणकोणत्या जबाबदाऱ्या लादल्या

गेल्या आहेत हें त्येविनला अखेरीस कळून आलें. या त्याच्या जबाबदाऱ्यांमध्यें आपला वांटा उचलून किती त्याला मदत करूं लागली. अजून असे कित्येक प्रश्न उपस्थित होत होते कीं ज्यांची समाधानकारक उत्तरें त्याला कधींच देतां आलीं नसतीं. तरी देखील त्याला जीवनांतलें समाधान देणारें सौंदर्य, त्यांतले परिश्रम, त्यांतली फुरसत, त्यांतलें दुःख नि त्यांतलें सुख, या सगळ्या गोष्टींची चांगलीच जाणीव आली.

ॲन्थनी ॲड्व्हर्स

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* हेर्वे ॲलन (१८८९-१९४९). *कथानकाचा प्रकार :* चमत्कृतिपूर्ण अद्भुतकथा. *काळ :* अठराव्या शतकाची अखेर आणि एकोणिसाव्या शतकाचा आरंभ. *स्थळ :* पश्चिम युरोप, आफ्रिका, उत्तर अमेरिका. *प्रथम प्रकाशन :* १९३३.

प्रमुख पात्रें : **ॲन्थनी ॲड्व्हर्स**. **डॉन लुई, मार्कि द विन्सिताता**, ॲन्थनीच्या आईचे पति. **मारिय**, ॲन्थनीची आई. **मिस्टर बॉनिफेदर**, ॲन्थनीचे आजोबा. **फेथ पॉलियोलोगुस**, मिस्टर बॉनिफेदर याचें घरकाम करणारी मोलकरीण. **एन्जेला ग्यूसेप्पी**, ॲन्थनीची प्रेयसी. **फ्लॉरेन्स उडने**, ॲन्थनीची पहिली पत्नी. **डोलोरस द ला फुएन्त**, ॲन्थनीची दुसरी पत्नी. **व्हिन्सेन्त नोल्त**, ॲन्थनीचा मित्र, एक बँकर.

समीक्षण : 'ॲन्थनी ॲड्व्हर्स' ही नशीब काढायला निघालेल्या एका सैनिकाची कथा. हा सैनिक भटकत भटकत युरोपचा बराच मोठा भाग पालथा घालतो, आफ्रिकेंतून भ्रमंती करतो आणि उत्तर अमेरिकेला जातो. या पुस्तकांत घटनांची नुसती रेलचेल आहे. ऐतिहासिक पुरुषांचाहि तींत उल्लेख आढळतो. तथापि तींतील पात्रांना कथानकाच्या मानानें गौण स्थान आहे. अद्भुतरम्य कादंबरीचे जे वेगवेगळे प्रकार आहेत, त्या सगळ्यांचे एकेक प्रातिनिधिक नमुने या कादंबरीच्या विविध विभागांमध्यें आढळतात म्हणूनहि ती मनोरंजक ठरते.

कथानक : लेगहॉर्न येथील एका स्कॉटिश व्यापाऱ्याची तरुण कन्यका स्वरूपसुंदरी मार्किसे मारिय द विन्सिताता हिचें लग्न होऊन एक वर्ष व्हायच्या आंतच ती डेनिस मूर नामक एका तरुणाच्या प्रेमांत सांपडली. आपले

पतिराज फ्रान्समध्यें स्वतःच्या संधिवातावर इलाज करण्यासाठीं राहिलेले असतांना तिनें त्याची गुप्तपणें भेट घेतली. तिचा चढेल पति डॉन लुई, मार्कि द विन्सिताता, याला या कारस्थानाचा पत्ता लागला. त्यानें आपल्या पत्नीला तिथून ताबडतोब दूर नेलें आणि तिचा शूर दुर्दैवी प्रियकर तिला गांठायला तिच्या पाठोपाठ निघाल्यावर त्यानें या प्रियकराला ठार मारून टाकलें.

मारीय हिचें बाळ आल्प्स पर्वताच्या उंच पठारावर जन्माला आलें. बाळाला जन्म दिल्यावर डॉन लुईची पत्नी या बाळंतपणांतच स्वर्गवासी झाली. मग डॉन लुईनें हें आईवेगळें बाळ लेगहॉर्नला नेलें आणि तिथें त्यानें तें चोरून 'कॉन्व्हेंट ऑफ जीसस द चाइल्ड' नामक मठांत नेऊन ठेवलें. तें बालक कुणाचें आहे हें ओळखण्याच्या फक्त दोनच निशाण्या बाळाजवळ आढळल्या. एक ओव्हरकोट आणि मॅडोन्नाची (येशू ख्रिस्ताच्या आईची) मूर्ति. या दोन्ही वस्तू मारीय हिच्या मालकीच्या होत्या.

मठांतल्या जोगिणींनीं मुलाचें नामकरण केलें. तो ॲन्थनी झाला. दहा वर्षे वयाचा होईपर्यंत तो त्या जोगिणींच्या मठांतच राहिला. मग त्याला एक शिकाऊ उमेदवार म्हणून गांवांतील एक प्रमुख व्यापारी मिस्टर बॉनिफेदर याच्या स्वाधीन करण्यांत आलें.

मुलाबरोबर आलेला ओव्हरकोट व मॅडोन्नाची मूर्ति या वस्तू आपली कन्या मारीय हिच्याच आहेत हें बॉनिफेदरनें चटकन ओळखलें. त्याच्या घरच्या मोलकरणीनेंहि या वस्तू ओळखल्या. ॲन्थनीला ॲड्व्हर्स हे आडनांव देण्यांत आलें. तरी पण ज्या व्यापाऱ्याकडे आपण कामाला आहोंत तो आपल्या आईचा पिता आहे हें नातें त्याला मुद्दामच त्याच्या आजोबानें सांगितलें नाहीं. आपला भरभराटीस येत असलेला धंदा पुढें मागें वारसाहक्कानें त्याच्याच स्वाधीन होणार हें मुकाट्यानें गृहीत धरून त्याच्या शिक्षणाची सोय नीट होईल अशी खबरदारी मात्र बॉनिफेदरनें अगोदरपासून घेतली.

ॲन्थनी फार लवकर वयांत आला. घरची मोलकरीण फेथ पॅलिओलोग हिनेंच त्याला आपल्या कह्यांत घेऊन त्याला प्रेमाचे पहिले धडे दिले. त्यानंतर स्वयंपाक्याची कन्या ॲन्जेला हिच्याशींहि त्यानें कांहीं काळ प्रेमसंबंध ठेवला. गांवांतील इंग्लिश राजदूताची मुलगी फ्लॉरेन्स उडने हिच्याकडेहि तो

आकर्षित झाला; परंतु तिच्या आईनें त्याला या बाबतींत उत्तेजन दिलें नाहीं. ॲन्थनीच्या कांहीं अपेक्षा असतील हें तिला ठाऊकच नव्हतें.

नेपोलियनची फौज अखेरीस लेगहॉर्नपर्यंत येऊन थडकणार अशी आगाऊ अटकळ बांधून मिस्टर बॉनिफेदरनें मुकाट्यानें आपला धंदा आंवरता घेतला, आपले पैसे परदेशाला धाडून दिले, आणि स्वतः व्यवसायांतून निवृत्त होण्याचे बेत आंखले. आपल्या नातवाला त्यानें अमेरिकन आगबोट 'वाम्पानोग' हिचें तिकीट काढून दिलें. या बोटीचा कप्तान कॅप्टन जॉरहॅम हा होता. ॲन्थनीनें क्यूबा बेटावर जायचें आणि तिथें एका गिऱ्हाइकाकडे बऱ्याच वर्षांपासून येणें असलेले पैसे वसूल करायचे, अशी कामगिरी त्याच्या आजोबानें त्याच्यावर सोंपविली.

'वाम्पानोग' बोटीनें प्रथम जिनोवा बंदर घेतलें. तिथें फादर झेवियर या जेसुइटपंथीय साधूची ॲन्थनीनें भेट घेतली. जोगिणींच्या मठांतील त्याच्या मुक्कामांत हा साधूच त्याचा पालक होता. तूं बॉनिफेदरचा वारस आहेस ही गोष्ट ॲन्थनीला केव्हां कळवायची हें ठरवायचा हक्क या साधूला त्याच्या आजोबानें बहाल केलेला होता. आणि ॲन्थनीची आई कोण होती व त्याचें भवितव्य कसें उज्वल आहे ही सगळी हकीकत याच भेटींत फादर झेवियरनें त्याला सांगून टाकली.

'वाम्पानोग' बोट क्यूबा बेटावरील हॅव्हाना बंदरांत येऊन पोंचली. तिथें ॲन्थनीला असा पत्ता लागला कीं आपला ऋणको गॅल्लेगो हा गुलामांचा व्यापार करायला आफ्रिकेला गेला आहे. इथला कॅप्टन-जनरल डान लुई द ला कासास याच्या मदतीनें एक योजना तयार झाली. ॲन्थनीला सरकारचा प्रतिनिधी म्हणून आफ्रिकेला जातां यावें अशी तरतूद या योजनेंत होती. आफ्रिकेंत गेल्यावर त्यानें गॅल्लेगोचे गुलाम जप्त करावेत आणि ते तिथून क्यूबामध्यें विक्रीसाठीं आणावेत आणि या विक्रींतून जे पैसे येतील त्यांचा अर्धा भाग कॅप्टन-जनरलला मिळावा व उरलेल्या अर्ध्या भागांतून बॉनिफेदरचें येणें वसूल व्हावें अशी ही एकंदर योजना ठरली.

डॉन लुईच्या नात्यांतली एक तरुणी डोलोरेस द ला फुएन्ते हिच्याविषयीं तरुण ॲन्थनीला अतिशय आकर्षण वाटूं लागलें. म्हणून त्यानें शेवटीं आफ्रिकेंत मुक्काम करायचें कबूल केलें. आपलें येणें वसूल करण्यावरच न थांबतां गुलामांचे

तांडेच्या तांडे भरभरून बोटी क्यूबाला धाडायच्या आणि अशा रीतीनें कॅप्टन-जनरलला खूप श्रीमंत करायचें असें त्यानें ठरविलें. पुढें मागें केव्हां तरी आपल्याला डोलोरेसशीं लग्न करायला मिळेल या त्याच्या आशेला या व्यवहारानें बळकटी येणार होती म्हणूनहि त्यानें ही जबाबदारी पतकरली.

'ॲरिस्टॉक्रॅटिका' या बोटीनें त्याचा आफ्रिकेचा प्रवास सुरू झाला. या प्रवासांत त्याची चांगलीच कसोटी लागली. या बोटीवर फादर फ्रान्स्वा हा साधू होता. आफ्रिकेंतील गुलामांना मदत करायची त्यानें खटपट केली, गुलामगिरीच्या यातनांतच त्यानें त्यांना थोडा धीर दिला, म्हणून त्याची या कामगिरीवर मुद्दाम आफ्रिकेला रवानगी झाली. बोटीवर हा साधू 'यलो फीव्हर' नें आजारी झाला. इतका आजारी झाला कीं तो मरतां मरतां वांचला. बोट रिओ पॉंगो नदींतून गॅल्लेगोच्या मुक्कामाच्या ठिकाणावर चालली असतांना बोटीचा कप्तान व खलाशी यांनीं बंड उभारलें. क्रूर दडपशाही करून ॲन्थनीला या बंडाचा बंदोबस्त करावा लागला. मुक्कामाच्या ठिकाणीं गेल्यावर त्याला कळलें कीं गॅल्लेगोला मरून कांहीं महिने लोटले आहेत आणि त्यानें आपल्या मागें आपला मॅनेजर फर्डिनान्डो याजकडे आपल्या धंद्याचा कारभार सोंपविला आहे.

ॲन्थनीनें हा धंदा आपल्या ताब्यांत घेतला आणि सतत तीन वर्षें बोटी भरभरून गुलामांचे तांडे क्यूबामध्यें विक्रीला धाडून दिले. इथल्या मुक्कामांत फादर फ्रान्स्वा याला दुःख होईल अशी एक गोष्ट ॲन्थनीनें केली. फर्डिनान्डोची बहीण अर्धवट युरोपियन व अर्धवट नीग्रो रक्ताची नेलेता हिला ॲन्थनीनें आपली रखेली म्हणून ठेवून घेतली. परंतु ॲन्थनीचें इथें सगळें नीट चाललेलें असतांना देखील मानवी देहांची खरेदीविक्री करण्याच्या या उद्योगाशीं त्यांला पुरतेपणीं मिळतें घेणें जमेना.

ॲन्थनी आपल्या उद्योगाच्या ठिकाणीं कांहीं काळ हजर नव्हता. ती संधि साधून एक आफ्रिकन देवऋषि म्नोम्बिबी यानें फादर फ्रान्स्वा याला पकडून त्याच्याच क्रूसावर त्याला खिळे ठोकून ठार केलें. ॲन्थनी परत येऊन बघतो, तर त्या साधूच्या प्रेताची ती अवस्था त्याला दिसली. तेवढ्यांत त्याला अशी बातमी कळली कीं त्याचे आजोबा मिस्टर बॉनिफेदर यांचें निधन झालें असून 'युनिकॉर्न' बोटीचा कॅप्टन बिटर्न हा त्याला लेगहॉर्नला परत घेऊन जाण्यासाठीं

रिओ पाँगो नदींत बोट उभी करून वाट पाहतो आहे. तेव्हां अॅन्थनीनें हें गुलामांच्या व्यापाराचें केन्द्र सोडून जाण्याचें ठरविलें. त्यानें आपली रखेली नेलेता हिला तिथेंच सोडून दिलें.

लेगहॉर्न येथें अॅन्थनी आणि डॉन लुई मार्कि द विन्सिताता हे दोघे एकाच वेळीं येऊन दाखल झाले. दोघांचींहि तिथें धंद्याचींच कामें होतीं. "कासा बॉनिफेदर" या घराची मालकी मार्कि याजकडे होती. हें घर बंद करून टाकायला डॉन लुई आलेला होता. अॅन्थनी आला होता तो बॉनिफेदरनें आपलें मृत्युपत्र विन्सेंत नोल्त या बँकरकडे ठेवलें होतें, तें त्याच्याकडून घ्यायला आलेला होता. अॅन्थनीचे आजोबा व विन्सेन्त हे तरुणपणीं एकमेकांचे मित्र होते.

विन्सेन्तनें एक नवा उद्योग अॅन्थनीला सुचविला. एक फ्रेंच सावकार मॉसिए अवरार हा दिवाळखोर स्पॅनिश सरकारला फ्रेंच खाद्यपदार्थ आणि पैसे पुरवायच्या विचारांत होता. याच्या मोबदल्यांत मेक्सिकोमधील खाणींतली चांदी त्याला मिळायची होती. या फ्रेंच सावकाराचें म्हणणें असें होतें कीं अॅन्थनीनें ही चांदी वेराक्रूझ येथून बोटींतून रवाना झाल्यावर ती न्यू ऑर्लीन्स येथें उतरून घ्यावी, आणि यांतला जास्तींत जास्त पैसा फायदेशीर अशा दुसऱ्या कोणत्या तरी धंद्यांत पुन्हां गुंतवावा. उरलेली चांदी त्यानें बोटीनें फिलाडेल्फिया येथें पाठवायची होती, आणि तिथून तिची रवानगी युरोपला होणार होती. फिलाडेल्फिया मुक्कामीं फ्लॉरेन्स उडने हिचा पति डेव्हिड पॅरिश हा ही चांदी ठेवून घेणार होता.

पुढची व्यवस्था करण्यासाठीं विन्सेन्त व अॅन्थनी असे दोघे पॅरिसच्या प्रवासाला निघाले. वाटेंत आल्प्स पर्वताच्या एका खिंडींत डॉन लुईनें त्यांना गांठलें. त्यांची गाडी कड्यावरून खालीं लोटली जावी असा त्याचा प्रयत्न होता. परंतु त्याची ही योजना फसली आणि त्याची स्वतःचीच गाडी तींतल्या कोचमनसकट एका खोल घळींत कोसळली. त्या वेळीं डॉन लुईबरोबर फेथ पॅलिओलोगुस हीहि होती. तिला डॉननें आपली रखेली म्हणून ठेवून घेतलेली होती. हीं दोघें आपल्या गाडींतून उतरून अॅन्थनी व त्याचा मित्र विन्सेन्त यांचा कडेलोट पाहायला मिळेल म्हणून वाट बघत होतीं. परंतु झालें भलतेंच. त्यांच्याच गाडीचा कोचमनसकट कडेलोट झाला. त्यांचा डाव असा फसल्यावर त्यांना खिंडींतून उतरायचा सगळा प्रवास पायीं करावा लागला.

पॅरिस शहरीं ॲन्जेला अनेक वर्षांनीं प्रथमच ॲन्थनीला भेटली. तिला त्याच्यापासून मुलगा झालेला होता. आतां ती प्रख्यात गायिका झालेली असून नेपोलियननें तिला आपली रखेली म्हणून ठेवून घेतलेलें होतें. ॲन्थनीबरोबर लग्न करून त्याच्यासमवेत अमेरिकेला जायला तिनें नकार दिला. परंतु तिनें त्याचा मुलगा मात्र त्याच्या स्वाधीन केला. तथापि तिच्या विनवण्यांना मान देऊन ॲन्थनीनें हा मुलगा आपल्याबरोबर न नेतां विन्सेन्तची अपत्यहीन चुलतबहीण आना हिच्याकडे ठेवून दिला.

ॲन्थनीचा धंदा न्यू ऑर्लीन्स शहरीं खूपच भरभराटला. ती चांदी त्याला फायदेशीर रीतीनें गुंतवितां आली. त्यानें तिथें एक बँक स्थापन केली, स्वतःसाठीं एक सुंदर मळा खरेदी केला, त्यांत एक झकासपैकीं हवेली बांधली. डेव्हिड पॅरिश हृदयविकाराचा झटका येऊन मृत्यु पावल्यावर ॲन्थनीनें फ्लॉरेन्सशीं लग्न केलें. त्यांची मुलगी मारीय तीन वर्षांची झाल्यावर ॲन्थनी घरीं नसतांना एका रात्रीं अचानक त्याच्या मळ्यांतल्या हवेलीला आग लागली. या आगींत त्याची पत्नी व मुलगी दोघीहि जळून खाक झाल्या.

या दुःखावेगाच्या भरांत ॲन्थनी पश्चिमेकडे प्रवासाला निघाला. वाटेंत रेड इंडियन लोकांच्या एका जमातीनें त्याला पकडलें. त्यांच्या तावडींतून तो सुटला आणि सांता फे येथील सैनिकांच्या हातीं सांपडला. तिथें त्याला गव्हर्नर डॉन लुई याच्यापुढें उभें करण्यांत आलें, आणि त्याला तुरुंगवासाची शिक्षा होऊन कैद्यांच्या रेल्गाडींतून त्याची मेक्सिको सिटीकडे रवानगी झाली. त्याच दिवशीं डॉन लुईला अर्धांगवायूचा झटका येऊन त्यांतच त्याचा अंत झाला. फेथ ही त्याची आतां पत्नी झालेली होती. तिनें स्पेनला परत जाण्याची तयारी केली.

सेंट लाझारोच्या इस्पितळांत ॲन्थनीनें दोन वर्षें घालविलीं. तिथें डोलोरेसला त्याचा पत्ता लागला. तिचें एक श्रीमंत जमीनदाराशीं लग्न होऊन नंतर तो वारल्यामुळें आतां ती विधवा झालेली होती. डोलोरेसनें त्याच्या सुटकेची व्यवस्था केली. मागाहून दोघांचें लग्न झालें आणि मग हें जोडपें सान लुझ या खेड्यांत राहायला गेलें. त्याला डोलोरेसच्या पोटीं दोन मुलें झालीं. सर्व कांहीं सुरळीत चाललें होतें. परंतु एके दिवशीं ॲन्थनी झाड तोडत असतां त्याच्या हातांतली कुऱ्हाड निसटली आणि तिचा घाव त्याच्या

जांघेवर बसला. त्याला शोधत माणसें येईपर्यंत रक्तस्राव होऊन तो तिथल्या तिथें मरून पडला.

त्यानंतर अनेक वर्षें लोटलीं. डोलोरेस व तिचे लोक तें खेडेंगांव केव्हांच सोडून गेले होते. स्थलांतर करणाऱ्या लोकांची एक टोळी सांता फे या गांवीं जातां जातां वाटेंत या खेड्याच्या वास्तूच्या ठिकाणीं आली. अॅन्थनीनें जी मॅडोन्नाची छोटी मूर्ति आयुष्यभर आपल्याबरोबर वागविली होती, ती अजूनहि सान लुझ या खेड्यांतल्या पडझडींतील एका खासगी प्रार्थनामंदिरांत उभी होती. कुणी एक कॅप्टन् जॉर्हम याची छोटी पुतणी मेरी जॉर्हम हिला ती मूर्ति सांपडली. परंतु ती मूर्ति आपल्याजवळ ठेवून घ्यायला तिच्या आईवडिलांनीं तिला मनाई केली. कारण त्यांना असें वाटलें कीं ही कुणा तरी बिगरख्रिस्ती लोकांची देवता असली पाहिजे. त्या ऐवजीं या मूर्तीचा उपयोग बंदुकीच्या नेमबाजीचें निशाण म्हणून फार चांगला होऊं लागला. कालांतरानें गोळ्या खा खाऊन या निशाणरूपी मूर्तीचे हजार तुकडे झाले.

अॅन्टिगॉन

वाङ्मयप्रकार : नाटक. *लेखक :* सोफोक्लीज (इ. स. पूर्वी ४९५ ?-४०६). *कथानकाचा प्रकार :* अभिजात शोकान्तिका. *काळ :* प्राचीन ग्रीस. *स्थळ :* थीब्रीस नगरी. *पहिला प्रयोग :* इ. स. पूर्वी ४४०.

प्रमुख पात्रें : **क्रेऑन**, थीब्रीस नगरीचा जुलुमशहा. **अॅन्टिगॉन**, ओएडिपसची कन्या. **इस्मेने**, तिची बहीण. **हायेमॉन**, क्रेऑनचा पुत्र. **टिरेसियास**, एक भविष्यवेत्ता.

समीक्षण : या नाटकांतला मुख्य प्रश्न आज जरी बिनमहत्वाचा असला तरी राज्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्यांविषयींची चर्चा प्राचीन ग्रीस देशांतल्या-इतकीच आतांहि समर्पक ठरते. नाटकांतील पात्रें खूपच नाट्यपूर्ण भाषणें करीत करीत आपापला शोककारक अन्त पतकरतात. त्याचबरोबर कथानकांतील नैतिक व तात्विक प्रश्न सत्रगीतांतून व स्वगत भाषणांतून प्रेक्षकांना सादर होतात. नाटकाचा पहिला प्रयोग पाहून अथेन्स-निवासी प्रेक्षक इतके बेहद्द खूष झाले कीं सामोसविरुद्ध झालेल्या लढाईत नाटककार सोफोक्लीजला सेनापतिपद

मिळालें. या नाटकाचे अलीकडील प्रयोग देखील प्रेक्षक व टीकाकार या दोहोंना चांगलेच स्वागतार्ह वाटले.

कथानक: राजा ओएडिपस याच्या शापभ्रष्ट कुळांतले दोघे पुत्र पॉलिनॉइसेस आणि एटिओक्लेस या भावांभावांनीं आपापल्या सेनांचें नेतृत्व केलें आणि ते दोघे थीबीस नगरीच्या वेशीपाशीं एकमेकांशीं लढाई करण्याच्या पवित्र्यांत उभे राहिले. पुढें दोघां भावांनीं द्वंद्व युद्ध केलें आणि त्यांत दोघे एकमेकांकडून ठार मारले गेले. त्या दोघांचा मामा आणि आतांचा थीबीस नगरीचा जुलमी राज्यकर्ता क्रेऑन याने असें फर्मान काढलें कीं एटिओक्लेस याचे नीट धर्माज्ञेनुसार संपूर्ण अंत्यसंस्कार करावेत, परंतु पॉलिनाइसेस यानें शहरावर हल्ला केलेला असल्यामुळें त्याचें प्रेत तिथेंच पडूं द्यावें आणि त्याच्यासाठीं कुणीहि शोक करूं नये. जो कोणी या फर्मानाविरुद्ध वर्तन करील त्याला देहान्ताची शिक्षा जाहीर झाली.

पॉलिनाइसेस आणि एटिओक्लेस या दोघां भावांच्या दोघी बहिणी ॲन्टिगॉन आणि इस्मेने यांनीं या फर्मानावर चर्चा केली. आपल्या दफन न झालेल्या भावाविषयींच्या दुःखानें ॲन्टिगॉनचें अंतःकरण विदीर्ण झालें. ती आपली बहीण इस्मेने हिला म्हणाली: "मी त्याचं दफन करत्यें. तूं मला मदत कर." असल्या धोकेबाज कामगिरींत इस्मेने हिनें मदत करण्याचें नाकारलें. तेव्हां ॲन्टिगॉन तें प्रतिबंधक फर्मान धुडकावून लावून पॉलिनाइसेसचें दफन करायला गेली.

त्यानंतर लवकरच एका पाहरेकऱ्याकडून क्रेऑनला कळलें कीं त्या प्रेताचें दफन झालें. त्याबरोबर तो संतापला आणि त्यानें हें कृत्य करणाऱ्याला शोधून काढायला पाहरेकऱ्याला फर्मावलें. पाहरेकरी कबरीकडे परत गेला आणि त्यानें तें प्रेत बाहेर काढून ठेवलें. तेवढ्यांत एक वावटळ सुटली आणि ॲन्टिगॉन आपल्या भावाची कबर बघायला आली. पाहते तों ती उघडी. तिथल्या तिथें तिनें आकांत मांडला. तिच्या आक्रोशामुळें पाहरेकऱ्याचें लक्ष तिच्याकडे गेलें आणि त्यानें तिला पकडून क्रेऑनसमोर नेऊन हजर केली.

क्रेऑननें तिला विचारलें: "तूं हा गुन्हा कां केलास?" ती उत्तरली: "मानवाचं दफन करणं हें मानवाच्या कायद्यांच्या विरुद्ध असलं तरी त्यामुळें देवांच्या कायद्यांचं पालनच होत असतं." तिच्या उत्तराची क्रेऑनला चीड

आली. त्यानें ॲन्टिगॉनला देहान्ताची शिक्षा फर्माविली. क्रेऑनच्या अंतःकरणाला पाझर फोडण्याचा इस्मेने हिनें प्रयत्न केला. ती म्हणाली : " मामा ! ॲन्टिगॉन माझी जशी बहीण आहे, तशी तुझी भाची आहे, आणि तुझा पुत्र हायेमॉन याची ती भावी वधू म्हणजे तुझी भावी सून आहे, हें तूं कसं विसरतोस ? तिची देहान्ताची शिक्षा तूं माफ कर." परंतु क्रेऑननें आपला हेका कायम ठेवला.

मग क्रेऑनचा पुत्र हायेमॉन मध्यें पडला. तो म्हणाला : " बाबा ! जनतेची सहानुभूति माझी भावी वधू ॲन्टिगॉन हिच्या बाजूला आहे. म्हणून तुम्ही ही शिक्षा सौम्य करावी." हें ऐकून क्रेऑन आपल्या पुत्रावरच संतापला. तो म्हणाला : " नगरवासी लोकांच्या डोक्यांत काय चाललं आहे याची मला काडीइतकीहि पर्वा नाहीं." यावर हायेमॉन उत्तरला : " बाबा ! हें तुमचं उत्तर मूर्खपणाचं आहे." मुलाच्या उद्धटपणाबद्दल शिक्षा म्हणून क्रेऑननें असा हुकुम दिला कीं " हायेमॉनच्या डोळ्यांदेखत ॲन्टिगॉनला ठार करा." हायेमॉन सूड घ्यायच्या धमक्या देऊन पसार झाला. क्रेऑननें यावर असें फर्माविलें कीं " थीबीस नगरीच्या बाहेरील एका गुहेंत ॲन्टिगॉनला कोंडून घाला, त्या गुहेच्या तोंडाशीं भिंत बांधून ती बंद करून टाका आणि माझ्या आदेशा-विरुद्ध गुन्हा केल्याबद्दल तिला तिथंच पडून मरूं द्या."

ॲन्टिगॉनला पाहरेकऱ्यांनीं नगराबाहेर नेलें तेव्हां सारे थीबीस नगरांतले लोक तिच्या पाठोपाठ गेले. तिच्यावर ओढवलेल्या दुर्धर प्रसंगाबद्दल धाय मोकलून रडले. शेवटीं तिला गुहेंत बंद करण्यांत आलें. हा सारा वेळ पॉलिनाइसेसचें शव नगराच्या तटबंदीपलीकडे तसेंच मूठमाठी न देतां पडून राहिलेलें होतें. या गोष्टीला अनुलक्षून भविष्यवेत्ता टिरेसियास यानें क्रेऑनला बजावून ठेवलें कीं " तुझं हें कृत्य देवांना मुळींच आवडलेलं नाहीं. बऱ्या बोलानं त्या शवाचं दफन करायची व्यवस्था कर. तूं जर पॉलिनायसेसच्या शवाचं दफन केलं नाहींस आणि ॲन्टिगॉनला गुहेंतून सोडवलं नाहींस तर लवकरच तुझा पुत्र हायेमॉन मरून जाईल."

टिरेसियासनें आतांपर्यंत वर्तविलेलीं कोणतींहि भविष्यें कधींच खोटीं ठरलेलीं नाहींत हें क्रेऑनच्या ध्यानांत आलें. म्हणून त्या भविष्यवेत्त्यानें सांगितलेली आपत्ति टाळण्यासाठीं तो घाईघाईनें त्याच्या सांगण्याप्रमाणें सगळ्या

गोष्टी करूं लागला. पॉलिनायसेससाठीं ताबडतोब एक कबर तयार करायचा त्यानें हुकूम दिला. आणि तो स्वतः ॲन्टिगॉनला सोडवायला तांतडीनें निघाला. परंतु देवांच्या इच्छेनुसार ठरलेल्या गोष्टी इतक्या सहजासहजीं बदलतां येणें शक्य नव्हतें. तो गुहेजवळ पोंचला तेंव्हां त्याला गुहेंतून त्याच्या पुत्राचा शोकपूर्ण आक्रोश ऐकूं आला. क्रेऑन गुहेंत जाऊन पाहतो तों ॲन्टिगॉन स्वतःच्याच कपड्यांचा गळफांस लावून घेऊन मरून पडलेली त्याला दिसली.

हायेमॉन हातांत तरवार घेऊन आपल्या वडिलांच्या अंगावर धांवून गेला. तो जणूं काय वडिलांवर हल्ला करणार असें बघणारांना वाटलें. परंतु हल्ला करण्याऐवजीं तो म्हाताऱ्याच्या तोंडावर नुसताच थुंकला. मग त्यानें ॲन्टिगॉनच्या मृत्यूमुळें जीव नकोसा होऊन स्वतःचीच तरवार स्वतःच्या छातींत भोंसकून घेतली. या घटनांची बातमी ताबडतोड नगरांत पसरली. हे सगळे एकापेक्षां एक शोककारक प्रसंग घडलेले ऐकून क्रेऑनच्या पत्नीनें आत्महत्या केली.

आपल्या पुत्राचें शव घेऊन क्रेऑन परत थीबीस नगरींत आला येवढ्यांत त्याला आपल्या पत्नीच्या आत्महत्येची बातमी कळली. अतःपर आपल्या आयुष्यांत कांहीं अर्थच राहिलेला नाहीं हें पाहून त्यानें स्वतःलाच नगराबाहेर हद्दपार करून घेतलें. स्वतःच्या कठोर जुलमशाहीला अखेरीस तो स्वतःच बळी पडला.

द अपॉसल : प्रेषित

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* शॉलेम आश्च (१८८०-). *कथानकाचा प्रकार :* धार्मिक बखर. *काळ :* येशू ख्रिस्ताला क्रूसावर फांशीं दिल्यानंतरचा. *स्थळ :* रोमन साम्राज्य. *प्रथम प्रकाशन :* १९४३.

प्रमुख पात्रें : **सॉल ऑफ तार्शिश**, मागाहून हा पॉल या नांवानें प्रख्यात झाला. **जोसेफ बार नाबा ऑफ सायप्रस**, सॉलचा मित्र, ख्रिस्ताच्या अव्वल अमदानींत ख्रिस्ती धर्म स्वीकारणारा. **रेब इस्टेफान**, एक प्रख्यात ज्यूइश (यहुदी) उपदेशक. **सायमन बार जोना**, यालाच पीटर म्हणत असत. **रेड जेकब**, जोसेफचा भाऊ.

समीक्षण : येशू ख्रिस्ताचे दोन महान प्रेषित पीटर आणि पॉल यांचें

चरित्र रेखाटण्याचा प्रामाणिक प्रयत्न म्हणजे 'द अॅपॉसल' ही कादंबरी. या काळाच्या इतिहासाशीं बिलकुल प्रतारणा न करतां लेखकानें ख्रिस्ती धर्म पंथाच्या आरंभींच्या काळांतील लढ्यांचें सहानुभूतिपूर्ण चित्र सादर केलें आहे. येशू ख्रिस्ताला क्रूसावर फांशी दिल्यानंतर लगेच ज्या घडामोडी झाल्या, त्या काल-खंडांतील जीवनाचें ठळक चित्र वाचकांसमोर मांडण्याच्या कामीं लेखकाचें तत्कालीन घटनांचें ज्ञान फार उपयोगी पडतें.

कथानक : पॉन्टियस पायलेट यानें नाझारेथच्या येशूला क्रूसावर फांशी दिल्याला सात आठवडे लोटले. जेशुआ हाच आपला प्रेषित आहे अशी श्रद्धा असणारे जेरुसलेमचे सगळे गरीब लोक लपून बसले. परंतु त्याचा संदेश पसरतच राहिला. येशुआ आपल्या मृत्युनंतर पुन्हां भूलोकीं अवतरला, आपल्या शिष्यांना या प्रेषितानें दर्शन दिलें अशी कथा हळूहळू सर्वभर पसरली. सगळीकडे याच गोष्टीवर कडाक्याचा वाद माजला. धार्मिक वृत्तीच्या ज्यू (यहुदी) लोकांचा या ठार झालेल्या प्रेषितावर विश्वास बसणें शक्य नव्हतें. परंतु प्रेषित-वाद्यांनीं आपली श्रद्धा भक्तिभावपूर्वक घोषित केली.

सॉल ऑफ तार्शिश आणि जोसेफ बार नाबा या दोघांना रस्त्यांत एक उपदेशक भेटला. हा गॅलिलीयन जमातींतला एक खेडवळ माणूस होता. येशुआचें दफन झाल्यानंतर तो पुन्हां भूतलावर अवतरल्याची गोष्ट त्यानें मोठ्या श्रद्धेनें सांगितली. त्याच्या या कथाकथनांत लोकांनीं बरेच अडथळे आणले. कुणी त्याच्यावर विश्वास प्रदर्शित करणारे उद्गार काढले. कुणी त्याच्या बोलण्यानें आपल्याला तिटकारा आल्याचें जाहीर प्रदर्शन केलें. असा मतामतांचा बराच गलबला माजला. या प्रेषिताविषयीं खुद्द सॉलनें फारच कटु उद्गार काढले. क्रूसावर फांशीं गेलेल्या प्रेमळ येशुआचें नांव काढलें कीं त्याच्या तळव्याची आग मस्तकाला जात असे.

ही चळवळ झपाट्यानें फोफावत चालली. येशुआच्या अत्यंत जोरदार पुरस्कर्त्यांपैकीं रेब इस्टेफान हा एक होता. मानवांचे आत्मे गदगदां हालवून सोडण्याची दैवी देणगी त्याच्या अंगीं असल्यामुळें ज्यू लोकांचें मतपरिवर्तन जास्त जास्त प्रमाणांत होऊं लागलें. खुद्द जोसेफ बार नाबा याला येशुआच्या हयातींत त्याची चांगली ओळख होती. रेब इस्टेफान याचें प्रवचन ऐकल्यावर जोसेफचेंहि मतपरिवर्तन झालें. जोसेफ आतां प्रेषितवादी झाला. हें मतांतर

बघून सॉलला त्याची शिसारी आली. आपला मित्र जोसेफ याच्याशीं असलेले संबंध त्यानें उद्वेगानें आणि कटु मनोवृत्तीनें तोडून टाकले.

मग एक नाट्यपूर्ण प्रसंग घडला. येशुआच्या शिष्यगणांपैकीं पहिला शिष्य सायमन यानें एक चमत्कार करून दाखविला. नेहेमिया या पांगळ्या माणसाला त्यानें नाझरीन येशुआच्या कृपाप्रसादानें धडधाकट केला. या चमत्काराचा अनेकांवर प्रभाव पडला. परंतु प्रेषिताच्या नांवाचा असा उपयोग सायमननें केला ही गोष्ट इतरांना अजिबात आवडली नाहीं. त्यांना सायमनचा रागच आला. याचा परिणाम व्हायचा तोच झाला. शत्रूंना मोकळें रान मिळालें. वरिष्ठ धर्मगुरूनें सायमनला कैदेंत टाकलें. त्याच्यावर खटला भरला.

यानंतर आणखी एक चमत्कार घडला! खरें म्हटलें म्हणजे सायमन आणि त्याचा अनुयायी जोचानान या दोघांना एका अंधारकोठडींत कडक बंदोबस्तांत कड्याकुलुपें लावून डांबून ठेवलेलें होतें. परंतु दुसरे दिवशीं सकाळीं पाहावें तों ते दोघे पुन्हां खुशाल रस्तोंरस्तीं भटकत असलेले आढळले. ते दगडी भिंतींतून सरळ बाहेर पडले असें लोक सांगूं लागले. आणि हें सारें म्हणे त्या येशुआच्या मदतीनें झालें!

राज्यकर्त्यांना या पिसाट गॅलिलीयन जमातींतल्या लोकांचा जास्त जास्तच राग येऊं लागला. याच्या उलट गरीबगुरीब लोक भक्तिभावानें सायमनचे अनुयायी झाले. वरिष्ठ धर्मगुरूनें सायमनला पुन्हां न्यायासनासमोर हजर व्हायला लावलें. परंतु सायमननें कोर्टांत आपल्या तत्वप्रणालीचें समर्थन करणारें इतकें छान भाषण केलें कीं त्याची लगच्या लगेच सुटका झाली. आणि आतां तर कोलाहल भलताच वाढत चालला. सायमनची सुटका झालेली बघून अज्ञानी लोकांनीं असा निष्कर्ष काढला कीं नव्या पंथाला ही एक प्रकारें सरकारी मान्यताच मिळालेली आहे. म्हणून येशुआच्या अनुयायांमध्यें आणखी अधिक लोकांची भर पडली.

सॉलच्या संतापाचा पारा भलताच वर चढला. त्याच्या मतें खरा प्रेषित अवतरायला अजून अवकाश असून येशुआचे शिष्य उगाचच कांहीं तरी थापाथापी करून जेरुसालेमच्या लोकांना चिडवीत आहेत. तो वरिष्ठ धर्मगुरूकडे गेला आणि त्यानें अधिकृत सरकारी हेर म्हणून स्वतःची नेमणूक करून घेतली. हा नवा हुद्दा मिळतांक्षणीं सॉलनें नम्र व सालस प्रेषितवाद्यांचा पत्ता लावून

त्यांना अटक करविली आणि शिक्षा म्हणून त्यांना चाबकाच्या फटकाऱ्यांनीं फोडून काढायचा सपाटा चालविला. सत्तामदानें सॉल आतां चांगलाच धुंद झाला. त्यानें शेवटीं नव्या धर्माचा प्रचार केल्याच्या आरोपावरून रेब इस्टेफान यालाच कैद केलें. इस्टेफान याला दगडांनीं चेंचून ठार करायची शिक्षा झाली. आसुरी आनंदाच्या भरांत सॉल स्वतः या दगड मारणाऱ्यांचा पुढारी झाला. दगडांचा मारा खा खाऊन इस्टेफान त्याच दगडांच्या ढिगाऱ्याखालीं कसा गाडला जात होता हें सॉल मोठ्या कौतुकानें बघत उभा राहिला. मरतां मरतां उपदेशक इस्टेफान यानें आपल्या जुलुमकर्त्यांना क्षमा करण्याबाबत परमेश्वराची प्रार्थना केली. या प्रार्थनेचे उद्गार पुसट पुसट सॉलच्या कानीं आले. सॉलच्या मनांत यामुळें कसली तरी मोघम खळबळ माजली.

प्रेषितवाद्यांना यापुढें चांगलाच हुरूप आला. या विनम्र पंथाचें नेतृत्व करण्यासाठीं येशुआचा धाकटा भाऊ रेब जेकब बेन जोसेफ हा मुद्दाम जेरुसालेम नगरींत दाखल झाला. या धार्मिक व कर्तव्यकठोर ज्यूच्या विरुद्ध सॉल याला कांहीं करतांच येईना. त्यांत पुन्हां योगायोग असा जुळून आला कीं दमास्कस शहरीं प्रेषितवाद्यांची संख्या बरीच वाढली असल्याचें वरिष्ठ धर्मगुरूच्या कानीं आलें. या बाबतींत तपास करायची सॉल यानें आपणहून तयारी दर्शविली आणि आपल्या या नव्या क्षेत्राकडे तो घाईघाईनें निघून गेला. परंतु वाटेंतच त्याला एक स्वर्गीय आकृति दिसूं लागली. ही आकृति त्याला म्हणाली : " अरे सॉल ! ए सॉल ! तूं मला असा कां रे छळतोस ? "

ही आकृति म्हणजे आपला भगवान येशुआच आहे याची सॉल याला ओळख पटली. या स्वर्गीय आकृतीच्या दर्शनानें त्याचे डोळे इतके दिपले कीं तो आंधळाच झाला. तशा अंध अवस्थेंतच भगवान येशुआच्या आदेशानुसार तो दमास्कसकडे चालता झाला. तिथें नव्या पंथाच्या एका अनुयायानें त्याला बाप्तिस्मा दिला. त्याबरोबर त्याची दृष्टि त्याला परत मिळाली. पश्चात्तापानें पोळलेला सॉल आतां माणसांच्या वस्तींत फिरकायला शरमूं लागला. तो मनुष्य वस्तीपासून दूर दूर निघून गेला आणि परमेश्वराच्या प्रेषिताचा आदेश मिळण्याची त्यानें उणींपुरीं सात वर्षें वाट पाहिली.

शेवटीं त्यानें आपल्या आईच्या घरीं जाऊन परमेश्वराची प्रार्थना केली. मग मात्र त्याला प्रेषिताचा आदेश मिळाला. जोसेफ बार नाबा त्याला म्हणाला :

"चल. आपण दोघे मिळून ॲन्टिऑक नगरीला जाऊं या. तिथल्या भक्तमंडळाला आपण मजबुती आणूं या." अशा प्रकारें प्रेषिताचा संदेश जनतेला पोंचविण्याच्या कामगिरीवर सॉल एकदांचा निघाला. जोसेफ आणि सॉल यानीं ज्याचें पहिल्या प्रथम मतपरिवर्तन केलें तो ग्रीक इसम टायटस. या दोघांबरोबर सॉल यानें अखेरीस ॲन्टिऑक नगरीकडे प्रयाण केलें.

आतां सायमननें ग्रीक लोकांची वस्ती असलेल्या ॲन्टिऑक नगरींत ख्रिस्ती चर्चची स्थापना केलेलीच होती. परंतु सगळ्यांना बुचकळ्यांत पाडणारा जो प्रश्न होता तो असा: खऱ्या धर्मनिष्ठ यहुद्याला बिगरयहुद्यांच्या पंक्तीला बसून जेवायची तरी मुभा आहे का? मग त्यांना चर्चमध्यें प्रवेश देण्याचा प्रश्न तर दूरच राहिला. जेरुसालेम नगरींत जोसेफनें तर "तोरा" च्या नियमाची सक्त अंमलबजावणी चालविलेली होती. सुंता केलेल्या लोकांनाच तेवढी मुक्ति मिळायची असा या नियमानुसार सगळ्यांचा दृढ समज होता. या बाबतींत सायमनच्या मनांत चलबिचल सुरू झाली. तो जेरुसालेममध्यें असला कीं जेकबच्या म्हणण्याप्रमाणें वर्तन करी; आणि ग्रीक लोकांच्या संगतींत असला कीं तो त्यांच्याशीं सगळे व्यवहार अगदीं खुल्या दिलानें करी. प्रेषिताच्या चर्चला ॲन्टिऑक नगरींत वाढते अनुयायी मिळूं लागले. तेव्हां अधिक कडक धर्माचरणाचा नियम तिथें लागू करण्यासाठीं जेरुसालेमच्या वडिलधाऱ्या मंडळींनीं जोसेफला तिकडे धाडून दिलें.

पहिल्या पहिल्यांदां सॉलविषयीं सगळ्यांनाच पुष्कळसा संशय वाटत होता. सॉलनें आपला कसकसा छळ केला याचा प्रेषितबांधवांना सहजासहजीं विसर पडणें शक्य नव्हतें. परंतु या प्रेषितानें त्यांना हळू हळू आपलेंसें करून घेतलें. येशूआनें त्याला कित्येकदां दिव्य दर्शन दिलें आणि यामुळें त्याच्या श्रद्धेला पुष्कळच बळकटी आली. शेवटीं सॉलला आपल्या खऱ्या जीवितकर्तव्याचा सुगावा लागला. येशूआची दिव्य वाणी बिगरयहुद्यांना सादर करण्यासाठीं खुद्द परमेश्वरानें आपली नेमणूक केली आहे याची त्याला बालंबाल खात्री पटली. त्यानें या दिशेनें ॲन्टिऑक नगरीमध्यें अशी कामगिरी बजाविली कीं ती बघून कुणीहि आश्चर्यानें थक्कच व्हावें. त्यानें तिथल्या चर्चची भक्कम पायावर उभारणी केली. परंतु त्यानें बिगरयहुद्यांना आपल्या पंथामध्यें सामील करून घेतल्यामुळें

जोसेफची मैत्री मात्र त्याला गमावावी लागली. आपल्या नव्या कामगिरीचें प्रतीक म्हणून पॉल हें नवें नांव सॉलनें धारण केलें आणि आपल्या अनेक वर्षें चालू राहणाऱ्या मिशनरी कार्याला सुरवात केली.

पॉलचे मिशनरी दौरे चालू झाले. तो कॉरिन्थला गेला. सगळ्या बिगर-यहुद्यांना त्यानें येशुआचा संदेश पोंचविला. प्रत्येक ठिकाणीं त्यानें एकेक चर्च स्थापन केलें. कधीं कधीं हें चर्च लहान असे, पण निष्ठेच्या बाबतींत मात्र तें कधींच उणें पडत नसे. या बहुतेक सगळ्या प्रवासामध्यें ग्रीक डॉक्टर लुकास हा त्याच्याबरोबर होता. लुकास हा मोठा कर्तबगार धर्मोपदेशक व विद्वान पंडित होता. तो येशुआचें चरित्र लिहीत होता.

बिगरयहुद्यांना आपल्यांत सामील करून घेणाऱ्या या विलक्षण धर्मोपदेश-काच्या कामगिरीमुळें जेरुसालेम नगरींतील धर्मनिष्ठ यहुदी बरेच हवालदिल झाले. शेवटीं त्यांनीं त्याच्यावर खटला भरून त्याला कोर्टांत उभें केलें. या खटल्यांतून पॉलची सुटका झाली ती एकाच मुद्यावर. तो रोमन नागरिक असल्यामुळें त्याच्या खास हक्कांना या खटल्यानें बाध येत होता. खुद्द सीझर-समोर आपला खटला चालला पाहिजे अशी मागणी करण्याचा त्याला रोमन नागरिक या नात्यानें हक्क होता. मग कैदी म्हणूनच पॉलची रवानगी रोमला झाली. पण त्याला या गोष्टीमुळें वाईट वाटण्याऐवजीं उलट आनंदच झाला. कारण खिस्ती धर्माची खरी कसोटी रोममध्येंच लागणार हें तो पुरतेपणीं जाणून होता. सायमन तर अगोदरच रोमला गेलेला होता आणि तिथें तो सनातनी यहुद्यांना नव्या धर्माचा उपदेश करीत होता.

दुष्ट रोमन सीझर नीरो यानें पॉलच्या खटल्याची सुनावणी न करतां त्याला दोन वर्षें तुरुंगांतच तिष्ठत ठेवलें. आणि त्यानंतर सुद्धां सेनेकानें मध्यस्थी केली म्हणूनच या प्रेषिताची रोमच्या तुरुंगांतून सुटका झाली. कांहीं काळ सायमन आणि पॉल या दोघांनीं मिळून रोममध्यें धर्मोपदेशाची कामगिरी केली. सायमननें यहुदी लोकांमध्यें ही कामगिरी चालविली आणि पॉलनें बिगरयहुदी लोकांमध्यें. त्यांनीं अनेकांचें मतपरिवर्तन केलें. आणि खालच्या दर्जाच्या लोकांनीं मोठ्या हौसेनें मुक्तीचें आश्वासन देणाऱ्या या नव्या धर्माचा स्वीकार केला.

रोमन सीझर नीरो याला आपण मोठे कल्पक वास्तुशिल्पी आहोंत असें उगीचच्च वाटत होतें. या तथाकथित कल्पकतेला वाव मिळावा म्हणून नीरोनें रोम जाळून टाकलें, आणि सुंदर नवी रोम नगरी पुन्हां बांधून काढण्याची योजना आंखली. परंतु त्याचा हा भयंकर गुन्हा निदर्शवलेल्या रोमन नागरिकांना देखील सहन करणें अशक्य झालें. आपल्यावरचा जनतेचा संशय दुसऱ्या कुणावर तरी ढकलून मोकळें व्हावें म्हणून नीरोनें अशी थाप ठोकली कीं ख्रिस्ती लोकांनींच रोम जाळलें.

त्यानें हजारों ख्रिस्ती लोकांना अटक केली. या ख्रिस्ती लोकांची कत्तल करण्याचा नेमलेला दिवस उगवला. रोमचा सीझर (बादशहा) नीरो यानें सगळ्या नागरिकांसमोर ज्यू आणि ख्रिस्ती कैद्यांची कत्तल आरंभली. तासातासाच्या अंतरानें यहुदी आणि ख्रिस्ती कैदी रिंगणांत आणायचे आणि त्यांच्यावर माजलेले बैल सोडायचे. मग या बैलांनीं आपलीं शिंगें भोंसकून भोंसकून या कैद्यांना ठार करायचें. हा कार्यक्रम उरकला म्हणजे आणखी कैदी आणायचे आणि त्यांच्या अंगावर वाघ सोडायचे. वाघांनीं या कैद्यांना फाडफाडून त्यांचा चट्टामट्टा करून टाकायचा. नंतर आणखी कैद्यांवर सुसरी सोडायच्या. या सुसरींनीं त्यांना चावून चावून त्यांचा चेंदामेंदा करायचा. असा प्रकार तीन दिवस सतत चालला. अनेक रोमन लोकांना हें दृश्य अतःपर बघवेनासें झालें. पण नीरोला याचा कांहीं कंटाळा येईना. तो हा छळवाद बघतच बसला.

एकंदर प्रकार खरोखरीच मोठा विलक्षण होता. ख्रिस्ती लोक अशा प्रकारें मरतांना बिलकुल डगमगले नाहींत. मरतां मरतां देखील त्यांनीं आपला असा छळ करणाऱ्या नरराक्षसांना उदार मनानें क्षमा केली.

या कत्तलीनंतर सायमनला क्रूसावर चढवून फांशीं देण्यांत आलें; कारण तो पडला नुसताच यहुदी. पॉल हा जन्मजात रोमन नागरिक. म्हणून त्याचा शिरच्छेद झाला. त्यांच्याबरोबर गॅबेलस हा ग्लॅडिएटर (गुलाम पहिलवान) देखील फांशी गेला. कारण त्यानें ख्रिस्ती धर्म स्वीकारलेला होता. परंतु सायमन आणि पॉल यांचे मृत्यु ही तर ख्रिस्ती धर्म प्रसाराची केवळ नांदी होती. अव्वल अमदानींतल्या या ख्रिस्ती लोकांचें हौतात्म्य हीच पुढें भरभराटलेल्या ख्रिस्ती चर्चच्या पायाची कोनशिला ठरली.

द ॲपल ऑफ द आय : लाडकी लेक

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* ग्लेन्वे वेस्कॉट (१९०१-). *कथानकाचा प्रकार :* प्रादेशिक अद्भुतरम्य कथा. *काळ :* विसावें शतक. *स्थळ :* विस्कॉन्सिन राज्याचा ग्रामीण विभाग. *प्रथम प्रकाशन :* १९२४.

प्रमुख पात्रें : **हॅना मॅडॉक,** एक ग्रामीण तरुणी. **ज्यूल बियर,** तिचा प्रियकर. **सेल्मा,** ज्यूलची पत्नी. **रोझालिया,** ज्यूल आणि सेल्मा यांची कन्या. **माइक,** रोझालियाचा प्रियकर. **डान स्ट्रेन,** रोझालियाचा मावसभाऊ.

समीक्षण : या कादंबरींत विस्कॉन्सिन राज्याच्या ग्रामीण विभागांतील डान ट्रेन याचें पूर्वचरित्र आणि तारुण्य यांचें वर्णन केलेलें असून तींतील हॅना मॅडॉक हिच्या कहाणीच्या द्वारां कादंबरीलेखकाचा जीवनमूल्यांविषयींचा दृष्टिकोन आपल्याला कळतो. लेखकानें आपल्या पात्रांचें मूल्यांकन याच दृष्टिकोनांतून केलेलें आढळतें. खुद्द ज्यूल याला हॅनाच्या चांगुलपणाविषयीं खात्री असते. परंतु आपलें खरोखरी जिच्यावर प्रेम आहे अशा तरुणीशीं विवाह करण्यासाठीं स्वतःच्या सामाजिक बंधनांच्या पलीकडे जाण्याइतकें सामर्थ्य त्याच्या अंगीं नसतें. धार्मिक तत्वें आणि मानवाच्या खऱ्या व्यक्तित्वाचीं नैसर्गिक कार्यें या दोहोंमधील फरक पाहून तरुण मुलाला केवढा अचंबा वाटतो याचें नमुनेदार चित्रण करणें हाच या कथेंत शृंगाराला प्राधान्य देण्यांत लेखकाचा हेतु असावा.

कथानक : शांत-स्वभावी, कष्टाळू हॅना मॅडॉकचे वडील एका रात्रीं दारू पिऊन झिंगलेल्या अवस्थेंत घरीं आले आणि झाडूचा बांबू घेऊन तिच्या अंगावर धांवले. तिनें स्वतःचें संरक्षण करण्यासाठीं वडिलांना पोर्चमधून खालीं ढकलून दिलें. आणखी कांहीं दिवसांनीं हे वडील वारले आणि हॅना पोरकी झाली. घरांत एक दिडकी देखील शिल्लक नव्हती. मिसेस बॉइलच्या किराणा मालाच्या दुकानांत ती कामावर राहिली. तिथें दिवसा गिऱ्हाइकांना माल द्यायचा आणि रात्रीं पुरुषांना दारू प्यायला द्यायची असा तिचा नित्यक्रम चालू झाला.

एके रात्रीं ती दुकानाच्या काउंटरमागें उभी असलेली ज्यूल बियर याला दिसली. ज्यूलची आई वारलेली होती. त्याच्या वडिलांच्या डोक्यावर कर्जाचा मोठा बोजा चढलेला होता. परंतु आपल्या मुलाला आयुष्यांत पुढें येण्याची संधि

मिळावी म्हणून पुरेसा पैसा मिळविण्यासाठीं त्याचे वडील आपल्या शेतावर सतत राबत होते. तसे त्याचे वडील निर्विकार वृत्तीचे नि हिशेबी होते. त्यांनीं ज्यूलला शेजारच्या शेतीवाडीमध्यें मोलमजुरी करायला धाडण्याचा उपक्रम केला. हॅनाची ओळख झाल्यावर ज्यूल तिचा अनुनय करूं लागला. रात्रीं तिला खूप लांब लांब फिरायला घेऊन जाऊं लागला. शेजारपाजारच्या नृत्यसमारंभांना तो आपल्याबरोबर तिला घेऊन जाई. आपल्या बगींत बसवून तिला फिरवून आणी. इतर पुरुषांच्या मेहेरनजरेचा हॅनाला लवकरच कंटाळा आला. मिस्टर बॉइल तिच्याशीं प्रेमचाळे करूं लागला तेव्हां तिनें ती नोकरी सोडून दिली आणि ज्यूलच्या घराशेजारच्या शेतावर ती मोलमजुरी करूं लागली.

ज्यूलच्या वडिलांनीं त्याला शेजारच्या धनाढ्य शेतकऱ्याची ज्येष्ठ कन्या सेल्मा डंकन हिचा अनुनय करायला धाडून दिलें. ज्यूलनें डोळे मिटून वडिलांच्या आज्ञेचें पालन केलें आणि सेल्माला लग्नाची मागणी घातली, आणि तें लग्न ठरलें. आपण हा केवढा घोर अपराध केला हें नंतर त्याच्या लक्ष्यांत आलें. हॅनाची गांठ पडल्यावर तिचा आक्रांत बघून तो दिङ्मूढ झाला. स्वतःच्या दुःखाची जाणीव त्याला त्या वेळीं तरी अर्धवटच झाली.

शेल्बॉयगन सोडून देऊन फॉन्ड डु लॅक येथें हॅना राहायला गेली. तिथें तिनें वेश्याव्यवसाय सुरू केला आणि कांहीं वर्षांच्या अवधींतच ती आपलें सौंदर्य व आपली तडफ घालवून बसली. शेवटीं ज्यूल आपल्या माजी प्रियतमेला घरीं परत घेऊन यायला फॉन्ड डु लॅक येथें गेला. आपलें उरलेंसुरलें आयुष्य हॅनानें वांझपणाच्या कटु यातना सोसण्यांत घालविलें. कुणा शेजाऱ्यानें मदत मागितली तर ती द्यावी, आजारी वासराची शुश्रूषा करावी, एखादी माता आजारी पडली तर तिच्या मुलांची काळजी घ्यावी, अशा प्रकारें तिनें काळ काढला. तशांत तिला अपघात होऊन ती पडली आणि तिला बरेंच लागलें. अकालीं वार्धक्य आलेल्या हॅनाचा यांतच अंत झाला.

ज्यूल आणि सेल्मा या जोडप्याला एकच मुलगी झाली. तिचें नांव रोझालिया. सेल्माची बहीण मिसेस स्ट्रेन हिला एक मुलगा होता. त्याचें नांव डान. रोझालिया विशींत होती त्या वेळीं हा मुलगा चौदा वर्षांचा होता.

ज्यूलच्या शेतावर माइक हा तरुण इसम कामावर होता. माइकला जीवनाची लज्जत चाखायची मोठी हौस. डानच्या आईनें आपल्या मुलाला

विश्वासांत घेऊन कांहीं सांगितलें तर नाहींच; उलट त्याच्या मनावर तिनें अज्ञानाचे व अलिप्तपणाचे दृढ संस्कार बिंबवायचा प्रयत्न केला. यामुळें डानच्या मनांत कुमार वयांतच वैफल्याची व कुतूहलाची भावना बळावली. शृंगार म्हणजे काय, त्याचा माणसावर काय परिणाम होतो, हें जाणून घेण्याची त्याला अतीव उत्कंठा वाटूं लागली, परंतु त्याच बरोबर असल्या गोष्टींचा विचार मनांत आला कीं तो जन्मजात शरमेनें अर्धमेला होऊन जाई. माइक आणि डान या दोघांची दोस्ती जमल्यावर माइकनें त्याला त्याचा मार्ग मोकळा करून दिला.

माइकच्या मतें जीवन हें शारीरिक व मानसिक अशा दोन्ही प्रकारच्या अनुभवांनीं कांठोकांठ भरलेलें असावें; जीवनाच्या प्रक्रिया आनंदकर असतात; त्यांत अश्लीलता व घाणेरडेपणा हीं मुळींच नसतात; डानच्या आईनें या बाबतींत त्याला जें सांगितलें होतें तसें गैर असें त्यांत कांहींच नसतें. आतांपर्यंत आई हेंच डानचें दैवत होतें. या दैवतापासून तो फटकून निघाला आणि आपला नवा मित्र माइक याला त्यानें आपलें दैवत करून ठेवलें. माइक आणि रोझालिया यांचें प्रेम जमलेलें होतें. आपल्या या सखोल भावनांचा परिचय माइकनें आपल्या पोरसवदा मित्राला करून दिला. डानला आतां सारें समजूं लागलें.

माइकचें प्रेम रोझालियावर होतें. ती त्याला फार हवीहवीशी वाटे. परंतु सुरवातीला रोझालियानें त्याच्या प्रियाराधनेला विरोध केला. एके दिवशीं तिसरे प्रहरीं माइकनें संधि साधून तिला फशीं पाडलें. रोझालिया या अनुभवानंतर ओक्साबोक्शीं रडूं लागली. माइक घाबरला. परंतु लवकरच ती शृंगाराचें भय लपवून ठेवण्यांत तरबेज झाली. ती माइकला म्हणाली: "आपल्या हातून झालेलं हें पाप निस्तरायसाठीं आपण लग्न करूं या." परंतु "तुझी आई मला जांवई म्हणून कदाचित पसंत करणार नाहीं," असें माइकनें सुचवितांच रोझालिया घाबरून गप्प बसली. आपण रोझालियाशीं लग्न करावें का नाहीं याबद्दल माइकच्या मनाचा निश्चय पक्का झालेला नव्हता.

ज्यूलनें हळूच माइकला सांगितलें: "रोझालियावर तूं प्रेम करतोस हें माझ्या निदर्शनाला आलं आहे. तुला हवं असलं तर तूं तिच्याशीं खुशाल लग्न कर. मी मुळींच हरकत घेणार नाहीं." आपण सांपळ्यांत अडकलों अशी माइकची भावना झाली. तो ज्यूलची नोकरी सोडून देऊन दुसरीकडे निघून गेला.

या प्रकारानें डान अतिशय अस्वस्थ झाला. आपली मावसबहीण आणि

माइक हें आदर्श प्रेमिकांचें जोडपें आहे या दृष्टीनें तो त्यांच्याकडे पाहत होता. अशा परिस्थितींत माइकनें तिला सोडून कां जावें हेंच त्याला कळेना. रोझालिया आपल्याशींच कुढत बसली. माइक निघून गेल्यावर तिच्या मनांतली गुन्हेगारीची भावना आणखीच वाढली. ती आपल्या भावना आपल्या आईवडिलांपासून छपवून ठेवत असली तरी डानला तिचे माइकशीं संबंध कोणत्या मर्यादेपर्यंत गेलेले आहेत हें ठाऊक होतें. आणि तिच्या भावना आतां कशा झाल्या असतील हें समजून घेण्याचें त्याला मोठेंच कुतूहल वाटत होतें. परंतु तिनें त्याला यांतलें अवाक्षरहि सांगितलें नाहीं.

खुद्द रोझालिया वरून दिसत होती तितकी आंतून शांत नव्हती. शृंगाराची शिक्षा म्हणजे अपत्य. अपत्यप्रेमानें तिचें सर्वांग पुलकित होई. हें अपत्यप्रेम म्हणजे आपल्या व्यक्तित्वाचा एक कायमचा भाग आहे असें तिला दिसून आलें. यावरून तिनें असा निष्कर्ष काढला कीं आपल्याला नक्कीच दिवस गेले असले पाहिजे. ही गोष्ट अपरिहार्यच होती. आपण पाप केलें तर त्या पापाचें हें फळ आपण भोगलेंच पाहिजे अशी तिची या बाबतींतील भावना होती. आपल्या प्रियकरानें नि भावी पतीनें आपल्याला टाकून दिलें, अशा परिस्थितींत आपल्या लाजिरवाण्या जिण्याचा विचार तिला अगदीं असह्य झाला. तिनें शेजारपाजारच्या कांहीं लोकांना सांगितलें कीं "मी माइकला भेटायला घर सोडून पळून जाणार आहें." आणि एका रात्रीं, बर्फाचें वादळ झालेलें असतांना, ती घरांतून निघून गेली.

रोझालिया अगर माइक यांच्याविषयीं कुणालाहि कसलीहि बातमी कळली नाहीं. डान आणि सेल्मा यांनीं सारा हिंवाळाभर वाट पाहिली. एकदां डान आपल्या मावशीला भेटायला मिल्वॉकीला गेला. तिथें त्यानें माइकचा शोध केला. पण तो त्याला सांपडला नाहीं.

वसंत आला. एका शेजाऱ्यानें ज्यूलला एक बातमी सांगितली. रोझालियाचें प्रेत एका दलदलींत सांपडलें. अगोदरच आजारी असलेल्या सेल्माला ही बातमी कळली तर तिचा प्राणच जाईल असें ज्यूलला भय पडलें. म्हणून त्यानें ती बातमी आणणाऱ्या शेजाऱ्याकडून व डानकडून हें कुणाला कळूं न देण्याच्या शपथा घेवविल्या. तिघांनीं त्या दलदलींत रोझलियाचें दफन केलें.

सारा उन्हाळाभर डान आपल्या वडिलांच्या शेतावर काम करीत होता.

रोझालियाच्या शवाचें दफन करायला त्यानें ज्यूलला मदत केली त्या क्षणापासून माइकच्या आठवणीचा त्याला तीव्र तिरस्कार वाटूं लागलेला होता. आपल्या मनांतील माइकच्या मूर्तीला डाननें तेव्हांपासून शंभरदां तरी ठार केलें असेल. पावसाळ्यांत सेल्माचें देहावसान झालें. आणि डान त्यानंतर ज्यूलच्या घरीं राहायला गेला. प्रेमळ, प्रशान्त वृत्तीच्या ज्यूलनें आयुष्यांतले अनेक बरेवाईट अनुभव घेतलेले होते. डानला त्याच्याविषयीं फार आपुलकी वाटूं लागली.

ज्यूल त्याला म्हणाला: "डान! रोझालिया नि माइक यांच्या बाबतींत जें जें कांहीं तुला ठाऊक असेल तें तें सगळं मला सांगून टाक पाहूं." म्हाताऱ्याच्या अजब समजूतदारपणामुळें डान खूपच प्रभावित झाला. माइकला तसा दोष द्यायला ज्यूल तयार होईना. ज्यूल म्हणाला: "सेल्माऐवजीं हॅना जर रोझलियाची आई असती तर रोझलियानं केवळ भीतीनं गांगरून आत्मघात करून घेतला नसता. जीवनाला टक्कर देऊन तें कसं जगावं हें हॅनाला ठाऊक होतं. जीवन जसं आहे त्यापेक्षां अधिक चांगलं करायची खटपट धार्मिक लोकांनीं चालविलेली आहे. परंतु जीवन हें त्याच्या साध्यासुध्या नैसर्गिक मूल्यांनिशींच पतकरायला हवं." ज्यूलचीं हीं मतें डाननें एकदम मान्य केलीं.

डानच्या वडिलांना आपल्या मुलाच्या मनाचा उलगडा कधींच झाला नाहीं. हायस्कूलचें शिक्षण पूर्ण केल्यावर डान अस्वस्थ होऊं लागला. डानच्या हातून शेतीचें काम जमणार नाहीं हें लक्षांत घेऊन त्यांनीं त्याला कॉलेजांत दाखल व्हायची सूचना केली. जीवनाविषयीं आपल्या मनांत जे अनेक प्रश्न उभे आहेत त्यांना आणखी अनेक उत्तरें मिळतील अशी उच्च आकांक्षा मनांत धरून डान विद्यापीठांत प्रवेश मिळवायच्या तयारीला लागला.

अर्नी

वाङ्मयप्रकार : कादंबरी. *लेखक :* ब्योर्नस्टयेर्न ब्योर्नसन (१८३२-१९१०). *कथानकाचा प्रकार :* आडगांवांतील अद्भुतरम्य कथा. *काळ :* एकोणिसाव्या शतकाचा आरंभ. *स्थळ :* नॉर्वे. *प्रथम प्रकाशन :* १८५८.

प्रमुख पात्रें : **निल्स**, एक शिंपी. **मार्गिट**, त्याची पत्नी. **अर्नी**, त्यांचा पुत्र. **बाअर्ड बोयेन**, निल्सचा वैरी. एली, बाअर्डची कन्या.

समीक्षण : एका आडगांवांतील कथा, हें वर्णन ' अर्नी ' या कादंबरीला उत्तम प्रकारें लागू पडत असलें तरी त्याचबरोबर नॉर्वेजियन शेतकरी जीवनावरील हें एक रूपक आहे ही गोष्ट विमर्शक वाचकाच्या सहज ध्यानांत येईल. या शेतकऱ्यांची वैयक्तिक इभ्रतीवर केवढी अपार निष्ठा असते, स्मरणांतल्या घटनेला शब्दरूप वा कृतिरूप देण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं कसें असतें, हें या कादंबरींत अशा वाचकाला वाचावयास मिळेल. निल्स हा माणूस किती भयंकर दुष्ट आहे याविषयींची माहिती या कादंबरींत वाचल्यावर निल्स हा देखील एका अर्थी दुष्ट भुताखेतांच्या करणीला बळी पडलेला एक हुतात्मा होता असेंच त्या वाचकाला वाटेल. अर्नीची कहाणी आपल्याला पूर्ण स्वरूपांत वाचायला मिळाल्याचें समाधान वाचकाला लाभेल. कारण ' हरपलें श्रेय ' शोधण्यासाठीं निल्सला आपली हयातभर जो अस्वस्थपणा व शोककारक ध्यास लागलेला होता, त्याची एका अर्थानें परिपूर्तीच त्याच्या वैऱ्याच्या मुलीनें त्याच्या मुलाशीं लग्न करण्यांत झाली, असें म्हणतां येईल.

कथानक : काम्पेन गांवीं टेंकडीच्या उतारावर एक शेतीवाडी होती. तिथें अर्नीचा जन्म झाला. तो मार्गिटचा मुलगा. एका रात्रीं ती एका नृत्य समारंभाला गेलेली होती. तिथें तिची फसगत झाली. त्या फसगतीचें फळ म्हणजे हा मुलगा.

या बालकाचा पिता म्हणून ज्याचें नांव घेतलें जात होतें, तो निल्स नामक एक शिंपी होता. आपल्या मोकळ्या वेळांत तो खेड्यापाड्यांतील नृत्यसमारंभांमध्यें फिडल वाजवायला जात असे.

अर्नीची आजी (म्हणजे आईची आई) ही मोठी काटकसरी विधवा बाई होती. आपली मुलगी व आपला नातू यांना सांभाळणारा कुणी पुरुष माणूस नसल्यामुळें त्या दोघांची कसलीहि आबाळ होऊं नये यासाठीं ही म्हातारी आपल्या मिळकतींतून जास्तींत जास्त पैसे शिल्लक ठेवीत होती. दरम्यान, आपले फिडल-वादक शिंपी महाशय प्यायचे अधिक, आणि शिंपीकाम करायचे कमी, आणि अशा रीतीनें त्यांची धंद्यांतली मिळकत कमी कमी होत चालली.

अर्नी सहा वर्षांचा झाला. आपल्या वडिलांच्या वाह्यात वर्तनावर कुणा तरी स्थानिक शीघ्रकवीनें रचलेलें एक गाणें त्याला ठाऊक झालें. त्याच्या आजीनें असा आग्रह धरला कीं आपले वडील कोण आहेत याविषयीं त्याला सगळें

कांहीं सांगून टाकलें पाहिजे. त्यानंतर लवकरच निल्स व बाअर्ड बोयेन या दोघांची मारामारी होऊन तींत निल्सच्या पाठीचा मणकाच मोडला. त्याच सुमारास अर्नीची म्हातारी आजी त्याच्या आईला म्हणाली : "मुली! माझी मरायची वेळ आतां जवळ आली आहे असं मला वाटायला लागलंय. मरायच्या अगोदर मी तुला एक शेवटचा इशारा देऊन ठेवत्यें. मी जे पैसे शिल्लक ठेवले आहेत ते तुझ्या उपयोगीं यावेत म्हणून ठेवले आहेत. त्या पैशांची उगाच उधळ माधळ करूं नकोस."

अर्नीच्या आजीनें देह ठेवल्यावर त्याची आई निल्सला आपल्या घरीं घेऊन आली आणि त्याची शुश्रूषा करायला लागली. पुढच्या वसंतऋतूमध्यें मार्गिट आणि निल्स यांचें लग्न झालें. निल्सची प्रकृति आतां पुष्कळच सुधारली. त्याला थोडेंसें शेतीकाम करणें जमूं लागलें. पहिल्या पहिल्यांदां निल्स फारच उद्विग्न आणि दुर्मुखलेला असायचा. कारण लग्नाकार्यांतील नृत्यसमारंभांच्या वेळीं फिडल-वादक व नर्तक मंडळींमध्यें सामील होणें त्याला अतःपर अशक्य झालेलें होतें. म्हणून तो भरपूर दारू प्यायला लागला.

त्याच्या अंगांत पूर्वींइतकी शक्ति आल्यावर तो पहिल्यासारखा फिडल-वादन करूं लागला. वडिलांची फिडलची पेटी वाहून न्यायचें काम आतां अर्नी करूं लागला. या कामाच्या निमित्तानें त्याला नृत्यसमारंभाची मौज उपभोगतां येऊं लागली. अर्नीला असा आपल्या सहवासांत घेत घेत निल्सनें त्याला हळूहळू मार्गिटपासून दूर केलें. अधूनमधून अर्नीला आपण आईपासून दुरावत आहोंत याबद्दल पश्चाताप व्हायचा. परंतु जसजशी दिवसगत होत गेली तसतसा वडिलांचा त्याच्यावरचा प्रभाव वाढत चालला.

शेवटीं दारूच्या नशेंतील अशाच एका हाणामारीच्या प्रसंगांत निल्स मरून गेला. त्याच्या मृत्यूचा दोष अर्नी व त्याची आई या दोघांनीं अंशतः आपल्याकडे घेतला. अर्नी खेड्यांतल्या लोकांपासून अलिप्त झाला. तो आपलीं गुरें राखायचें काम करी. आणि हें काम करतां करतांच त्यानें कांहीं गाणीं लिहिलीं.

तो जास्त जास्तच भिडस्त होऊं लागला. एका लग्नाच्या प्रसंगीं त्यानें एका लोककथेचा अर्थ स्वतःला अनुलक्षून लावून दाखविला. हें करतां करतां त्यानें आपल्या वडिलांच्या मृत्यूसंबंधीं एक विलक्षण कहाणी सांगितली. ती अंशतः खरी होती आणि अंशतः काल्पनिक होती. मग तो एकदम त्या घरांतून

झटदिशीं निघूनच गेला. त्यानें वाजवीपेक्षां जास्त ब्रँडी घेतल्यामुळें तो भलताच बेहोष झालेला होता. तो अंधारांत पडल्या पडल्या हळूहळू शुद्धीवर येत होता. त्या वेळीं त्याची आई त्याला म्हणाली : "तुझे वडील एकदां असेच इथं पडलेले मला आढळले. त्यांची अवस्था आज जशी तुझी आहे तशीच त्या दिवशीं होती. त्याच दिवशीं तुझा नामकरणविधि झाला."

अर्नीला आतां जुन्या लोककथांचा व पोवाडे वाङ्मयाचा अभ्यास करायचा नवा छंद लागला. खेड्यांतल्या एका वृद्ध इसमाच्या तोंडून तो लोककथा ऐकत असे. ऐकतां ऐकतां तो स्वतःच्या स्वतंत्र कथा रचूं लागला. कधीं कधीं तो एकटाच जंगलांत भटकत असे. आणि जशीं डोक्यांत स्फुरतील तशीं स्वतः रचलेलीं गाणीं तो या वेळीं गात असे.

तितक्यांत एली बोयेन आणि गांवच्या धर्मोपदेशकाची मुलगी अशा दोघी मैत्रिणी येत असलेल्या त्याला दूर अंतरावरून दिसल्या. तेव्हां त्यानें प्रेमगीतें गायचा सपाटा चालविला. अर्नी थोडेंसें सुतारकामहि करीत असे. त्या कामाच्या निमित्तानें त्याला आणखी अनेकदां खेड्यांतील वस्तींत जावें लागे. त्या हिंवाळ्यांत बोयेननें कांहीं तरी सुतारकाम करण्यासाटीं अर्नीला बोलावून घेतलें. यामुळें अर्नीची आई अस्वस्थ झाली. कारण कित्येक वर्षांपूर्वीं या बोयेनशीं झालेल्या मारामारींतच निल्सच्या पाठीचा मणका मोडलेला होता.

बोयेनच्या घरीं अर्नी गेला, तेव्हां पहिल्या प्रथम बोयेनच्या पत्नीनें अर्नीशीं बोलायचेंच नाकारलें. एली बोयेन सुरवातीला त्याला काय हवें काय नको हें विचारत होती, आणि मागाहून तिनेंहि त्याच्याकडे दुर्लक्षच केलें. एके दिवशीं अर्नीनें एक बातमी एलीला सांगितली. गांवच्या धर्मोपदेशकाची कन्या हें गांव सोडून जात आहे हीच ती बातमी. ही बातमी ऐकतांक्षणीं एली बेशुद्धच पडली. कारण या दोघी मुली अगदीं जिवाभावाच्या मैत्रिणी होत्या.

कित्येक वर्षांपूर्वीं निल्सबरोबर आपला कसला तंटा झाला याचा खुलासा अर्नीजवळ करण्याचा बाअर्ड बोयेननें प्रयत्न करून पाहिला. परंतु आपली त्या वेळची भूमिका स्पष्टपणें समजावून सांगण्याचें त्याला कांहीं जमलें नाहीं. आणि आतां त्या गोष्टीला इतकीं वर्षें लोटलीं होतीं कीं उभयतांमधील त्या दीर्घकालीन झगड्याचें नक्की कारण कोणतें असावें हें त्याचें त्यालाच खात्रीपूर्वक सांगतां येत नव्हतें.

एलीची आई शेवटीं अर्नीशीं आपुलकीनें वागूं लागली. एली आतां आजारीपणांतून बरी व्हायला लागलेली दिसत होती. "एलीला गाणीं म्हणून दाखव," असा तिनें अर्नीला आग्रह केला. तो गायला लागला. हा गायनाचा कार्यक्रम चालू असतांनाच त्याला व एलीला एकमेकांविषयीं प्रगाढ प्रेमभावना निर्माण झाली असल्याचें जाणवलें. दुसऱ्या दिवशीं अर्नीचें त्या घरचें सुतारकाम संपलें. तो आपलीं हत्यारें घेऊन निघून गेला. त्या वेळेपासून त्याच्या मनांत ब्राअर्ड बोयेनच्या कन्येविषयींचे विचारच एकसारखे घोळूं लागले.

अर्नीला एक मित्र होता. त्याचें नांव क्रिस्टियन. तो अमेरिकेला गेलेला होता. आतां क्रिस्टियन त्याला आपल्याकडे अमेरिकेला निघून येण्याचा आग्रह पत्रांतून करूं लागला. परंतु त्याचीं हीं पत्रें मार्गिट लपवून ठेवूं लागली. शेवटीं ती धर्मोपदेशकाचा सल्ला घ्यायला गेली. तो म्हणाला: "तुम्हीं अर्नीला असं अडवूं नका. त्याला जसं योग्य वाटेल तसं आपल्या जीवनाला वळण द्यायला तुम्ही मुभा दिली पाहिजे. मला तर असं वाटतं. मग तुम्ही काय करायचं असेल तें करा."

वसंत ऋतु आला. शेतीवाडी एका आगळ्याच सौंदर्यानें बहरली. अर्नी असाच भटकत असतांना वाटेंत त्याला एली दिसली. त्याला असें वाटलें कीं आतांपर्यंत ही जेवढी सुंदर दिसत होती त्याच्यापेक्षां आतां ही किती तरी अधिक सुंदर दिसत आहे. त्याला या मुलीविषयीं येवढा प्रेमा वाटतो हें पाहून मार्गिटचा धीर चेपला. ऐन उन्हाळ्यांत संध्याकाळच्या वेळीं मार्गिट गांवांत गेली असतांना ती एलीला अचानक भेटली. ती एलीला म्हणाली: "चल. आपण जरा फिरायला जाऊं या." तिनें एलीला आपल्या घरीं नेलें. तिला आपलें सगळें घर दाखविलें. गोठे दाखविले. अर्नीनें आपल्या भावी वधूसाठीं जमविलेल्या अहेराच्या वस्तू ज्या कपाटांत ठेवल्या होत्या तें कपाट उघडून त्या तिनें तिला दाखविल्या. त्यांत एक स्तोत्रांचें पुस्तक होतें. त्याला चांदीचा च्याप बसविलेला होता. त्या चापावर एलीला आपलेंच नांव कोरलेलें दिसलें.

तेवढ्यांत अर्नी तिथें आला. मागाहून तो एलीला तिच्या घरीं पोंचवायला तिच्याबरोबर चालत गांवांत परत गेला. आपलें आतां एकमेकांवर संपूर्ण प्रेम जडलें आहे हें दोघांच्याहि ध्यानांत येऊन चुकलें.

त्यानंतर लवकरच दोघांचें लग्न झालें. केकचे तुकडे घेऊन मुलें चर्चच्या

जवळ उभीं होतीं. अर्नीच्या वडिलांशीं आपलें जें फार पूर्वीपासून चालत आलेलें वैर होतें, त्याची या वेळीं बाअर्ड बोयेनला आठवण झाली. आणि आपल्या जुन्या वैऱ्याच्या पुत्राशीं आपल्या कन्येचें हें लग्न झालें तरी कसें, याचें त्याला राहून राहून नवल वाटूं लागलें.

द मर्चंट ऑफ व्हेनिस : व्हेनिस नगरचा व्यापारी

वाङ्मयप्रकार : नाटक. *लेखक :* विल्यम शेक्स्पियर (१५६४-१६१६). *कथानकाचा प्रकार :* शोकान्तमिश्रित सुखान्तिका. *काळ :* सोळावें शतक. *स्थळ :* व्हेनिस. *पहिला प्रयोग :* १५९६.

प्रमुख पात्रें : **शायलॉक**, एक ज्यूइश (यहुदी) सावकार. **पोर्शिया**, एक श्रीमंत तरुणी. **ॲन्टोनियो**, दारिद्र्यानें गांजलेला एक व्यापारी; हा शायलॉकचा दुष्मन असतो आणि पोर्शिया याचा पुरस्कार करते. **बॅसॅनियो**, पोर्शियाचे यजमान आणि ॲन्टोनियोचे स्नेही. **नेरिस्सा**, पोर्शियाच्या घरची दासी. **ग्रॅटियानो**, नेरिसाचे यजमान आणि बॅसॅनियोचे स्नेही. **जेसिका**, शायलॉकची कन्या. **लॉरेन्झो**, जेसिकाचे यजमान.

समीक्षण : 'द मर्चंट ऑफ व्हेनिस' या नाटकाचे शेवटचे प्रवेश त्याची शोकान्तिका होऊं द्यायला अटकाव करीत असले तरी हें नाटक मूलभूत दृष्ट्या पैसा, प्रेम व परिणय यांचा सदुपयोग व दुरुपयोग कसा होतो याचा गंभीर अभ्यास प्रेक्षकांना सादर करतें. लोभी व खुनशी ज्यू (यहुदी) शायलॉक आणि शाहणी व झकास पोर्शिया या उभयतांमधील समरप्रसंगाच्या योगानें या नाटकाला प्रगल्भ सौंदर्यानें नटलेला विषय लाभलेला आहे हें कोणाहि रसिकाला बिनहरकत मान्य होईल.

कथानक : बॅसॅनियोनें आपला श्रीमंत स्नेही ॲन्टोनियो याची गांठ घेतली. आपली धनदौलत आपण निष्काळजीपणानें उधळून टाकली असून आतां आपली पूर्वीची श्रीमंती आपण परत मिळविणार आहोंत आणि आतांपर्यंत केलेलीं कर्जेंहि आपण फेडून टाकणार आहोंत, अशी प्रस्तावना करून त्यानें आपली याबाबतची योजना आपल्या मित्राला उघड करून सांगितली. तो म्हणाला: "मित्रा ॲन्टोनियो, तुला बेलमॉंट हें गांव ठाऊक असेलच. व्हेनिस

नगरीपासून तें फारसं दूर नाहीं. तिथं पोर्शिया नामक एक धनाढ्य तरुणी राहते. श्रीमंतीबरोबरच तिची सुस्वरूप म्हणून देखील फार ख्याति आहे. मला जर तूं थोडेसे पैसे उसने देशील तर मी तिचा अनुनय सुरू करीन. आणि माझी खात्री आहे कीं मी तिचं हृदय जिंकून तिच्याशीं विवाहबद्ध होईन. मग मित्रा, करतोस ना माझ्यासाठीं येवढी पैशाची सोय?"

ॲन्टोनियो उत्तरला: "काय सागूं मित्रा? मी तुला हवी असलेली रक्कम ताबडतोब दिली असती रे. पण या घटकेला माझ्याजवळ रोकड पैसे नाहींत. माझे सगळे पैसे जहाजांच्या धंद्यांत गुंतले आहेत, आणि तीं जहाजं वाहतुकी-साठीं इतस्ततः आतां समुद्रांवर संचार करीत आहेत. पण तरी हरकत नाहीं. तुझ्या या योजनेला मी सक्रिय पाठिंबा देतों. आपण असं करूं या. इथल्या इथं व्हेनिस नगरींतच कुणाकडून तरी तुझ्या आतांच्या गरजेपुरते पैसे उसने मिळतात का बघूं. तूं कांहीं काळजी करूं नकोस. तुझं हें प्रेम प्रकरण तूं जोरांत चालू ठेव. तें पैशासाठीं अडूं दिलं जाणार नाहीं ही जबाबदारी माझी."

पोर्शियाला मागणी घालायला हौशी वरांची नुसती भाऊगर्दी झालेली होती. परंतु तिच्याशीं विवाह करूं पाहणाऱ्या इच्छुक वरांच्या मार्गांत एक फार मोठी धोंड उभी होती. ती धोंड म्हणजे तिच्या वडिलांचें मृत्युपत्र. या मृत्युपत्रान्वयें त्या इच्छुक वराला कांहीं विलक्षण अटी पुऱ्या कराव्या लागत होत्या. ज्याला पोर्शियाशीं विवाह करायला हवा असेल त्यानें तिच्याजवळ असलेल्या तीन पेट्यांपैकीं एक पेटी पसंत करायची. या तीन पेट्या निरनिराळ्या धातूंच्या बनविलेल्या होत्या. एक पेटी होती सोन्याची. दुसरी होती चांदीची. आणि तिसरी होती शिशाची. या तिहींपैकीं एका पेटींत एक चिठी ठेवलेली होती व या चिठींत लिहिलेलें होतें: "ही चिठी ज्या वराच्या हातीं पडेल त्यानें पोर्शियाशीं विवाहबद्ध व्हावें." चिठी असलेली पेटी ज्याच्या वांट्याला येईल, त्या भाग्यवंताशींच पोर्शियाचें लग्न व्हायचें.

आतांपर्यंत तिला मागणी घालायला आलेल्या इच्छुक वरांना या विलक्षण अटींपायीं काय करावें हाच प्रश्न पडला. चौघे तर या अटी पूर्ण केल्याखेरीज आपल्याला तिचा लाभ होणें शक्य नाहीं हें पाहून सरळ चालतेच झाले. पांचवा इच्छुक वर म्हणून आलेला इसम वायव्य आफ्रिकेंतला मूर होता. त्यानें आपल्या नशिबाची परीक्षा बघायचें ठरविलें. या दुर्दैवी इसमानें सोन्याची पेटी

पसंत केली. ती उघडून पाहतां तिच्यांत माणसाच्या डोक्याची एक कवटी व तिच्याबरोबर एक संदेश होता. या संदेशांत ही पेटी पसंत करणाराची टर उडविणारा मजकूर होता. या इच्छुक वराला येवढें अपेश लाभण्यावरच भागलें नाहीं. मृत्युपत्रांतल्या अटींनुसार त्याला अशी शपथ घ्यावी लागली कीं "मी पसंत केलेल्या या पेटींत काय आहे याची माहिती मी कुणालाहि कधींहि उघड करून सांगणार नाहीं. त्याचबरोबर मी अन्य कोणत्याहि स्त्रीला लग्नाची मागणी घालण्याच्या दृष्टीनें तिचा कधींहि अनुनय करणार नाहीं."

यानंतर ॲरॅगॉनचा राजपुत्र आपल्या नशिबाची परीक्षा पाहण्यासाठीं पोर्शियाशीं लग्न करण्याच्या इराद्यानें एक इच्छुक वर म्हणून हजर झाला. त्यानें बिचाऱ्यानें तरी जरा डोकें वापरावें का नाहीं? त्यानेंहि चुकीचीच पेटी पसंत केली. फरक येवढाच कीं सोन्याच्या पेटीऐवजीं चांदीची पेटी पसंत केली. पेटी उघडून आंत बघतो तों त्याच्यासाठीं एक खास संदेश ठेवलेला होता. या संदेशांत लिहिलेलें होतें: "अरे महामूर्ख माणसा! तूं ही पेटी कशाला पसंत केलीस? आतां स्वतःला मूर्ख म्हणवून घेत जन्मभर खुषींत गाजरें खात बैस."

इकडे बॅसॅनियोला दिलेलें वचन ॲन्टोनियोनें तंतोतंत पाळलें. शायलॉक नामक एका धनाढ्य ज्यूकडून (यहुद्याकडून) त्यानें तीन हजार डकॅट कर्जाऊ काढायची व्यवस्था केली. या रकमेचा वापर करायला ॲन्टोनियोला तीन महिन्यांची मुदत मिळाली. या कर्जाची रक्कम जर मुदत संपल्यानंतर त्याला परत करतां आली नाहीं, तर ॲन्टोनियोच्या शरीरांतील कोणत्याहि भागांतलें एक रत्तल मांस कर्जाची फेड म्हणून कापून घेण्याचा हक्क शायलॉकला कर्जरोख्यांतील करारानुसार मिळाला. वास्तविक असल्या विलक्षण अटीवर ॲन्टोनियोनें हें कर्ज घ्यायला नको होतें.

बॅसॅनियोनें त्याला परोपरीनें सांगून पाहिलें. परंतु ॲन्टोनियोनें या अटी मान्य करण्याचा आग्रहच धरला. कारण कर्जाची मुदत पूर्ण व्हायला किती तरी अवकाश असतांनाच, निदान एक महिना अवकाश असतांना, आपलीं जहाजें परत येतील अशी ॲन्टोनियोला खात्री होती. या ज्यूच्या (यहुद्याच्या) तावडींत आपण कधींच सांपडणार नाहीं असा ॲन्टोनियोला अगदीं पक्का आत्मविश्वास वाटत होता. तसा हा यहुदीहि ॲन्टोनियोचा भयंकर द्वेष करीत असे. कारण

शायलॉक जें भरमसाट व्याज मागायचा, तसलें व्याज तर राहोच, परंतु अजिबात व्याज न घेतांच ॲन्टोनियो इतरांना पैसे कर्जाऊ देत असे.

त्या रात्रीं बसॅनियोनें एका जंगी मेजवानीचा बेत केला. या मेजवानीच्या वेळीं पाहुण्यांसाठीं मूकाभिनयाचा एक खास कार्यक्रमहि ठेवला. आपला मित्र लॉरेन्झो याच्याशीं संगनमत करून त्यानें मुद्दाम शायलॉकला या मेजवानीला हजर राहण्यासाठीं आपला पाहुणा म्हणून निमंत्रण दिलें. शॉयलॉकला एक मुलगी होती. तिचें नांव जेसिका. तिचें लॉरेन्झोवर प्रेम होतें. वडिलांच्या गैरहजेरीचा नेमका फायदा घेऊन त्याच रात्रीं जेसिकानें आपल्या प्रियकरासह सूं बाल्या केला. आणि ती नुसतीच लॉरेन्झोबरोबर रिक्त हस्तांनीं पळून नाहीं गेली. जातां जातां तिनें शायलॉकच्या तिजोरींतले पैसे अडके दागदागिने बरेचसे बरोबर न्यायला बिलकुल मागेंपुढें बघितलें नाहीं.

इकडे शायलॉकची कन्या व पैसे चोरीला जाण्यावरच नुसतें भागलें नाहीं. तो मेजवानीला व करमणुकीच्या कार्यक्रमाला हजर राहण्यासाठीं म्हणून बसॅनियोच्या वाड्यांत गेला खरा. पण तिथें बघतो तर मेजवानीहि रद्द झालेली होती व करमणूकहि रहित करण्यांत आलेली होती. कारण त्याच वेळीं वाऱ्याची दिशा एकाएकीं बदलली आणि बेल्मॉन्टला जायला ही हवा फारच अनुकूल ठरली. म्हणून आपले सगळे बेतबात स्थगित करून बसॅनियो ताबडतोब जहाजांतून बेल्मॉन्टकडे रवाना झाला. बिचाऱ्या शायलॉकची याहि बाबतींत फसगत झाली आणि त्याला हात हालवीत घरीं परतावें लागलें.

दिवसामागून दिवस आले नि गेले. शायलॉकला एकेक बातम्या ऐकायला मिळूं लागल्या. त्या कधीं कधीं त्याला दैव प्रतिकूल असल्याचें दर्शवीत, तर कधीं कधीं तें अनुकूल असल्याचें दर्शवीत. त्याची कन्या जेसिका ही लॉरेन्झोबरोबर जिनोआला पळून गेलेली होती. तिथल्या मुक्कामांत ती वडिलांच्या घरचे बरोबर आणलेले पैसे हवे तसे उडवीत होती. आपल्या मुलीनें चालविलेल्या या उधळ-पट्टीच्या बातम्या ऐकून त्या चिक्कू मारवाड्याच्या हृदयाचा थरकांप होत होता. पण त्याचबरोबर या नुकसानीची भरपाई म्हणून त्याला कांहीं चांगल्या बातम्याहि ऐकायला मिळत होत्या. ॲन्टोनियोचीं जहाजें सुरक्षित परत येण्यावर त्याच्या भाग्यांतली मोठी घटना अवलंबून होती. तीं जहाजें वेळेवर परत आलीं असतीं तर त्याला त्याचे पैसे व व्याज येवढेंच परत मिळालें असतें, ॲन्टोनियोच्या

एक पौंड मांसाला त्याला मुकावें लागलें असतें. परंतु त्याचें सुदैव असें कीं ॲन्टोनियोचीं जहाजें वादळांत फुटून बुडून गेलीं अशी बातमी त्याच्या कानीं आली.

पोर्शियाची भेट घेण्यासाठीं बसॅनियो तिच्या समोर हजर झाला. तो तिला मागणी घालायला म्हणूनच आलेला होता. त्याला बघतांक्षणीं तिला तो एकदम आवडला. म्हणून तिनें अशी इच्छा प्रदर्शित केली कीं योग्य ती पेटी पसंत करण्याचा प्रयत्न आरंभण्यापूर्वीं त्यानें थोडे दिवस तसेंच थांबावें. इतर इच्छुक वर या बाबतींत जसे अपेशी ठरले तसाच हाहि अपेशी ठरेल अशी तिला खात्री वाटत होती. म्हणून ही विषाची परीक्षा होण्यापूर्वीं आपल्याला त्याच्या सहवासाचा लाभ आणखी कांहीं काळ मिळावा अशी तिनें अपेक्षा धरलेली होती. परंतु बसॅनियो तर आपल्या नशिबाची परीक्षा बघायला अगदीं उतावळा झालेला होता. म्हणून तिनें मोठ्या नाखुषीनें त्याला त्या तीन पेट्यांपैकीं एक पेटी पसंत करायची मोकळीक दिली. त्याला सोन्याचांदीच्या पेट्यांवरील नक्षीकामाची भुल-भुलावणी मुळींच आवडली नाहीं. खरें शील हें अंतःकरणाच्या शुद्धतेवर अवलंबून असतें, त्याला बाह्य डामडौलाची कांहींच जरूर नसते, असा पोक्त तत्वविचार मांडून त्यानें शिशाची पेटीच पसंत केली. या पेटींत पोर्शियाचें चित्र होतें. त्याची पसंती बिनचूक ठरली.

आपल्या वाङ्‌निश्चयावर शिक्कामोर्तब करण्यासाठीं म्हणून पोर्शियानें आपली आंगठी बसॅनियोला दिली. आपल्याला मनपसंत वर मिळाला, त्यानें आपल्या वडिलांच्या मृत्युपत्रांतील विलक्षण अटीहि यशस्वी रीतीनें पूर्ण केल्या, या खुषींत ती होती. मात्र त्या आंगठीबाबत तिनें त्याला मुद्दाम बजावून ठेवलें. ती म्हणाली: "ही आंगठी तुम्ही तुमच्या बोटांतून कधींहि काढून ठेवूं नका हं. ती तुमच्या बोटांतच कायमची राहूं दे. कारण जर का चुकूनमाकून तुमच्या हातून ती हरवली, तर आपला वाङ्‌निश्चय रद्द झाला असा त्याचा अर्थ होईल. म्हणून मी तुम्हांला पुन्हां पुन्हां बजावून सांगत्यें आहे. ती आंगठी तेवढी निदान आपला विवाह होईपर्यंत नीट काळजीपूर्वक संभाळा."

बसॅनियोबरोबर त्याचा एक मित्र ग्रॅटियानो हाहि बेल्मॉन्टला आलेला होता. तिथें आल्यावर तो देखील स्वस्थ नाहीं बसला. त्यानें पोर्शियाची दासी नेरिसा हिच्याशीं प्रेम जमविलें. पोर्शियाचें लग्न ठरलेलें बघून त्याच्याहि पोटांत त्याचें हें प्रेमरहस्य ठरेना. त्यानें त्याचा तिथल्या तिथें पोर्शियासमोर परिस्फोट

करून टाकला. पोर्शियानें त्याच्या लग्नाला मोठ्या आनंदानें संमति दिली. पण ग्रॅटियानो मोठा वस्ताद. त्यानें असा बेत ठरविला कीं दोन्ही जोडप्यांचीं लग्नें एकाच मांडवांत झालीं पाहिजेत.

परंतु कसचें काय नि कसचें काय. आपलें भाग्य उजळलें या आनंदांत बॅसनियो मश्गुल झाला खरा, पण त्याच्या या आनंदावर फार लवकर विरजण पडलें. ॲन्टोनियोचें त्याला पत्र आलें. त्यांत त्यानें लिहिलें होतें : " मित्रा, माझा घात झाला. माझीं जहाजें वेळेवर परत आलीं नाहींत. शायलॉकचें देणें फेडायची मुदत तर टळून गेली. तो माझें एक पौंड मांस वसूल करायला अगदीं गिधाडासारखा टपून बसलाय." मात्र पत्राच्या शेवटीं ॲन्टोनियोनें त्याला असें आश्वासन देऊन ठेवलें होतें कीं " मित्रा, माझें कांहींहि झालें तरी त्याची तूं बिलकुल फिकीर करूं नकोस. तूं माझें कांहीं एक देणें लागत नाहींस हें मी या पत्राच्या द्वारां तुला स्पष्ट लिहून कळवितों आहे. माझी फक्त एकच इच्छा आहे. माझ्या मृत्यूपूर्वी तुझी एकदां भेट व्हावी असें मला फार फार वाटतेंय. येवढी माझी शेवटची इच्छा तूं पूर्ण कर."

परंतु या पत्रांतला मजकूर ऐकून पोर्शिया बिलकुल डगमगली नाहीं. तिनें ठांसून सांगितलें कीं ठरलेलीं दोन्ही लग्नें एका मांडवांत ताबडतोब उरकून घेतलीं पाहिजेत. आणि त्यानंतरचा कार्यक्रम तिनें बॅसनियोला समजावून सांगितला : " माझ्या लग्नानिमित्त तुम्हांला सहा हजार डकॅट येवढी रक्कम हुंडा म्हणून मिळते आहे. ती रक्कम घेऊन तुम्ही ताबडतोब व्हेनिस नगराला जायचं. ही रक्कम तुमच्या कर्जाच्या दुप्पट भरते. त्या यहुद्याला ही सगळींच्या सगळी रक्कम देऊन टाका. म्हणजे त्याचं तोंड बंद होईल. पैशाचा लोभी माणूस तो. पैसे मिळाल्यावर तुमच्या मित्राचं एक पौंड मांस मागायची त्याला मुळींच आवश्यकता वाटणार नाहीं."

दोन्ही जोडप्यांचें लग्न झालें. तोंवर लॉरेन्झो व जेसिका ही जोडी जिनोआहून बेल्मॉन्टला येऊन दाखल झालेली होती. बॅसनियो व ग्रॅटियानो हे दोघे व्हेनिसला निघून गेल्यानंतर पोर्शिया या जोडप्याला म्हणाली : " मी आणि नेरिसा आतां जोगिणींच्या एका मठांत राहायला जाणार आहोंत. आम्हां दोघींचे यजमान परत येईपर्यंत आम्ही तिथंच एकांतवासांत राहूं. तोंवर तुम्ही दोघं माझ्या घरांत राहा. माझं घर संभाळा आणि माझ्या नोकरांचाकरांवर लक्ष

ठेवा." लॉरेन्झो आणि जेसिका या दोघांना तिचें हें म्हणणें खोटें वाटायचें कांहींच कारण नव्हतें. दोघांनीं त्या दोघींना जाऊं दिलें आणि त्यांच्या गैरहजेरींत आपला मुक्काम पोर्शियाच्या घरीं ठेवला.

परंतु पोर्शियाचा बेत अगदींच निराळा होता. ती मठांत राहायला जाण्याच्या भानगडींत मुळींच पडली नाहीं. तिनें आपला नोकर बाल्थाझार याला एक पत्र देऊन तावडतोब पाडुआ शहराकडे पिटाळला. तिथें तिचे मावसबंधु डॉक्टर बेल्लॅरियो हे प्रख्यात वकील राहत होते. त्यांच्या सहीचें एक पत्र आणायचें आणि त्यांच्याकडून कांहीं कपडे घेऊन यायचे अशी कामगिरी या नोकराकडे होती. तिनें नेरिसाला सांगून ठेवलें कीं "आपण व्हेनिस नगराला जायचं. परंतु असंच नव्हे. आपण पुरुषवेषांत तिकडे जायचं."

अँन्टोनियोची केस व्हेनिसच्या ड्यूकपुढें सुनावणीला निघाली. शायलॉकनें ठरवून घेतलेल्या शर्तीप्रमाणें त्याच्या कर्जाची भरपाई तंतोतंत करून द्यायला ड्यूक नाखूष होता. त्यानें त्या यहुद्याच्या उदात्त भावनांना आवाहन करून त्याची समजूत काढून बघितली. परंतु शायलॉक कशालाच बधेना. आतां या सावकाराला करारांत ठरल्याप्रमाणें अँन्टोनियोचें एक पौंड मांस देण्यापलीकडे दुसरा मार्गच शिल्लक नाहीं हें कोर्टाला दिसून आलें. बॅसॅनियोनेंहि आपल्या परीनें शायलॉकला सहा हजार डकॅट देऊं केले आणि त्याला त्याच्या राक्षसी मागणीपासून परावृत्त करण्याची शिकस्त करून पाहिली. परंतु शायलॉक त्यालाहि बधला नाहीं. ड्यूकची विनंति जशी त्यानें धुडकावून लावली, तसा त्यानें बॅसॅनियोच्या विनंतीला देखील खंबीरपणें नकारच दिला.

तेवढ्यांत वकिलाचा पुरुषी वेष धारण केलेली पोर्शिया व त्याच्या कारकुनाचा वेष धारण केलेली नेरिसा अशा दोघी जणी कोर्टात येऊन दाखल झाल्या. नेरिसानें डॉक्टर बेल्लॅरियो यांचें ड्यूकला उद्देशून एक पत्र बरोबर आणलेलें होतें, तें तिनें ड्यूकला सादर केलें. त्या पत्रामध्यें डॉक्टरसाहेबांनीं लिहिलेलें होतें कीं "आपल्यासमोर ही जी विलक्षण केस आलेली आहे तिच्या बाबतींत माझें स्वतःचें मत मांडण्यासाठीं मी आपणांसमोर जातीनें हजर राहणार होतों. परंतु आयत्या वेळीं माझी प्रकृति फार बिघडल्यामुळें माझा नाइलाज झाला. तथापि माझा तरुण प्रतिनिधी बाल्थाझार हा माझें मत

समर्पक रीतीनें सादर करील. तें ऐकून या प्रकरणीं योग्य तो निर्णय द्यावा."

मग पोर्शियानें वादीला विनंति केली कीं वादीनें दयावंत होऊन प्रतिवादीला जीवदान द्यावें. त्याबरोबर शायलॉक उत्तरला: "तें कांहीं नाहीं. माझ्या व प्रतिवादीच्या आपसांत ठरलेल्या करारानुसार त्यानं ठरलेली नुकसानभरपाई मला दिली पाहिजे. हा न्यायाचा प्रश्न आहे." मग पोर्शिया म्हणाली: "ठीक आहे. तुमचं म्हणणं बरोबर आहे. तुमच्या करारांतल्या शब्दशः शर्तीनुसार तुम्हांला पैसे भरून त्या मोबदल्यांत ॲन्टोनियोची सुटका करून घेतां येत नाहीं हें मला मान्य आहे. मग आतां एकच पर्याय शिल्लक राहतो. तो म्हणजे ॲन्टोनियोचं एक रत्तल मांस तुम्ही अवश्य कापून घ्या."

शायलॉकनें मांस कापून घेण्यासाठीं सुरा सरसावला. आपल्या शत्रूच्या छातीच्या शक्य तितक्या जवळचें मांस कापून घ्यायचें असा त्यानें निर्धार केलेला होता. म्हणून ॲन्टोनियोनें आपली छाती खुली केली व आपलें मांस कापून देण्याच्या तयारींत तो उभा राहिला. परंतु शायलॉक सुरा चालविणार येवढ्यांत पोर्शिया म्हणाली: "थांबा. कराराच्या शर्ती मी पुन्हां नीट वाचून पाहिल्या तेव्हां मला असं आढळून आलं कीं मांस कापतांना ॲन्टोनियोचं रक्त सांडायची परवानगी शायलॉकला मिळालेली नाहीं. तेव्हां शायलॉकनं मांस अवश्य कापून घ्यावं. परंतु रक्ताचा एक थेंबहि सांडतां उपयोगी नाहीं."

पोर्शियाचा हा युक्तिवाद ऐकल्यावर शायलॉकच्या ध्यानांत आलें कीं आपला सपशेल पराभव झाला. म्हणून तो घाईघाईनें सहा हजार डकॅट घ्यायला व तेवढ्यावर हें प्रकरण मिटवायला तयार झाला. परंतु पोर्शियानें पुन्हां बजावलें: "तें जमणार नाहीं. शायलॉकनं ही रक्कम घ्यायला अगोदरच नकार दिलेला आहे. तेव्हां एकदां नाकारलेली रक्कम त्याला पुन्हां स्वीकारतां येणार नाहीं. शिवाय, शायलॉक हा परस्थ माणूस आहे. आणि ॲन्टोनियोच्या शरीरांतलं एक रत्तल मांस वसूल करायच्या हट्टाला पेटून त्यानं एका व्हेनिसनिवासी नागरिकाचे प्राण धोक्यांत आणलेले होते. या गुन्ह्याबद्दल शायलॉकची अर्धी मालमत्ता जप्त करण्याचा ॲन्टोनियोला हक्क आहे. आणि उरलेली अर्धी मालमत्ता सरकारनं जप्त केली पाहिजे."

ॲन्टोनियानें हा दंड वसूल करायला साफ नकार दिला. परंतु या बाबतींत उभयपक्षीं अशी तडजोड ठरली कीं शायलॉकची निम्मी मालमत्ता ताबडतोब

त्याची कन्या जेसिका व जांवई लॉरेन्झो या दोघांच्या स्वाधीन करण्यांत यावी. उरलेली मालमत्ता शायलॉकजवळच राहूं द्यावी परंतु त्यानें ताबडतोब मृत्युपत्र तयार करावें आणि या मृत्युपत्रामध्यें ही उर्वरित मालमत्ता जेसिका व लॉरेन्झो या जोडप्यालाच आपल्या पश्चात मिळावी असें स्पष्ट कलम त्यानें घालून ठेवावें. याशिवाय वरील अपराधाबद्दल दंड म्हणून शायलॉकनें यहुदी धर्माचा त्याग करून ख्रिस्ती धर्म स्वीकारावा असाहि आदेश कोर्टानें दिला.

पोर्शियानें ही जी उत्कृष्ट वकिली केली तीबद्दल तिनें कांहीं तरी बक्षीस हें घेतलेंच पाहिजे असा सगळ्यांनीं तिला आग्रह केला. तेव्हां नाइलाज म्हणून तिनें फक्त ॲन्टोनियोच्या हातमोज्यांची जोडी आणि तिनें स्वतःच बॅसॅनियोला दिलेली आंगठी अशा दोन वस्तू भेटीदाखल स्वीकारल्या. त्याचप्रमाणें नेरिसानेंहि ग्रॅटियानोची आंगठी भेट म्हणून बळकावण्यांत कसेंबसें यश मिळविलें. येवढें सगळें झाल्यावर पोर्शिया व नेरिसा ही पुरुषवेषांतली दुकल ताबडतोब बेल्मॉन्टला परत जायला निघाली.

बॅसॅनियो आणि ग्रॅटियानो हे दोघे ॲन्टोनियोसमवेत पोर्शियाच्या घरीं दाखल व्हायच्या थोडेसेंच अगोदर पोर्शिया व नेरिसा या दोघी आपल्या घरीं परत आलेल्या होत्या. आपल्या उभय पतींच्या आंगठ्या हरवल्या आहेत याचा जणूं काय आपल्याला नव्यानेंच पत्ता लागला, असा दोघींनीं बेमालूम बहाणा केला आणि पहिल्या सपाट्यासरशीं पोर्शियानें बॅसॅनियोवर आणि नेरिसानें ग्रॅटियानोवर बेइमानीपणाचा आरोप केला. शेवटीं दोघींनीं आपल्या रहस्याचा स्फोट करून सगळ्यांना चकित करून सोडलें. जेसिका व लॉरेन्झो यांना जेसिकाच्या वडिलांकडून वारसाहक्कानें मिळणाऱ्या इस्टेटीची सुवार्ता सांगून त्यांनीं खूष करून सोडलें. आणि ॲन्टोनियोचीं कांहीं जहाजें सुरक्षितपणें बंदरांत पोंचलीं अशी बातमी देणारें एक पत्र चुकून त्यांच्या हातीं लागलें, तें त्याला वाचायला देऊन त्यांनीं त्यालाहि खुषींत आणलें.

ओएडिपस टिरॅनस

वाङ्मयप्रकार : नाटक. *लेखक :* सोफोक्लीज (इ. स. पूर्वी ४९५?-४०६). *कथानकाचा प्रकार :* अभिजात शोकान्तिका. *काळ :* अतिप्राचीन काळ. *स्थळ :* थीबीस. *पहिला प्रयोग :* इ. स. पूर्वी ४२९.

प्रमुख पात्रें : ओएडिपस, थीब्रीसचा राजा. जोकास्टा, त्याची पत्नी. क्रेऑन, जोकास्टाचा भाऊ. टेयिरेसियास, एक भविष्यवेत्ता.

स मी क्ष ण : 'ओएडिपस टिरॅनस' हें सोफोक्लीजचें सर्वोत्तम नाटक असून अनेकांच्या मतें अभिजात ग्रीक शोकान्तिकांमध्यें तें सर्वश्रेष्ठ ठरलें आहे. ॲरिस्टॉटलनें आपल्या 'पोएटिक्स' (काव्यशास्त्र) या ग्रंथामध्यें आदर्श शोकान्त कवितेचीं लक्षणें दाखवून देतांना या नाटकाचा सतत निर्देश केला. यांतील स्वभाव-दिग्दर्शन आणि यांत घडलेल्या घटना यांचा जवळजवळ संपूर्ण मेळ साधलेला आढळतो. नाट्यात्मक उपरोधाचा अत्यंत परिणामकारक उपयोग करून सोफोक्लीजनें राजाच्या अधःपाताचा भयानकपणा द्विगुणित केलेला आहे.

क था न क : थीबीस नगरांत प्लेगाच्या सांथीनें धुमाकूळ मांडला. नागरिकांनीं राजा ओएडिपस याला विनंति केली कीं कसेंहि करून या सांथीच्या भयानक हालअपेष्टांतून आम्हांला सोडवा. ओएडिपसची राणी जोकास्टा हिचा भाऊ राजशालक क्रेऑन हा ॲपोलो देवाला कौल लावून आला. देववाणी अशी होती: ओएडिपसच्या अगोदरचा राजा लाइयस याच्या खुनाबद्दल शिक्षा म्हणून हा प्लेग या राज्याला भोंवलेला आहे. राणी जोकास्टा ही मुळांत त्या लाइयस राजाचीच पत्नी होती.

राजशालक क्रेऑन यानें देवावाणीचा पुढचा संदेशहि सांगून टाकला. त्याचा आशय असा होता कीं प्लेगाची आपत्ति जर दूर करून घ्यायची असेल तर अगोदर थीब्रीसनिवासी नागरिकांनीं लाइयस राजाच्या मारेकऱ्याचा पत्ता लावून त्याला शासन केलें पाहिजे. तेव्हां राजा ओएडिपसनें नागरिकांना सांगितलें: "लोक हो! तुमच्या हिताप्रीत्यर्थ आतां तुम्हीच मारेकऱ्याचा शोध लावून त्याला पकडून आणलं पाहिजे."

मग ओएडिपसनें थीबीस नगरींतला वयोवृद्ध आंधळा भविष्यवेत्ता टेयिरेसियास याला मारेकऱ्याचा पत्ता लावण्याच्या कामीं मदत करण्याची विनंति केली. तेव्हां टेयिरेसियास म्हणाला कीं "मला जें ठाऊक आहे तें मी इतरांना न सांगितलं तरच तें सगळ्यांच्या हिताच्या दृष्टीनं जास्त बरं होईल. पुढं ज्या घटना घडणार आहेत त्या सगळा प्रकार आपसूकच उघडकीस आणतील." हें ऐकून राजा ओएडिपस खूपच संतापला. आपण स्वतः विचारलें असतांना देखील हा भविष्यवेत्ता सगळें ठाऊक असूनहि या रहस्यांतलें कांहीं एक सांगायला

तयार नाहीं याचा अर्थ काय ? तेव्हां तो म्हाताराहि तापला. त्यानें राजाला त्याच्या तोंडावर सांगून टाकलें कीं "राजा! तूंच या थीब्रीस नगरावर ओढवलेल्या सगळ्या आपत्तींना जबाबदार आहेस. तूंच लाइयस राजाचा खून केलास. आणि तूंच आपल्या अगदीं जवळच्या नातेवाईक स्त्रीशीं निषिद्ध संबंध ठेवलेला आहेस."

ओएडिपसनें त्याबरोबर म्हाताऱ्यावर उलट आरोप केला कीं "माझा शालक क्रेऑन याच्याशीं तूं संगनमत केलं आहेस. त्याला माझी गादी हवी आहे. त्याला तुझीच साथ असली पाहिजे. म्हणूनच तूं माझ्याविरुद्ध असं अद्वातद्वा बोलायला धजतोस." यावर टेयिरेसियास उत्तरला: "राजा! तुला तुझे खरे आईबाप कोण आहेत हें ठाऊक नाहीं. तुझं जन्मरहस्य जर तुला कळलं तर तुला शरमेनं खालीं मान घालावी लागेल आणि तूं घाबरून जाशील."

ओएडिपसनें त्या म्हाताऱ्या भविष्यवेत्त्याला आणखीच सटकावलें नि सांगितलें: "सत्य काय आहे तें मला कळलं पाहिजे. मग त्यापायीं माझं कांहींहि झालं तरी चालेल." क्रेऑनविषयींचा त्याचा संशय या वादावादीमुळें आणखीच दृढ झाला. ओएडिपसनें आपल्या या शालकाचा कांटा काढण्याची धमकी दिली. परंतु राणी जोकास्टानें व नागरिकांनीं रदबदली करून त्याला शांत केलें आणि ओएडिपसनें क्रेऑनला हद्दपारीची शिक्षा फर्माविली.

आपला भाऊ क्रेऑन व आपला पति राजा ओएडिपस या उभयतांमधील शत्रुत्वामुळें राणी जोकास्टा हिला फार दुःख झालें. तिनें आपल्याजवळची सगळी माहिती राजाला सांगून टाकली. ती म्हणाली: "माझे दिवंगत पति राजे लाइयस यांना देववाणीकडून असं कळलं होतं कीं त्यांच्या स्वतःच्या अपत्या-कडूनच त्यांचा खून होईल. हें अपत्य त्यांना माझ्या पोटींच झालेलं असेल. परंतु राजे लाइयस यांचा खून त्यांच्या स्वतःच्या अपत्याकडून झालेला नाहीं याबद्दल माझी पक्की खात्री आहे. कारण तें अपत्य जन्माला आल्याबरोबर एका ओसाड डोंगराच्या उतारावर टाकून दिलं जावं अशी पक्की व्यवस्था झालेली होती."

मग जोकास्टाकडूनच ओएडिपसला कळलें कीं राजा लाइयस याचा खून दरवडेखोरांनीं केला. तीन रस्ते जिथें एका ठिकाणीं मिळतात अशा तिवाठ्यावर हा खून झाला. हा तिवाठा म्हणजेच फोसिस नगर, हें कळल्यावर तर त्याला

असा संशय येऊं लागला कीं खुद्द आपणच हा खून केला नसेल ना? परंतु आपला हा गुन्हा उघड करून सांगायला त्याची छाती होईना. आपण स्वतःच या खुनाच्या बाबतींत गुन्हेगार आहोंत याबद्दल त्याची अधिकाधिक खात्री होत चालली.

ओएडिपसनें आपली पूर्वपीठिका राणी जोकास्टा हिला सांगितली ती अशी: "माझी स्वतःची प्रथम अशी पक्की समजूत होती कीं मी कॉरिन्थनिवासी पॉलिबस आणि मेरोपे या दंपत्याचा मुलगा. पुढं मी एका मेजवानीला गेलों. तिथं एका इसमानं दारूच्या धुंदींत असतांना असं जाहीर करून टाकलं कीं 'तरुण ओएडिपस हा खरोखरी पॉलिबसचा मुलगा नव्हे.' हें ऐकून मी अगदीं अस्वस्थ झालों. मग मी अॅपोलो देवाकडे कौल लावायला गेलों. त्या वेळीं देववाणीनं मला असं सांगितलं कीं 'तूं मातागमनी होशील. स्वतःच्या आईशीं तुझा शरीरसंबंध होऊन तिच्या पोटीं तुला मुलं होतील; आणि तूं स्वतःच्या पित्याचा खून करशील.'

"हें ऐकल्यावर मी कॉरिन्थ नगरी सोडून दिली आणि एका तिवाठ्यावर आलों. तिथं एक माणूस रथांत बसलेला मला दिसला. त्यानं माझा अपमान केला. त्याबरोबर मी त्याला तिथच्या तिथं ठार केलं. त्याच्या बरोबर असलेल्या सगळ्या नोकरांनाहि मी ठार केलं. फक्त एक नोकर मात्र माझ्या हातून निसटला.

"त्यानंतर मी इथं थीब्ीस नगराला आलों. इथं सिंहाचं शरीर व स्त्रीचं डोकं असलेली स्फिंक्स ही राक्षसीण सगळ्यांना एक उखाणा घालत बसली होती. ज्याला त्या उखाण्याचं बरोबर उत्तर देतां येत नसेल त्याला ती लगेच ठार करीत होती. मलाहि या राक्षसिणीनं तो उखाणा घातला. उखाणा असा होता: दुपारच्या अगोदर चार पायांनीं चालणारं काय असतं? दुपारीं दोन पायांनीं चालणारं काय असतं आणि तिसरे प्रहरीं तीन पायांनीं चालणारं काय असतं? मी या उखाण्याचं बिनचूक उत्तर दिलं. मी सांगितलं कीं माणूस तान्हं बाळ असतांना चार पायांनीं चालतो, तरुणपणीं तो दोन पायांनीं चालतो आणि म्हातारपणीं तो काठीची मदत घेऊन चालतो. हें बिनचूक उत्तर दिल्याबद्दल मला या नगराचं राजपद मिळालं. आणि राजपदाबरोबर लाइयस राजाची राणी जोकास्टा म्हणजे तूंहि माझी राणी झालीस."

ओएडिपसला सगळा छडा लागेपर्यंत चैन पडेना. ज्या नोकरानें राजा लाइयस याला दरवडेखोरांनीं ठार केल्याची बातमी आणलेली होती, त्या

नोकराला बोलावणें धाडलें. राणी जोकास्टा त्याला एकसारखा धीर देत होती. ती म्हणाली : "या एकंदर प्रकरणाला तुम्ही काडीइतकंहि महत्व देऊं नका. देवावाणीनं सांगितलेलीं सगळींच भविष्यं खरीं ठरतात अशांतला मुळींच प्रकार नसतो."

तेवढ्यांत कॉरिन्थ नगराहून एक जासूद बातमी घेऊन आला कीं त्या नगराचा राजा पॉलिबस हा मृत्यु पावला असून ओएडिपस यालाच आतां कॉरिन्थ नगराचेंहि राजपद मिळालें आहे. पॉलिबसला आजारीपणामुळेंच मृत्यु आलेला होता. पॉलिबसचा पुत्र ओएडिपस याच्या हातून कांहीं त्याचा खून झालेला नव्हता. यामुळें ओएडिपस व जोकास्टा या दोघांचा जीव तेवढ्यापुरता तरी भांड्यांत पडला. ओएडिपसनें त्या जासुदाला सांगितलें कीं "मी जरी कॉरिन्थ नगराचा राजा झालों असलों तरी मी आतां तिकडे मुळींच येत नाहीं." कारण त्याला अशी भीति वाटत होती कीं न जाणो, आपण तिथें गेलों आणि आपली आई मेरोपे हिच्या पोटीं आपल्याला मुलें झालीं तर देववाणीनें सांगितलेलें भविष्य खरें ठरायचें. त्यापेक्षां तिकडे न गेलेलेंच बरें.

मग मात्र त्या जासुदानें खरा प्रकार उघड करून सांगितला. तो म्हणाला : "राजेसाहेब, तुम्ही खरोखरी पॉलिबस व मेरोपे यांचे चिरंजीव नाहीं. तुमच्या आईबापांचा कुणालाच पत्ता नव्हता. मी त्या वेळीं एक मेंढपाळ होतों. मला तुम्ही बेवारशी, टाकून दिलेल्या बालकाच्या अवस्थेंत मिळालांत. मीच तुम्हांला पॉलिबस राजाकडे नेऊन दिलं. खरं सांगायचं म्हणजे दुसऱ्या एका मेंढपाळानं तुम्हांला माझ्या हातीं सोपवलं होतं. आणि तो मेंढपाळ राजे लाइयस यांच्या घरचा नोकर होता."

या सगळ्या प्रकारांतलें भयंकर सत्य आतां राणी जोकास्टा हिच्या ध्यानांत आलें. तिनें सांगितलें कीं "आतां या गोष्टीची अधिक चर्चा नको. त्या जुन्या नोकराला भेटावंसं मला कांहीं वाटत नाहीं." परंतु ओएडिपस आतां हट्टालाच पेटला. परिणाम कांहींहि झाला तरी हरकत नाहीं, परंतु आपल्याला सगळा प्रकार कळलाच पाहिजे असा आग्रह धरून त्यानें त्या जुन्या नोकराला पुन्हां बोलावणें धाडलें.

कॉरिन्थहून आलेल्या जासुदानें त्या जुन्या नोकराला ओळखलें. मग त्या जुन्या नोकरानेंहि कबुलीजबाब दिला. तो म्हणाला : "राजेसाहेब, तुम्ही तान्हं

अर्भक असतांना राजे लाइयस यांनीं तुम्हांला माझ्या स्वाधीन केलं आणि सांगितलं कीं या अर्भकाला ठार मारून टाकायचं. परंतु मला तुमची दया आली. म्हणून मी तुम्हांला या कॉरिन्थनिवासी मेंढपाळाच्या स्वाधीन केलं."

खरा प्रकार आतां ओएडिपसच्या पूर्णपणें ध्यानांत आला. आपल्या हातून काय काय पापें घडलीं त्यांच्या जाणिवेनें त्याला वेड लागायचेंच काय तें बाकी राहिलें. तो तसाच राजवाड्यांत गेला. बघतो तों जोकास्टानें स्वतःच्या केसांचा गळफांस लावून घेऊन जीव दिलेला होता. त्यानें तिच्या छातीवरचे सोन्याचे ब्रूच (वस्त्र अडकावण्याचे कांटे) काढून घेतले आणि ते आपल्या डोळ्यांत खुपसून घेतले. तो मुद्दाम आंधळा झाला. हेतु हा कीं त्या भयानक भविष्यकथनाचीं दृश्य फळें निदान आपल्या डोळ्यांना तरी दिसूं नयेत. मग थीब्रीसनिवासी नागरिकांना उद्देशून तो म्हणाला : "लोक हो! मीच तुमच्या राजाचा मारेकरी. मीच स्वतःच्या जन्मदात्या आईशीं लग्न केलं. मी मात्रागमनी झालों."

तोंवर राजशालक क्रेऑन परत आलेला होता. त्यानें नोकरांना आंधळ्या ओएडिपसला परत राजवाड्यांत घेऊन जाण्यास सांगितलें. ओएडिपसनें क्रेऑनला सांगितलें: "मला थीब्रीस नगराच्या बाहेर घेऊन जा. अशा ठिकाणीं घेऊन जा कीं कुणाहि माणसाच्या मी पुन्हां कधींहि दृष्टीस पडूं नये. जोकास्टा राणीचे अंत्यसंस्कार नीटपणीं कर. आमच्या अनैसर्गिक लग्नापोटीं जन्माला आलेल्या मुलांमुलींचा नीट संभाळ कर." मग क्रेऑन त्या दुर्दैवी ओएडिपसला बरोबर घेऊन नगराबाहेर दूर गेला. आंधळ्या अवस्थेंत हालअपेष्टांचें व मानसिक यातनांचें परागंदा आयुष्य जगायला त्यानें त्याला तिकडेच सोडून दिलें.

अवर टाउन : आमचा गांव

वाङ्मयप्रकार : नाटक. *लेखक :* थॉर्न्टन वाइल्डर (१८९७-). *कथानकाचा प्रकार :* घरगुती अद्भुतरम्य कथा. *काळ :* १९११-१९१३. *स्थळ :* न्यू हॅम्पशायर. *पहिला प्रयोग :* १९३८.

प्रमुख पात्रें : **डॉ. गिब्ज**, एक वैद्यकविशारद. **मिसेस गिब्ज**, त्यांची पत्नी. **जॉर्ज** आणि **रेबेका**, त्यांचीं मुलें. **मिस्टर वेब**, एका वृत्तपत्राचे संपादक. **मिसेस वेब**, त्यांची पत्नी. **एमिली** आणि **वॉली**, त्यांची मुलें. **सायमन स्टिम्सन**, सामुदायिक प्रार्थनागीताचा दिग्दर्शक.

समीक्षण : या नाटकाला १९३८ ची अमेरिकेंतील उत्कृष्ट वाङ्मयकृति म्हणून पलिट्झर पारितोषिकाचा मान मिळाला. अमेरिकेंतील लहान गांवाचें प्रातिनिधिक चित्रण या नाटकांत केलेलें असून सीनसीनरीचा वापर त्यांत कमींत कमी ठेवलेला आहे. नाटकाचा एक सूत्रधार सगळ्या प्रवेशांमध्यें सतत रंगमंचावर हजर राहून त्यांतल्या बऱ्याचशा घटनांचा खुलासा करायला मदत करतो. जॉर्ज गिब्ज व एमिली वेब यांची हळुवार नि साधीसुधी प्रेमकथा हाच मुख्य धागा धरून त्याच्यावर कथानकाची उभारणी केलेली आहे.

कथानक : १९०१ सालीं एका भल्या पहाटेस डॉ. गिब्ज आपल्या घरीं परत आले. न्यू हॅम्पशायरमधील ग्रोव्हर्स कॉर्नर्स या गांवांत त्यांचें घर होतें. ते नुकतेच एका बाईची बाळंतपणांतून सुटका करून आलेले होते. तिला जुळीं झालीं. वाटेंत त्यांना सकाळचा पेपर टाकणारा ज्यो क्रॉमवेल हा पोऱ्या भेटला. दूधवाला होवी न्यूसम हाहि भेटला. ग्रोव्हर्स कॉर्नर्स विभागांत दिवसाच्या नित्यक्रमांना सुरवात झाली होती एकूण.

ते परत घरीं आले त्या सुमारास मिसेस गिब्ज यांनीं सकाळच्या न्याहारीची तयारी करून ठेवलेली होती. आईनें जॉर्ज व रेबेका या मुलांना न्याहारीला बोलावलें. न्याहारीनंतर दोन्हीं मुलें रस्त्यापलीकडे राहणाऱ्या वेब कुटुंबांतील वॉली व एमिली या बहीणभावंडांच्या दुसऱ्या जोडीबरोबर शाळेला गेलीं.

मुलें शाळेला निघून गेल्यावर मिसेस गिब्ज आपल्याकडे पाळलेल्या कोंबड्यांच्या पिल्लांचें दाणापाणी करायला बाहेर पडल्या. शेजारच्या मिसेस वेब आपल्या मागच्या अंगणांत दोऱ्यावर शेंगांचें वाळवण घालायला आलेल्या त्यांनीं पाहिल्या. तेव्हां त्या रस्ता ओलांडून त्यांच्याकडे गप्पा मारायला गेल्या.

उन्हें उतरलीं. मुलें शाळेंतून घरीं परत यायला लागलीं. एमिली वेब आपण कुणी तरी प्रतिष्ठित महिला आहोंत असा बहाणा करून एकटीच चालत घराकडे निघाली. जॉर्ज गिब्ज बेसबॉल खेळायला चालला होता. तो वाटेंत एमिलीशीं बोलायला मिळावें म्हणून थांबला. शाळेंतील तिच्या यशाचें आपल्याला किती कौतुक वाटतें हें त्यानें तिला सांगितलें. ती जेवढा वेळ घरीं करायला दिलेल्या अभ्यासावर खर्च करते तेवढा वेळ कुणालाहि अभ्यासासाठीं कसा काय देतां येत असेल याची आपल्याला तर कल्पनाच करवत नाहीं असें

त्यानें आग्रहानें प्रतिपादन केलें. या कौतुकानें एमिलीला अस्मान ठेंगणें वाटूं लागलें आणि तिनें जॉर्जला बीजगणिताच्या अभ्यासांत मदत देऊं केली.

जॉर्ज निघून गेल्यावर एमिलीनें धांवतच आपल्या आईला गांठलें नि विचारलें: "आई ग, मुलांना माझ्याकडे लक्ष देणं भाग पडावं इतकी सुंदर मी आहे का?" आईनें बरेच आढेवेढे घेत "तूं तितकी सुंदर आहेस" हें कबूल केलें, पण मग लगेच मिसेस वेब यांनीं एमिलीचें मन इतर विषयांकडे वळविण्याचा प्रयत्न केला.

त्या सायंकाळीं मिसेस वेब व मिसेस गिब्ज या दोघी जणी सामुदायिक प्रार्थनागीताच्या तालमींत गुंतलेल्या होत्या. त्या वेळीं वरच्या मजल्यावर जॉर्ज व एमिली आपापल्या घरीं अभ्यास करीत बसलीं होतीं. दोघांच्या खोल्यांच्या खिडक्या समोरासमोर होत्या. जॉर्जनें बीजगणितांतील कसल्याशा प्रश्नाबाबत एमिलीला हांक मारून सल्ला विचारला. एमिलीनें त्याला मदत केली खरी, परंतु तिला चांदण्याकडे बघण्यांत अधिक गोडी वाटत होती. मात्र जॉर्जला या गोष्टींत फारच माफक गोडी असल्याचें दिसलें.

गृहिणी सामुदायिक प्रार्थनागीताच्या तालमी उरकून घरीं परत चालल्या. वाटेनें जातां जातां त्या आपला दिग्दर्शक सायमन स्टिम्सन याच्याविषयीं बोलत होत्या. त्याचा बहुतेक सारा वेळ दारू पिण्यांतच जात असे. आणि, कां कुणास ठाऊक, पण लहानशा गांवांतल्या जीवनाशीं जुळतें करून घेणें त्याला कांहीं जमत नव्हतें. या सगळ्याचा शेवट कशांत होणार याचाच या महिलांना विचार पडलेला होता. मिस्टर वेब यांना देखील हाच विचार पडलेला होता. ते एका स्थानिक वृत्तपत्राचे संपादक होते. आणि ते घरीं येत होते तेव्हां त्यांना सायमन निर्जन रस्त्यांवरून भटकत असलेला वाटेंत भेटला.

हायस्कुलांतील ज्यूनियर वर्षाच्या अखेरीस जॉर्ज आपल्या वर्गाचा अध्यक्ष म्हणून निवडून आला आणि एमिली सेक्रेटरी-खजिनदार म्हणून निवडून आली. निवडणुकींनंतर जॉर्ज एमिलीबरोबर बोलत बोलत घरीं चालला होता. त्या वेळीं ती इतकी निर्विकार नि उदासीन दिसली कीं जॉर्जनें तिला तिच्या या वृत्तीबद्दल खुलासा विचारला. ती म्हणाली: "सगळ्या मुली तुला चढेल नि आंखडू समजतात. कारण तुला आपल्या मित्रमैत्रिणींविषयीं वाटणाऱ्या आस्थे-

पेक्षां बेसबॉलचीच आस्था जास्त वाटते. पुरुषांनीं कसं सर्वगुणसंपन्न असावं. जसे तुझे नि माझे बाबा आहेत तसं."

जॉर्ज म्हणाला: "पुरुषांना सर्वगुणसंपन्न होतां येत नाहीं. स्त्रियांना मात्र सर्वगुणसंपन्न होतां येतं. उदाहरणार्थ तूं." मग एमिली रडायला लागली. "मी मुळींच सर्वगुणसंपन्न नाहीं. माझ्यांत खूपच उणीवा आहेत," असें तिनें आग्रहानें प्रतिपादन केलें. मग जॉर्जनें सुचविलें: "चल आपण सोडा घेऊं या." दोघें सोडा पीत बसलीं तेव्हां त्यांना असें आढळून आलें कीं आपण बरेच अगोदरपासून एकमेकांना खरोखरीच आवडलों आहोंत.

आणखी थोडासा काळ गेल्यानंतर डॉ. आणि मिसेस गिब्ज यांना कळलें कीं हायस्कूलचें शिक्षण संपतांक्षणीं एमिलीशीं लग्न करायचा जॉर्जचा विचार आहे. पहिल्याप्रथम या गोष्टीमुळें त्यांना हादराच बसला. कारण जॉर्ज हा अजून पोरवयाच्या पलीकडे गेला आहे अशी त्यांना कल्पनाच करवेना. हा बायकोच्या पोटापाण्याची कशी तरतूद करणार, एमिलीला घर संभाळणें कसें काय जमणार, अशा अनेक काळज्या त्यांना वाटूं लागल्या. मग डॉ. आणि मिसेस गिब्ज यांना आपल्या स्वतःच्या वैवाहिक जीवनांतील आरंभींचीं वर्षें आठवलीं. त्यांना कांहीं त्रास कमी नव्हता झालेला, परंतु त्यांना मिळालेल्या संसारसुखाच्या आनंदानें त्यांच्या त्रासावर मात केलेली होती. त्यांनीं शेवटीं असें ठरविलें कीं जॉर्जची तशी इच्छा असेल तर त्यानें खुशाल एमिलीशीं लग्न करावें.

लग्नाच्या दिवशीं सकाळीं जॉर्ज मिस्टर आणि मिसेस वेब यांना भेटायला गेला. मिसेस वेब यांनीं सासरे-जांवयांना मुद्दाम एकांत मिळवून दिला. हेतू हा कीं आपल्या पतिराजांनीं जॉर्जला सल्ला मसलतीचे चार शब्द ऐकवावेत.

जॉर्ज निघून गेल्यावर एमिली आपल्या माहेरची शेवटची न्याहारी घ्यायला वरून खालीं आली. मायलेकी एकमेकींच्या गळ्यांत गळे घालून रडल्या. मिसेस वेब यांना आपल्या मुलीला वैवाहिक जीवनसंबंधांत कांहीं तरी सदुपदेश करावासा वाटत होता, पण त्यांना तो करायचा धीरच झाला नाहीं.

प्रार्थनामंदिरांत गेल्यावर, विवाह समारंभाच्या किंचित अगोदर, जॉर्ज व एमिली यांना असें वाटलें कीं आपण हें लग्न करतों आहोंत, यांत आपली कांहीं चूक तर नाहीं ना होत. परंतु प्रार्थना संगीत सुरू झाल्यावर दोघेंहि शांत झालीं. लग्नसमारंभ लवकरच समाप्त झाला.

नऊ वर्षें लोटलीं. १९१३ चा उन्हाळा आला. गांवाच्या वरच्या अंगाला असलेल्या स्मशानभूमींत भूतलावरील आपल्या काळज्यांतून मुक्त झालेले मृतात्मे आराम करीत पहुडलेले होते. तिथें आतां आणखी एका कबरीची भर पडली. एमिली बाळंतपणांत वारली आणि जॉर्ज बिचारा आपल्या चार वर्षांच्या मुलासह एकाकी उघडा पडला.

टेकडीवरील रस्त्यानें वळणें घेत नव्या कबरीकडे स्मशानयात्रा चालली असतांना पाऊस पडत होता. मग एमिली लाजत लाजत इतर मृतांच्या समोर हजर झाली. त्यांनीं गंभीरपणें तिच्या विश्रांतिस्थानावर तिचें स्वागत केलें. परंतु तिला विश्रांति नको होती. तिला आपल्या जीवनांतला आनंद पुन्हां उपभोगायला हवा होता. आपलें मृत्युलोकांतील जीवन एक दिवसापुरतें आपल्याला पुन्हां उपभोगायला मिळावें असा तिचा प्रयत्न चाललेला होता. तसें करणें शक्य होतें. परंतु इतर मृतांनीं तिला असला प्रयत्न न करण्याबद्दल आगाऊ इशारा देऊन ठेवला.

एमिलीनें मृत्युलोकांत एक दिवस राहायला येण्यासाठीं आपला बारावा वाढदिवस पसंत केला. असें पुन्हां लहानपण मिळाल्याबद्दल पहिल्या प्रथम तिला खूप खूप उत्साह वाटला. परंतु हा उत्साह झपाट्यानें ओसरला. भविष्यकाळीं आपल्यापुढें काय वाढून ठेवलेलें आहे हें एमिलीला अगोदरच ठाऊक असल्या-मुळें तिला त्या दिवसापुरता आनंद उपभोगतां आला नाहीं. आपण जिवंत असतांना जीवनांतली अर्थपूर्णता व नवलाई या बाबतींत आपण किती अनभिज्ञ होतों हें तिच्या ध्यानांत आल्यामुळें तिला असह्य दुःख झालें. सायमन स्टिम्सन आत्महत्या करून त्या स्मशानांत चिरविश्राम घ्यायला आलेला होता. तो तिला म्हणाला: "अग, जीवन मुळीं असतंच तसं. अज्ञान, आंधळेपणा आणि मूर्खपणा यांनीं भरलेला असाच तो काळ असतो." मेल्यानंतर देखील त्याची कटु मनोवृत्ति अजून तशीच राहिलेली होती.

एमिली आपल्या चिरविश्राम-स्थानाकडे परत आली. रात्र पडल्यावर जॉर्ज अत्यन्त शोकाकुल मनःस्थितींत तिथें आला आणि त्यानें एमिलीच्या कबरीवर अंग झोकून दिलें. तिला त्याची दया आली. इतर सगळ्याच जिवंत माणसांची तिला दया आली. कारण खुद्द जीवन ही केवढी दिव्य देणगी आहे याची खरी जाणीव या लोकांना जवळजवळ मुळींच नाहीं हें आतां तिला ठाऊक झालेलें होतें.

भारतीय ग्रंथ भवन

जगप्रसिद्ध अशा ७६० लेखकांच्या (यांत ३१ लेखक 'नोबेल प्राइझ' विजेते आहेत) उत्कृष्ट अशा १६०० कला-कृतींचा सारांशरूप परिचय **अमर विश्व साहित्य** मालेंतून क्रमशः आपणांस सादर होईल.

या निवडक कलाकृतींत कादंबरी, कथा, नाटक, काव्य, चरित्र, इतिहास, तत्वज्ञान, प्रवास, निबंध, लोककथा इत्यादि सर्व साहित्य-प्रकार आढळतील.

प्रस्तुत पांचव्या भागांत ॲडाम बीड, ॲलिस इन वंडरलॅंड, आना कारेनिना, द मर्चंट ऑफ व्हेनिस, अमेलिया, ॲन अमेरिकन ट्रॅजेडी, इत्यादि अमेरिकन, इंग्लिश, रशियन, फ्रेंच, जर्मन, नॉर्वेजियन अशा चौदा कादंबऱ्या, ग्रीक, इंग्लिश व अमेरिकन, अशीं सात नाटकें, एक लॅटिन महाकाव्य आणि एक इंग्लिश परीकथा अशा एकंदर तेवीस जगप्रसिद्ध ग्रंथांचे सारांश दिले आहेत.

मूल्य रु. ३-५०



अमर विश्व साहित्य